**( सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

**पृ.शी./मु.शी** : कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

श्री.राणा जगजितसिंह पाटील ( उद्योग राज्यमंत्री ) सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळाचा सन 2006-2007 व 2007-2008 चा अनुक्रमे पंचेचाळीसावा व सेहचाळीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उपसभापती** : वार्षिक अहवाल सभगृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

--

श्री.राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने मॅगनीज ओर (इंडीया ) लिमिटेड यांचा सन 2007-2008 चा 46वा वार्षिक अहवाल सभगृहासमोर ठेवतो.

**उपसभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

--

श्री.जयप्रकाश दांडेगावकर ( वस्त्रोद्योग राज्यमंत्री ) :सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मर्यादित, मुंबई यांचा सन 2003-2004 चा 32 वा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उपसभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री.जयप्रकाश दांडेगावकर :सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ मर्यादित, नागपूर यांचा सन 2006-2007 चा 36 वा वार्षिक अहवाल अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उपसभापती** :वार्षिक अहवाल सभगृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री.जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य वस्त्रोद्योग महामंडळ मर्यादितचा सन 2007-2008 चा 42 वा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उपसभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयप्रकाश दांडेगावकर :सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने मराठवाडा वस्त्रोद्योग महामंडळ मर्यादितचा सन 2007-20088 चा 38 वा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उपसभापती** :वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

-

श्री.सुरेश वरपुडकर ( कृषी राज्यमंत्री ) :सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महात्मा फुले कृषि विद्यापीठ , राहुरी यांचे सन 2000-2001 व 2001-2002 चे वार्षिक लेखे व परीक्षण अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उपसभापती** : वार्षिक लेखे व परीक्षण अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

-

श्री.चद्रकांत हंडोरे ( सामाजिक न्याय मंत्री ) :सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ, मर्यादित, मुंबई यांचे सन 1992-93, 1993-94, 1994-95 व 1995-96 चे वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उपसभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

-

श्री.रामनाथ मोते : 16 वर्षा नंतर वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

डॉ.दीपक सावंत : 1992 सालचा वार्षिक अहवाल आता सभागृहासमोर सादर केला जात आहे.

श्री.नितीन गडकरी :सभापती महोदय, या सबंधीची जबाबदारी विधिमंडळाची आहे. कोणा कोणाचे अहवाल येत नाहीत त्यांची नावे सभगृहात जाहीर केली पाहिजेत. ही नावे जाहीर करण्याचे काम विधिमंडळाचे आहे. इतक्या उशिराने अहवाल सादर करुन आमचा विश्वासघात केला जात आहे. आम्ही लोकप्रतिनिधी असतानासुध्दा 16 वर्षे वार्षिक अहवाल आम्हाला दिले जात नाहीत. ही माहिती आमच्या पासून दडवून ठेवली जात आहे. त्यामुळे आपले महत्व कमी झालेले आहे. तुम्हाला कोणीही घाबरत नाही. माननीय मंत्रिमहोदयांना बेंचवर उभे केले म्हणजे अहवाल वेळेवर येतील.

**उपसभापती** : ठीक आहे.

नंतर श्री.सुंबरे

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रविशेठ पाटील (पशुसंवर्धन व दुग्धविकास मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळ लिमिटेड, पुणे यांचा सन 2003-04 चा पंचविसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उपसभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री. रमेश शेंडगे : सभापती महोदय, ही जी महामंडळे आहत त्यांना त्यांच्या वाट्याचा निधी दिला जात नाही त्याबद्दलही आपल्याकडून शासनाला काही निर्देश देण्यात यावेत. सगळ्याच महामंडळांना योग्य न्याय दिला जावा यासाठी आपण शासनाला काही सूचना द्याव्यात अशी माझी आपणास विनंती आहे.

**उपसभापती** : ठीक आहे.

***

.... बी 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**आश्वासन समितीचा अहवाल सभागृहासमोर ठेवण्याबाबत.**

**उपसभापती** : मी सभागृहाला माहिती देऊ इच्छितो की, आजच्या कार्यक्रम पत्रिकेनुसार आता आश्वासन समितीचे अहवाल सभागृहाला सादर व्हावयाचे आहेत. आश्वासन समितीचे समिती प्रमुख सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त हे आहेत. त्यांच्या स्वीय सहाय्यकाकडून मला नुकतेच एक पत्र देण्यात आले आहे की, सन्माननीय सदस्य व आश्वासन समितीचे समिती प्रमुख श्री.संजय दत्त हे आज दुपारी 12.00 नंतर सभागृहात येणार आहेत तेव्हा त्यांना त्यावेळेस हे अहवाल सभागृहाला सादर करण्याची परवानगी दिली जावी. तरी मी ही बाब माननीय सभापतींच्या निर्णयासाठी पाठवितो. ..

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, ही कोणती नवी प्रथा आहे ? सदस्यांचे असे कोण स्वीय सहायक आहेत की जे माननीय सभापती/उपसभापती यांना पत्र पाठवून अशा प्रकारे विनंती करतात ? हा तुमचा, तुमच्या पदाचा, या सभागृहाचा देखील अवमान आहे. आता आमदार स्वत:च्या सहीचे पत्र देखील तुम्हाला द्यायला तयार नाहीत का ? खरे तर त्यांनी त्यांच्या स्वत:च्या सहीने हे पत्र दिले पाहिजे होते. कोणीही तुम्हाला कसेही वागवावयाचे आणि आपण त्याबद्दल कोणतीही प्रतिक्रिया व्यक्त करीत नाही हे आम्हाला बरोबर वाटत नाही. आम्हाला आपला अवमान सहन होत नाही. आम्ही तुमची, या सभागृहाची प्रतिष्ठा सांभाळतो म्हणूनच आम्हाला हे योग्य वाटत नाही. आमदारांचे स्वीय सहाय्यक तुम्हाला अशा प्रकारे पत्र पाठवितात हे बरोबर नाही.

**उपसभापती** : म्हणूनच मी हे पत्र माननीय सभापतींकडे पाठवितो आहे, तेच याबाबत निर्णय घेतील. आता यानंतर लक्षवेधी सूचना चर्चेला घेण्यात येतील.

***

...... बी 3 ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : नागपूर विभागातील गोसीखुर्द हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प पूर्ण होण्यात होत असलेली दिरंगाई.

**मु. शी.** : नागपूर विभागातील गोसीखुर्द हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प पूर्ण होण्यात होत असलेली दिरंगाई यासंबंधी सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, विनोद तावडे, केशवराव मानकर, रणजितसिंह मोहिते-पाटील, प्रा.फौजिया खान, सर्वश्री सतीश चव्हाण, जितेंद्र आव्हाड,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.नितीन गडकरी (नागपूर विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून) लाभक्षेत्र विकास मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"नागपूर विभागातील गोसीखुर्द या महत्वाकांक्षी सिंचन प्रकल्पास मार्च २००८ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात केंद्रीय वित्त मंत्री यांनी देशाचा अर्थसंकल्प सादर करतेवेळी लोकसभेत सदर गोसीखूर्द प्रकल्प हा राष्ट्रीय प्रकल्प म्हणून घोषित करण्यात आलेला असणे, नागपूर, भंडारा व चंद्रपूर या जिल्ह्यांमधील शेतकऱ्यांना वरदान ठरणाऱ्या गोसीखूर्द प्रकल्पाची प्रशासकीय किंमत ७,७७७ कोटी रुपयांपर्यंत गेली असणे, सदर प्रकल्प सन २०१३ पर्यंत पूर्ण करण्याचे आश्वासन देवूनही आजतागायत या प्रकल्पाचे फक्त २० टक्केच काम झालेले असणे, या प्रकल्पामध्ये एकूण २०० गावांची जमीन भूसंपादित करण्यात आली असून एकुण ८५ गावांचे पुनर्वसन करण्यात येणार असणे, या प्रकल्पामुळे त्या परिसरातील एकूण २,५०,८०० एकर जमिनींना सिंचन क्षमता पूर्ण होणार असून या प्रकल्पांतर्गत पुनर्वसनाच्या पहिल्या टप्प्यातील नागपूर जिल्ह्यातील अकरा पैकी फक्त तीन गावांचे तर भंडारा जिल्ह्यातील तीन पैकी एका गावाचे पुनर्वसन अर्धवट स्थितीत झाले असणे, सन २००८-०९ मध्ये या प्रकल्पावर १३०० कोटी रुपये खर्च करणार असल्याचे प्रस्ताव विभागाकडून शासनाला दिलेला असणे, परंतु अर्थसंकल्पात मात्र फक्त १०० कोटी रुपयांचा निधी दिला जाणे, जलसंपदा विभागाने विविध प्रकल्पांतर्गत पाणी साठा करण्यासाठी १००० कोटी रुपयाची तरतूद अर्थसंकल्पात दर्शवून त्यातून २२६ कोटी रुपये या प्रकल्पाला देण्याचे मान्य केले असताना आजतागायत फक्त १७ कोटी प्रत्यक्षात प्रकल्पाच्या कामास उपलब्ध करुन देण्यात आलेला

..... बी ४ ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गडकरी ....

असणे, राज्य शासन वेळेवर निधी देत नसल्याने या प्रकल्पाचे बांधकाम पूर्ण होणार की नाही असा प्रश्न सर्वसामान्य शेतकऱ्यांच्या मनात निर्माण झाला असणे, या प्रकल्पाचे काम पूर्ण करण्याकरिता शासन स्तरावर धोरणात्मक निर्णय घेण्याची गरज, शासनाने या प्रकल्पाच्या पूर्णत्वाकरिता आजतागायत केलेली दिरंगाई, परिणामी हा प्रकल्प पूर्ण होण्याकरिता शासनाकडून होत असलेला मोठा विलंब, याबाबत शासनाने तातडीने करावयाची उपयायोजना व शासनाची प्रतिक्रिया."

श्री. विजय वडेट्टीवार (जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून) लाभक्षेत्र विकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**<u>निवेदन</u>**

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...... बी 5 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( लक्षवेधी सूचनेवरील मा.जलसंपदा राज्यमंत्र्यांच्या निवेदनानंतर ....)

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, विदर्भातील सिंचनाच्यादृष्टीने सगळ्यात प्रतिष्ठेचा असा हा गोसीखुर्द प्रकल्प आहे, ज्याला इंदिरा सागर असेही नाव दिले गेले आहे. 1988 साली तत्कालीन पतप्रधान श्री.राजीव गांधी यांनी याचे भूमिपूजन केले होते. आज हा प्रकल्प 7,700 कोटी रूपयांवर पोहोचला आहे. सभापती महोदय, तत्कालीन पंतप्रधान या प्रकल्पाच्या भूमिपूजनास जेव्हा येथे आले होते त्यावेळी त्यांनी राजभवनावर एक पत्रकार परिषद घेतली होती त्यावेळेस त्यांनी दोन घोषणा केल्या. पैकी एक घोषणा अशी होती की, नागपूरचा विमानतळ मिहान कंपनीला एक महिन्याच्या आत हस्तांतरित करण्यात येईल आणि दुसरी घोषणा अशी होती की, गोसीखुर्द प्रकल्पास राष्ट्रीय प्रकल्प म्हणून मान्यता देण्यात येईल. मला वाटते देशाच्या पंतप्रधानांचे या देशात ऐकले जाते. पण प्रत्यक्षात अनुभव वेगळाच येतो आहे. सभापती महोदय, आज या लक्षवेधी सुचनेवर उत्तर देण्यासाठी जलसंपदा विभागाचे कॅबिनेट मंत्री येथे उपस्थित असायला पाहिजे होते. पण ते नेमके अशा महत्त्वाच्या चर्चेच्या वेळीच येथे येत नाहीत. आता माननीय राज्यमंत्री यावर उत्तर देणार आहेत. ते नवीन आहेत, नागपूर विभागातील आहेत. त्यांनी सुरूवातीस या प्रकल्पासाठी खूप काम केले आहे. पण आता ते सरकारमध्ये राज्यमंत्री म्हणून बसले आहेत. खरे म्हणजे त्यांच्यात काही स्वाभिमान असेल तर त्यांनी यापूर्वी या संदर्भात जी कृती केली आहे ती योग्य होती. पण आताया बाबतीत मंत्री म्हणून ते काही बोलणार आहेत की नाही ? म्हणूनच मी या ठिकाणी एक दोन प्रश्न विचारणार आहे. हा प्रकल्प राष्ट्रीय प्रकल्प आहे म्हणून केंद्र सरकारचे नोटिफिकेशन निकाले आहे काय ? हा माझा पहिला प्रश्न आहे. नसेल तर का निघाले नाही ? आणि किती वर्षांपासून ही बाब पेंडींग आहे ? दुसरा प्रश्न म्हणजे एआयबीपी चा रेशिओ काय आहे? 28 टक्के केंद्र सरकारचे आणि 72 टक्के राज्य सरकारचे असा यात वाटा होता. या वर्षी बजेटमध्ये यासाठी 326 कोटी आहेत. केंद्र सरकारने आपला हिस्सा दिला आहे. ...

( यानंतर श्री. सरफरे ..... सी 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी...

गेल्या सहा महिन्यापासून विदर्भातील सर्वात मोठया प्रकल्पाचे काम बंद आहे हे खरे आहे काय? म्हणून माझा प्रश्न आहे की, या प्रकल्पाला राष्ट्रीय मान्यतेचे नोटिफिकेशन निघाले काय? केंद्र सरकारचे पैसे मिळाल्यानंतर राज्य शासनाचे 82 कोटी रुपये आपण दिले नाहीत. त्यामुळे यावर्षी या प्रकल्पासाठी 326 कोटी रुपये मंजूर आहेत. मी आपणास सांगतो की, या विषयावर आम्ही आपणास बिल्कुल सहकार्य करणार नाही. आजच्या आज या प्रकल्पाला पैसे दिले पाहिजेत. माननीय राज्यपालांची या प्रकल्पाला मान्यता मिळाली असे आम्ही खूप दिवस ऐकत आहोत. तुमचे एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर आणि सेक्रेटरी यांना शिपायासारखे अधिकार आहेत. त्यांना विचारले की, प्रोव्हिजन करणार की नाही तर ते दादांना विचारुन सांगतो, दादा म्हणतील तर चहा पितो, दादा म्हणतील तर जेवण करतो, दादा म्हणतील तर मान्यता देतो. हे कुठले अधिकारी आहेत? त्यांची औकात काय आहे? या प्रकल्पाची फाईल माननीय राज्यपालांकडे केव्हा मूव्ह झाली, त्याचा मी स्वत: फॉलोअप केला. याबाबत माननीय सदस्य प्रा. बी.टी. देशमुख यांच्याशी माझे मतभेद झाले. मी त्यांच्यावर नाराज झालो. माननीय मंत्री डॉ. सुनील देशमुख यांनी मला फाईल आणून दाखविली, मी त्यांच्यावर नाराज झालो. मी त्यांना म्हटले की, तुम्ही आमच्या नागपूर आणि अमरावती विभागामध्ये फरक करता आमच्या प्रकल्पाचे काम बंद करता. त्यांनी मला फाईल आणून दाखविली आणि म्हणाले की, तुम्ही म्हणत आहात ते सर्व रिमार्क यावर आपण लिहा. यामध्ये माझा काहीही दोष नाही. या प्रकल्पाचे काम गेल्या सहा महिन्यापासून बंद आहे. हे 326 कोटी रुपये मंजूर आहेत त्यामध्ये राज्य सरकारच्या हिश्याचे पैसे द्यावयाचे आहेत ते अजून दिले नाहीत.आज हे सभागृह संपण्यापूर्वी या बाबतीत आपण किती पैसे रिलिज करणार ते सांगा. नाहीतर कॅबिनेट मंत्री माननीय श्री.अजितदादा पवार यांना आपण बोलवा. आम्ही टरक्यामाईसीनच्या गोळया घेणार नाही. मला आपले उलटे उत्तर ऐकावयाचे नाही. हा सूर्य आणि हा जयद्रथ हे समोरासमोर झाले पाहिजे.

श्री. विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी नागपूर विभागातील दोन-तीन जिल्हयांना वरदान ठरणारा गोसीखुर्द प्रकल्प आणि त्या भागातील जवळपास अडीच लाख हेक्टर सिंचन क्षेत्राच्या संदर्भात ही लक्षवेधी सूचना आणली आहे. खरे म्हणजे या प्रकल्पाची मुहूर्तमेढ स्वर्गीय या देशाचे तत्कालीन युवा पंतप्रधान श्री.राजीव गांधी यांनी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ MMP/ KGS/

श्री. विजय वडेट्टीवार.....

केली होती. खरे म्हणजे मुळात हा प्रकल्प वेळेत पूर्ण व्हावयास पाहिजे होता. या माननीय सदस्यांच्या मताशी मी सहमत आहे. परंतु या प्रकल्पाच्या क्षेत्रामध्ये अनेक वन क्षेत्र होते. या प्रकल्पाच्या धरणाचे जळ जवळ 98 टक्के काम पूर्ण झाले आहे, आणि पाणी अडविण्याचे....

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी विचारलेल्या दोन-तीन महत्वाच्या प्रश्नांची उत्तरे मंत्रिमहोदयांनी दिली पाहिजेत.

श्री. विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून या प्रकल्पाची माहिती सभागृहाला दिली पाहिजे.

प्रा. बी. टी. देशमुख : या प्रकल्पाची माहिती सभागृहाला आहे. जे तीन प्रश्न विचारण्यात आले आहेत त्यांचे उत्तर आपण दिले पाहिजे.

श्री. दिवाकर रावते : माजी पंतप्रधान कै. राजीव गांधी यांनी काय केले ही माहिती आम्हाला नको....

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, आम्हाला टरक्यामायसीनच्या गोळया देऊन तुम्ही कसे मूर्ख बनविले आहे हे माहीत आहे. तुम्ही याठिकाणी काय बोलले आहात ते दहा वेळा जरा आठवा. जी वस्तुस्थिती आहे ती सांगा नाहीतर कॅबिनेट मंत्र्यांना बोलवा.

श्री. विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी सभागृहासमोर लक्षवेधी सूचनेच्या रुपाने विदर्भाचा प्रश्न मांडला आहे. त्यामुळे या प्रकल्पाची माहिती विदर्भातील लोकांना दिली पाहिजे. हे सांगण्याचा माझा उद्देश आहे.

श्री. दिवाकर रावते : ही वस्तुस्थिती सर्वांना माहिती आहे, आणि कै. राजीव गांधी यांनी काय केले ते सर्वांना माहीत आहे.आपण पैसे केव्हा देणार ते सांगा?

श्री. विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, या प्रकल्पाचे राष्ट्रीय प्रकल्प म्हणून नोटिफिकेशन निघाले काय? असा प्रश्न विचारण्यात आला आहे. त्यामुळे विचारण्यात आलेल्या सर्व प्रश्नांची मी उत्तरे देणार आहे. जी वस्तुस्थिती आहे ती सांगणार आहे, नसेलतर सांगणार नाही. याठिकाणी वस्तुस्थिती काय आहेते सांगत आहे. यामध्ये असत्य सांगत आहे अशातला भाग नाही.

(यानंतर श्री. बरवड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विजय वडेट्टीवार .....

हा प्रकल्प राष्ट्रीय प्रकल्प म्हणून घोषित करण्याची घोषणा तत्कालीन वित्तमंत्री श्री. पी. चिदंबरम यांनी केली. त्यानंतर आताचे विद्यमान माननीय पंतप्रधान याच्याकडे वित्त विभाग असून त्याचे नोटिफिकेशन निघण्यासंबंधीचा प्रस्ताव त्यांच्याकडे आहे. प्रस्तावाला मान्यता देण्यासंबंधी पंधरा दिवसांपूर्वी एक बैठक झाली परंतु वित्त विभागाचे सचिव हे जम्मू आणि काश्मीरमध्ये ऑब्झरव्हर म्हणून गेले होते त्यामुळे ते बैठकीला उपस्थित नव्हते.

श्री. नितीन गडकरी : या गोष्टीला किती वर्षे झाली ? आपण याबाबत समर्थन करीत आहात. माननीय पंतप्रधान हे श्री. विलास मुत्तेमवार यांच्याबरोबर आले होते त्यावेळी घोषणा केली होती. दीड वर्षापूर्वी ही घोषणा केली.

श्री. विजय वडेट्टीवार : घोषणेला दीड वर्ष झालेले नाही. सात महिन्यांपूर्वी राष्ट्रीय प्रकल्प म्हणून माननीय पंतप्रधानांनी घोषणा केली. हा प्रकल्प राष्ट्रीय प्रकल्प व्हावा म्हणून माननीय मुख्यमंत्र्यांनी माननीय पंतप्रधानांना आठ दिवसांपूर्वी पत्र पाठविले आहे. त्यांनी त्यांना सर्व वस्तुस्थिती सांगितली आहे. माननीय मुख्यमंत्री श्री. अशोक चव्हाण साहेबांनी माननीय पंतप्रधानांना पत्र पाठवून विदर्भातील जनतेच्या भावना कळविलेल्या आहेत. हा प्रस्ताव आता पंतप्रधान कार्यालयामध्ये आहे. माझा जो अधिकार आहे तेवढीच माहिती मी सांगेन. माननीय पंतप्रधान कार्यालयातील मंत्री श्री. पृथ्वीराज चव्हाण यांच्याशी बोलण्याचा प्रयत्न केला परंतु बोलणे होऊ शकले नाही. या प्रकल्पाबाबत आमच्या-तुमच्या सर्वांच्या भावना तीव्र आहेत. माझ्या कमांड एरियामध्ये तो प्रकल्प येतो त्यामुळे मलाही त्या प्रकल्पाची चिंता आहे. चंद्रपूर जिल्ह्याचा बराच भाग त्या प्रकल्पामुळे सिंचनाखाली येणार आहे. चंद्रपूर, भंडारा, नागपूर भागात या प्रकल्पामुळे मोठ्या प्रमाणावर सिंचन होणार आहे. त्यामुळे या प्रकल्पाबाबत माझ्याही भावना तीव्र आहेत. आपण विदर्भातील नेते आहात, महाराष्ट्राचे नेते आहात. विदर्भातील दोन तीन जिल्ह्यातील परिस्थिती आपल्याला माहीत आहे म्हणून आपल्या भावना तीव्र आहेत. मी सुध्दा या राज्याचा राज्यमंत्री झाल्यानंतर माझी प्रायोरिटी म्हणून मी या प्रकल्पाकडे लक्ष केंद्रित केले आहे. या प्रकल्पासाठी तातडीने निधी उपलब्ध व्हावा, हा प्रकल्प तातडीने मार्गी लागावा अशी माझी भावना आहे. राज्य

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MMP/ KGS/

श्री. विजय वडेट्टीवार .....

शासनाचा जो वाटा आहे त्याबाबत अर्थसंकल्पामध्ये 326 कोटी रुपये तरतूद होती आणि त्यापैकी 99.27 कोटी रुपये मिळालेले आहेत आणि खऱ्या अर्थाने डिसेंबर पर्यंत 70 टक्के निधी रिलीज व्हावयास पाहिजे होता.

श्री. नितीन गडकरी : मग तो निधी का दिला नाही ?

श्री. विजय वडेट्टीवार : 129 कोटी रुपये जे मिळावयाचे आहेत ते तातडीने 15 दिवसांच्या आत रिलीज करण्यासंबंधीची फाईल माननीय वित्त मंत्र्यांकडे आहे आणि हे 129 कोटी रुपये आम्ही पंधरा दिवसाच्या आत रिलीज करणार आहेत.

श्री. नितीन गडकरी : माननीय वित्तमंत्री या ठिकाणी बसलेले आहेत. आपण आम्हाला टरकॅमायसिनच्या गोळ्या देऊ नका. माजी मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमुख यांनी चार वेळा पत्र पाठवले आहे तरीही काही होत नाही. हे अधिवेशन संपण्याच्या आधी यासंदर्भातील आदेश काढण्यात येईल काय ? याबाबत 'होय' किंवा 'नाही' असे सांगावे. नाही तर पुढचे कामकाज होणार नाही. यामध्ये काय अडचण काय आहे. अर्थमंत्री या ठिकाणी बसलेले आहेत.

श्री. विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी माझे उत्तर पूर्णपणे ऐकून घ्यावे. त्यांचे समाधान होत नसेल तर नंतर त्यांनी पुढची स्टेप घ्यावी. माझे उत्तर मला पूर्णपणे मांडू द्यावे.

प्रा. बी. टी. देशमुख : जे कामाचे नाही तेच माननीय मंत्रिमहोदय बोलत आहेत.

श्री. नवाब मलिक : सभापती महोदय, आपण विधान परिषदेमध्ये कामकाज करीत असताना सन्माननीय सदस्याने प्रश्न उपस्थित केल्यानंतर त्याचे उत्तर देण्याची संधी माननीय मंत्रिमहोदयांना दिली पाहिजे. त्यांचे उत्तर पूर्ण झाल्यानंतर उपप्रश्न विचारण्याची संधी सन्माननीय सदस्यांना आहे. सन्माननीय मंत्रिमहोदयांचे उत्तर पूर्ण झाल्यानंतर सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांना आपण प्रश्न विचारण्याची संधी दिल्यानंतर ते उपप्रश्न विचारतील. माननीय मंत्रिमहोदयांच्या उत्तरामध्ये अडथळा निर्माण करणे बरोबर नाही.

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, प्रश्नाचे उत्तर सोडून ते बाकीचेच बोलत आहेत.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( विरोधी पक्षातील तसेच सत्तारुढ पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य उभे राहून एकाच वेळी बोलत असतात.)

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, माननीय राज्यमंत्री महोदयांकडून ठामपणे उत्तर येत नसल्यामुळे ही लक्षवेधी सूचना राखून ठेवावी. शासनाने सभागृहात अनेक वेळा असत्य आश्वासने दिलेली आहेत. आजही मंत्रिमहोदय आमच्यावर अन्याय करणारे भाष्य करीत आहेत.

प्रा.बी.टी.देशमुख : मंत्रिमहोदयांनी 15 दिवसात पैसे रिलीज करण्याचे कौतुक आम्हाला सांगू नये. त्यांनी आजच्या आज याबाबतचा निर्णय जाहीर करावा.

**उपसभापती** : दोन्ही सन्माननीय सदस्यांनी कृपया खाली बसावे.

( सन्माननीय सदस्य सर्वश्री नितीन गडकरी व दिवाकर रावते हे सभापतींच्या आसनाजवळ जाऊन त्यांना कागदपत्रे दाखवितात. )

**उपसभापती** : मी सभागृहात वारंवार विनंती केल्यावरही दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य माझे ऐकण्याच्या मन:स्थितीत नसतात. आपण ही प्रथा कायम ठेवणार असाल तर मी स्वत: येथे बसणार नाही. मी उभा राहिल्यानंतरही दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य कामकाज करण्याऐवजी आरडाओरड करण्यात मश्गुल असतात. (अडथळा) मी येथे कामकाज गुंडाळण्यासाठी बसलेलो नाही. माननीय मंत्री महोदय उत्तर देत असताना सन्माननीय सदस्यांनी त्यांचे उत्तर ऐकून घेतले पाहिजे. त्यांच्या उत्तरानंतर आपल्याला पुन्हा प्रश्न विचारण्याचा हक्क आहे. परंतु सभागृहात आरडाओरड होत असेल तर येथे बसणा-या पीठासीन अधिका-यांनाही कामकाज चालविणे अवघड होते. मी सर्व सन्माननीय सदस्यांना संरक्षण देतो, पण मला कोणी संरक्षण देणार आहे काय ?

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, होय. आम्ही आपल्या शब्दाबाहेर नाही. आपण आमच्या व्यथा समजून घ्याव्या. या प्रश्नावर या सभागृहामध्ये आतापर्यंत 35 वेळा चर्चा झाली आहे, वेळोवेळी शासनाकडून आम्हाला आश्वासनांशिवाय काहीच मिळालेले नाही. माननीय पंतप्रधान डॉ.मनमोहन सिंग यांनी दीड वर्षापूर्वी प्रेस कॉन्फरन्समध्ये असे म्हटले होते की, "Irrigation is a pressing need of the region. Indira Sagar and Goshikhurd are close to the heart of the people of Nagpur and Vidharbha. It's foundation was laid by the late Shri Rajiv Gandhiji. I request the Government of Maharashtra to

...2/-



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ MMP/

Shri Nitin Gadkari contd...

speed up the work on the project and we will provide all necessary assistance from the Government of India for the speedy completion of this project." त्यानंतर आमच्या उपस्थितीमध्ये माननीय केंद्रीय मंत्री श्री.विलास मुत्तेमवार, माननीय राज्यमंत्री श्री.विजय वडेट्टीवार यांनी माननीय पंतप्रधानांना भेटून विनंती केली आहे. या प्रकल्पाला राष्ट्रीय प्रकल्प म्हणून मान्यता मिळालेली असल्याने निधी मिळेल असे वाटले होते, पण तसे झाले नाही. केंद्र सरकारकडून राष्ट्रीय प्रकल्प म्हणून नोटिफिकेशन निघत नाही, त्यामुळे केंद्र सरकारचा पैसा मिळत नाही. राज्य सरकारने या प्रकल्पासाठी 326 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. त्यापैकी पहिला 99 कोटींचा हप्ता रिलीज केला. त्यात राज्य सरकारचा 82 कोटींचा हिस्सा आहे. केंद्र सरकारकडून 16.87 कोटी रुपये मिळाले आहेत. पण अर्थसंकल्पात 82 कोटींची तरतूद केलेली असताना त्यापैकी किती पैसा रिलीज केला ते माननीय राज्यमंत्र्यांनी सांगावे. या प्रकल्पामुळे अडीच लाख हेक्टर क्षेत्र ओलिताखाली येणार आहे. यासंदर्भात मी माननीय मंत्री महोदयांना अनेक वेळा फोन केले आहेत, विभागाच्या सचिवांना फोन केले आहेत.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MMP/ KGS/ पूर्वी श्री. खंदारे 10:25

(श्री. नितीन गडकरी ...

मग आमच्या समोर सांगितले की, सन्माननीय सदस्य प्रा. बी.टी.देशमुख यांना समजवा, माननीय राज्यमंत्री महोदय डॉ.सुनील देशमुखांना समजवा. सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या निर्देशानुसार या प्रकल्पासाठी आम्ही पैसे मागत असताना ते दिले जात नाहीत. सन्माननीय राज्य मंत्री महोदय डॉ. सुनील देशमुख हे माझे विद्यार्थी मित्र आहेत. ते, डॉ. श्रीकांत जिचकार आणि मी, आम्ही एकत्र कॉलेजमध्ये होतो. मी डॉ. सुनील देशमुख यांच्यावर नाराज झालो. त्यानंतर त्यांनी माझ्‍या घरी येऊन मला फाईल दाखविली आणि सांगितले की माझे काही ऑब्जेक्शन नाही. या प्रकल्पाला कोणाचेही ऑब्जेक्शन नाही. सर्व गोष्टी क्लिअर आहेत. मी तीन महिन्यापासून सचिवांना फोन केला, माननीय मंत्री महोदयांना चार वेळा फोन केला. काम 6 महिन्यांपासून बंद आहे. माननीय राज्यमंत्री महोदय, श्री. विजय वडेट्टीवार हे त्याच मतदारसंघात राहातात. त्यांनी छातीवर हात ठेवून हा प्रकल्प 6 महिन्यापासून बंद आहे की नाही ते सांगावे. हा राष्ट्रीय प्रकल्प घोषित करुन केन्द्राने आपल्या तोंडाला पाने पुसली. राष्ट्रीय प्रकल्प घोषित केल्यानंतर त्या संदर्भात अद्याप नोटिफिकेशन निघालेले नाही. जे हिश्श्याचे पैसे आहेत ते देण्यासाठी माननीय राज्यपालांनी मान्यता दिलेली आहे. त्यावर फक्त वित्त मंत्र्यांची सही व्हायची आहे. सभापती महोदय, आता तीन महिन्या नंतर पावसाळा सुरु होईल. पावसाळ्यामध्ये सिंचन प्रकल्पाची कामे होत नाहीत. आता जर कामाला सुरुवात झाली तर तीन महिन्यामध्ये कामाला गती येईल. या प्रकल्पाची किंमत 7,777 कोटी रु. झालेली आहे. सर्व डेड इन्व्हेस्टमेण्ट झालेली आहे. या प्रकल्पामुळे अडीच लाख हेक्टर जमीन पाण्याखाली येणार आहे. येथील लोकांचे भविष्य बदलणारा हा प्रकल्प आहे. मला माहीत आहे की, माननीय वित्त मंत्री श्री. दिलीप वळसे-पाटील हे त्यांच्या कॅबिनमध्ये बसलेले आहेत. निधी वितरणासाठी माननीय राज्यपालांची मान्यता आहे, मंत्र्यांची मान्यता आहे, प्रस्ताव तयार आहे आणि आम्ही येथे फक्त तडफडून मरतोय. माझी विनंती आहे की, आपण या प्रकल्पाचे काम तातडीने सुरु करण्यासाठी पैसे रिलिज करा. या गोष्टी माननीय राज्यमंत्री महोदयांच्या अधिकारात नसतील तर माननीय मंत्री महोदयांना बोलवा, तोपर्यन्त ही लक्षवेधी राखून ठेवा. सभापती महोदय, कोणत्याही राज्यमंत्र्यांना अधिकार नाहीत. केवळ मंत्र्यांनाच अधिकार आहेत....(अडथळा) ...सभापती महोदय, या प्रकल्पाला राज्य सरकारने केलेली प्रोव्हिजन ताबडतोबीने देण्याच्या





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MMP/ KGS/ पूर्वी श्री. खंदारे 10:25

(श्री. नितीन गडकरी....)

संदर्भात हे अधिवेशन समाप्त होण्याच्या आत ऑर्डर काढण्यात येईल काय ? दुसरा प्रश्न असा आहे की, केन्द्राला केवळ पत्र पाठवून काही होणार नाही. तेव्हा माननीय राज्यमंत्री महोदयांना मी सांगू इच्छितो की, या प्रकल्पाचे नोटिफिकेशन काढण्याच्या संदर्भात त्यांनी हे अधिवेशन संपल्याबरोबर माननीय मुख्यमंत्री श्री. अशोक चव्हाण साहेबांना घेऊन दिल्लीला जावे आणि माननीय केन्द्रीय मंत्री श्री. पृथ्वीराज चव्हाण यांच्या समवेत माननीय पंतप्रधानाना भेटावे. हा माननीय राज्यमंत्री महोदयांच्या प्रतिष्ठेचा विषय आहे. तेव्हा मी पुनश्च विचारतो की, हे अधिवेशन संपल्याबरोबर आपण दिल्लीला जाल का आणि पैसे रिलिज कराल का ?

श्री. विजय वडेट्टीवार : सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी सभागृहामध्ये विस्तृत माहिती ठेवलेली आहे. या प्रकल्पावर मार्च 2008 पर्यन्त रु.2548 कोटी खर्च झालेले आहेत. सन्माननीय सदस्यांनी दिल्लीला जाण्यासंबंधी सांगितले. आम्ही सुध्दा हे अधिवेशन संपण्याची वाट पहात आहोत. सन्माननीय सदस्यांप्रमाणे आमच्याही भावना आहेत. 70 टक्के निधी देण्याच्या संदर्भात फाईल मुव्ह झालेली आहे.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.विजय वडवेट्टीवार...

दुसरी गोष्ट अशी आहे की, या प्रकल्पाची कामे तातडीने व्हावीत म्हणून 146 कोटी रुपये उसने घेतले. तसेच अतिरिक्त 1 हजार कोटी रुपये जलसंपदा विभागास मिळाले आहेत, त्यातील जास्तीत जास्त निधी या प्रकल्पाच्या कामासाठी उपलब्ध करुन देण्याचा जलसंपदा विभागाचा प्रयत्न आहे. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी सांगितले की, गेल्या सहा महिन्यापासून या प्रकल्पाचे काम बंद आहे. याबाबतीत मी खुलासा करु इच्छितो की, सदरहू प्रकल्पाचे काम गेल्या आठ ते दहा दिवसापासून बंद आहे. सदर प्रकल्पाचे काम बंद राहू नये म्हणून 100 कोटी रुपये रिलीज केलेले आहेत. त्यामुळे तेथे काम सुरु झालेले आहे. पावसाळयात दोन,तीन महिने काम बंद होते आणि पावसाळयात काम बंद राहणे हे स्वाभावीकच आहे.या ठिकाणी मी अतिशय सत्य माहिती देत आहे. मी कोणत्याही प्रकारची चुकीची माहिती देत नाही. मी सभागृहाच्या निदर्शनास एक गोष्ट निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, माननीय मुख्यमंत्र्यांनी या प्रकल्पाच्या कामास गती मिळावी म्हणून संयुक्त बैठक बोलाविली आहे. या बैठकीस माननीय वित्त मंत्री, जलसंपदा मंत्री, वित्त विभागाचे प्रधान सचिव, जलसंपदा विभागाचे प्रधान सचिव, तसेच दोन्ही विभागांचे राज्यमंत्री यांना निमंत्रित केले आहे. गोसीखूर्द प्रकल्पाबाबत त्या बैठकीत सविस्तर चर्चा होणार आहे. सदर प्रकल्प राष्ट्रीय प्रकल्प म्हणून घोषित करण्यात यावा व या प्रकल्पाच्या कामास गती मिळावी म्हणून माननीय मुख्यमंत्री यांच्या नेतृत्वाखाली आम्ही माननीय पंतप्रधानांना दिल्ली येथे भेटावयास जाणार आहोत. या भेटीच्या वेळी माननीय जलसंपदा मंत्री देखील समवेत असतील.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, सोमवारी या प्रकल्पाच्या अनुषंगाने माननीय मुख्यमंत्र्यांनी संयुक्त बैठक आयोजित केली आहे. त्या बैठकीत कोणते महत्वाचे निर्णय घेण्यात आले, यासंबंधीचे निवेदन या सभागृहात सन्माननीय मंत्री महोदयांनी सोमवारी करावे अशा आपण सूचना द्याव्यात.

**उपसभापती** : यासंदर्भात सोमवारी बैठक घेतली जाणार आहे, त्यात काय निर्णय झाले यासंबंधीचे निवेदन माननीय मंत्री महोदयांनी सोमवारी सभागृहात करावे अशी मी सूचना देतो.

श्री. विजय वडवेट्टीवार : ठीक आहे. आपल्या सूचनेचे निश्चितपणे पालन करण्यात येईल.

--------

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**लक्षवेधी सूचना क्रमांक 2 पुढे ढकलण्याबाबत**

**उपसभापती** : लक्षवेधी सूचना क्रमांक 2 पुढे ढकलण्यात आलेली आहे.

-------------

3...

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>**लक्षवेधी सूचना क्रमांक 3 संबंधी**</u>

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री जितेंद्र आव्हाड, रणजितसिंह मोहिते-पाटील, लक्ष्मण जगताप, राजेंद्र जैन, डॉ.वसंत पवार हे आतापर्यंत सभागृहात उपस्थित होते. आपण लक्षवेधी सूचना क्रमांक तीन पुकारण्यापूर्वी ते सभागृहाच्या बाहेर गेले. लक्षवेधी सूचना विचारलेली असताना अशा पध्दतीने सभागृहाच्या बाहेर निघून जाणे ही गोष्ट बरोबर नाही. असे प्रकार या सभागृहात वारंवार होतात. असे प्रकार होऊ नयेत म्हणून आपण दक्षता घ्यावी अशी माझी आपणास विनंती आहे.

**उपसभापती** : या लक्षवेधी सूचनेवर सन्माननीय सदस्य श्री. भास्कर जाधव यांचे नाव आहे. त्यांनी लक्षवेधी सूचना पुकारावी.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, ही लक्षवेधी सूचना पुकारण्यासाठी मला थोडा अवधी देण्यात यावा अशी माझी आपणास विनंती आहे.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री. भास्कर जाधव यांना सदर लक्षवेधी सूचनेवरील निवेदन कदाचित नुकतेच प्राप्त झाले असेल, त्यामुळे ते निवेदन त्यांनी वाचले नसेल. सन्माननीय सदस्यांना निवेदन वाचण्यासाठी त्यांना मी थोडा अवधी देतो. निवेदन वाचल्याशिवाय ते उपप्रश्न विचारु शकत नाही. त्यामुळे ही लक्षवेधी सूचना नंतर घेण्यात येईल.

--------

4...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : कल्याण (जि.ठाणे) येथील नॅशनल रेयॉन कंपनीतील कर्मचा-यांना पगार व इतर सुविधा न मिळणे

**मु. शी.** : कल्याण (जि.ठाणे) येथील नॅशनल रेयॉन कंपनीतील कर्मचा-यांना पगार व इतर सुविधा न मिळणे यासंबंधी श्री. जयप्रकाश छाजेड, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.जयप्रकाश छाजेड (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांव्दारा निर्वाचित ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय कामगार मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"कल्याण (जि.ठाणे) येथील रॅशनल रेयॉन कंपनीतील 4200 कामगारांपैकी कामागर कंपनीच्या वसाहतीत राहणा-या 1500 कामगारांना गेल्या 11 महिन्यापासून पगार न मिळणे तसेच त्यांना देण्यात येणा-या सुविधा बंद करण्यात आल्या असून भविष्य निर्वा निधी,एलआयसीसाठी कापलेल्या रकमेचाही कंपनीने भरणा न करणे, कंपनी व्यवस्थापनाने कामगारांना नाहक त्रास देऊन वसाहतीतील घरे रिकामी करण्याची बजावलेली नोटीस, यावरुन कामगारांची कंपनीकडून पिळवणूक होत असल्याचे निदर्शनास येणे, परिणामी कामगार वर्ग व त्यांचे कुटुंबिय आर्थिक अडचणीत सापडून त्यांच्यात पसरलेले तीव्र चिंतेचे व भितीचे वातावरणश कंपनी मालक व व्यवस्थापनाबद्दल निर्माण झालेली चिडीची भावना ा, कामगारांना आवश्यक असणा-या राज्य कामगार विमा योजना, भविष्य निधी तसेच बंद करण्यात आलेल्या सोयीसुविधा पुन्हा सुरु करण्याची गरज, यावर शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही. "

श्री.नितीन राऊत ( कामगार राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

5...



ABG/ MMP/ KGS/ प्रथम श्री. शिगम 10:30

श्री.जयप्रकाश छाजेड : सभापती महोदय, कल्याण जि.ठाणे येथील नॅशनल रेयॉन कंपनी स्वातंत्र्यपूर्व काळापासून सुरु झाली आहे. या कंपनीमध्ये 5 हजार कामगार काम करीत आहेत. या लक्षवेधी सूचनेसंबंधी कामगार विभागाने निवेदन वितरित केले आहे, त्या अनुषंगाने मी दोन,तीन उपप्रश्न या ठिकाणी विचारणार आहे. या कंपनीतील कामगारांना मार्च, 2008 पासून पगार दिलेला नाही. त्यामुळे त्या कामगारांचा संसार उद्‌ध्वस्त होत आहे. त्या कामगारांचा संसार उद्‌ध्वस्त होऊ नये, तसेच त्यांना संसार चालविण्यासाठी काही पर्यायी कामे देण्याबाबत कंपनीला शासनाकडून भाग पाडले जाईल काय ? या कंपनीतील कर्मचा-यांना मार्च,2008 पासून पगार दिले गेले नाहीत. त्यांना पगाराची रक्कम न देता उलट त्या कंपनीच्या निवासस्थानात जे कर्मचारी राहतात, त्यांच्याकडून निवासस्थाने खाली करुन घेण्याची प्रक्रिया कंपनी व्यवस्थापनाने सुरु केलेली आहे. त्या कामगारांना कंपनीच्या निवासस्थानातून बाहेर काढू नये तसेच त्या कर्मचा-यांची पगाराची थकित रक्कम तातडीने देण्यात यावी या अनुषंगाने कंपनी व्यवस्थापकांना बोलावून घेऊन त्यासंबंधी शासनाकडून तातडीने सूचना दिल्या जातील काय ?

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्रमांक-4........

श्री.नितीन राऊत : सभापती महोदय, सदर कारखाना सुरळीत चालावा, कारखान्याचे आधुनिकीकरण व्हावे व कामगारांची देणी दिली जावी म्हणून संघटनेच्या मान्यतेनुसार कामगारांची देणी देण्यासाठी लेबर कोर्टाची एन.ओ.सी. मिळविली आहे. व्यवस्थापनाने केडीएमसीच्या पाणीपुरवठ्याची देणी द्यावयाची आहेत. ओपन लँडला टॅक्स लावू नये म्हणून ॲग्रीमेंट झालेले असताना केडीएमसीने टॅक्स लावला म्हणून व्यवस्थापनाने कोर्टात दावा दाखल केला आहे. ही बाब न्यायप्रविष्ठ झाल्यामुळे सदर प्रकरण प्रलंबित आहे.

--------------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**लक्षवेधी सूचना क्र.2 पुढे ढकलण्यासंबंधी**

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, लक्षवेधी सूचना देणारे सन्माननीय सदस्य सर्वश्री एस.क्यू.जामा, चरणसिंग सप्रा हे सभागृहात उपस्थित नाहीत. परंतु हा विषय अत्यंत महत्वाचा आहे. 300 कामगार उपोषणाला बसलेले आहेत.

श्री.नवाब मलिक : सभापती महोदय, आज सभागृहाच्या कामकाजाचा अतिरिक्त दिवस निश्चित केलेला आहे. त्यामुळे काही माननीय सदस्य आज नागपूरमध्ये उपस्थित नाहीत. ही लक्षवेधी सूचना आज चर्चेला घेता येत नसेल तर ती पुढे ढकलण्याबाबत शासनाची हरकत नाही.

श्री.नितीन गडकरी : लोक उपोषणाला बसलेले आहेत.

**उपसभापती** : आजच्या कामकाज पत्रिकेतील अनुक्रमांक-2 वरील लक्षवेधी सूचना सोमवार, दिनांक 29 डिसेंबर, 2008 रोजी चर्चेला घेण्यात येईल.

-----------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : मुंबईतील विविध पब्जमध्ये तरुणवर्गाकडून सर्रास केले जाणारे अंमली पदार्थाचे सेवन

**मु. शी.** : मुंबईतील विविध पब्जमध्ये तरुणवर्गाकडून सर्रास केले जाणारे अंमली पदार्थाचे सेवन यासंबंधी सर्वश्री जितेंद्र आव्हाड, रणजितसिंह मोहिते पाटील, लक्ष्मण जगताप, राजेंद्र जैन, डॉ.वसंत पवार, सर्वश्री भास्कर जाधव, रमेश शेंडगे, श्रीमती उषाताई दराडे, प्रा.फौजीया खान, श्रीमती मंदा म्हात्रे, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.जितेंद्र आव्हाड (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय गृहमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्यात रिसॉर्ट तसेच पबमध्ये सर्रासपणे अंमली पदार्थांचे सेवन करुन रेव्ह पार्ट्यांचे आयोजन करण्यात येत असल्याची नोव्हेंबर, २००८ मध्ये उघडकीस आलेली धक्कादायक माहिती, मुंबईतील जुहू येथील बॉम्बे ७२ डिग्री या पबमध्ये दिनांक १९ नोव्हेंबर, २००८ रोजी अंमली पदार्थविरोधी पथकाने टाकलेल्या धाडीमध्ये शेकडो तरुण-तरुणींनी अंमली पदार्थांचे सेवन केलेले असल्याचे निष्पन्न होणे, यापूर्वी पुणे, मुंबई परिसरामध्ये टाकण्यात आलेल्या धाडीमध्ये महाविद्यालयीन तरुण-तरुणींना अंमली पदार्थांचे सर्रास सेवन केले जात असल्याचे उघडकीस येणे, याबाबत संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचे दुर्लक्ष होत असल्याने तरुण पिढीची वाममार्गाने वाटचाल सुरु असणे, शासनाने वेळीच हस्तक्षेप करुन कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया."

श्री.नितीन राऊत (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून जो मुद्दा उपस्थित केला आहे त्याला विविध पैलू आहेत. अंमली पदार्थाचे सेवन करणे हे गैर आहे. परंतु पबवर घातलेल्या धाडीमध्ये पकडल्या जाणाऱ्या मुला-मुलींचे चित्रीकरण करुन त्याची प्रसिध्दी केली जाणे हे त्याहून गैर आहे. तरुण तरुणींना वाममार्गापासून दूर करण्याचे काम समाजातील परिपक्व माणसांनी करावयाचे आहे. 18 ते 20 वयोगटातील तरुणवर्गाला अंमली पदार्थाच्या सेवनापासून दूर करण्यासाठी, त्यांचे पुनर्वसन करुन त्यांना समाजातील मुख्य प्रवाहात आणण्याचे काम सरकारच्या माध्यमातून झाले पाहिजे. पबवर धाडी टाकायच्या, खबऱ्यांच्या माध्यमातून धाडी टाकल्यानंतर पकडल्या जाणाऱ्या तरुणांचे चित्रीकरण करायचे आणि ते सगळे चित्रीकरण चॅनेल्सना वाटायचे. जी मुले ड्रग्ज घेतात त्यांच्याबाबत जरुर कारवाई व्हावी. परंतु ज्यांनी ड्रग्ज सेवन केले नाही त्यांची नाहक बदनामी होते. हे अंमली पदार्थ येतात कुठून? जे अधिकारी यासंबंधी कारवाई करण्यास जातात त्यावेळी व्हिडिओ चित्रीकरणाचे साहित्य कुठून उपलब्ध होते? या सर्व प्रक्रियेबाबत परिपक्व विचार करुन अंमलबजावणीचा कार्यक्रम आखला जाईल काय?

श्री.नितीन राऊत : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जितेंद्र आव्हाड यांनी जो मुद्दा उपस्थित केला त्याबद्दल मी एवढे सांगू इच्छितो की, ज्या प्रकारे सदर प्रकरणास प्रसिध्दी दिली जाते त्यावर निश्चितपणे उपाययोजना करुन थांबविण्यात येईल.

श्री.जितेंद्र आव्हाड : 'बॉम्बे 72 डिग्री' या पबवर धाड टाकल्यानंतर 100 मुला-मुलींना अटक झाली. त्यांच्या चेहेऱ्यांची व्हिडिओग्राफी करुन त्याला टी.व्ही.वर प्रसिध्दी दिली जाते. त्यातील 4 मुलांनी ड्रग्जचे सेवन केले असेल, परंतु ज्यांनी सेवन केले नाही त्यांच्या पालकांवर, त्यांच्या कुटुंबावर काय आघात होत असतील? या तरुण पिढीला सुधारावयाचे असेल तर त्यांची जाणीवपूर्वक बदनामी करुन त्यांना सुधारता येणार नाही. शासनाचा हेतू काय आहे? या पिढीला सुधारावयाचे आहे की प्रसिध्दी साधायची आहे?

(नंतर श्री.खर्चे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जितेंद्र आव्हाड .....

म्हणून याबाबतीत शासन परिपक्व असा विचार करुन यातून मार्ग काढणार आहे की, प्रसिध्दीलोलूप अधिकाऱ्यांच्या हातात हे काम सोपवून बाजूला होणार आहे ?

श्री. नितीन गडकरी : महोदय, सन्माननीय सदस्य श्री. जितेंद्र आव्हाड यांनी अतिशय महत्वाचा प्रश्न उपस्थित केला आहे. कायदा असा सांगतो की, 99 गुन्हेगार सुटले तरी चालतील परंतु एका निरपराध्याला शिक्षा होता कामा नये. याप्रकरणी मला मुलींचे आई-वडिल त्यावेळेस येऊन भेटले होते. ते संपूर्ण खोटे होते असे मी म्हणणार नाही पण किमान आपल्याला, या तरुण मुला-मुलींना जीवनातून उठविणे योग्य नाही, याचाही विचार करणे आवश्यक आहे. म्हणून अशा प्रकरणांमध्ये प्रसिध्दीपासून लांब राहून निरपराध्यांचा बळी जाता कामा नये. यासाठी अशा पार्ट्यांचे चित्रीकरण बंद केले पाहिजे, ते शासन करणार काय ?

श्री. विनोद तावडे : सन्माननीय सदस्यांनी जरी नाव घेतले नसले तरी मी श्री. विश्वास नांगरे पाटील नावाचा अधिकारी, सिंहगडच्या पायथ्याशी झालेल्या रेव्ह पार्टीच्या संदर्भात या अधिकाऱ्याचे नाव घेतो. कारण मुंबईतील थर्ड डिग्री पार्टी, लोणावळ्याचे तर नित्याचेच झाले आहे. परंतु या नांगरे पाटलांना प्रसिध्दीची फारच हौस आहे. परवा देखील ताज हॉटेलमध्ये झालेल्या चकमकीची सी.डी. काढली आणि ती वाटत सुटले. मी कसे काम करतो हे दाखवून देत होते. त्यावेळेस ते बोलत आहेत की पळत आहेत हेच समजत नव्हते. म्हणून स्पेसिफिक अशा अधिकाऱ्यांना शासनाने समज दिली पाहिजे. तसेच केव्हा तरी पोलीस खात्यासाठी एखादा नियम केला पाहिजे की, कंट्रोल रुममध्ये स्पोक पर्सन असताना दुसऱ्या अधिकाऱ्याने मिडियासमोर काहीच बोलायचे नाही, कारण अशा प्रकारे कोणताही अधिकारी मिडियासमोर जाऊन बोलत राहिला तर त्यामुळे समाजात एक प्रकारे चुकीचा मेसेज जातो. म्हणून शासन हे थांबविणार काय ?

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जी सूचना केली त्यासंदर्भात मलाही सांगायचे आहे की, हे पोलीस अधिकारी स्पोक पर्सन असताना मिडियासमोर बोलतात ते देखील अशुध्द स्वरुपातील हिंदी भाषेतून बोलत असतात. महाराष्ट्रात मराठी बोलणे कंपल्सरी असताना सुध्दा हिंदीतून बोलतात, त्यांना समज देण्यात यावी.

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन राऊत : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री जितेंद्र आव्हाड, नितीन गडकरी, विनोद तावडे आणि दिवाकर रावते यांनी ज्या भावना व्यक्त केल्या त्यांचा निश्चितच सन्मान करण्यात येईल. जे अधिकारी अशा प्रकारे प्रसिध्दीमागे लागत असतील त्यांना समज देण्यात येईल. तसेच त्यांच्यावर प्रतिबंधात्मक कारवाई सुध्दा केली जाईल. यानंतर पोलीस खात्यातील कुठलाही अधिकारी सर्रासपणे जाऊन पब्लिसिटी करण्यासाठी कुठलेही वक्तव्य करणार नाही तर ठराविक स्पोक पर्सनच्या माध्यमातूनच मिडियाला माहिती दिली जाईल.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री. जितेंद्र आव्हाड यांनी अत्यंत महत्वाच्या विषयाबाबत लक्षवेधी सूचना उपस्थित केली आहे. या निमित्ताने मला देखील शासनाच्या निदर्शनास आणून द्यावयाचे आहे की, साधारणपणे पोलीस यंत्रणेची भूमिका म्हणजे गुन्ह्यांवर नियंत्रण ठेवणे अशी असते.....

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** ...

सरसकट सर्व पोलीस वाईट आहेत किंवा सर्व पोलीस फार चांगले आहेत अशातला भाग नाही. या विषयाच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री. गडकरी तसेच सन्माननीय सदस्य श्री. तावडे यांनी सुध्दा यासंदर्भात आपले विचार व्यक्त केलेले आहेत. या ठिकाणी हा विषय उपस्थित झाला म्हणून एक गोष्ट मी आपल्या निदर्शनास आणणार आहे त्याची आपण जरुर नोंद घेऊन त्यावर कारवाई करा. सिंहगडच्या रेव्ह पार्टीचा आपण येथे उल्लेख केलेला आहे. त्या काळात बरेच पालक या प्रकरणात आमच्या मुलांचा काही संबंध नाही यासाठी आपल्या मुलांच्या मदतीसाठी गेले होते. त्यातील एक भयानक घटना अशी आहे की, अंमली पदार्थाचे सेवन केल्यामुळे या तरुणांना अटक करुन मेडीकलसाठी डॉक्टरांसमोर नेण्यात आले. या मुलांचे ब्लड घेतल्यानंतर त्याचा रिपोर्ट घ्यावयाचा असतो त्यावेळी पोलिसांनी जेवढया लोकांना अटक केली होती त्यातील ब-याच लोकांनी अंमली पदार्थाचे सेवन केलेले नव्हते. परंतु असे असतांनाही त्यांना डॉक्टरांपुढे नेण्यात आले, त्या ठिकाणच्या डॉक्टरांना पोलिसांनी धमक्या दिल्या, काही डॉक्टरांना पैशाचे आमिष दिले गेले. या लोकांनी अमली पदार्थाचे सेवन केले आहे अशा प्रकारचे सर्टिफिकेट घेण्यात आले. ही सत्य घटना आहे हे मी या चेअरवरुन जबाबदारीने सांगत आहे. पोलीस जर अशाच प्रकारचे काम करीत असतील तर पुढची पिढी बरबाद झाल्याशिवाय राहणार नाही असे मला वाटते. जे नालायक आहेत त्यांना तुम्ही 100 वेळा फाशी द्या परंतु जे निरपराध आहेत त्यांच्या बाबतीत असे घडणे हे महाराष्ट्राच्या परंपरेला शोभेसे नाही. ही घटना घडून गेली परंतु या घटनेतील वास्तव अजूनही कायम आहे. यासंदर्भातील सत्यता आपण जरुर पडताळून पहावी. रेव्ह पार्टीची सीआयडी मार्फत चौकशी झाली आहे. यामध्ये करोडो रुपयांचा भ्रष्टाचार झालेला आहे परंतु त्याची साधी चौकशी सुध्दा झाल्याचे आढळलेले नाही. या ठिकाणी मी जबाबदारीने बोलतो आहे. या प्रकरणात ज्यांना अटक करण्यात आलेली आहे त्या सर्वांचे जाबजबाब घ्यावयास सांगा. त्यातील किती लोक जबाबदार होते, किती लोक निरपराध होते, त्यांना कोणत्या डॉक्टरांकडे नेण्यात आले, डॉक्टरांना कशा धमक्या दिल्या, कोणत्या डॉक्टरांकडून सर्टिफिकेट्स घेतली या सर्वांचे आपण स्टेटमेंट घ्या. या प्रकरणातील वास्तव आणि सत्यता बाहेर आली पाहिजे. या विषयावर अजूनही काही सन्माननीय सदस्य आपले विचार मांडतील. जसे एखाद्या विषयात एखाद्या प्रोफेसराने डॉक्टरेट पदवी घ्यावी

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** ...

तशी रेव्ह पार्टी पकडणे हा काही कोण्या एकाचा अधिकार नाही. त्यामुळे रेव्हपार्टीच्या संदर्भात आता मोनोपली व्हावयास लागलेली आहे त्या अनुषंगाने ज्या ज्या लोकांना त्रास होत आहे याची गंभीर दखल शासनाने घ्यावयास पाहिजे होती परंतु ती दखल शासनाने का घेतली नाही याची मला कल्पना नाही. अशा प्रकरणामुळे तरुण पिढी बरबाद होऊ नये यासाठी उपाययोजना करणे आवश्यक आहे परंतु ज्यांनी खरोखरच असे काही केले नसेल त्यांना अमली पदार्थाच्या प्रकरणात भरडणे, त्यांच्याकडून पैसे वसूल करणे, धाकदपटशा दाखवणे हे काही बरोबर नाही. या प्रकरणातील ब-याचशा गोष्टी मी या फ्लोअरवरुन बोलू शकत नाही. तुमची आणि माझी शरमेने खाली जाईल अशा गोष्टी त्या ठिकाणी घडलेल्या आहेत. त्या गोष्टी मला येथे बोलणे देखील शक्य नाही. परंतु .... माझ्या तोंडातून या प्रकरणाच्या संदर्भात शब्द सुध्दा फुटत नाही. पण अशा मंडळींच्या बाबतीत आपण निश्चितपणे, अत्यंत सावधपणे योग्य ती कारवाई करावी अशी मी आपणास सूचना करतो.

श्री. नितीन राऊत : सभापती महोदय, या ठिकाणी आपण ज्या भावना व्यक्त केल्या आहेत....

**उपसभापती** : मला अजून एक गोष्ट समजत नाही की, अशा पार्ट्यांच्या वेळेस चित्र वाहिन्या आपोआप कशा काय पोहचतात ?

श्री. नितीन राऊत :सभापती महोदय, मला सुध्दा मुलं,मुली आहेत. हा जो काही प्रकार चालतो त्या प्रकाराच्या संदर्भात मला सुध्दा फार मोठी चिंता आहे. मी आपणास सांगू इच्छितो की, रेव्ह म्हणजे रेव्हलरी, हंगामा, चिंता मुक्ती असा रेव्ह पार्टीचा अर्थ आहे. मी आपणास सांगू इच्छितो की, पहिल्या टप्प्यात या ठिकाणी ज्या लोकांना अटक करण्यात आली त्यासंदर्भात पहिल्यांदा आम्हाला 119 अहवाल प्राप्त झाले होते व त्यातील 109 लोक पॉझिटीव्ह निघाले. दुस-या टप्प्यात 44 अहवाल प्राप्त झाले त्यातील 36 लोक पॉझिटीव्ह निघाले. एकंदर 246 पैकी 163 लोकांचे अहवाल प्राप्त झाले असून त्यातील 146 लोक पॉझिटीव्ह निघाले. सभापती महोदय, हा विषय अत्यंत संवेदनशील आहे.

यानंतर श्री. अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन राऊत........

या संवेदनशील विषयाची चौकशी एस.ई.पी. यांच्या मार्फत करण्यात येईल. नार्को टेस्ट करण्याबाबत केंद्र सरकारच्या ज्या सूचना आहेत त्या सर्व राज्यांना लागू आहेत....

**उपसभापती** : पुणे येथे झालेल्या रेव्ह पार्टीची सी.आय.डी.मार्फत चौकशी करणार काय ? या रेव्ह पार्टीत अनेक निरपराधांवर खोटे गुन्हे दाखल केलेले आहेत.

श्री.नितीन राऊत : सभापती महोदय, या संदर्भात चौकशी करण्याचे निर्देश दिलेले आहेत.

श्री.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, पुणे येथे झालेल्या रेव्ह पार्टीमध्ये किती लोक सामील होते, पहिल्या 24 तासांत किती जणांचा रिपोर्ट प्राप्त झाला ? अमली पदार्थ आणि दारु या दोन वेगवेगळ्या गोष्टी आहेत. तेव्हा किती जणांनी अमली पदार्थांचे सेवन केल्याचे निष्पन्न झाले ? तसेच रेव्ह पार्टीमध्ये पकडलेल्या लोकांचे चित्रिकरण करण्यास बंदी आणणार काय ?

श्री.नितीन राऊत : सभापती महोदय, हवेली,जि.पुणे येथील पोलीस स्टेशनमध्ये दोन गुन्हे दाखल झाले. त्याचा सी.आर.नं.12 आहे. यामध्ये एकूण 15 जणांना अटक झाली असून त्यांच्यावर चार्जशीट दाखल झालेल्या आहेत. नार्कोटेस्ट विभागाने स्पेशल कोर्टात केस दाखल केली आहे. त्याबाबत चौकशी सुरु आहे.

श्री.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, रेव्ह पार्टीत पकडलेल्या लोकांचे चित्रिकरण झाले होते त्यामध्ये जवळपास 300 लोक दिसत होते. असे असताना फक्त 15 जणांवर गुन्हा दाखल झ ाला. याचा अर्थ बाकीचे 285 लोक निरपराध होते. तेव्हा आपण अशा चित्रिकरणावर बंदी आणणार आहात काय ?

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. हिंगोली मध्ये गणपतीची मिरवणूक निघाली असताना गुलाल उधळल्याच्या नावाखाली 350 शिवसैनिकांना अटक झाली होती. ही अटक श्री.के.एल.प्रसाद यांच्या सांगण्यावरुन झाली होती. त्यांनी व्हीडिओ चित्रिकरण पाहून अमुक याला पकडा, तमुक याला पकडा असे आदेश देऊन शिवसैनिकांची धरपकड सुरु होती. हा प्रकार वीस दिवस सुरु होता. केवळ व्हीडिओ चित्रिकरणावरुन शिवसैनिकांना पकडण्यात आले असेल तर रेव्ह पार्टीत टाकलेल्या धाडीमध्ये जवळपास 300 लोक हाते असे चित्रिकरणावरुन दिसते. तेव्हा त्या लोकांना व्हीडिओ चित्रिकरणावरुन का पकडण्यात आले नाही ?

..2..

श्री.नितीन राऊत : सभापती महोदय, मी अगोदर सांगितलेले आहे की, यासंबंधी चौकशीचे निदेश दिलेले आहेत.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, संघटीत स्वरुपाचा गुन्हा घडलेला आहे. याठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.जितेंद्र आव्हाड आणि अन्य सदस्यांनी अशाप्रकारच्या पडलेल्या धाडीचे चित्रिकरण करण्यात येऊ नये असे सांगितले. मी पुढे असे सांगेन की, चित्रिकरणाबरोबर रेव्ह पार्टीत पकडलेल्या लोकांचे वर्तमानपत्रात फोटो छापून येतात त्यावरही बंदी आणली पाहिजे. आपण अतिरेकी किंवा दरोडेखोऱ्यांना पकडल्यानंतर त्याची आयडेन्टीटी कळू नये म्हणून न्यायालयात हजर करताना त्याच्या तोंडावर बुरखा घालतो.

यानंतर श्री.गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ KGS/ D/ KTG/ MMP/ प्रथम श्री.शिगम 10.55

डॉ.नीलम गो-हे ...

या प्रकरणात माननीय उपसभापतींनी शासनाला निदेश दिले आहेत. ती चांगली गोष्ट आहे. या घटनेमध्ये चरस आणि अंमली पदार्थ पुरविणारे जे सूत्रधार आहेत त्यांच्यावर श्री. नांगरे पाटील किंवा अन्य जे कोणी अधिकारी आहेत त्यांनी कोणती कारवाई केली होती ? असा मला माननीय मंत्रिमहोदयाना प्रश्न विचारावयाचा आहे. आमचा अनुभव असा आहे की , दोन्ही बाजूनी पैशाची देवाणघेवाण होत असते. अंमली पदार्थाची विक्री आणि मुलींचे व्यवहार होत असताना कोणी तरी बातमी लिक करतात आणि तोच या पैशाच्या व्यवहारात भागीदार असतो ही वस्तुस्थिती आहे. या निवेदनामध्ये समन्वय समितीच्या सभासदाचा उल्लेख केलेला आहे. तेव्हा त्यांच्या मार्फत रेव्ह पार्टीमध्ये अंमली पदार्थ पुरविणा-या किती लोकांच्या विरुध्द कारवाई करण्यात आली होती.? सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांनी प्रश्न विचारत असताना प्रवक्त्याचा उल्लेख केला होता. तेव्हा काय बोलावयाचे यासंबंधी या प्रवक्त्यालासुध्दा प्रशिक्षण देण्याची आवश्यकता आहे.ब-याच वेळी पीडित व्यक्तीच्या चौकशीतील जे कच्चे दुवे असतात त्यासंबंधीच्या बातम्या हे प्रवक्ते मिडियाकडे पोहोचवत असतात. तेव्हा ट्रायल बॅन्ड मिडिया व्हावयाचे नसेल तर या प्रवक्त्यांना एस.पी. कडून किंवा कमिशनरांकडून मार्गदर्शन देण्यात आले पाहिजे. कोणत्या प्रकारची त्यांनी माहिती प्रसार माध्यमांना दिली पाहिजे हे त्यांना सांगितले गेले पाहिजे. त्याचबरोबर आपण चॅनल्सवर बंधने आणू शकत नाही. आपण फक्त त्यांना एवढेच सांगू शकतो की, आतमध्ये येऊन अशा प्रकारचे चित्रिकरण करता कामा नये. परंतु पेज थ्रीमध्ये दाखविले आहे की सगळी झाकपाक करुन टाकावयाची आणि जणू काही काहीच प्रसंग धडलेला नाही. कोणी धाड टाकली, कसली धाड टाकली याबाबतीत काहीच कळत नाही. म्हणून या घटने मधील व्यक्तिचा चेहरा दाखविण्यात येत असतो अर्थात ही वाईट गोष्ट असली तरी धाड पडली आहे ही माहिती मिडियाच्या मार्फत, वाहिन्यांच्या मार्फत मिळाली पाहिजे परंतु त्यावर पूर्ण बंदी आणणे योग्य होणार नाही असे माझे मत आहे. तेव्हा याबाबतीत माननीय मंत्री महोदय खुलासा करतील काय ?

श्री.नितीन राऊत : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जो प्रश्न उपस्थित केला होता त्याबाबतीत मी त्यांना सांगू इच्छितो की, अंमली पदार्थ बाळगणा-या एकूण 8 आरोपीना अटक करण्यात आली असून त्यात हॉटेलचे जनरल मॅनेजर, मॅनेजर , कॅशिअर होते . मिडियाचे स्वतंत्र अस्तित्व आहे आणि मिडियावाल्यांनी चित्रिकरण करु नये असे आदेश त्याना देण्यात आलेले आहेत. त्यामुळे सन्माननीय सदस्यानी पुन्हा पुन्हा तोच प्रश्न विचारता कामा नये.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव :सभापती महोदय , या हॉटेलमध्ये अंमली पदार्थ विकणारे एकूण 15 जण होते.असे लक्षवेधी सूचनेच्या निवेदनात म्हटलेले आहे. हे अमली पदार्थ काही खुले आम विकले जात नाहीत. अंमली पदार्थ विकण्यामध्ये मोठी रिस्क असते. 15 जण हॉटेलमध्ये अंमली पदार्थ विकण्यासाठी येतात. त्या हॉटेल मालकाची त्यास संमती असल्याशिवाय , या ठिकाणी अमली पदार्थ विकले जाऊ शकतात याची खात्री असल्याशिवाय त्याचबरोबर येथे अमली पदार्थ विकल्यानंतर आपल्याला कोणत्याही प्रकारचा धोका नाही यासबंधी त्यांना पूर्णपणे संरक्षण असल्याशिवाय अमली पदार्थ विकणारे लोक त्या हॉटेलमध्ये जाणार नाहीत. जवजवळ अंमली पदार्थ विकणारे 15 लोक तेथे गेले होते याचा अर्थ त्या हॉटेलचे मालक आणि त्यांचे चार भागीदार अंमली पदार्थ विकणा-यांना संरक्षण देणारे आहेत. म्हणूनच त्यांनी अशा प्रकारचे धाडस केलेले आहे. निवेदनाच्या पहिल्या परिच्छेदामध्ये सुध्दा हॉटेलच्या नावाचा उल्लेख केलेला आहे त्यामुळे अंमली पदार्थ विकणा-यां बरोबरच हॉटेलचे मालक आणि त्यांचे चार भागिदार यांनी 15 जणांना संरक्ष्‍ण दिलेले असावे. त्याचबरोबर हा व्यवसाय ते फार पूर्वीपासून करत असले पाहिजे. म्हणूनच या हॉटेलचे मालक आणि त्यांच्या चार भागीदाराविरुध्द अंमली पदार्थ विरोधी कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल केलेला आहे काय आणि केला नसेल तर तो गुन्हा दाखल करणार आहात काय ?

श्री.नितीन राऊत : अंमली पदार्थ बाळगणारे आठ आरोपी आहेत. त्याचबरोबर 7 आरोपी आयोजक आहेत. अशा प्रकारे हॉटेलचे जनरल मॅनेजर आणि आयोजक अशा 15 व्यक्तिंना अटक करण्यात आली होती.

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/MMP/D. श्री. गायकवाड नंतर --- 11:00

श्री.नितीन राऊत .....

त्यानंतर 16 जुलैला 280 आरोपींना देखील अटक केली आहे. ...

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, मी या ठिकाणी सदर हॉटेलचा मालक आणि त्याच्या भागीदारांबाबत प्रश्न विचारलेला आहे. ...

श्री. नितीन राऊत : सभापती महोदय, मी उत्तर दिलेले आहे की, 15 लोकांना अटक करण्यात आली आहे. या हॉटेलचा मालकाने हे हॉटेल भाड्याने चालविण्यासाठी दिले होते आणि हे हॉटेल चालविणाऱ्या चार मुली आहेत त्यांच्यावर कारवाई करण्याच्यादृष्टीने त्यांची तपासणीचे काम सुरू आहे.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, या ठिकाणी मंत्री महोदयांनी निवेदनात म्हटलेले आहे की, या हॉटेलचे मालक आणि त्याचे चार भागीदार यांनी या पार्टीचे आयोजन केले होते. आणि तेथे छापा टाकला तेव्हा पार्टी आयोजन करणाऱ्या व इतर अशा 15 व्यक्तींकडून अंमली पदार्थ जप्त करण्यात आला आहे. तर हे 15 लोक त्या ठिकाणी कसे काय गेले ? त्यांना तेथे अशी पार्टी होणार आहे हे माहिती असल्याशिवाय ते तेथे गेले नाहीत. म्हणूनपच शासन यामध्ये जाणीवपूर्वक त्या हॉटेल मालकाला आणि त्याच्या भागीदारांना पाठीशी घालत आहे. यामध्ये आणखी चौकशी करण्याचा प्रश्न येतोच कोठे ?

श्री. नितीन राऊत : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.भास्कर जाधव यांनी जो मुद्दा येथे उपस्थित केला आहे त्याबाबत मी पुन्हा सांगू इच्छितो की, या हॉटेलचे जे मालक आहे त्यांना आणि या पार्टीच्या आयोजकांना अटक करण्यात आलेली आहे व त्यांच्यावर कारवाई करण्यात आली आहे. त्यानंतर याबाबत लीगल ओपिनिअन घेऊन यापुढे जाऊनही कारवाई करण्यात येईल व त्यात कठोर कारवाई संबंधितांवर केली जाईल.

श्री. भास्कर जाधव : पण ते 15 लोक त्या हॉटेलच्या प्रिमायसेसमध्ये आलेच कसे ? त्यांना त्या पार्टीची माहिती होती म्हणूनच ते तेथे आले होते ...

श्री. जयप्रकाश छाजेड : सभापती महोदय, या ठिकाणी माननीय राज्यमंत्री देत असलेली सगळी उत्तरे ऐकल्यानंतर आणि या लक्षवेधी सूचनेच्या विषयाचे गांभीर्य लक्षात घेतल्यानंतर आता त्या मालकाला आणि पार्टी आयोजकांना अटक केली आहे म्हणून सांगण्यात आले आहे. पण प्रथमत: त्या हॉटेलचा परवाना कायमचा रद्द आपण केला आहे का ? नसेल तर करणार आहात का ?

...... एम 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन राऊत : सभापती महोदय, आतापर्यंत सदर हॉटेलचा परवाना रद्द करण्याची कारवाई सुरू केलेली आहे.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, या ठिकाणी मी स्पेसिफिक प्रश्न विचारणार आहे. मी ती फिल्म पाहिलेली आहे. त्यामध्ये काही मुलींनी आपली ओढणी घेऊन चेहरा झाकून घेण्याचा प्रयत्न केला असता तेथील पोलीस त्यांना म्हणत होता की, आता तोंड कशासाठी झाकून घेता, आता तुम्हाला लाज वाटते का ? सभापती महोदय, यातील काही मुलींची लग्ने व्हायची आहेत. त्यामुळेच याची सीआयडी चौकशी झाली पाहिजे. या व्यसनांमधून तरूण पिढीला आपण वाचविले पाहिजे याबद्दल दुमत नाही. त्यामुळे याबाबतीत आम्ही पोलिसांचे हात बांधू इच्छित नाही. पण शेवटी रोगापेक्षा इलाज भयानक असता कामा नये याची दक्षता आपण घेतली पाहिजे. या ठिकाणी आपण निवेदनात म्हटले आहे की, सहा लोकांनी अंमली पदार्थ सेवन केल्याचे आढळले. आता एखाद्या हॉटेलमध्ये हजार माणसे जमली असतील आणि त्यातील 5-10 जणांनी असा प्रकार केला असेल म्हणजे बाकीचे सारेच त्यात सामील असतील असे नाही. पण तरीही आपण त्यांना त्यांचे जोडीदार म्हणून बाहेर काढणार का ? आता या ठिकाणी सापडलेल्या अनेक मुली घरंदाज आहेत. सगळ्याच काही वाईट वा व्यसनाधीन नसतात. आपण पुरूषांचे सोडून द्या, पण यातून मुलींचे आयुष्य उद्‌ध्वस्त होणार आहे हे लक्षात घेतले पाहिजे. यामध्ये ज्या ज्या मुलींची नावे आली असतील त्या सगळ्याच काही यात सामील नसतील. पण तरीही त्यांना केवळ त्या तेथे उपस्थित होत्या म्हणून यात गोवण्यात आले आहे. खरे तर त्यांची तपासणी केल्यानंतर त्यांच्यापैकी ज्या यामध्ये सामील नसतील त्यांच्याबाबतीत तसे पोलिसांनी जाहीर केले पाहिजे. अन्यथा अशा अशा पार्टीमध्ये या या मुली आढळून आल्या अशी बातमी आल्यानंतर त्या मुलींची आणि त्यांच्या घरच्यांची काय अवस्था झ ाली असेल याची आपण कल्पना करावी. म्हणूनच याची सीआयडी चौकशी केली गेली पाहिजे. `ती आपण करणार का ? श्री.विश्वास नांगरे-पाटील हे साऊथचे प्रमुख आहेत पण त्यांच्याकडे याचा वेगळा चार्ज आहे. तेव्हा त्यासाठी वेगळा आयपीएस अधिकारी आपण देणार आहात का ?....

...सभापती महोदय, मी या ठिकाणी कोठल्याही प्रकारे या रेव्ह पार्टीचे समर्थन केलेले नाही. पण ही कोठली पद्धत आहे की, तेथे काही मुली आढळल्या आणि त्यांना बाहेर घेऊन येताना त्यांनी आपल्या तोंडावर ओढणी घेतली तर लगेच 'आता तुला लाज वाटते काय' म्हणून

..... एम 3 ...



KBS/MMP/D. श्री. गायकवाड नंतर --- 11:00

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण ....

तिला जणू काही ती दोषीच आहे असे समजून एक पोलीस विचारतो. मी केव्हाही अशा पार्टीचे समर्थन केलेले नाही आणि करणार नाही. आमची तरूण पिढी अशा व्यसनांपासून दूर राहिली पाहिजे, त्यांना त्यापासून वाचविले पाहिजे याच मताचा मीदेखील आहे. सेंट झेवियर्स कॉलेजच्या बाहेर 50 मुली जेव्हा सिगारेटस् ओढत उभ्या असतात तेव्हा आम्हालाही ते पाहून वाईट वाटते. ..

( यानंतर श्री. सरफरे .... एन 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण...

सभापती महोदय, मी अजिबात समर्थन करीत नाही. परंतु रोगापेक्षा इलाज भयंकर असे होता कामा नये. आपण या निवेदनात म्हटले आहे की, 127 लोकांचा अहवाल अजून आलेला नाही. सिंहगडच्या पार्टीला किती दिवस झाले. तेथील मुलांचे पालक सांगतात की, पोलीस आमच्याकडे एक-दोन लाख रुपये मागतात. तुमच्या मुलांना सोडतो. तुमच्या मुलांच्या मल-मूत्रामध्ये, रक्तामध्ये अंमली पदार्थाचे अंश आढळले नाहीत असा रिपोर्ट आम्ही तुम्हाला देतो. असे पोलीस त्या मुलांच्या पालकांना सांगतात. मी याठिकाणी या गोष्टीचे समर्थन करीत नाही. आजची पिढी बरबाद होईल. ही नवीन पिढी वाम मार्गाला चालली आहे याची आपण नंतर चर्चा करु.

श्री. नितीन राऊत : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी व्यक्त केलेल्या भावनेशी मी सहमत आहे. हा नार्कोटीक्स विभागाचा विषय आहे, अत्यंत संवेदनशील असा विषय आहे. या विभागासाठी डयुएल चार्जचा अधिकारी नेमला असेल तर ती बाब तपासून निश्चितपणे एका व्यक्तिकडे कारभार सोपविण्याबाबत योग्य ते प्रयत्न करु.

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, याठिकाणी पोलीस खात्याच्या कारभाराबाबत प्रश्न विचारण्यात आला. त्या अनुषंगाने श्री. नांगरे पाटील यांचे नाव घेतले गेले. तसेच, त्या मुलींचे चित्रीकरण करण्यात आले वगैरे चर्चा झाली. माझा प्रश्न असा आहे की, पोलीस खात्यामध्ये सामाजिक सुरक्षितता विभाग असून त्या विभागामध्ये अधिकारी आहेत. याठिकाणी घडलेला गुन्हा हा दरोडा, खून अशाप्रकारचा गुन्हा नाही. या गुन्हयाला सामाजिक संदर्भ आहे. पोलीस खात्याची कामाची पध्दत अशी आहे की, अशाप्रकारचा गुन्हा घडल्यानंतर सामाजिक सुरक्षितता विभागाच्या अधिकाऱ्यांना त्यामध्ये सामील करुन त्या घटनेमागील पूर्वेतिहास काय आहे, कशामुळे हे घडले ? कोणत्या कुटुंबातील हे लोक आहेत. या संदर्भात पोलीस खाते त्यांचे कौन्सिलिंग करु शकते. त्या संदर्भात प्रिव्हेंटीव्ह मेजर घेण्याच्या दृष्टीने या विभागाने आतापर्यंत कारवाई केली आहे काय?

श्री. नितीन राऊत : सभापती महोदय, याठिकाणी अंमली पदार्थ सेवन कायद्यांतर्गत केंद्र सरकारने 12 कलमी कार्यक्रम तयार केला आहे. त्या अंतर्गत सन्माननीय सदस्यांनी मांडलेले मुद्दे त्यामध्ये कव्हर झाले आहेत. त्यादृष्टीने योग्य ती कारवाई सुरु आहे.

श्री. मुजफ्फर हुसेन : सभापती महोदय, मंत्रिमहोदयांनी म्हटले आहे की, यामध्ये 4 मुलींचा सहभाग असून त्यांच्यावर गुन्हा नोंदविण्यात आला आहे. ज्या चार मुलींवर गुन्हा नोंदविण्यात आला

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KTG/ D/

श्री. मुजफ्फर हुसेन....

आहे त्यांचे पुढील इन्व्हेस्टिगेशन पोलिसांनी केले आहे काय? त्यांची फायनान्शिअल बॅकग्राऊंड काय होती? अशाप्रकारचे रिसॉर्ट भाडयाने घेऊन महिना 5 ते 10 लाख रुपये भाडे त्या देऊ शकत होत्या. याचा अर्थ जो मालक आहे, जो फ्रंट मॅन आहे त्याच्यावर आपण कारवाई करणार काय? तसेच, त्यांच्या फायनान्शिअल बॅकग्राऊंडची तपशिलवार माहिती पोलीस गोळा करणार आहे काय?

श्री. नितीन राऊत : सभापती महोदय, या व्यवसायामध्ये भागीदार म्हणून त्या महिलांचा सहभाग आहे की नाही याबाबतचा पुरावा मिळाल्यानंतर योग्य ती कारवाई करण्यात येईल.

श्री. रमेश शेंडगे : सभापती महोदय, याठिकाणी एक-दोन घटना घडल्यानंतर त्या माध्यमातून आपण सभागृहात चर्चा करीत आहोत. संपूर्ण तरुण पिढीला बरबाद करणाऱ्या अंमली पदार्थाची विक्री मुंबई शहरामध्ये मोठया प्रमाणात सुरु आहे. त्या विक्रीला आळा बसावा यासाठी आपले पोलीस खाते काम करणार आहे काय? आज कॉलेजच नव्हेतर शाळांच्या बाहेर सुध्दा अंमली पदार्थ विकणारे बसावयास लागले आहेत.

(यानंतर श्री.बरवड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश शेंडगे .....

अशा एखाद-दुसऱ्या घटनेकडे न बघता जर राजकीय इच्छाशक्ती असेल तर जसे मुंबईतील डान्सबार तसेच हातभट्टया बंद होऊ शकतात तर मग अंमली पदार्थ सेवन बंद का होऊ शकत नाही ? त्याबाबतीत शासन काही कारवाई करणार काय ? गृह विभागाचे अपर मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली सर्व अधिकाऱ्यांची समिती नेमली आहे. त्या समितीने काय काम केले ? समिती नेमल्यापासून यामध्ये काय सुधारणा झाली आहे ?

श्री. नितीन राऊत : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी जो प्रश्न विचारला तो अत्यंत योग्य आहे. केंद्र सरकारच्या कायद्यानुसार अंमली पदार्थाचे समूळ उच्चाटन करण्यासाठी अपर मुख्य सचिव,गृह यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय समिती स्थापन झाली आहे त्यात केंद्र शासनाचे नारकोटिक्स विभागाचे अधिकारी तसेच राज्याचे अधिकारी यांचा समावेश असतो. त्यावर नियंत्रण करण्यासाठी आणि उपाययोजनेसाठी 12 कलमी कार्यक्रम तयार केलेला आहे. त्याचे सुध्दा पालन होत आहे.

ॲड. उषा दराडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. भास्कर जाधव तसेच इतर तीन-चार सन्माननीय सदस्यांनी मालकाच्या संदर्भात जो प्रश्न विचारला होता त्या प्रश्नाचे समाधान झालेले नाही. माननीय मंत्रिमहोदयांनी अत्यंत हुशारीने उत्तर दिलेले आहे. यामध्ये कायदेशीर सल्ला घेऊन कारवाई करु हे उत्तर असू शकत नाही. या लक्षवेधीचे उत्तर केवळ मालकावर गुन्हा दाखल करणे हे आहे. आपण पंधरा लोकांना जी अटक केली ती कायदेशीर सल्ला घेऊन केली का ? या लक्षवेधी सूचनेचे समाधान होणार नसेल तर ही लक्षवेधी सूचना राखून ठेवावी. त्यांनी सल्ला घ्यावा, सोमवारी गुन्हा दाखल करावा आणि त्यानंतर लक्षवेधी सूचना घ्यावी. सभापती महोदय आपण आता जे निदेश दिले त्याबद्दल मी आपले आभार मानते. चित्रीकरण बंद झाले पाहिजे. आता 31 डिसेंबर दोन दिवसांवर आलेले आहे त्यामुळे या सूचना ताबडतोबीने दिल्या जातील काय ?

श्री. नितीन राऊत : सभापती महोदय, मी आधीच सांगितले आहे की, या प्रकरणामध्ये मालकाचा गुन्हा असेल तर त्याला सोडण्याचा प्रश्नच येत नाही. त्याच्यावर ताबडतोब कारवाई करण्यात येईल आणि त्याला योग्य ती शिक्षा ठोठावली जाईल.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/ D/

**उपसभापती** : सन्माननीय सदस्यांनी पुढचा एक प्रश्न असा विचारला होता की, या सूचना 31 डिसेंबरच्या आत देण्यात येतील काय ? नाही तर हे सगळीकडे कॅमेरे घेऊन फिरतील.

श्री. नितीन राऊत : सभापती महोदय, निश्चितपणे मुंबईवर अतिरेक्यांनी जो हल्ला केला त्यामुळे संपूर्ण राज्य आणि देश दु:खात असताना 31 डिसेंबरचा नवीन वर्षाचा कार्यक्रम हा धुमधडाक्यात साजरा होऊ नये हा प्रयत्न राज्य सरकारचा आहे. त्यामुळे ज्या सूचना या ठिकाणी आलेल्या आहेत त्या सूचनांचे निश्चितपणे स्वागत करण्यात येईल.

----

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/ D/

**पृ. शी.** : पुण्यातील चाकण औद्योगिक परिसरात नागरी सुविधांची असलेली कमतरता

**मु. शी.** : पुण्यातील चाकण औद्योगिक परिसरात नागरी सुविधांची असलेली कमतरता यासंबंधी डॉ. नीलम गोऱ्हे, सर्वश्री अरविंद सावंत, परशुराम उपरकर, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

डॉ. नीलम गोऱ्हे ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय नगरविकास मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छिते आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करते.

"पुण्यातील चाकण औद्योगिक परिसरात उद्योगांची दिवसेंदिवस वाढ होणे, अनेक बहुराष्ट्रीय कंपन्या चाकण येथे सुरु असणे तसेच अनेक उद्योग विस्तारित असणे, चाकण येथे आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रस्तावित असणे, चाकण भागाला औद्योगिक नगरीचे प्राप्त झालेले महत्व, चाकण येथे बहुराष्ट्रीय कंपन्या बरोबर राष्ट्रीय कंपन्यांनी सुरु केलेले व्यवसाय, चाकण हे औद्योगिक केंद्र म्हणून उदयास येत असून तेथे रस्ते पाणी, वीज आदि प्राथमिक नागरी सुविधांची असलेली कमतरता व सुविधेवर पडणारा ताण, चाकण औद्योगिक परिसराचा महत्वाचा भाग पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेला जोडण्याची शासनाची योजना, चाकण पिंपरी-चिंचवड महानगरपालिका क्षेत्रात समाविष्ट केल्यास तेथील करांचा उद्योग धंद्यावर व नागरिकांवर पडणारा प्रचंड आर्थिक बोजा, परिणामी चाकण परिसरातील उद्योग क्षेत्रातील जनतेत निर्माण झालेला तीव्र असंतोष व संतापाची लाट लक्षात घेता चाकण औद्योगिक वसाहत आहे तशीच स्वतंत्र ठेवण्याची नितांत आवश्यकता, चाकण औद्योगिक वसाहत पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेत समाविष्ट करण्याचा तेथील तमाम जनतेचा असलेला सक्तविरोध लक्षात घेता याप्रकरणी शासनाने आपली भूमिका स्पष्ट करण्याची आवश्यकता."

श्री. हसन मुश्रीफ ( नगरविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

....4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/ D/

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, म्हटले तर हा अगदी साधा प्रश्न वाटतो आणि शासनाने अगदी थोडक्यात उत्तर दिलेले आहे. चाकण औद्योगिक परिसर तसेच चाकण आणि आळंदी हा भाग मुंबई-पुणे-नाशिक हा जो त्रिकोण आहे त्याच्या जवळचा हा भाग असल्यामुळे लवकरच त्या ठिकाणी आंतरराष्ट्रीय विमानतळ सुध्दा होणार आहे आणि फार मोठ्या प्रमाणावर तेथे कारखाने सुरु झालेले आहेत. आळंदी नगरपालिकेच्या ठिकाणी शांतताप्रेमी लोक आहेत तसेच तेथे लक्षावधी वारकरी येतात हे एका बाजूला आणि दुसरीकडे कामगारांची उपलब्धता त्यामुळे या महाळुंगे, चाकण, खराबवाडी, वाकी, कुरुळी, नाणेकरवाडी, रासे, भोसे, आंबेठाण, मेदनकरवाडी, निघोजे, चिंबळी आदी अनेक गावांमध्ये उद्योगधंदे आसपास पसरलेले आहेत आणि पसरत चालले आहेत. त्या ठिकाणी प्रश्न असा निर्माण झालेला आहे की, ज्या सोयीसुविधा असल्या पाहिजेत आणि खासकरुन वाहतुकीच्या साधनांच्या बरोबरीने पिण्याच्या पाण्याची व्यवस्था आणि विविध प्रकारच्या वाहनांची उपलब्धता, गावातील नागरी सुविधा, या पुरेशा उपलब्ध नाहीत. त्यामुळे सातत्याने त्या परिसरामध्ये ज्या काही घटना घडल्या त्यामध्ये लोकांना माहीत नसतानाच एसईझेड सारखे निर्णय त्या ठिकाणी होतात आणि त्याची अंमलबजावणी सुरु होते. लोकांमध्ये जी घबराट आहे ती उद्योगांच्या विरोधात नाही. लोकांच्या मनामध्ये जो असंतोष आहे तो त्या ठिकाणी उद्योगधंदे येऊ नयेत असा नाही.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे....

त्यांची अशी अपेक्षा आहे की, सोयी सुविधा देत असताना चाकण व आळंदी नगरपालिकेद्वारे त्यांच्या गावाबाबत निर्णय घेतले जातात ते त्यांच्या हातात राहिले पाहिजेत. या गावांमधून कर प्राप्त होणार आहे म्हणून ही गावे पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेला जोडणार असेल तर ते जाऊ नये. माझा प्रश्न असा आहे की, चाकण व आळंदी परिसरातील लोकांची इच्छा असेल तर तेथील उद्योगांना व स्थानिक ग्रामस्थांना विश्वासात घेऊन चाकण, आळंदी मिळून एक महानगरपालिका होऊ शकेल काय, याबाबत शासन विचार करील काय ? कारण त्यांच्याकडे निधीची कमतरता आहे. पीएमआरडीए निर्माण झाले असले तरी या परिसराला किती पैसा मिळेल याबाबत प्रश्नचिन्ह आहे. मुंबई-पुणे रस्ता, मुंबई-नाशिक रस्ता याची कनेक्टिव्हिटी सोडली तर बाकी गावे अविकसित राहतील. म्हणून स्थानिक ग्रामपंचायती, स्थानिक लोकप्रतिनिधी व आम्हाला विश्वासात घेऊन चाकण, आळंदी महानगरपालिका करण्यासाठी विचार करण्यात येईल काय ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, चाकण, आळंदी औघोगिक वसाहतीतील गावे ही पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेला जोडली जाणार आहेत आणि त्यामुळे तेथील नागरिकांमध्ये असंतोष आहे असा या लक्षवेधीचा रोख आहे. त्या परिसरात असलेली गावे, तेथील औद्योगिक वसाहत कोणत्याही परिस्थितीमध्ये पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेला जोडली जाणार नाही. तसा कोणताही प्रस्ताव नाही, प्रस्ताव प्रलंबित नाही आणि तसा शासनाचा मानस नाही. या परिसराची महानगरपालिका होईल काय असा सन्माननीय सदस्या श्रीमती गोऱ्हे यांनी दुसरा प्रश्न विचारला आहे. महानगरपालिका निर्माण करण्यासाठी लोकसंख्येचा निकष असतो. त्यातून होणारे अकृषक फायदे, तोटे हे पाहून त्याचाही शासन विचार करील.

डॉ.दीपक सावंत : या लक्षवेधीच्या मुख्य प्रश्नाला बगल देण्याचा शासनाकडून प्रयत्न झालेला आहे. हा भाग पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेला जोडला जाणार आहे काय या प्रश्नाला नाही असे उत्तर देण्यात आले आहे. परंतु त्या भागातील प्राथमिक सोयी सुविधांवर ताण पडत चालला आहे त्यासाठी शासन काही योजना आखणार आहे काय, या प्रश्नाबाबत निवेदनात उत्तर दिलेले नाही.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, त्या भागातील औद्योगिक वसाहत एमआयडीसी अंतर्गत येते. औद्योगिक वसाहतीमध्ये व त्या भागामध्ये पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी नगरविकास विभागाकडून निश्चितपणे त्या विभागाला सूचना देण्यात येतील.

---------

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

3....

**पृ. शी.** : कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांना दि.1.1.1996 पासून नवीन वेतनश्रेणी लागू करणे

**मु. शी.** : कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांना दि.1.1.1996 पासून नवीन वेतनश्रेणी लागू करणे यासंबंधी श्री.वसंतराव खोटरे, प्रा.बी.टी.देशमुख, श्री.दिलीपराव सोनवणे,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.वसंतराव खोटरे ( अमरावती विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय शालेय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"शासनाच्या सर्व प्रवर्गांना नवीन वेतनश्रेणी 1 जानेवारी 1996 पासून लागू होणे, मात्र कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांना सदर वेतनश्रेणी दिनांक 1 मार्च 2000 पासून लागू होणे, वेतनश्रेणीमधील तफावत संपुष्टात आणण्यासाठी शिक्षण मंत्री आणि वित्त मंत्री यांनी दिनांक 2 एप्रिल 2008 रोजी विधान भवन येथे झालेल्या बैठकीमध्ये सहमती दर्शविणे, एक महिन्याच्या आत निर्णय घेण्याचा त्याच बैठकीत निश्चय होणे, विदर्भ ज्युनिअर कॉलेज टिचर्स आसोसिएशनचे अध्यक्ष व सचिवांनी शालेय शिक्षण मंत्री यांना दिनांक 15 सप्टेंबर, 2008 रोजी वा त्यादरम्यान शिक्षण उपसंचालक, अमरावती विभाग, अमरावती यांच्यामार्फत एक निवेदन देणे, याबाबतीत अद्याप कोणताही निर्णय न होणे, परिणामी संबंधित शिक्षकांमध्ये निर्माण झालेला तीव्र असंतोष, याप्रकरणी राज्यभरातील शिक्षकांतर्फे आयोजित करण्यात आलेला मोर्चा, याबाबत शासनाची भूमिका व प्रतिक्रिया."

श्री.नाना पंचबुध्दे ( शालेय शिक्षण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KTG/ D/

श्री.वसंतराव खोटरे : सभापती महोदय, महाराष्ट्र राज्यातील सर्व प्रवर्गांना दिनांक 1.1.1996 पासून पाचवा आयोग लागू झाला आहे. तसेच अनेक प्रवर्गांच्या वेतनश्रेणीतील त्रुटी दूर करुन दि.1.1.96 पासूनच पाचवा आयोग लागू केला आहे. पण कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांना मात्र दि.1.3.2000 पासून पाचवा वेतन आयोग लागू केला आहे. त्याऐवजी दि.1.1.96 पासून पाचवा वेतन आयोग लागू करण्यासाठी विदर्भ माध्यमिक शिक्षक संघ, शिक्षक महासंघाने शासनाला अनेक निवेदने दिलेली आहेत, पण शासनाने त्याची दखल घेतलेली नाही. त्यानंतर दिनांक 2.4.2008 रोजी माननीय सभापतींच्या दालनामध्ये माननीय वित्त मंत्री, माननीय शिक्षण मंत्री यांच्यासोबत या लोकांची बैठक घेतली होती. त्या बैठकीत काय निर्णय झाला याची माहिती माननीय मंत्री महोदय देतील काय ?

श्री.नाना पंचबुध्दे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे माननीय सभापतींच्या दालनामध्ये दि.2.4.2008 रोजी बैठक झाली होती. त्या बैठकीला माननीय वित्त मंत्री, माननीय शिक्षण मंत्री, माननीय संसदीय कार्य मंत्री, लोकप्रतिनिधी आणि या शिक्षकांचे प्रतिनिधी यांच्याबरोबर चर्चा झाली. त्या चर्चेच्या अनुषंगाने माननीय वित्त मंत्र्यांनी शालेय शिक्षण विभागाबरोबरच आदिवासी विकास विभाग, सामाजिक न्याय विभाग आणि ग्रामविकास विभाग या विभागांची माहिती संकलित करुन प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर सादर करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. नाना पंचबुध्दे....

त्यानुषंगाने शिक्षण विभागाने पत्र वितरित केले होते. परंतु अजूनपर्यन्त अन्य विभागाकडून माहिती अप्राप्त आहे. शिक्षण विभागाकडून माहिती घेऊन ती वित्त विभागाकडे पाठविण्यात आली. वित्त विभागाने 6वा वेतन आयोग लागू केला जाईल त्यावेळी यांचा निश्चितपणे विचार केला जाईल.....

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, हा प्रश्न माननीय पीठासीन अधिका-यांशी संबंधित आहे. मी देखील या प्रश्नाची नोटीस दिलेली आहे. लक्षवेधीच्या संदर्भात एक नवीन पध्दत सुरु झालेली आहे ती अशी की, लक्षवेधीला उत्तर दिले जात नाही, त्याऐवजी बाकीचा सारा निबंध दिला जातो. या लक्षवेधीमध्ये दिलेल्या मुद्यांच्या संदर्भात दोन पानी उत्तर दिलेले आहे. या प्रश्नाच्या संदर्भात माननीय पीठासीन अधिकारी यांनी 2 एप्रिल 2008 रोजी बैठक बोलाविलेली होती. सभापती महोदय, तुम्ही आणि आम्ही लोकप्रतिनिधी आहोत. पीठासीन अधिकारी शेपाचशे नाहीत, फक्त 4 आहेत. माननीय पीठासीन अधिका-यांनी बोलाविलेल्या बैठकीमध्ये काही डेंफिनेट अशा प्रकारचे निर्णय झाले होते. त्या निर्णयाच्या संदर्भात उत्तर दिलेले नाही. त्या दिवशीच्या बैठकीमध्ये माननीय अर्थमंत्र्यांनी असे सांगितले की, 5व्या वेतन आयोगाची वेतनश्रेणी विचारात घेण्यात येऊ नये असा निर्णय वित्त विभागाने पूर्वीच घेतलेला आहे तरी सुध्दा ही मागणी विचारात घेता शिक्षण विभागाने या संदर्भात योग्य त्या खर्चासहीत प्रस्ताव तयार करावा. शिक्षण विभागाच्या मिनिटस्‌मध्ये असे म्हटलेले आहे की," स्वत: वित्त मंत्री असे म्हणाले की, सर्व विभाग मिळून किती बोजा शासनावर पडेल याची एकत्रित माहिती घेऊन तो प्रस्ताव शिक्षण मंत्र्यांनी कॅबिनेट समोर आणावा. माननीय संसदीय कार्यमंत्र्यांनी सांगितले की, यासाठी टाईम बाऊण्ड प्रोग्राम आखवा आणि 1 महिन्याच्या आत निर्णय घेण्यात यावा. शैक्षणिक वर्ष सुरु होण्यापूर्वी निर्णय घेण्यात यावा. माननीय पीठासीन अधिका-यांनी एवढेच सांगितले की, अर्थमंत्र्यांनी आणि शिक्षण मंत्र्यांनी आपल्या मागण्यांच्या संदर्भात सकारात्मक विचार केलेला आहे. 1 महिन्याच्या आत निर्णय घेतील. सभापती महोदय, माननीय पीठासीन अधिका-यांसमवेत ही जी चर्चा झाली त्यासंबंधी एका शब्दानेही उत्तर दिलेले नाही. मात्र बाकीचे कथानक पूर्ण दोन पाने दिलेले आहे. त्यामुळे प्रश्नाला न्याय मिळण्याच्या संदर्भातील गोष्टी आम्हाला पुन्हा पुन्हा येथे सांगाव्या लागतात आणि त्यामुळे आम्हीच किती तरी वेळ बोलतो अशी भावना निर्माण होते. हा प्रश्न पीठासीन अधिका-यांशी संबंधित आहे. तीन

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(प्रा. बी.टी.देशमुख...

कॅबिनेट मंत्री त्या बैठकीला उपस्थित होते. आपण लोकप्रतिनिधी आहोत. आपण माननीय पीठासीन अधिका-यांसमोर प्रश्न आणला तर ती चूक आहे काय ? पीठासीन अधिका-यांनी बोलावलेल्या बैठकीला तीन कॅबिनेट मंत्री हजर होते. त्या बैठकीत निर्णय झालेला असताना या लक्षवेधीच्या संदर्भात निबंध लिहिलेला आहे. बैठकीत झालेल्या निर्णयाच्या अनुषंगाने या निबंधामध्ये एका शब्दाने उल्लेख आलेला नाही. या लक्षवेधीच्या निवेदनामध्ये शेवटी उद्धट उत्तर दिलेले आहे. निवेदनामध्ये असे म्हटलेले आहे की, "सहावा वेतन आयोग लागू करण्याबाबत श्री. हकीम यांचे अध्यक्षतेखाली जी समिती नेमली आहे त्यांच्या समोर निरनिराळ्या संघटना त्यांच्या मागण्या सादर करु शकतात." म्हणजे हा प्रश्न माननीय पीठासीन अधिकारी, शिक्षण मंत्री आणि वित्त मंत्री यांच्या समोर सादर केला हा गुन्हा झाला काय ? त्यासंबंधी एक शब्द या निवेदनामध्ये नाही. हा प्रश्न राखून ठेवावा असे मी म्हणणार नाही. मी फक्त पॉईण्टेड प्रश्न विचारतो. पीठासीन अधिका-यांसमोर निर्णय झाला. कॅबिनेट मंत्र्यांनी तेथे सांगितले त्याप्रमाणे 1 महिन्यामध्ये कार्यवाही करावयाची, असा निर्णय झाला होता. त्यानुषंगाने कार्यवाही केली नाही. सभापती महोदय, एप्रिल महिन्यामध्ये मिटींग झाली.

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. भास्कर जाधव)**

...नंतर श्री. गिते...

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख...

ही गोष्ट योग्य झालेली नाही. संसदीय प्रथा,परंपरा यांचे विभागाने पालन करता त्यांनी अतिशय लांच्छनास्पद वर्तन केलेले आहे. माननीय शालेय शिक्षण राज्यमंत्र्यांनी कबूल करावे की, एका महिन्यात आमच्याकडून कार्यवाही झाली नाही, ती कार्यवाही आम्ही एका महिन्यात करु. जर यासंबंधीची कार्यवाही होणार नसेल तर ती गोष्ट फार गंभीर आहे. सभापती महोदय, यासंबंधी आपण शासनाला वेगळे आदेश द्यावेत असे मी म्हणणार नाही. पीठासीन अधिका-यांनी बोलाविलेल्या बैठकीतील निर्णयांची अंमलबजावणी विभागाच्या अधिका-यांनी करावयास पाहिजे असे पीठासीन अधिका-यांनांच पुन्हा सांगावे लागेल. माननीय मंत्री महोदय, माननीय पीठासीन अधिका-यांना पुन्हा आदेश देण्याची वेळ येऊ देऊ नका. ही गोष्ट शिक्षण विभागाला अतिशय लाजिरवाणी आहे. यासंबंधी मी परवाच उल्लेख केलेला आहे. शिक्षण विभागावर अशी वेळ तिस-यांदा आलेली आहे. सभागृहात उपस्थित केलेल्या मुद्दयांना उत्तर न देणे, नाही ती पुराणातील माहिती निवेदनात नमूद करणे आणि सन्माननीय सदस्यांचा वेळ घेणे ही गोष्ट बरोबर नाही. शालेय शिक्षण विभागाने यासंबंधीची कार्यवाही एका महिन्यात केली नाही ती चूक केली आहे. मी या ठिकाणी बैठकीतील निर्णय मी मघाशी वाचून दाखविले. ते निर्णय झाले होते की नाही असा प्रश्न विचारला असता तसे निर्णय झाले होते ही गोष्ट माननीय मंत्री महोदयांनी कबूल केली आहे. तशा प्रकारचे निर्णय पीठासीन अधिका-यांच्या बैठकीत झाले होते किंवा नाही ? निर्णय झाले असतील तर त्या अनुषंगाने एका महिन्याच्या आत कार्यवाही केली जाईल काय ?

श्री.नाना पंचबुध्दे :सभापती महोदय, मी पूर्वी सांगितले की, सहावा वेतन आयोग लागू करण्यात येईल, त्यावेळी या गोष्टींचा निश्चितपणे विचार केला जाईल.

प्रा.बी.टी.देशमुख : मघाशी मी जे निर्णय वाचून दाखविले ते निर्णय पीठासीन अधिका-यांच्या बैठकीत झाले होते काय ? झाले असतील तर होय म्हणा अथवा नाही म्हणा. सन्माननीय शालेय शिक्षण राज्यमंत्र्यांनी पुन्हा माझे म्हणणे पूर्णपणे ऐकून घ्यावे. सहावा वेतन आयोगासंबंधीची माहिती कशाला सांगितली जात आहे. सहावा वेतन आयोगासंबंधी शासनाने जी.आर.काढलेला आहे. सहावा वेतन आयोग लावल्यामुळे पाचव्या वेतन आयोगाच्या अनुषंगाने जे प्रश्न उपस्थित झाले आहेत, त्यासंबंधी काही करता येणार नाही असे आपल्याकडून सांगितले जाईल. यासंबधात शासनाने दोन,चार जी.आर.काढलेले आहेत. काल, परवा देखील यासंबंधी

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख...

जी.आर.काढला आहे. या ठिकाणी माननीय राज्य मंत्री महोदयांनी माझा प्रश्न समजून घ्यावा. माझा प्रश्न समजून घेतला नाही तर आपण पुन्हा निबंध वाचून दाखवाल. मी पुन्हा चार निर्णय वाचून दाखवितो. स्वत: माननीय अर्थमंत्र्यांनी असे सांगितले की, पाचव्या वेतन आयोगाच्या वेतनश्रेणीतील त्रुटी बाबतचे प्रस्ताव विचारात घेण्यात येऊ नये असा निर्णय वित्त विभागाने पूर्वीच घेतला आहे. तरी सुध्दा सदर मागणी विचारात घेता शिक्षण मंत्र्यांनी यासंदर्भात प्रस्ताव तयार करुन योग्य त्या शिफारशीसह मंत्रिमंडळासमोर आणावा. तुमच्या समोर इतिवृत्त उपलब्ध आहे ते तुम्ही पहा. त्या इतिवृत्तात खाली असे वाक्य आहे की, सर्व विभागां मिळून किती बोजा शासनावर पडेल याची एकत्रित माहिती घेऊन तो प्रस्ताव शिक्षण मंत्र्यांनी कॅबीनेट समोर आणावा. संसदीय कार्यमंत्र्यांनी असे सांगितले की, यासंदर्भात टाईम बाऊंड प्रोग्रॅम आखावा व एक महिन्यात निर्णय घेण्यात यावा. येते शैक्षणिक वर्ष सुरु होण्यापूर्वी निर्णय घेण्यात यावा. अशा प्रकारचे निर्णय त्या बैठकीत घेण्यात आले होते किंवा नाही ? त्या निर्णयांची अंमलबजावणी आतापर्यंत केली नाही, ती एका महिन्यात करण्यात येईल काय ?

श्री.नाना पंचबुध्दे : सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांनी सांगितले की....

**तालिका सभापती** (श्री.भास्कर जाधव ) : सन्माननीय सदस्यांनी अतिशय पॉईन्टेड प्रश्न विचारलेला आहे. सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांचे म्हणणे असे आहे की, एप्रिल महिन्यामध्ये सभापतींच्या उपस्थितीमध्ये माननीय मंत्री महोदयांच्या समवेत या विषयाच्या बाबतीत एक बैठक झाली. त्या बैठकीत जे निर्णय घेतले गेले. त्या निर्णयांची अंमलबजावणी केली जाणार आहे किंवा नाही यासंबंधीची त्यांना माहिती हवी आहे. यासंदर्भात कसे उत्तर द्यावयाचे ते तुम्ही ठरवा.

प्रा.बी.टी.देशमुख : सदर चार निर्णय त्या बैठकीत झाले होते किंवा नाही ? त्या निर्णयांची शासनाने आतापर्यंत कार्यवाही केली नाही. ती कार्यवाही पुढील एका महिन्यात करण्यात येईल काय ? मंत्रिमंडळासमोर प्रस्ताव आणावा अशा प्रकारचा निर्णय त्या बैठकीत घेतला गेला आहे, तसा प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर आणला जाईल की नाही ? या प्रश्नांची मला उत्तरे हवी आहेत.

श्री. नाना पंचबुध्दे : पीठासीन अधिका-यांसमवेत झालेल्या बैठकीत जे निर्णय झाले होते त्यासंबंधाने एका महिन्यात कार्यवाही केली जाईल.

3...



ABG/ D/ KTG/ प्रथम श्री. शिगम 11:25

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख : एक महिन्यात कार्यवाही करण्याचे माननीय राज्यमंत्री यांनी आश्वासन दिले त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो. सदर चार निर्णयाचा उल्लेख लक्षवेधी सूचनेच्या निवेदनात केला नाही. हे चार निर्णय त्या बैठकीत झाले होते की नाही यासंबंधीचे मला उत्तर मिळावे.

श्री. नाना पंचबुध्दे : होय. इतर संबंधित विभागांची माहिती घेऊन एका महिन्यात निर्णय घेतला जाईल.

यानंतर श्री. भोगले

अग्रधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्रमांक-6...........

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, या विषयावर 1 एप्रिल, 08 रोजी सभागृहात चर्चा झ ाली होती. 2 एप्रिल, 08 रोजी सन्माननीय पीठासीन अधिकारी यांच्याकडे बैठक झाली होती. त्या बैठकीमध्ये एक महिन्यात करतो असेही म्हटले. 1.4.2008 ला चर्चा झाली त्यावेळीही सन्माननीय मंत्रीमहोदयांनी सभागृहात उत्तर दिले होते की, 1 महिन्याच्या आत तातडीने मंत्रिमंडळासमोर जाऊन निर्णय घेऊ. 1.4.08 ला आश्वासन दिले त्याची पूर्तता झाली नाही. आता सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांनी प्रश्न उपस्थित केला त्या प्रश्नाला उत्तर देताना मंत्रीमहोदय म्हणाले की, एका महिन्यात निर्णय घेणार आहोत. इतर संवर्गासाठी शासनाने 2006 मध्ये जी.आर. काढला, त्यांना 1996 पासून पाचवा वेतन आयोग लागू केला. 3 जून, 2000 ला जी.आर.काढून महाविद्यालयीन शिक्षकांना मार्च, 2000 पासून पाचवा वेतन आयोग लागू केला. त्यामुळे ही तफावत दूर करण्यासाठी 1 एप्रिलला दिलेल्या आश्वासनाची पूर्तता झाली नाही. आता सभागृहात दिलेल्या आश्वासनानुसार पुन्हा हा विषय सभागृहात विषय मांडावा लागणार नाही यादृष्टीने दिलेले आश्वासन पाळले जाईल काय? एका महिन्यात आश्वासनाप्रमाणे निर्णय घेतला जाईल काय?

श्री.नाना पंचबुध्दे : होय.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, हा प्रश्न सरळ सरळ चोरीचा आहे. सहावा वेतन आयोग येत असून पाचव्या वेतन आयोगानुसार फरकाची रक्कम दिली जात नाही. हा सरळ सरळ चोरीचा प्रकार आहे. मंत्रीमहोदयांनी सांगितले की, एका महिन्यात सादर करु. शिक्षण विभागाचा प्रस्ताव वित्त विभागाला 19.9.08 रोजी सादर झाला. सहाव्या वेतन आयोगात विचार करीत आहोत असे निवेदनात म्हटले आहे. आता एका महिन्यात निर्णय घेऊ असे मंत्रीमहोदय सांगतात. परंतु वित्त विभागाने प्रस्ताव नाकारला आहे. हकीम समितीपुढे म्हणणे मांडा असे निवेदनात म्हटले आहे. मागील फरकाची रक्कम ताबडतोब देणार आहात का? वित्त विभागाने प्रस्ताव नाकारला आहे.

श्री.नाना पंचबुध्दे : मी यापूर्वीच सांगितले आहे की, सर्व विभागांची माहिती घेऊन एका महिन्याच्या आत कारवाई करु.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, हा विषय मी वाचल्यानंतर माझ्या लक्षात आले की, 1996 पासून जर मागणी मान्य केली असेल तर काही विभागामध्ये 2000 पासून पाचवा वेतन आयोग का लागू केला? एकदा तत्व स्वीकारल्यानंतर त्याप्रमाणे सर्वांना निर्णय लागू झाला पाहिजे. शिक्षकांचे प्रश्न जाणीवपूर्वक उपस्थित करावयास लावता का? स्वीकारलेल्या तत्वाप्रमाणे वेतनश्रेणी लागू केली जाईल का? प्रत्येक वेळी वित्त विभागाकडून आडकाठी का आणली जाते?

श्री.कपिल पाटील : शिक्षण विभागातीलच एका कक्षाला फायदा दिला जातो व दुसऱ्या कक्षाला फायदा दिला जात नाही हा भेदभाव संपुष्टात आणण्यासाठी 1996 पासून पाचवा वेतन आयोग लागू करणार आहात की नाही?

श्री.नाना पंचबुध्दे : मी यापूर्वीच सांगितले की, इतर विभागात शिक्षक आहेत त्या सर्वांची माहिती घेऊन एका महिन्याच्या आत निर्णय करु.

श्री.सतीश चव्हाण : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख प्रत्येक अधिवेशनात हा विषय उपस्थित करतात, त्यावेळी निर्णयासाठी एका महिन्याची मुदत शासनाकडून मागितली जाते. पुढील अधिवेशनात सुध्दा सन्माननीय सदस्यांना पुन्हा हा विषय उपस्थित करावा लागेल. त्यावेळी देखील एका महिन्याची मुदत मागितली जाईल. पीठासीन अधिकाऱ्यांकडे झालेल्या बैठकीत जे चार निर्णय घेण्यात आले त्यानुसार वित्त विभागाकडे प्रस्ताव पाठविला हे खरे आहे काय? वित्त विभागाने तो प्रस्ताव नाकारला हेही खरे आहे काय?

श्री.नाना पंचबुध्दे : फक्त शिक्षण विभागाचा प्रस्ताव वित्त विभागाकडे पाठविण्यात आला होता. इतर विभागांची माहिती अप्राप्त होती.

श्री.सतीश चव्हाण : सभापती महोदय, माझ्या प्रश्नाचे उत्तर आलेले नाही?

(नंतर श्री.खर्चे....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ KTG/ D/ पूर्वी श्री. भोगले.... 11:35

**तालिका सभापती (श्री. भास्कर जाधव)** : माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, रिजेक्ट केलेले नसून फक्त एकाच विभागाचा प्रस्ताव प्राप्त झाला, इतर विभागांचे प्रस्ताव अप्राप्त होते.

श्री. सुभाष साळुंके : महोदय, 1 जानेवारी, 1996 पासून पाचवा वेतन आयोग लागू करणार अशी घोषणा सन 1998 मध्ये शासनाने केली होती व तो वेतन आयोग सन 1999 मध्ये प्रत्यक्षात लागू झाला होता. त्यावेळेस शासनाने सवंग लोकप्रियता मिळविली आणि सांगितले की, राज्यातील सर्व शिक्षकांनाही पाचवा वेतन आयोग लागू करणार. परंतु सन्माननीय सदस्यांनी लक्षात आणून दिले की, अजूनही राज्यतील डी.एड., बी.एड. शिक्षकांना ती वेतनश्रेणी शासनाने दिलेली नाही. आय.टी.आय. इन्स्ट्रक्टर्सच्या बाबतीत सांगायचे तर सन 2004 पर्यंत ही वेतनश्रेणी त्यांनादिली नव्हती. अशा प्रकारे पाचवा वेतन आयोग सर्व शिक्षकांना लागू झालेला नसून अजूनही 50 टक्के शिक्षकांना नियमानुसार वेतेणी मिळत नाही, म्हणून त्यांची ओरड आहे. परवा 23 डिसेंबर, 2008 रोजी शासनाने नेमलेल्या हकीम समितीची मुदत संपली. त्या समितीचा अहवाल आल्यानंतर ज्या वेतनश्रेण्या निर्धारित केल्या जातील त्यातही या शिक्षकांना न्याय मिळणार नाही. म्हणून एक महिन्यात या शिक्षकांच्या वेतनश्रेणीतील त्रुटी काढून त्यांचे नुकसान होणार नाही याचाही विचार करणे आवश्यक आहे. म्हणून या शिक्षकांच्या ज्या समस्या आहेत त्या जाणून घेऊन त्यात दुरुस्ती करावी आणि सन 1996 पासून असलेल्या त्रुटीची दुरुस्ती होईल, हे पहावे. म्हणून शिक्षकांच्या वेतनश्रेणीतील तफावत हकीम समितीचा अहवाल येण्यापूर्वी शासन दूर करणार काय ?

श्री. नाना पंचबुध्दे : सभापती महोदय, मी आताच सांगितले की, सहावा वेतन आयोग......

प्रा.बी.टी.देशमुख : महोदय, माननीय मंत्री महोदयांनी जे उत्तर दिले ते योग्य नाही. कारण या शिक्षकांवर अन्याय होत आहे. माननीय वित्त मंत्र्यांनी ठामपणे सांगितले, त्यासंबंधीचे कार्यवृत्त देखील माझ्याकडे आहे. ते म्हणाले होते की, सर्व विभागांचे प्रस्ताव एकत्रितपणे ठेवावेत. वित्त विभागाने हा प्रस्ताव फेटाळला असे उत्तर देणे योग्य नाही. याचा अर्थ असा होतो की, वित्त विभागासमोर हा प्रस्ताव नेलाच नाही.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी प्रश्न विचारला की, शालेय शिक्षण विभागाने वित्त विभागाकडे पाठविलेला प्रस्ताव वित्त विभागाने फेटाळला, हे खरे काय ? त्याला माननीय मंत्री महोदयांनी "नाही" असे उत्तर दिलेले आहे. ते पुढे असेही म्हणाले की, सर्व विभागांचे प्रस्ताव प्राप्त झालेले नव्हते.

......2

प्रा.बी.टी.देशमुख : महोदय, माननीय वित्तमंत्र्यांनी सर्व विभागांचे प्रस्ताव आणण्याची सूचना केली होती. परंतु माननीय मंत्री महोदयांनी आता सांगितले की, सर्व माहिती त्यांच्याकडे आलेली नाही. म्हणून माझी अशी सूचना आहे की, एक महिन्यात ही सर्व माहिती घेऊन ठरल्याप्रमाणे शालेय शिक्षण विभागामार्फत प्रोसेस करण्याचे आदेश देणार काय ?

श्री. नाना पंचबुध्दे : महोदय, ही सर्व माहिती घेऊन एक महिन्यात आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.

---------

....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : औंध उरो हॉस्पिटलमध्ये आवश्यक सुखसोई नसणे

**मु. शी.** : औंध उरो हॉस्पिटलमध्ये आवश्यक सुखसोई नसणे यासंबंधी सर्वश्री लक्ष्मण जगताप, जितेंद्र आव्हाड, रणजितसिंह मोहिते-पाटील, राजेंद्र जैन, डॉ. वसंत पवार, सर्वश्री भास्कर जाधव, रमेश शेंडगे, प्रा. फौजिया खान, ॲड. उषा दराडे, श्रीमती मंदा म्हात्रे, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.रमेश शेंडगे (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय आरोग्य मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"पुणे जिल्ह्यातील पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीतील यशवंतराव चव्हाण व पुणे येथील ससुन सर्वोपचार रुग्णालयावरील ताण कमी होण्यासाठी औंध उरो रुग्णालयातील काही खाटा आरक्षित ठेवून 300 खाटांचे सामान्य रुग्णालय सुरु करण्यात येणे, परंतु सदर रुग्णालयातील अनागोंदी व गैरकारभारामुळे रुग्णांना अनेक अडचणी येणे, विद्युत रोहित्र बंद अवस्थेत असणे, शवागृह नसणे, क्ष किरण व सोनोग्राफी ही यंत्रे अद्ययावत सुस्थितीत नसणे, तज्ञ वैद्यकीय अधिकाऱ्यांचे असलेले अत्यल्प प्रमाण, हृदय रोग विभाग सुरु नसणे, रस्त्यांची प्रचंड दुरावस्था झालेली असणे, रस्त्यांवर दिव्यांची व्यवस्था नसणे, तसेच अद्ययावत रुग्णवाहिका नसणे, 300 खाटांच्या सदर रुग्णालयांमध्ये केवळ 54 रुग्ण दाखल असणे, अपुऱ्या साधनसामुग्रीमुळे परिसरातील रुग्णांना खाजगी रुग्णालयाकडे जावे लागत असल्याने त्यांना प्रचंड मानसिक त्रास सहन करावा लागत असणे, यासंदर्भात वेळीच हस्तक्षेप करुन कार्यवाही करण्यास शासनाकडून होत असलेली दिरंगाई व टाळाटाळ याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी परिसरातील नागरिकांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष व संतापाची भावना, सदर प्रकरणी त्वरीत कार्यवाही करण्याची नितांत अत्यावश्यकता व याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया."

डॉ. राजेंद्र शिंगणे (सार्वजनिक आरोग्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

----------

.....4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ KTG/ D/

श्री. रमेश शेंडगे : सभापती महोदय, पुणे जिल्ह्यात औद्योगिकीकरणात वेगाने वाढ होत आहे. त्याचप्रमाणे पिंपरी-चिंचवड या भागात सुध्दा लोकसंख्या झपाट्याने वाढत आहे याचा विचार करुन पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे यशवंतराव चव्हाण हॉस्पिटल सुरु करण्यात आले, कारण पुण्यातील ससून रुग्णालयावरील ताण वाढला होता. त्यामुळे औंध येथील "उरो" या सामान्य हॉस्पिटलमध्ये 300 खाटांची मर्यादा वाढविली. परंतु या रुग्णालयात कुठल्याही प्रकारच्या सोई-सवलती आवश्यकतेनुसार दिल्या जात नाहीत. आज आरोग्याच्या दृष्टीने सर्व सुखसोई उपलब्ध करणे हे शासनाचे कर्तव्य आहे. 300 खाटांच्या या रुग्णालयाबाबतची माहिती घेतली असता प्रत्यक्षात तेथे 50-60 रुग्ण देखील ॲडमिट नसतात.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. लक्ष्मण जगताप....

असे सांगण्यात आले आहे की, हे रुग्णालय क्षय रुग्णांसाठी असल्यामुळे बाकीच्या आजाराचे रुग्ण त्या ठिकाणी ॲडमीट होत नाहीत. या ठिकाणचे एक्सरे मशीन जुने असल्यामुळे ते मशीन काम करीत नाही. सभापती महोदय, जो रुग्ण या ठिकाणी ॲडमीट होतो त्याची एक्सेरे आणि सोनोग्राफी चेकींग चांगल्या प्रकारे होणे आवश्यक आहे. वीज गेल्यानंतर या ठिकाणी जे जनरेटर मशीन आहे ते बरोबर काम करीत नाही. रिपेअरिंगची प्रक्रिया सुरु आहे असे उत्तर या ठिकाणी देण्यात आलेले आहे. जर जनरेटर रिपेअर होत नसेल तर त्या ठिकाणी दुसरे जनरेटर मशीन आणले पाहिजे. रस्त्याची सुध्दा या ठिकाणी चांगली सोय नाही. या हॉस्पिटलमध्ये डॉक्टरांची काही पदे रिक्त आहेत. या हॉस्पिटलमध्ये रुग्ण गेल्यानंतर त्याच्यावर चांगल्या प्रकारचे उपचार झाले पाहिजेत. रस्त्याच्या संदर्भातील विषय सार्वजनिक बांधकाम विभागाकडे पाठविण्यात आलेला आहे, दिव्यांच्या संदर्भातील विषय तसेच रिक्त भरण्याच्या विषय संबंधित विभागाकडे पाठविण्यात आलेले आहेत अशी माहिती निवेदनामध्ये देण्यात आलेली आहे. या हॉस्पिटलमध्ये सर्व सोयी सुविधा उपलब्ध करुन जनतेच्या मनात विश्वास निर्माण करण्यासाठी सर्व सोयींनी युक्त असे अद्यावत हॉस्पिटल आपण केव्हा पासून उपलब्ध करुन देणार आहात?

डॉ. राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी औंध येथील उरो रुग्णालयाच्या संदर्भात प्रश्न उपस्थित केलेला आहे. 26 जानेवारी 1949 मध्ये क्षय रोगांच्या रुग्णांसाठी 400 खाटांच्या हॉस्पिटलची निर्मिती करण्यात आली होती. सन 2002 मध्ये निर्णय घेऊन 1 मार्च 2006 मध्ये 200 खाटांचे सामान्य रुग्णालय व 120 खाटांचे क्षय रुग्णालय अशा पध्दतीने या हॉस्पिटलचे रुपांतर करण्यात आलेले आहे. ही दोन्ही रुग्णालये एकाच इमारतीमध्ये सुरु आहेत. सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी जे प्रश्न उपस्थित केले आहेत त्यासंदर्भात सविस्तर उल्लेख लक्षवेधी सूचनेच्या निवेदनात करण्यात आलेला आहे. शवागृह खराब झाले आहे असे या ठिकाणी सांगण्यात आले आहे त्यासंदर्भात नवीन पोस्टमार्टेम गृहाच्या संदर्भात सार्वजनिक बांधकाम खात्याकडून अंदाजपत्रक मागवण्यात आल्यामुळे नवीन पोस्ट मार्टेम गृहाचे काम देखील लवकरात लवकर सुरु करण्यात येईल. या हॉस्पिटलमधील एक्सरे मशीन व सोनोग्राफी मशीन्स व्यवस्थित सुरु आहेत. सीटी स्कॅन मशीनचा प्रस्ताव प्राप्त झालेला असून येत्या मार्च महिन्यामध्ये अजून एक

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

27-12-2008 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) U-2

SGJ/ KTG/ D/ 11:40

डॉ. राजेंद्र शिंगणे....

सिटीस्कॅन मशीन या हॉस्पिटलला उपलब्ध होणार आहे. या वर्षामध्ये आतापर्यंत 1578 रुग्णांची सोनाग्राफी करण्यात आलेली असून या ठिकाणी पोस्टमार्टेम सेंटर सुध्दा सुरु आहे. पदांच्या संदर्भात मी आपणास सांगू इच्छितो की, गट "अ" वर्ग एक मधील मंजूर पदे 19 असून त्यापैकी 15 पदे भरण्यात आलेली आहेत. गट "अ" वर्ग 2 मधील 33 पदे मंजूर असून 33 च्या 33 पदे भरण्यात आलेली आहेत. गट "क" मधील 222 पदे मंजूर असून 210 पदे भरण्यात आलेली आहेत. गट "ड" वर्ग 4 मधील 169 पदे मंजूर असून 163 पदे भरलेली आहेत. एकूण 443 पदांपैकी 421 पदे भरण्यात आलेली आहेत. या ठिकाणी फार रिक्त जागा आहेत अशातला काही भाग नाही. या ठिकाणी 2 फिजिशिअन, ऑप्टोथोमीक सर्जन 3, गायनेकॉलॉजिस्ट 4, बालरोग तज्ज्ञ 4 आहेत, सर्जन 1, आर्थोपेडीक सर्जन 2, इएनटी सर्जन 2, डेंटल सर्जन सुध्दा आहे, ॲनेस्थेटीक 3 आहेत, रेडीओलॉजिस्ट 3, पॅथॉलॉजिस्ट 2, त्वचारोग तज्ञ 3, चेस्ट फिजिशिअन 3, मनोविकार तज्ज्ञाची सुध्दा जागा भरण्यात आलेली आहे. हृदयविकार तज्ज्ञ आहे, आयसीयु 10 खाटाचे मंजूर असून यासाठी 18 पदे मंजूर असून ही पदे सुध्दा भरण्यात आलेली आहेत. 8 एप्रिल, 2008 ते नोव्हेंबर, 2008 पर्यंत 353 रुग्णांवर उपचार करण्यात आलेले आहेत. आयसीयु मध्ये सुध्दा सर्व व्यवस्था असून या ठिकाणी 2 ॲम्ब्यूलन्स उपलब्ध आहेत. सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी जनरेटरचा मुद्दा मांडलेला आहे. या ठिकाणी 63 के.व्ही. चे जनरेटर सुरु असून 160 के.व्ही.चे जनरेटर बंद आहे. आपण या ठिकाणी एक्स्प्रेस फिडरचा प्रस्ताव दिलेला असून हा प्रस्ताव सुध्दा लवकरात लवकर मंजूर होणार आहे. या ठिकाणी एक्स्प्रेस फिडरचे काम झाले तर दुस-या जनरेटरच्या दुरुस्तीचे काम सुध्दा आपल्याला पडणार नाही. सभापती महोदय, या ठिकाणी क्षय रोग हॉस्पिटल आणि जनरल हॉस्पिटल आहे. या ठिकाणी अनेक वर्षापासून जुना क्षयरोग दवाखाना असल्यामुळे जनतेची या दवाखान्यात येण्याची मानसिकता नाही. म्हणून आम्ही तत्वत: निर्णय घेतलेला आहे की, या ठिकाणी क्षय रोगाचे जे हॉस्पिटल आहे त्याचे इएसआयच्या इमारतीमध्ये शिफ्टींग करण्याचे काम आम्ही करीत आहोत.

यानंतर श्री. अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.राजेंद्र शिंगणे.......

ईएसआयमध्ये ट्रान्सफर करणार आहोत. तेथील रस्ते खराब झालेले आहेत. ते दुरुस्त करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाला सांगण्यात आले असून सा.बा.विभागाने अंदाजपत्रक मागविले आहे. तेव्हा तेथील रस्ते लवकरात लवकर दुरुस्त करण्यात येतील. तसेच तेथील कॅम्पमध्ये लाईटसची व्यवस्था ताबडतोब करण्यात येईल.

श्री.मोहन जोशी : सभापती महोदय, पुणे शहर वेगाने वाढत आहे. पुणे शहरात मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या ससून रुग्णालयावर मोठ्या प्रमाणावर ताण वाढत आहे. बिबवेवाडी येथे महाराष्ट्र शासनाच्या काही बिल्डींग्ज विनावापर पडून आहेत. त्याठिकाणी हॉस्पीटल हलविण्यात येईल काय ?

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे महाराष्ट्र शासनाच्या बिल्डींग्ज विनावापर पडून असतील तर त्याठिकाणी रुग्णांची सेवा करण्यासाठी त्याचा निश्चितपणे उपयोग केला जाईल.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, याठिकाणी औंध उरो रुग्णालयाचा प्रश्न चर्चेसाठी आला आहे. मला सन्माननीय मंत्रिमहोदयांच्या एक गोष्ट निदर्शनास आणून द्यावयाची आहे की, वैद्यकीय सेवासंबधी पायाभूत सुविधा उभ्या कराव्या लागतात आणि त्याचे ॲडमिनिस्ट्रेशन डॉक्टरांनी करणे योग्य नाही. तेव्हा ॲडमिनिस्ट्रेशनची कामे करण्यासाठी अधिकारी व कर्मचाऱ्यांची भरती झालेली आहे काय ? जर अशाप्रकारे भरती झाली नसेल तर या विभागात बी.ओ.टी.तत्त्वासारखा प्रयोग राबविणार आहात काय ? म्हणजे एखादे रुग्णालय काही डॉक्टर्स वा एखादी संस्था चालविण्यास तयार असेल तर ते हॉस्पीटल लीजवर चालविण्यास दिल्यास हॉस्पीटलचा दर्जा देखील सुधारेल. इंग्लंडमध्ये अशा पध्दतीने हॉस्पीटल चालविण्यास देण्यात येतात. तेव्हा महाराष्ट्रात तसा प्रयोग करण्यात येईल काय ?

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, प्रशासकीय बाबी संदर्भात निर्णय घेण्यासाठी प्रशासकीय अधिकाऱ्यांची नियुक्ती केलेली आहे. जसे की, सिव्हील सर्जन, डी.एच.ओ. काही ठिकाणी या जागा रिक्त असल्यामुळे प्रशासकीय निर्णय

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.राजेंद्र शिंगणे.......

घेण्यास विलंब होतो. मी यापूर्वी सांगितल्याप्रमाणे जानेवारी 2009 पर्यंत सर्व रिक्त जागा भरण्याचा शासनाने निर्णय घेतलेला आहे. हॉस्पीटल एखाद्या संस्थेस चालविण्यास देण्याबाबतच्या प्रश्नाबाबत सांगू इच्छितो की, एखादी संस्था वा यंत्रणा अशाप्रकारचे काम करीत असेल तर त्याबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेण्यात येईल.

ॲड.उषा दराडे : सभापती महोदय, सन्माननीय मंत्रिमहोदयांनी याठिकाणी दिलेले उत्तर आणि लेखी निवेदनात दिलेले उत्तर यामध्ये फरक आहे. लेखी निवेदनात म्हटले आहे की, सद्य:स्थितीत शवागृह नुतनीकरण करण्याचे काम व अंतर्गत रस्त्याची दुरस्ती व दिव्यांची दुरुस्ती करण्याबाबत जिल्हा शल्य चिकित्सक, पुणे यांनी सार्वजनिक बांधकाम विभागास कळविले आहे." मंत्रिमहोदयांनी उत्तर देताना सांगितले की, शवागृहाचे काम सुरु आहे. तेव्हा नेमके उत्तर कोणते आहे ? जर शवागृहाच काम सुरु असेल तर ते केव्हा सुरु करण्यात येईल ?

यानंतर श्री.जुन्नरे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.उषा दराडे ..

बंद असलेले रोहित्र चालू करण्याची प्रक्रिया सुरु आहे अशा प्रकारचा उल्लेख निवेदनात करण्यात आला आहे. अशा प्रकारचे उत्तर देण्याची पध्दत बरोबर नाही. हे रोहित्र किती दिवसात सुरु करण्यात येणार आहे आणि किती दिवसात रिक्त पदे भरण्यात येणार आहेत ?

डॉ.राजेंद्र शिगणे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, शवविच्छेदन गृह जुने आहे व ते खराब झालेले आहे . त्यामुळे नवीन कोल्ड स्टोअरेज असलेले पोस्ट मार्टेम रुम बांधण्याचे प्रस्तावित केलेले आहे. जुने शवविच्छेदन गृह खराब झालेले असले तरी त्या ठिकाणी शवविच्छेदनाचे काम सुरु आहे. ते काम बंद झालेले नाही. त्याचबरोबर नवीन शवविच्छेदन बांधण्याचे प्रस्तावित केलेले आहे.

डॉ.नीलम गो-हे :सभापती महोदय, पुण्याच्या ससून हॉस्पिटलच्या संदर्भात या सभागृहात अनेक तक्रारी वेळोवेळी उपस्थित करण्यात आल्या होत्या. पिंपरी चिंचवड आणि पुणे महानगरपालिका भागातील ससून हॉस्पिटल हे शासनाशी संबंधित असून त्या बाबतीत अनेक तक्रारी करण्यात आलेल्या आहेत. तेव्हा विधान सभा आणि विधान परिषदेतील पुण्याच्या आमदारांची एक बैठक घेऊन या हॉस्पिटलच्या तक्रारीबाबत मार्ग काढण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्यात येणार आहे काय ?

डॉ.राजेंद्र शिगणे : सभापती महोदय, अधिवेशन सपल्यानंतर मी स्वत: पुण्याला भेट देण्याचे ठरवले असून उरो रुग्णालय ,पुण्यातील ससून हॉस्पिटल व इतर रुग्णालये या ठिकाणी मी स्वत: भेट देऊन पहाणी करणार आहे . त्या भेटीमध्ये ज्या काही त्रृटी आढळून येतील त्या पुढच्या काळात दूर करण्याच्या दृष्टीने प्रयत्न केले जातील. तेथील रुग्णालय अपग्रेड कसे करावयाचे , तेथे कोठे स्टाफ कमी आहे इत्यादी बाबी मी स्वत: पहाणाार आहे. त्याचप्रमाणे सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे पुणे येथील रुग्णालयाची भेट दिल्यानंतर सन्माननीय सदस्यांची बैठक घेतली जाईल आणि सन्माननीय सदस्यांच्या काही सूचना असतील तर त्याचा विचार केला जाईल.

श्री.उल्हास पवार : सभापती महोदय ही अत्यंत महत्वाची लक्षवेधी सूचना असून पिंपरी चिंचवड महानगर पालिका आणि ससून हॉस्पिटल तसेच यशवंतराव चव्हाण रुग्णालयाच्या संदर्भात



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

या लक्षवेधी सूचनेमध्ये अनागोंदी हा शब्द वापरण्यात आला आहे.तो अत्यंत बरोबर आहे. लोकसंख्येच्या दृष्टीने देशातील नवव्या क्रमांकाचे हे शहर असून ते सतत वाढत आहे .तेथील लोकसंख्या वाढत असल्यामुळे रुग्णांची संख्या देखील वाढत आहे. त्याचबरेबर सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गो-हे यांनी सांगितल्याप्रमाणे औंध येथील चेस्टचे हॉस्पिटल प्रसिध्द असून ते उत्तम प्रकारचे आहे त्या ठिकाणचा एक एक भाग ससून सारख्या गर्दीच्या ठिकाणी हलविण्यास सुरुवात केली आहे.त्याचबरोबर सन्माननीय सदस्य श्री मोहन जोशी यांनी सांगितल्याप्रमाणे पुण्याच्या बिबवे वाडीत राज्य कामगार विमा योजनेचे कामगारांसाठी हॉस्पिटल असून ही इमारत बाधून चार वर्षे झाली आहेत .ही नवीन इमारत असून अजूनही ती रिकामीच पडून आहे. त्या इमारतीत हॉस्पिटल सुरु करण्यात येणार आहे काय ? त्याचप्रमाणे अनोगोंदी कारभाराचे मी एक उदाहरण देतो.तीन वर्षापूर्वी माझ्या आमदार फंडातून ससून हॉस्पिटलसाठी ॲम्ब्युलन्स घेण्याकरता मी पैसे दिले होते परंतु त्याचे टेन्डर निघाले नाही आणि कोटेशन काढले नाहीत या कारणासाठी ती खरेदी केली नाही आतापर्यत तीन वर्षे पूर्ण झाल्या नतरही आली नाही. मला असे सांगण्यात आले होते की पैसे लॅप्स होतील. त्यानंतर मी माननीय अर्थमंत्र्यांच्या कार्यालयात जाऊन त्यांच्याशी भांडलो होतो. अशा प्रकारचा अनागोंदी कारभार पुण्या सारख्या ससून हॉस्पिटलमध्ये चालू आहे.या बाबतीत काय करण्यात येणार आहे ? यासबंधी माननीसय मंत्रिमहोदयांनी खुलासा करावा.

डॉ राजेंद्र शिगणे : सभापती महोदय, मी अगोदरच सांगितले की अधिवेशन संपल्यानंतर या सर्व रुग्णालयांना भेट देणार आहे. सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी काही सूचना केल्या आहेत . ते या भागात काम करीत असल्यामुळे निश्चितपणे त्यांनी ज्या तक्रारी मांडल्या आहेत त्या ख-याच आहेत. इएसआयएस हॉस्पिटल त्या ठिकाणही बांधून तयार आहे. मी सुरुवातीलाच सांगितले आहे की, या हॉस्पिटलची जी रचना करण्यात आली होती त्यामध्ये टीबी हॉस्पिटलसुध्दा आहे आणि समान्य रुग्णालय सुध्दा आहे. तेथे टीबी हॉस्पिटल असल्यामुळे सामान्य रुग्णालयातील रुग्ण त्या ठिकाणी येत नाहीत. तेथे टीबी हॉस्पिटल असल्यामुळे आपण तेथ् कशाला जावयाचे अशा प्रकारची त्यांची मानसिकता आहे.त्यामुळे टीबी हॉस्पिटल इएसआयएस इमारतीमध्ये हलविण्याचा आमचा प्रयत्न आहे. आज सकाळी अधिका-याकडून ब्रिफिग घेत असतांना मला असे समजले की, तेथील डॉक्टर्सना राहण्याची सोय नाही. तेथे क्वार्टर्स नाही. हा परिसर खूप मोठा

आहे म्हणून पुढच्या काळात आरएमओ , मेडिकल ऑफिसर किंवा ज्याची इमर्जन्सी सेवा आवश्यक आहे. अशा डॉक्टर्सना राहण्यासाठी ताबडतोबीने क्वार्टर्स बांधण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे त्याचप्रमाणे् इतर ज्या काही तक्रारी आहेत त्या प्रत्यक्ष पाहण्यात येतील .सन्माननीय सदस्य श्री. उल्हास पवार यांनीसुध्दा काही सूचना केल्या आहेत त्या सूचना विचारात घेऊन त्याबाबतीत योग्य ती कार्यवाही केली जाईल.

श्री.उल्हास पवार : ॲम्ब्युलन्स खरेदी करण्यासाठी पैसे देऊन तीन वर्षे झाली आहेत त्याबाबतीत काय करण्यात येणार आहे ?

**तालिका सभापती (भास्कर जाधव)** : पैसे उपलब्ध होत नाहीत परंतु पैसे उपलब्ध करुन दिल्यानंतर लॅप्स होत असतील तर ते बरोबर नाही. तेव्हा या बाबतीत चौकशी करण्यात यावी.

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/ KTG/ D/ श्री. गायकवाड नंतर --- 11:55

डॉ. राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्य श्री.उल्हास पवार यांची ही तक्रार तपासून घेतो आणि त्यांनी दिलेला निधी लॅप्स झाला आहे किंवा काय तेही पाहतो. तसे पाहिले तर हे रूग्णालय वैद्यकीय शिक्षण विभागाच्या अंतर्गत येते. पण तरीही मी याबाबत माहिती घेतो आणि जे कोणी यामध्ये दोषी असतील त्यांच्यावर याबाबत निश्चितपणे कारवाई केली जाईल.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, माझे या संदर्भात दोन तीन प्रश्न आहेत. माननीय आरोग्य मंत्री या अधिवेशनाच्या सुरूवातीपासून घोषणा करीत आहेत की, 31 जानेवारीपर्यंत राज्यातील डॉक्टरांची सर्व रिक्त पदे भरली जातील. पण हे ते कोणत्या आधारावर बोलत आहेत ते मला कळत नाही. त्यांच्याकडे केवळ एमपीएससीची हजार पदे असतील. तेव्हा त्यांच्याकडे अशी कोणती जादूची कांडी आहे की एक महिन्यामध्ये ते ही सारी पदे भरण्याची आश्वासने देत आहेत. एक तर या सभागृहामध्ये आश्वासन दिल्यानंतर ते पाळणे आवश्यक आहे. आज राज्यामध्ये अशी जवळजवळ अडीच हजार पदे रिक्त आहेत अशी माझी माहिती आहे, तेव्हा ही सारी पदे आपण कशी भरणार आहात ? याचा खुलासा त्यांनी करावा. तसेच माझा दुसरा प्रश्न असा आहे की, या पुण्याच्या ससून हॉस्पिटलच्या बाजूला एक हॉस्पिटल बांधून तयार आहे आणि ते खाजगीकरणातून चालविण्यासाठी दिले आहे, माझ्या माहितीप्रमाणे वॉकहार्ट त्यात भागीदार आहे. पण त्यासाठी राज्य सरकारने जागा वगैरे दिलेली आहे. तेथे सगळे काही दिले गेलेले आहे. तेव्हा हे हॉस्पिटल केव्हा सुरू होणार आणि ते न चालू होण्यामागे काय कारस्थान आहे ? आता येथे सांगितले गेले की, इएसआयएस हॉस्पिटल आहे तेथे टी.बी.चा विभाग हलविला जाईल. मग तेथे जी काही एकर जागा आहे ज्यात उरो हॉस्टिप आहे ती जागा कोणाच्या घशात जाणार आहे ? त्या जागेविषयी राज्य सरकारने काय प्रपोजल केले आहे ? तेथे जनरल हॉस्पिटल केले जाणार आहे अशीही बातमी ऐकायला मिळते. पण मुंबईच्या सेंट जॉर्जेस हॉस्पिटलच्या ठिकाणी देखील काही इमारती तयार आहेत पण त्याही अजून कोणाला दिलेल्या नाहीत. त्याचे प्रपोजल काय आहे हे देखील येथे समजणे आवश्यक आहे. दुसरे असे की, तेथे टीबी विभाग केल्याने इतर रूग्ण यायला तयार नाहीत पण मग टीबी रूग्णांची संख्या कमी झालेली आहे का ?

डॉ. राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सुरूवातीस जो प्रश्न विचारला आहे तो राज्यात रिक्त असलेल्या डॉक्टरांची पदे भरण्याविषयीचा आहे. मी याबाबत वेळोवेळी सांगितले आहे. खरे म्हटले तर आपले दवाखान तयार आहेत, प्रा.आ.केंद्रे, ग्रामीण रूग्णालये अशा

..... एक्स 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. शिंगणे ....

अनेक ठिकाणी डॉक्टरांच्या जागा रिक्त असल्याने रूग्णांची गैरसोय होते याची आपणा सगळ्यांनाच कल्पना आहे. तेव्हा राज्यात अशी एकूण सव्वा दोन, अडीच हजार पदे रिक्त असतील असेही सन्माननीय सदस्यांनी सांगितले आहे. तर ही पदे भरताना आपण यापूर्वी जी पदे ॲडहॉक भरली आहेत त्यांना पर्मनंट करून त्यांना पोस्टिंग दिले जाईल. तसेच एमपीएससी कडून हजार पदे भरणार आहोत त्याचप्रमाणे प्रमोशनने देखील काही पदे आपल्याला उपलब्ध होतील. त्यांनाही आपण नेमणूका देण्याचे ठरविले आहे. हे सगळे करीत असताना त्यात थोड्याशी अडचणी जरूर येणार आहेत. परंतु प्रामुख्याने आरोग्य विभागाच्या अडचणी लक्षात घेऊन ही रिक्त पदे भरणे आज अत्यंत गरजेचे आहे. ...

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. आता माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, एमपीएससी मार्फत या जागा भरणार आहे, तसेच ॲडहॉक डॉक्टरांनाही कायम करणार आहेत व प्रमोशन्स दिली जाणार आहेत. तेव्हा माझा त्यांना प्रश्न आहे की, जे आपले डॉक्टर्स खाजगी प्रॅक्टीस करीत आहेत, त्यांना राज्य सरकारने एमपीएससी दिली आहे पण ते खाजगी प्रॅक्टिस देखील करीत आहेत त्यातील ज्यांची खाजगी प्रॅक्टिस चांगली चालते आहे ते डॉक्टर्स आपल्याकडे येणार नाहीत ही वस्तुस्थिती आहे. ती देखील या निमित्ताने आपण समजून घेतली पाहिजे. आपण सवंग लोकप्रियतेसाठी घोषणा करता पण प्रत्यक्षात त्या उतरणे कठीण असते. तेव्हा आपण कॅटेगरेकली सांगू शकाल का की ही हजार पदे अमुक ठिकाणी भरणार आहोत, ही अडीच हजार पदे या या माध्यमातून आम्हाला मिळणार आहेत.

**तालिका सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आपण या लक्षवेधी सूचनेचा स्कोप वाढवित आहात. ही लक्षवेधी सूचना केवळ पुण्यामधील रूग्णालयांसंबंधीची आहे.

( यानंतर श्री. सरफरे .... वाय 1 ..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, या महाराष्ट्रातील शासकीय दवाखान्यांमध्ये डॉक्टर असले पाहिजेत ही माझी भूमिका आहे. मला वाटते माननीय सदस्यांची सुध्दा हीच भूमिका असली पाहिजे. माझ्या जागी माननीय सदस्य जर आरोग्य मंत्री झाले असते तर त्यांनी निश्चितपणे ही भूमिका स्वीकारली असती. सभापती महोदय, 1079 पदे सिलेक्ट लिस्टमधून आली. आपण म्हणता की, ते खाजगी प्रॅक्टिस करतात. सर्वच डॉक्टर खाजगी प्रॅक्टिस करतात असे वाटत नाही. जवळपास 1300 पदे ॲडहॉक पध्दतीची असून ती भरण्यात येत आहेत. ही परिस्थिती 31 जानेवारीपर्यंत रहाणार आहे. अडीच हजार पदांचे टारगेट ठेवले आहे. माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे वैद्यकीय प्रॅक्टिस ठिकठिकाणी चालत असल्यामुळे काही डॉक्टर येणार नाहीत. म्हणून सुरुवातीला 2 हजार डॉक्टरांचे टारगेट ठेवले होते. आपल्याला माहीत होते की, अनेक लोक एस्टॅब्लिश झालेली प्रॅक्टिस सोडून त्यांची नेमणूक स्वीकारणार नाहीत. म्हणून आपण प्रयत्न करावयाचे नाहीत अशातला भाग नाही. प्रायमरी हेल्थ सेंटर, रुरल हॉस्पिटल आणि सिव्हिल हॉस्पिटीलमध्ये डॉक्टर देण्याबाबत प्रयत्न करणे ही शासनाची भूमिका आहे.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>लक्षवेधी सूचना क्रमांक 8 बाबत</u>**

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, आजच्या कामकाजाच्या क्रमामध्ये 8 व्या क्रमांकावरील लक्षवेधी सूचनेचे निवेदन शासनाकडून वितरीत करण्यात आलेले नाही. त्यामुळे ही लक्षवेधी सूचना आपण सोमवारी घ्यावी अशी माझी आपणास विनंती आहे.

डॉ. राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, ही लक्षवेधी सूचना रात्री उशिरा कार्यालयाला प्राप्त झाल्यामुळे सोमवारी किंवा मंगळवारी लक्षवेधी सूचना घेण्यात यावी अशी माझी आपणास विनंती आहे.

**तालिका सभापती (श्री. भास्कर जाधव)** : ठीक आहे.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : शासकीय दूध योजना, नागपूर येथील रोजंदारीवर काम करणाऱ्या 123 कर्मचाऱ्यांना सेवेत नियमित करण्याची मागणी

**मु. शी.** : शासकीय दूध योजना, नागपूर येथील रोजंदारीवर काम करणाऱ्या 123 कर्मचाऱ्यांना सेवेत नियमित करण्याची मागणी यासंबंधी सर्वश्री अरविंद सावंत,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. अरविंद सावंत (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय दुग्धव्यवसाय विकास मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"शासकीय दुध योजना, नागपूर येथील गेली २०-२५ वर्षे रोजंदारीवर काम करणाऱ्या सुमारे १२३ कर्मचाऱ्यांनी आपल्याला सेवेत नियमित करण्याची वेळोवेळी दिलेली लेखी निवेदने, गेली २०-२५ वर्षे हे कर्मचारी प्रतिमहा फक्त १५०० ते २००० रुपयांवर हंगामी कर्मचारी म्हणून काम करीत असणे, शासनाच्या निर्णयानुसार २४० दिवस सतत सेवा केल्यावर त्यांना कायम करणे आवश्यक असणे, परंतु त्याकडे शासनाने जाणीवपूर्वक केलेले अक्षम्य दुर्लक्ष, एका कर्मचाऱ्याने कामगार औद्योगिक कार्यालयात दाखल केलेल्या याचिकेवर सेवेत कायम करुन त्यांना पूर्वलक्षी प्रभावाने थकबाकी देण्याचा दिलेल्या निर्णयानुसार रुपये ३,३९,१३९ देण्यात येणे, नागपूर दुग्धशाळेतील रोजंदारी कर्मचाऱ्यांना सेवेत नियमित करण्याचा औद्योगिक न्यायालयाच्या आदेशाला शासनाने मुंबई उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालयात केलेले अपिल फेटाळून औद्योगिक न्यायालयाचा निर्णय कायम ठेवण्यात येणे, पश्चिम महाराष्ट्रातील दुग्धविकास शाळामधील सुमारे ३००० रोजंदारी कामगारांना सेवेत कायम करण्याची दुग्धविकास मंत्री यांनी त्यांच्या शिष्टमंडळास सप्टेंबर, २००७ मध्ये तयारी दर्शविणे, आपल्या रास्त व न्याय मागण्यांसाठी सदर रोजंदारी कामगारांनी कोर्टातून आदेश आणूनही त्याकडे शासनाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष, रोजंदारीवरील अनेक कामगारांना आलेला मृत्यू, आता फक्त १२३ कर्मचाऱ्यांना तातडीने सेवेत नियमित करण्यास शासनाने केलेला अक्षम्य

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

विलंब, परिणामी त्यांच्यात पसरलेला तीव्र असंतोष व संतापाची लाट लक्षात घेता या याप्रकरणी शासनाने तातडीने सदर १२३ रोजंदारी कामगारांना सेवेत नियमित करण्याबाबत आदेश काढण्याची नितांत आवश्यकता व शासनाची प्रतिक्रिया."

श्री. रविशेठ पाटील (दुग्धविकास मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, गेली दहा वर्षे आपण हा प्रश्न मांडीत आहोत. शासकीय दूध योजना नागपूर याठिकाणी रोजंदारीवर 25 ते 30 वर्षे हे लोक काम करीत आहेत. शासनाच्या नियमाप्रमाणे 240 दिवस पूर्ण झाल्यानंतर त्यांना सेवेत कायम करण्यात येते. तरीही या कर्मचाऱ्यांना सेवेत कायम करण्यात आले नाही. त्यासाठी हे कर्मचारी सातत्याने शासनाकडे पाठपुरावा करीत आहेत, आंदोलन करीत आहेत. आता सुध्दा ते उपोषणाला बसले आहेत. काल परवा आपण त्यांना भेटायला गेलो असतांना त्यापैकी एकाने तर मंत्रिमहोदयांचे पाय धरले तरी त्यांनी त्या कर्मचाऱ्याकडे पाहिले नाही. म्हणून ते रडले. तरीसुध्दा शासनाने याठिकाणी निर्दयपणे उत्तर दिले आहे. निवेदनामध्ये नियमित न झालेले रोजंदारीवरील कर्मचारी नागपूर विभागामध्ये 118 दाखविले आहेत. प्रत्यक्षात 200 ते 300 कर्मचारी होते. त्यापैकी काही जण मरण पावले. आणि आता 118 जीवंत आहेत. हे कामगार कामगार न्यायालयात गेल्यानंतर न्यायालयाने त्यांच्या बाजूने निकाल दिला. आणि या लोकांना कामय सेवेत घेण्यास सांगितले. त्यानंतर त्या निकालाच्या विरोधात हे शासन हायकोर्टात गेले. त्याठिक्‌ाणी या शासनाचा पराभव झाला. हायकोर्टाने आदेश दिले की, इंडस्ट्रियल कोर्टाने दिलेला निर्णय योग्य आहे त्याचे आपण पालन करावे. शासनाने त्याचे पालन केले नाही. शासन एवढयावर थांबले नाही. त्यानंतर शासन सुप्रिम कोर्टामध्ये गेले. त्याठिकाणी सुध्दा शासनाला सांगण्यात आले की, इंडस्ट्रियल कोर्टाचा निर्णय बरोबर आहे. एवढे होऊन सुध्दा अजूनपर्यंत त्यांना कायम सेवेत घेतले जात नाही. याठिक्‌ाणी निवेदनात म्हटले आहे की, "मा. सर्वोच्च न्यायालयाने अलिकडेच अे. उमराणी विरुध्द रजिस्ट्रार को.ऑ. सोसायटीज, तामिळनाडू व इतर सिव्हिल अपिल प्रकरणी दिनांक 28.7.2004 रोजी दिलेल्या निर्णयानुसार ज्यांनी मागील दाराने सेवेत प्रवेश केला आहे त्यांना त्याच दाराने परत पाठवावे."

(यानंतर श्री.बरवड)

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत .....

सभापती महोदय, या विभागाचे तत्कालीन मंत्री श्री. अनिस अहमद असे म्हणाले होते की, आप अपने स्तर पर वित्त मंत्री से पूछिये कि यह क्यो नही हो रहा है. हे उत्तर माननीय मंत्र्यांनी दिले होते. दुग्धविकास मंत्री असे म्हणाले की, मी घेण्यास तयार आहे परंतु वित्त मंत्र्यांकडून परवानगी मिळत नाही. आप अपने स्तर पर वित्त वित्त मंत्री से पूछिये असे त्यांनी पीठासीन अधिकाऱ्यांना सांगितले. त्यानंतर दालनात बैठक लावली. माननीय सभापतींनी निर्देश दिले. परंतु आजही याबाबतीत कार्यवाही होत नाही. म्हणून आपण या सर्व 199 कामगारांना कायमस्वरुपी कधी घेणार आणि त्यांचा एरिअर्स कधी देणार ?

श्री. रविशेठ पाटील : सभापती महोदय, एकूण 8488 कामगार होते. त्यापैकी जवळपास 8289 कामगारांना कामावर घेतले. 199 लोक राहिलेले आहेत. मधल्या काळात सर्वोच्च न्यायालयाचा निकाल आला आणि त्यांनी निर्देश दिले की, आपण बॅकडोअर एंट्रीमध्ये असे कामगार घेऊ नका. त्यांच्या बाबतीत आम्हाला आकस नाही. आम्हाला त्यांना घ्यावयाचे आहे. ज्या ज्या ठिकाणी जागा असतील त्या ठिकाणी भरावयाचे आहे परंतु सुप्रीम कोर्टाचा निकाल आल्यानंतर आम्हाला त्यांच्या बाबतीत विचार करता आला नाही.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी या ठिकाणी सांगितले. आता त्यांना उत्तर दिल्याशिवाय परत जाता येणार नाही. कारण आपण जो सर्वोच्च न्यायालयाचा निर्वाळा दिलेला आहे त्या अनुषंगाने आपले जे बारदाण अधिकारी आहेत त्यांचे काय करणार ते आधी सांगावे. बेशरमपणाने या कामगारांचे रक्त पिण्याची प्रवृत्ती असलेले हे बारदाण अधिकारी आहेत. आपण निवेदनामध्ये असे म्हटले आहे की, माननीय सर्वोच्च न्यायालयाने अलीकडेच म्हणजे 2004 मध्ये निर्णय दिला. 2004 म्हणजे अलीकडे असे म्हणता येईल काय ? आपण सर्वोच्च न्यायालयाच्या 2004 मधील निर्णयाचा निर्वाळा देऊन या कामगारांना वंचित ठेवत असाल तर मी आपल्याला सांगू इच्छितो की, या संदर्भामध्ये कामगार न्यायालयाचा जो निर्णय आहे त्याबाबत हायकोर्टाने 29 सप्टेंबर, 2005 रोजी त्यांच्या बाजूने निर्णय दिला. त्यावेळी आपल्या वकिलांना सुप्रीम कोटाचा 2004 मधील निर्णय कोट करता आला असता. हायकोर्टाने 2005 साली

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

कामगारांच्या बाजूने निवाडा दिलेला असून त्यानंतर सुप्रीम कोर्टाने 26.3.2007 ला कामगारांच्या बाजूने निर्णय दिला. याचा अर्थ सुप्रीम कोर्टाचा 2004 चा जो निर्णय होता तो सुप्रीम कोर्टानेच ओव्हर रुल केला. आता माननीय मंत्रिमहोदयांनी आम्हाला उत्तर दिल्याशिवाय जाऊ नये. ज्या सुप्रीम कोर्टाच्या निर्णयाचा हवाला देऊन आपण कामगारांना नाकारत होता त्याच सुप्रीम कोर्टाने 2004 नंतर 26.3.2007 ला या कामगारांच्या बाजूने निर्णय दिलेला आहे. हायकोर्टाने सुध्दा 2004 नंतर निर्णय दिलेला आहे. असे असताना आपण त्यांना कामावर घेतले पाहिजे आणि तसे आपल्याला या ठिकाणी जाहीर करावे लागेल. आपले जे अकलेचे बारदाण अधिकारी आहेत त्यांच्यावर कारवाई करणार की नाही ? हा कोर्टाचा अवमान आहे. नाही तर आपल्यावर कोर्टाच्या अवमानाची केस दाखल करावी लागेल. कारण आपण अधिकाऱ्यांचे ऐकून 2004 चा निवाडा अलीकडचा आहे असे उत्तर देत आहात. जे अधिकारी सुप्रीम कोर्टाच्या निवाड्याच्या विरोधात या ठिकाणी दिशाभूल करीत आहेत त्या अधिकाऱ्यांवर आजच्या आज तातडीने कारवाई करणार काय ? त्यांचे नुसते निलंबन नको. त्यांना निलंबित केले तरी ते सहा महिन्यामध्ये परत कामावर येतात. त्यांना बडतर्फ करणार काय ? जे अधिकारी सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयावर या सर्वोच्च सभागृहाची दिशाभूल करीत आहेत त्या अधिकाऱ्याला बडतर्फ करा. हा सार्वभौम सभागृहाचा अवमान आहे. आपण तो निवाडा सांगितल्यामुळे आपल्या विरुध्द सुध्दा हक्कभंग आणावा लागेल. त्या अधिकाऱ्याचे निलंबन नाही तर त्याला बडतर्फ करण्याचा हा विषय आहे. सुप्रीम कोर्टाने 2004 चा जो निवाडा दिला त्यानंतर 2007 साली सुप्रीम कोर्टाने कामगारांच्या बाजूने निवाडा दिलेला आहे. आपण आता मोठ्या अभिमानाने सांगितले की, 8488 कामगारांपैकी एवढेच राहिलेले आहेत. या शंभर-सव्वाशे कामगारांच्या बाबतीत तातडीने निर्णय घेऊन त्यांना एरिअर्स देणार काय ?

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/ KGS/ श्री.बरवडनंतर 12:10

श्री.रविशेठ पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी सांगितल्याप्रमाणे शासनाचे सकारात्मक मत आहे. तरी देखील यासंदर्भात ॲडव्होकेट जनरल यांचे मत मागविण्यात येईल.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत हे या प्रश्नाचा गेली 10 वर्षे पाठपुरावा करीत आहेत. या प्रश्नाबाबत माननीय सभापतींनी संबंधित विभागाच्या अधिका-यांना त्यांच्या दालनामध्ये बोलवून बैठक घेतली आहे. त्यावेळी माननीय सभापतींनी या कामगारांना कायम करण्याबाबत शासनाला निदेश दिलेले आहेत. परंतु हायकोर्टाच्या निर्णयाचा हवाला देऊन चुकीची माहिती सभागृहाला देणे योग्य नाही. मंत्रिमहोदयांचे सकारात्मक मत असेल, रायगड जिल्हयाचे मंत्री म्हणून आपण उभे आहात, त्याचा आम्हाला आनंद वाटत आहे. त्यामुळे या प्रश्नाला होकारात्मक उत्तर देऊनच सभागृहाबाहेर जावे. तसेच जे कोणी दोषी अधिकारी असतील त्याबाबतही आपण उत्तर द्यावे.

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, 199 पैकी 118 कामगारांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात केस दाखल केली. नागपूरच्या खंडपीठाने शासनाच्या अधिका-यांना दम भरला आणि दिनांक 30.9.2008 रोजी निर्णय दिला. त्या कर्मचा-यांपैकी श्री.भास्कर डाकरे, रोजंदारी कर्मचारी, शासकीय दूध योजना, गोंदिया यांनी त्यांनी 240 दिवस काम केले असल्यामुळे औद्योगिक न्यायालयात केस दाखल केली. त्या न्यायालयाने त्यांना 1991 ते 2008 या कालावधीसाठी 3,39,139 रुपये इतकी थकबाकी देण्याचा निर्णय दिल्यावर त्यांना शासनाने ती रक्कम एकाच दिवसात अदा केली आहे. म्हणजे एकाला एक न्याय आणि दुसऱ्याला एक न्याय दिला जात आहे. सुप्रीम कोर्टाने याप्रकरणी निर्णय दिलेला असल्यामुळे या कर्मचा-यांना किती दिवसात कायम सेवेत घेणार आहात आणि श्री.डाकरे यांच्याप्रमाणे बाकीच्या कामगारांना थकबाकी केव्हा दिली जाणार आहे ?

श्री.रविशेठ पाटील : सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांनी गरीब कामगारांबाबत प्रश्न विचारला आहे. याबाबत मी अगोदर सांगितल्याप्रमाणे शासनाची भूमिका सकारात्मक आहे. शासनाला 3 महिन्याचा अवधी द्यावा. या अवधीत या सर्व कामगारांना कामावर घेण्याचा निर्णय घेण्यात येईल.

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/ KGS/

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, हा विषय 10 वर्षे चालला आहे. तत्कालीन दुग्धव्यवसाय मंत्री श्री.अनिस अहमद यांनी काय उत्तर दिले होते ते मी माहितीसाठी वाचून दाखवितो. ते असे म्हणाले होते की, "सभापति महोदय, आप अपने स्तर पर वित्त मंत्री से पूछिए कि यह क्यों नहीं हो रहा है. 3 साल से यह प्रश्न चल रहा है और मेरे विभाग को न्याय नहीं मिल रहा है. मेरे विभाग की तरफ किसी का ध्यान नहीं है, आप इस बारे में ध्यान दीजिए."
शासनाची सकारात्मक भूमिका आहे हे आम्हाला माहीत आहे.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, मी मंत्रिमहोदयांच्या लक्षात आणून देऊ इच्छितो की, हे सर्वोच्च सभागृह आहे. ॲडव्होकेट जनरल हे सभागृहापेक्षा मोठे नाहीत. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी हा विषय मांडल्यावर आपण हायकोर्टाच्या मूळ निर्णयाचा संदर्भ दिला तो चुकीचा आहे. सुप्रीम कोर्टाने अे.मराणी विरुध्द रजिस्ट्रार को-ऑप.सोसायटीज, तामीळनाडू व इतर सिव्हिल अपिल या प्रकरणी असा निर्णय दिला की, जे मागील दाराने आले त्यांना त्याच दाराने परत पाठवावे. तेथे त्यांनी मागील दरवाजाने कामावर घेतले असेल, नियम डावलले असतील परंतु ही केस वेगळी आहे. पण आपल्या अधिका-यांच्या डोक्यात भूसा भरला आहे. सुप्रीम कोर्टाच्या निर्णयामुळे जो अगोदर निर्णय होता तो ओव्हररुल झाला आहे. या कामगारांना मागील दरवाजाने घेतलेले नाही. शासनाने त्यांना ठरवून रोजंदारीवर घेतले आहे. मागील दरवाजाने घेण्याचा प्रश्न येत नाही. या निवेदनात असे म्हटले आहे की, "सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक 25.8.2005 च्या परिपत्रकान्वये हे आदेश देण्यात आलेले आहेत." मला आठवते की, स्व.वसंतदादा पाटील हे मुख्यमंत्री असताना मंत्रिमंडळाची बैठक झाली होती.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. मधुकर चव्हाण....)

त्यांनी आय.ए.अेस. अधिका-यांना एक काम करायला सांगितले. त्यावेळी ते अधिकारी आपसात बोलत होते की, "It is not within the framework". वसंतदादा पाटील हे चाणाक्ष होते ते अधिका-यांना असे म्हणाले की, तुम्ही काय म्हणता ते मला समजलेले आहे. हे काम नियमाच्या चौकटीत बसत नसेल तर तुमची चौकट मोठी करा. गरिबांच्या हिताचे काम आहे. चौकटीसाठी माणूस नाही. मला असे म्हणावयाचे आहे की या रोजंदारी कामगारांना कायम स्वरुपी सेवेत सामावून घेण्यासाठी 3 महिन्याचा कालावधी कशासाठी पाहिजे ? तीन महिन्यानंतर तुमची आचारसंहिता येईल, अर्थसंकल्पीय अधिवेशन 2 आठवड्यात गुंडाळले जाईल. सभापती महोदय, ही कामगारांची पिळवणूक आहे. तेव्हा नागपूर हायकोर्टाच्या निर्णयानुसार उरलेल्या लोकांना सेवेत कायम करणार आहात काय ?

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, तीन महिन्याचा कालावधीत नाही तर तीन दिवसाच्या आत सुटणारा हा विषय आहे. सोमवारी या प्रश्नाच्या संदर्भात शंभर टक्के निर्णय घेण्यात येईल असे उत्तर माननीय मंत्री महोदयांनी द्यावयास पाहिजे. हा प्रश्न जेव्हा या सदनामध्ये यापूर्वी उपस्थित झाला होता त्यावेळी माननीय सभापती असे म्हणाले होते की, कामगार विषयक महत्वाची बाब सभागृहासमोर आलेली आहे. 240 दिवस सलग सेवा झाल्यानंतर कालेलकर समितीच्या अवॉर्डनुसार त्यांना शासकीय सेवेमध्ये घेण्याचे आपणावर बंधन आहे. त्या बंधनाच्या आधारे औद्योगिक न्यायालयाने आपला निकाल दिलेला आहे. मला असे वाटते की, यानुषंगाने माननीय मंत्री महोदय देखील प्रयत्न करीत आहेत. तरी देखील माझ्या दालनामध्ये या प्रश्नासंबंधी मार्ग काढण्यासाठी मी माननीय वित्तमंत्री, माननीय दुग्ध विकास मंत्री व यासदनातील एक-दोन सन्माननीय सदस्यांना बोलावून घेतो. कालेलकर समितीच्या अवॉर्डचा आधार घेऊन औद्योगिक न्यालयाने सन 2005 साली निर्णय दिलेला आहे. यासंबंधी शासनाने मुदतीमध्ये अपिलात जाण्याची आवश्यकता होती. परंतु ती मुदत संपली. त्यामुळे हायकोर्टाने रिटपिटिशन फेटाळले. मात्र सुप्रीम कोर्टाने डिले कंडोन केला आणि कामगारांच्या बाजूने निर्णय दिला. एवढे सर्व झाल्यानंतर आता बाकी काय राहिले आहे ? सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी सांगितल्याप्रमाणे हे सर्वोच्च सदन आहे. या सदनाची बूज राखण्यासाठी माननीय मंत्री महोदयांनी या कामगारांना सेवेत

(श्री. दिवाकर रावते...)

घेण्यासंबंधीचे ठोस उत्तर द्यावे किंवा ज्याप्रमाणे विधानसभेमध्ये प्रश्न सुटत नसल्यामुळे सन्माननीय सदस्य श्री. नाना पटोले यांनी आपल्या सदस्यत्वाचा राजीनामा दिला त्याप्रमाणे मंत्री महोदयांनी देखील राजीनामा द्यावा.

श्री. प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, 123 जिवंत कामगारांच्या संदर्भातील ही लक्षवेधी आहे. हाच विषय मागील अधिवेशनामध्ये देखील लक्षवेधीच्या माध्यमातून विचारण्यात आलेला असताना त्यावरील चर्चेमध्ये मी भाग घेतला होता. या कामगारांच्या प्रश्नासंबंधी धोरणात्मक निर्णय घेण्याची वेळ आलेली आहे. कामगारांना न्याय देण्यासाठी, त्यांच्यावरील अन्याय दूर करण्यासाठी औद्योगिक न्यायालय तसेच कामगार न्यायालय यांची स्थापना करण्यात आलेली आहे. एखाद्या खाजगी उद्योजकाने औद्योगिक व कामगार न्यायालयाने दिलेला निर्णय धुडकावने मी समजू शकतो. परंतु सरकारने हे वेळ काढूपणाचे धोरण अवलंबायचे, ...

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ KGS/ MMP/ 12:20

श्री.प्रकाश शेंडगे...

कामगार न्यायालयाचे निर्णय सरकारने धुडकावून लावणे, औद्योगिक न्यायालयाचे निर्णय धुडकावून लावणे, सुप्रीम कोर्टाच्या निर्णयांचा अर्थ वेगळा काढून त्या अनुषंगाने अंमलबजावणी करणे असा सरकारचा प्रयत्न आहे, ही निंदाजनक बाब आहे. या ठिकाणी बॅक डोअर संबंधी निवेदनात उल्लेख केला आहे. 25-25,30-30 कर्मचा-यांना समोरच्या दरवाज्याने प्रवेश देतात, परंतु अनेक वर्षापासून काम करीत असलेल्या कर्मचा-यांना मात्र मागच्या दाराने पाठविले जात आहे ही गोष्ट शासनास भूषणावह नाही. ज्यांची नेमणूक तदर्थ तत्वावर केलेली आहे त्यांना नियमित करु नये असे सामान्य प्रशासन विभागाने दिनांक 25.8.05 रोजी परिपत्रक काढलेले आहे. ते परिपत्रक शासनाने तातडीने रद्द करावे अशी माझी या निमित्ताने मागणी आहे. कामगारांच्या बाबतीत सुप्रीम कोर्टाने दिलेले निर्णय, औद्योगिक न्यायालयाने दिलेले निर्णय शासनावर बंधनकारक असले पाहिजेत अशा प्रकारचा निर्णय मंत्रिमंडळाने घ्यावा अशी देखील माझी या निमित्ताने मागणी आहे. कामगारांच्या हिताचे जे निर्णय घेतले जातात त्यात वेळकाढूपणा शासनाने करु नये अशा प्रकारचा निर्णय सुप्रीम कोर्टाने दिलेला आहे.शासनाने वेळ न काढता या ठिकाणच्या कामगारांना येत्या सोमवार पासून कामावर घेतले पाहिजे पाहिजे अशीही माझी मागणी आहे. या मागणीच्या संदर्भात शासनाने खुलासा करावा.

श्री. रविशेठ पाटील : सभापती महोदय, मी यासंबंधी मघाशीच खुलासा केलेला आहे. कामगारांना कामावर न घेण्याची आमच्या खात्याची नकारार्थी भूमिका असती तर 8289 कर्मचा-यांना कामावर घेतले नसते. यात 199 कर्मचारी घ्यावयाचे राहिले आहेत. त्यात 123 कर्मचारी जीवंत आहेत. या कर्मचा-यांना कायम करावयाचे झाले तर अधिसंख्य पदे निर्माण करावी लागतील. म्हणून मला तीन महिन्यांचा अवधी द्यावा. येत्या तीन महिन्यात या 123 कर्मचा-यांना न्याय देण्याचा प्रयत्न करण्यात येईल.

श्री. अरविंद सावंत : अधिसंख्य पदे कधी निर्माण करण्यात येतील व या 123 कर्मचा-यांना कायम सेवेत कधीपर्यंत घेण्यात येईल यासंबंधीचे निवेदन माननीय मंत्री महोदयांनी सोमवार पर्यंत करावे अशी माझी मागणी आहे.

श्री. रविशेठ पाटील : सभापती महोदय, यासंबंधीचे निवेदन सोमवारपर्यंत करणे मला शक्य होणार नाही. मला यासंबंधी दोन,तीन महिन्यांचा अवधी देण्यात यावा अशी माझी विनंती आहे.

2...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत : अधिवेशन संपण्यापूर्वी यासंबंधीचा निर्णय घेण्यात यावा व तसे निवेदन सभागृहात करण्यात यावे अशी माझी मागणी आहे.

श्री. रविशेठ पाटील : मला या संबंधी निर्णय घेण्यास तीन महिन्याचा अवधी लागेल.

श्री. दिवाकर रावते : मी मघाशी उल्लेख केल्याप्रमाणे तुमच्या विभागाच्या अधिका-यांनी दिशाभूल करणारी माहिती सदनाला दिली आहे. त्या अधिका-यांविरुध्द काय कारवाई करण्यात येणार आहे

श्री. रविशेठ पाटील : सन्माननीय दिलेली माहिती तपासून घेतली जाईल व त्या अनुषंगाने योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

श्री. दिवाकर रावते : त्या अधिका-यां विरुध्द काय कारवाई केली गेली आहे, त्यासंबंधीची माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवली जाईल काय ?

श्री. रविशेठ पाटील : होय.

श्री. दिवाकर रावते : सदर कर्मचा-यांच्या बाबतीत निर्णय घेण्यासंदर्भात तीन महिन्यांच्या अवधी मागितला आहे. सदर निर्णय एका महिन्यात घेण्यात येईल काय ?

श्री. रविशेठ पाटील : यासंबंधीचा निर्णय दोन महिन्यांच्या आत घेण्यात येईल.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी दोन महिन्यात निर्णय घेण्यात येईल असे आश्वासन या ठिकाणी दिलेले आहे. दोन महिन्यानंतर लोकसभेची आचारसंहिता लागू होणार आहे. मग कोणताही धोरणात्मक निर्णय घेता येणार नाही. मंत्रीमहोदयांच्या भावना प्रामाणिक आहेत, परंतु आचारसंहितेत निर्णय घेता येईल का हे पहावे. एक महिन्यात करु असे आज रेकॉर्डवर आले तर त्याप्रमाणे निर्णय घेता येईल.

श्री.मधुकर चव्हाण : दोन महिन्यांचा अवधी धेतला असला तरी एका महिन्यात निर्णय घेऊ असे मंत्रीमहोदयांनी सांगावे.

**तालिका सभापती** (श्री.भास्कर जाधव) : विषयाचे गांभीर्य मंत्रीमहोदयांच्या लक्षात आलेले आहे.

-----------

3...



ABG/ KGS/ MMP/ 12:20

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## <u>पुढे ढकलण्यात आलेल्या लक्षवेधी सूचने सबंधी</u>

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय "सायन-पनवेल" या महामार्गासंबंधीची लक्षवेधी सूचना आपण राखून ठेवली होती. सदर लक्षवेधी सूचना सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी व इतर सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केली होती. या लक्षवेधी सूचनेवर बरीच चर्चा झाली होती. त्यानंतर सभागृहातील एकंदर वातावरण पाहता ती लक्षवेधी सूचना मी राखून ठेवीत आहे व ती लक्षवेधी सूचना शनिवारी चर्चेला घेण्यात येईल, अशा प्रकारचा निर्णय आपण दिला होता. आज शनिवार आहे. परंतु ती लक्षवेधी सूचना आजच्या कार्यक्रमपत्रिकेत दिसून येत नाही. ही लक्षवेधी सूचना कधी चर्चेला घेण्यात येईल व ती आजच्या कार्यक्रमपत्रिकेत का दाखविण्यात आली नाही याची कृपया मला माहिती मिळावी अशी माझी विनंती आहे.

श्री. विनोद तावडे : अध्यक्ष महोदय...

श्री. जयंत प्र.पाटील : ही लक्षवेधी सूचना शनिवारी चर्चेला येणार होती. ती आजच्या कार्यक्रम पत्रिकेवर दाखवावयास पाहिजे होती. माननीय बांधकाम मंत्री आजारी होते, ते आता बरे झाले असून ते विधानसभा सभागृहात उपस्थित आहेत. ते लक्षवेधी सूचनेस उत्तर देऊ शकले असते. दोन हजार कोटी रुपयांच्या टेंडर संदर्भातील ती लक्षवेधी सूचना आहे. त्या लक्षवेधी सूचनेवर चर्चा करण्यात सभागृहाचा दोन तास वेळ खर्च झालेला आहे. ती लक्षवेधी सूचना महत्वाची होती म्हणून ती आजच चर्चेला येणे आवश्यक होती. आता अधिवेशनाचे शेवटचे दोनच दिवस शिल्लक आहेत. ही लक्षवेधी सूचना सोमवारी ठेवली तर त्या विषयाची तीव्रता कमी होण्याची शक्यता आहे. ही लक्षवेधी सूचना आजच्या कार्यक्रमपत्रिकेत का दाखविण्यात आली नाही व ती लक्षवेधी सूचना कधी चर्चेला घेण्यात येईल यासंबंधीचा खुलासा मला प्राप्त व्हावा अशा प्रकारची माझी मागणी आहे.

**तालिका सभापती** (श्री.भास्कर जाधव ) : सन्माननीय सदस्यांच्या भावना योग्य ठिकाणी पाहोचविण्याची मी व्यवस्था करतो.

--------

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: औचित्याच्या मुद्यासंबंधी

श्री.विनोद तावडे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी एका गंभीर विषयाकडे औचित्याच्या मुद्याद्वारे या सभागृहाचे लक्ष वेधू इच्छितो. मुद्दा गंभीर असल्यामुळे मी माननीय सभापतींना विनंती केली आणि माननीय सभापतींनी विशेष बाब म्हणून मला मुद्दा उपस्थित करण्यास संधी दिली आहे.

सभापती महोदय, आजच्या वृत्तपत्रांमध्ये आणि काल टी.व्ही चॅनेल्सवर असे प्रसिध्द झाले की, महाराष्ट्र राज्याचे पोलीस महासंचालक यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करावा अशा पध्दतीचा निकाल बांद्रा न्यायालयाने दिला आहे. श्री.राज अवस्थी या तक्रारदाराने असा अर्ज केला की, एका चुकीच्या पत्रामुळे मला अटक केली. जे पत्र चुकीचे आहे, खोटे आहे असे त्यांनी कळविले असताना. आताचे पोलीस महासंचालक आणि तत्कालीन पोलीस आयुक्त श्री.अनामी रॉय यांनी अटक करावयास लावली. चार महिने श्री.अवस्थी हे जेलमध्ये खितपत पडले. हायकोर्टाने निर्णय दिला की, श्री.अवस्थी यांची काही चूक नसल्यामुळे त्यांना मोकळे सोडावे. त्यानंतर त्यांनी बांद्रा कोर्टात केस दाखल केली होती. बांद्रा कोर्टाने काल असा निकाल दिला की, श्री.अनामी रॉय यांच्यासहित इतर सहा जणांवर फौजदारी गुन्हा दाखल करावा. राज्याच्या पोलीस महासंचालकांवर फौजदारी गुन्हा दाखल झाल्यास त्याची चौकशी पोलीसच करणार. डी.जी.विरुध्द फौजदारी गुन्हा ज्या पोलीस स्टेशनमध्ये दाखल केला जाईल त्याच पोलीस स्टेशनमधील अधिकारी देखील या प्रकरणात सहभागी आहेत. याठिकाणी सभागृह सुरु आहे. फार महत्वाचा विषय सभागृहापुढे आलेला आहे. श्री.अनामी रॉय यांची चतुर्वेदी प्रकरणात देखील खूप चर्चा झाली होती. त्यावेळचे गृहमंत्री यांनी सभागृहात बरीच माहिती दिली होती. वरिष्ठ अधिकारी श्री.बिपीन बिहारी यांच्यावर कारवाई करण्यात आली. इतरांना कसे वाचविण्यात आले ते मी सांगू इच्छित नाही. परंतु हा औचित्याचा मुद्दा मांडत असताना या प्रकरणात नेमकी वस्तुस्थिती काय आहे हे सभागृहासमोर स्पष्ट झाले पाहिजे. कायदा आणि सुव्यवस्थेचे धिंडवडे निघाले आहेत. एक महिन्यापूर्वी निघालेच होते आणि आजही निघत आहेत. या प्रकरणात नेमकी वस्तुस्थिती काय आहे हे सभागृहाला आणि महाराष्ट्राच्या जनतेला कळले पाहिजे. त्यामुळे या प्रकरणात शासनाला निवेदन करण्यास सांगावे अशी माझी विनंती आहे. जर श्री.अनामी रॉय यांनी





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे............

चूक केली असेल तर त्यांना जरुर दूर केले पाहिजे. त्यांना हटवावे अशी आम्ही मागणी केलेलीच आहे. सामान्य माणसांपासून बिल्डरांपर्यंत त्यांची मनमानी चाललेली आहे. त्यांच्याभोवती प्रचंड संरक्षण भिंत उभी आहे. कोणाची आहे हे मला माहिती आहे परंतु मी नाव घेत नाही. न्यायालयाचा अवमान होऊ देऊ नये यासाठी शासनाने त्यांच्यावर उचित कारवाई करावी आणि जनतेला संदेश द्यावा अशी माझी विनंती आहे.

श्री.रमेशचंद्र बंग : नोंद घेण्यात आली आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, डी.जी.हे राज्याच्या पोलीस विभागाचे सर्वोच्च अधिकारी आहेत. किमान शासनाला निवेदन करण्यास सांगावे.

**तालिका सभापती** (श्री.भास्कर जाधव) : शासनाने नोंद घ्यावी.

(नंतर श्री.खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ KGS/ MMP/ D/ पूर्वी श्री. भोगले..... 12:30

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, सभागृहात एखाद्या गंभीर बाबीसंबंधीचे निवेदन करण्याचे निदेश दिले असतानाही शासनाला त्याचे गांभीर्य नसते. तर केवळ नोंद घेऊन काय फरक पडणार आहे ? म्हणून माझी विनंती आहे की, शासनाने यासंबंधी निवेदन करावे, असे निदेश आपण द्यावेत.

**तालिका सभापती (श्री.भास्कर जाधव)** : ठीक आहे, राज्याच्या पोलीस महासंचालकांच्या संदर्भातील हा मुद्दा असल्यामुळे शासनाने याबाबतचे निवेदन करावे.

यानंतर कामकाज पत्रिकेतील विषय क्रमांक "चार" वर सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांची नियम 97 अन्वये अल्पकालीन चर्चा दाखविलेली आहे. परंतु माननीय गृह मंत्री सभागृहात उपस्थित राहू शकत नसल्याबाबतची विनंती करणारे पत्र त्यांनी दिलेले आहे. तसेच राज्यमंत्री (गृह) हे उपस्थित असले तरी त्यांना दोन्ही सभागृहाचे कामकाज सांभाळावयाचे असल्याने त्यांनाही शक्य होईल, असे वाटत नाही. म्हणून ही अल्पकालीन चर्चा आपण नंतर घेऊ.

श्री. जयंत प्र.पाटील : महोदय, माननीय सभापतींना मी अशी विनंती केली होती की, मी सोमवार, दिनांक 29 डिसेंबर, 2008 रोजी सभागृहात उपस्थित राहू शकणार नाही म्हणून आजच्या कामकाजात शेवटी जरी ही चर्चा घेतली तरी हरकत नाही. तसेच या चर्चेला माननीय राज्यमंत्री (गृह) यांनी उत्तर दिले तरी चालेल, अशीही मी विनंती केली होती.

**तालिका सभापती** : ठीक आहे, मी आपल्या भावना माननीय सभापतींच्या कानावर घालतो.

श्री. मधुकर चव्हाण : महोदय, यासंबंधी खालच्या सभागृहात असे सांगण्यात आले की, माननीय गृहमंत्री सभागृहात उपस्थित राहत नसतील तर त्यांनी विदर्भाच्या बाहेर कोणतेही जाहीर कार्यक्रम घेऊ नयेत, मुंबईत तर अजिबात घेऊ नयेत, वर्किंग डे ला देखील असे कार्यक्रम घेऊ नयेत तर फक्त नागपूरमध्येच मंत्री महोदय असे कार्यक्रम घेऊ शकतात. परवा माननीय गृह राज्यमंत्री एक दुर्देवी घटना घडली म्हणून ते येऊ शकले नव्हते हे मी समजू शकतो, तसे त्यांनी कळविले देखील होते. परंतु माननीय गृहमंत्री मात्र अशी कुठलीही घटना घडलेली नसताना दोन्ही सभागृहापैकी एकाही सभागृहात ते का उपस्थित राहू शकत नाहीत हे समजले पाहिजे. या क्षणाला माननीय मंत्री महोदय सभागृहात उपस्थित राहू शकत नाहीत हे समजल्यानंतर देखील सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र.पाटील यांनी सांगितले की, या चर्चेला माननीय राज्यमंत्र्यांनी उत्तर दिले तरी चालेल.

.....2

**तालिका सभापती** : मी ती चर्चा रद्द केलेली नाही.

श्री. जयंत प्र.पाटील : महोदय, मी कालच सभागृहात सांगितले होते की, या चर्चेला माननीय गृह राज्यमंत्र्यांनी उत्तर दिले तरी चालेल.

**तालिका सभापती** : ठीक आहे, आजच्या कामकाज पत्रिकेवरील कामकाज संपल्यानंतर शेवटी ही चर्चा आपण घेऊ. त्यामुळे हा विषय संपलेला नाही.

श्री. विनोद तावडे : महोदय, या चर्चेच्या अनुषंगाने एवढेच निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र.पाटील आणि आम्ही स्थगन प्रस्तावाची सूचना दिलेली असताना माननीय सभापतींनी त्या अनुषंगाने नियम 289 अन्वये या गंभीर विषयावर अल्पकालीन चर्चा मान्य केली. वास्तविक खालच्या सदनात हा विषय स्थगन प्रस्तावाच्या स्वरुपात दिला होता परंतु तो फेटाळल्यानंतर त्याच विषयावर दुसऱ्या आयुधाच्या माध्यमातून चर्चाही झालेली आहे, कारण हा विषय ज्वलंत आहे. परंतु आपल्या सभागृहात मात्र ही चर्चा पुढे पुढे जात असल्याने या सभागृहाला दुय्यम स्थान आहे की काय अशी शंका येऊ लागली आहे. त्याबाबत आम्हाला समजले पाहिजे, अशी मी विनंती करतो.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्यांनी असा समज करुन घेऊ नये. ही चर्चा आजच शेवटी घेण्याबाबत मी कबूल केले आहे.

----------

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ KGS/ MMP/ D/

**सामुदायिक छायाचित्र काढण्यासंबंधी**

**तालिका सभापती** : सर्व सन्माननीय सदस्यांना कळविण्यात येत आहे की, माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री, माननीय विरोधी पक्षनेते विधान परिषद, माननीय विरोधी पक्षनेते, विधानसभा, माननीय मंत्री, माननीय राज्यमंत्री, विधानपरिषदेचे व विधानसभेचे सर्व सन्माननीय सदस्य यांचे सामुदायिक छायाचित्र सोमवार, दि. 29 डिसेंबर, 2008 रोजी प्रश्नोत्तराच्या तासानंतर विधानभवन आवारात काढण्यात येणार आहे. या सामूहिक छायाचित्राच्या कार्यक्रमासाठी सर्व सन्माननीय सदस्यांनी विधानभवन, जुनी इमारत, मुख्य प्रवेशद्वार येथे एकत्रित यावे, अशी घोषणा मी करीत आहे.

आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी 30 मिनिटांसाठी स्थगित होईल आणि दुपारी 1.05 वाजता पुन: भरेल.

( 12.34 ते 1.05 मध्यंतर )

----------

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(मध्यंतरानंतर)**

**( सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री. भास्कर जाधव )**

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, सभागृहात एकही मंत्रीमहोदय उपस्थित नसल्यामुळे सभागृहाची बैठक अर्ध्या तासाकरिता स्थगित करण्यात यावी.

**तालिका सभापती** ( श्री. भास्कर जाधव ) : ठीक आहे. सभागृहाची बैठक दीड वाजेपर्यंत स्थगित करण्यात येत आहे.

(सभागृहाची बैठक 1.05 ते 1.30 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

**--------**

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( स्थगितीनंतर )

( सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.भास्कर जाधव)

<u>पॉईट ऑफ इन्फर्मेशनसंबंधी</u>

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आज आय.बी.एन.लोकमत या न्यूज चॅनेलवर राज्याचे गृहमंत्री श्री.जयंत पाटील यांच्या राजस्टोन बंगल्याची कंपाऊंड वॉल वाढविण्याचे काम सुरु आहे. त्यासाठी 100 लोक कामास लागले आहेत अशी बातमी दाखविली. माननीय गृह मंत्र्यांच्या सुरक्षिततेत अचानक वाढ करण्याचे कारण काय ? त्यांना आतंकवाद्यांकडून धमकी आली आहे काय ? तेव्हा याबाबत सभागृहाला माहिती होणे आवश्यक आहे. अधिवेशन सुरु असताना गृह मंत्री तातडीने मुंबईला निघून गेलेले आहेत. ही बाब अतिशय गंभीर आहे. याठिकाणी माननीय गृह राज्यमंत्री उपस्थित आहेत. तेव्हा त्यांनी याबाबत खुलासा करावा.

श्री.नितीन राऊत : सभापती महोदय, माननीय गृह मंत्री श्री.जयंत पाटील हे खाजगी कामानिमित्त मुंबईत गेलेले आहेत. ते सोमवारी सभागृहात उपस्थित राहतील. त्यांना कोणताही धोका नाही.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, न्यूज चॅनेलवर बातमी दाखविली जात आहे. विद्यमान गृह मंत्री हे मागील दहा वर्षापासून मंत्री आहेत. ते राहत असलेले निवासस्थान अतिशय चांगले आहे. मी काही निमित्त त्यांच्या निवासस्थानी गेलो होतो तेव्हा पाहिले होते. जेलची भिंत उंच असते त्याप्रमाणे माननीय गृहमंत्र्यांच्या निवासस्थानाची भिंत वाढविली जात आहे.

श्री.नितीन राऊत : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या मुद्याबाबत माहिती घेऊन ती पटलावर ठेवण्यात येईल.

**तालिका सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की,राज्याचे गृह मंत्री पद हे अतिशय जबाबदारीचे आणि तितकेच जोखिमीचे आहे. तेव्हा रुटीनमध्ये काळजी घेणे आवश्यक असल्याने ती घेतली जात असेल असे मला या क्षणापर्यंत वाटते.

-------------

..2.



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

<u>**विशेष उल्लेख**</u>

**पृ. शी.** : पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना उल्लेखनीय सेवेबद्दलची पदके जाहीर होऊन ती वेळेवर न देण्यात येणे

**मु. शी.** : पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना उल्लेखनीय सेवेबद्दलची पदके जाहीर होऊन ती वेळेवर न देण्यात येणे याबाबत श्री.किरण पावसकर, वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.नितीन राऊत ( गृह राज्यमंत्री ) : सभापती महोदय, श्री.किरण पावसकर, वि.प.स. यांनी "पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना उल्लेखनीय सेवेबद्दलची पदके जाहीर होऊन ती वेळेवर न देण्यात येणे" या विषयावर विशेष उल्लेखाद्वारा जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन राऊत...

सभापती महोदय, पोलीस दलातील अधिकारी आणि कर्मचारी यांना त्यांच्या सेवा कालावधीत केलेल्या उल्लेखनीय सेवेबद्दल राष्ट्रपती पोलीस पदक, गुणवत्तापूर्वक सेवेबाबत पदके जाहीर केली जातात. परंतु ती त्यांना वेळेवर देण्यात येत नाहीत. विशेष करुन हेमंत करकरे यांना 26 जानेवारी 2008 रोजी पुरस्कार जाहीर होऊनही तो त्यांना देण्यात आला नाही असा मुद्दा सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर यांनी उपस्थित केला होता. याबाबत सांगू इच्छितो की, दिनांक 26 जानेवारी 2007 रोजी 3 पोलीस अधिकारी व 33 कर्मचारी, 15 ऑगस्ट, 2007 रोजी 3 पोलीस अधिकारी व 32 कर्मचारी, दिनांक 26 जानेवारी 2008 रोजी 2 अधिकारी व 33 कर्मचारी अशी एकूण 109 पदके घोषित झालेली आहेत.

यानंतर श्री.गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ KTG/ KGS/ प्रथम श्री.शिगम 13.35

श्री.नितीन राऊत .........

सभापती महोदय, पदके बनविण्यासाठी कलकत्याला द्यावी लागतात . त्याचबरोबर दिल्लीहून काही आयटेमसुध्दा येत असतात. त्यामुळे पदके बनविण्यासाठी वेळ लागला आहे. आता पदके देण्याची तारीख निश्चित करण्यात आली आहे. आता शौर्य पदके लवकरच देण्यात येतील.

श्री.मधुकर चव्हाण :सभापती महोदय, पोलीस दलातील कर्मचा-यांना आणि अधिका-यांना शोर्य पदके देण्यास विलंब होण्याची कारणे काय आहेत ? शौर्य पदके बनविण्यासाठी दहा महिन्याचा कालावधी लागतो काय ? राष्ट्रपती पदक हे महत्वाच्या व्यक्तिला दिले जाणार आहे ते देण्यास विलंब का लागला याचे उत्तर दिलेले नाही. माननीय मंत्रीमहोदयांनी ठोकळेबाज उत्तर देता कामा नये. पोलीस महासंचालक श्री.अनामी रॉय यांना अशा प्रकारच्या फाईल्स काढण्यासाठी वेळ नाही. आपल्या सहका-याना श्ौर्य पदक मिळाल्यानंतर त्यांचे गुण गौरव करण्याची त्यांची प्रवृत्ती नाही. कोणाला कोणत्या गुन्हया खाली आत टाकावयाचे, कोणाला बाहेर काढावयाचे हीच कामे जर ते करीत असतील तर अशा प्रकारची फाईल लवकर निघणार नाही. तेव्हा ही शौर्य पदके देण्यास विलंब होण्याची कारणे काय आहेत ?

श्री.नितीन राऊत :सभापती महोदय ,पोलीस महा संचालक यांच्या कार्यालयाकडून माननीय राज्यपाल, माननीय मुख्यमंत्री , माननीय उप मुख्यमंत्री, माननीय गृहमंत्री, गृह राज्य मत्री यांची तारीख व वेळ निश्चित करुन प्रमाणपत्रे , स्क्रोल व मेडल, पदके त्यानंतरच्या वर्षात जानेवारी किंवा फेब्रुवारी महिन्यात माननीय राज्यपालांच्या हस्ते समारंभ होऊन ही पदके प्रदान केली जातात. मागील पदक प्रदान समारंभ दिनांक 16.2.2008 रोजी संपन्न झालेला असून सदर कार्यक्रमामध्ये ऑगस्ट 2006 पर्यत मिळालेली पदके व प्रमाणपत्रे संबधितांना प्रदान करण्यात आलेली आहेत. दिनांक 26 जानेवारी, 2008 मध्ये श्री. हेमंत करकरे यांना राष्ट्रपती पोलीस पदक घोषित करण्यात आले आहे. 26 जानेवारी 2007, 15 ऑगस्ट 2007 व 26 जानेवारी 2008 या दिवशी उल्लेखनीय सेवेबद्दल पदके मिळालेल्या एकूण 109 पोलीस अधिकारी कर्मचा-यांचा पदक प्रदान समारंभ 25 जानेवारी 2009 रोजी आयोजित करण्यात आला आहे.15 ऑगस्ट 2008 रोजी घोषित करण्यात आलेल्या एकुण 38 अधिकारी/ कर्मचारी यांची पदके अद्याप शासनास प्राप्त झालेली नाहीत.

**तालिका सभापती** :पदके देण्यासंबंधीची घोषणा वेळेवर झाली आहे परंतु पदके देण्याचा कार्यक्रम दिनांक 16.2.2008 रोजी संपन्न झाला होता.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे :सभापती महोदय, पदके बनविण्यासाठी दहा महिन्याचा कालावधी लागतो हे पटत नाही. पदके बनविण्यासाठी छन्नी आणि हातोडीचा वापर होत असेल तर ते मला माहीत नाही. ही पदके बनविण्यासाठी कलकत्याला पाठविली जातात व तेथे छन्नी हातोडी घेऊन एक एक पदक तयार केले जाते व त्यांच्याकडून पदके येण्यास दहा महिन्याचा कालावधी लागतो.आपण सध्या कोणत्या जमान्यात वावरत आहोत.? पदके बनविण्यासाठी डायचा वापर केला जात असल्यामुळे ते बनविण्यास इतका कालावधी लागणार नाही. आपण सांगितल्याप्रमाणे पदके तयार करण्याकरिता दहा महिन्याचा कालावधी लागतो हे गृहित धरले तरी ऑगस्ट 2006 नंतरची शौर्य पदके अजूनही मिळालेली नाहीत तेव्हा हा कालावधी दहा महिन्यांचा आहे की चोवीस महिन्यांचा आहे ?

**तालिका सभापती** :2006 ची पदके 16.2.08 च्या कार्यक्रमात देण्यात आली होती.

श्री.नितीन राऊत :सभापती महोदय, मी सुरुवातीलाच सांगितले होते की, ही पदके आपण तयार करीत नाही. केन्द्र सरकार आपल्याला पदके पुरवत असते. स्क्रोल सुध्दा केन्द्र सरकारकडून येत असतो. पदके बनविण्यासाठी कलकत्याला पाठवली जातात. त्यानंतर त्यांच्याकडून तयार होऊन आल्यानंतर समारंभ होत असतो. दिनांक 25 जानेवारी 2009 रोजी पदक प्रदान समारभ आयोजित करण्यात आलेला आहे.

श्री.विनोद तावडे :पदकाच्या संदर्भात राज्य सरकारने आता केन्द्र सरकारवर जबाबदारी टाकलेली आहे. आंध्र प्रदेशमध्ये कॉंग्रेस पक्षाचे सरकार असून तेथे पदक प्रदान समारंभ वेळेवर होत असतो. गुजराथ मधील श्री. मोदी यांच्या सरकारमध्ये सुध्दा पदक देण्याचा कार्यक्रम नियमित होत असतो. आपल्या राज्यातच हा कार्यक्रम नियमित का होत नाही ?

श्री.नितीन राऊत :आता नियमितपणे पदक प्रदान करण्याचा कार्यक्रम होण्या बाबतची कार्यवाही केली जाईल.

श्री.अरविद सावंत :सभापती महोदय, मला माननीय मंत्रिमहोदयांना असे विचारावयाचे आहे की, पोलीस दलातील ....

नंतर श्री.सुंबरे .

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/ MMP/ D/ श्री. गायकवाड नंतर --- 13:40

श्री.अरविंद सावंत ....

ज्या कर्मचाऱ्यांना-अधिकाऱ्यांना राष्ट्रपती पदके द्यायची आहेत त्याबाबतची शिफारस राज्य सरकारकडून केली गेली पाहिजे असते. परंतु त्याबाबतची फाईल कित्येक महिने प्रलंबित होती हे खरे आहे काय ? एखाद्या व्यक्तीला पदक देण्याचे घोषित झाल्यानंतर त्याला प्रत्यक्षात पदक मिळेपर्यंत 10 महिन्यांचा कालावधी लागतो हे आपण गृहीत धरले तरी आता श्री.हेमंत करकर यांना राष्ट्रपती पदक देण्याचे कोणत्या तारखेला निश्चित झाले ? ती संबंधित फाईल पोलीस महासंचालक श्री.अनामी रॉय यांच्या टेबलावर किती महिने पडून होती ? आणि त्याबाबत केंद्र सरकारला केव्हा कळविले गेले याची माहिती माननीय राज्यमंत्री महोदय देऊ शकतील काय ?

श्री. नितीन राऊत : सभापती महोदय, ही माहिती घेऊन मी ती सभागृहाला देऊ शकेन.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, माननीय राज्यमंत्र्यांच्या या उत्तरांनी आपले स्वत:चे तरी समाधान झाले असेल तर मला याबाबत काहीच म्हणावयाचे नाही. परंतु आपला चेहऱ्यावरून तरी आपले या उत्तराने समाधान झाले नसल्याचेच दिसते आहे. आपण येथे तालिका सभापती म्हणून बसला आहात असे असताना या सभागृहात आलेल्या विषयातून विरोधकांचे समाधान झाले की नाही हा भाग वेगळा पण त्या विषयाला तरी किमान न्याय मिळाला आहे काय ? हे तरी आपण पाहिले पाहिजे. म्हणूनच मी आपल्याला विचारतो की, राज्यमंत्र्यांच्या उत्तरांनी आपले तरी समाधान झाले आहे का ?

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, दुसरा मुद्दा यात असा आहे की, 2006 मध्ये जाहीर झालेली पदके 2008 मध्ये दिली गेली असे आपण येथे सांगितले. परंतु 26 जानेवारी 2007 मध्ये जी पदके मिळाली वा घोषित झाली ती अजूनही 24 महिने झाल्यानंतरही संबंधितांना मिळालेली नाहीत. ...

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, सभागृहामध्ये कॅबिनेट मंत्री उपस्थित नाहीत. यावरूनच सरकारला या विषयाचे गांभीर्य किती आहे हे दिसून येते. सभागृहात कॅबिनेट मंत्री उपस्थित नाहीत. तेव्हा ते येईपर्यंत आपण सभागृहाची बैठक 10 मिनिटांसाठी स्थगित करावी.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, बरोबर आहे, सभागृहात कॅबिनेट मंत्री उपस्थित नाहीत, हे काय चालले आहे ? सभागृहाचे कामकाज चालविण्याची ही पद्धत आहे का ? आपण कॅबिनेट मंत्री सभागृहात येईपर्यंत, 10 मिनिटांसाठी सभागृहाची बैठक स्थगित करावी.

..... आयआय 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, यात मुद्दा असा आहे की, सभागृहाचे कामकाज सुरू झाले तेव्हा कॅबिनेट मंत्री सभागृहात उपस्थित होते, केवळ आता ते दोन मिनिटांसाठी सभागृहाच्या बाहेर गेले आहेत., ते लगेच आता येतीलच. आपण कामकाज पुढे सुरू करू ...

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, असे चालणार नाही. कॅबिनेट मंत्र्यांनी सभागृहातून बाहेर जाताना आपली परवानगी घेतली होती का ? आता कोणीही कॅबिनेट मंत्री सभागृहात नाहीत म्हणून आपण सभागृहाची बैठक स्थगित केली पाहिजे. आपण सरकारला संरक्षण देत आहात. मंत्री येईपर्यंत आपण वेळ काढत आहात हे बरोबर नाही.

( अनेक सन्माननीय सदस्य 'वेल' मध्ये येऊन घोषणा देऊ लागतात. ... अडथळा ...)

( सभागृहात कॅबिनेट मंत्री श्री.विजयसिंह मोहिते-पाटील प्रवेश करतात.)

**तालिका सभापती** : आता सभागृहात सर्वात ज्येष्ठ कॅबिनेट मंत्री उपस्थित झालेले आहत. तेव्हा सर्व सन्माननीय सदस्यांनी आपापल्या जागांवर बसावे. तसेच ज्या मंत्र्यांची येथे कंपल्सरी सिटींग होती त्यांना आपण याबाबत सूचना देऊ.

( यानंतर श्री. सरफरे ..... जेजे 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. आपले स्थान हे या सभागृहाच्या पालकत्वाचे स्थान आहे. या सभागृहाची प्रतिष्ठा अबाधित ठेवणे आणि शासनाच्या बेपर्वाई वृत्तीचा मुलाहिजा न ठेवणारे पिठासीन अधिकारी या सभागृहाला लाभले आहेत. आपण तालिका सभापती म्हणून आसनस्थ असल्यामुळे आपणाकडून या सभागृहाच्या प्रतिष्ठेचे जतन करण्याची आपणाकडून अपेक्षा होती. सभागृहामध्ये कॅबिनेट मंत्री उपस्थित नसतांना सभागृह स्थगित न करता ते पुढे चालू ठेवणे योग्य नव्हते. सभापती महोदय, मला आपल्या भावना समजू शकतात. परंतु आज हे अधिवेशन लांबविले जात आहे, अशी भावना निर्माण होत आहे. आज दोन महिन्यापासून या नागपूरमध्ये कर्मचारी आले आहेत त्यांची देखील तीच अवस्था आहे. अशा अवस्थेत आज दीड डझन मंत्री सभागृहाचे कामकाज सोडून मुंबईला गेले आहेत. याबाबत अमची काही तक्रार नाही. मंत्रिमंडळाच्या रोस्टरप्रमाणे ज्यांनी सभागृहामध्ये उपस्थित रहाणे आवश्यक आहे त्यांनी उपस्थित रहावे. परंतु ते उपस्थित न राहिल्यामुळे माननीय मंत्री श्री. विजयसिंह मोहिते पाटील साहेबांना सभागृहामध्ये यावे लागणे बरोबर वाटत नाही. अधिवेशनाचे कामकाज सोडून काही मंत्र्यांना मुंबईला जावे लागणे त्यामुळे या सभागृहाची अप्रतिष्ठा होणे ही दुर्भाग्याची गोष्ट असून भविष्यात असे पुन्हा घडू नये हीच अपेक्षा व्यक्त करतो. हे सभागृह पाच मिनिटे तहकूब झाले असते तर त्याला आमची हरकत नव्हती. परंतु सरकारच्या प्रतिष्ठेपेक्षा या सभागृहाची अप्रतिष्ठा होता कामा नये असे मला नम्रपणे सुचवावयाचे आहे.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, माझ्या माहितीप्रमाणे मंत्रिमंडळातील 16 मंत्री मुंबईला गेले आहेत. आम्ही याठिकाणी वेडे म्हणून बसलो आहोत काय? नागपूरचे अधिवेशन सोडून किती मंत्री मुंबईला गेले आहेत ते आपण सांगा.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, राज्याच्या मंत्रिमंडळातील 16 मंत्री जर मुंबईला गेले असतील तर त्याची माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवली पाहिजे. हे मंत्री मुंबईला कशासाठी गेले, त्यांना कोणते काम नेमून देण्यात आले, या सभागृहाच्या पलिकडे तिसरे सभागृह मुंबईला आहे काय? याची माहिती आम्हाला मिळाली पाहिजे. सभागृहाचे कामकाज सोडून हे मंत्री मुंबईला कशासाठी गेले आहेत याची माहिती सभागृहाला मिळणे हा आमचा अधिकार आहे. त्याप्रमाणे आपण त्यांना आदेश द्यावेत अशी माझी विनंती आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती (श्री.भास्कर जाधव)** : माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी उपस्थित केलेल्या हरकतीच्या मुद्याबाबत मला खुलासा करावयाचा आहे. माननीय सदस्य श्री. रावते यांची जी भावना आहे तशी माझीही भावना आहे. त्यामुळे या सभागृहाची अप्रतिष्ठा व्हावी असा माझा हेतू नव्हता. सभागृहातील काही माननीय सदस्यांना साडे तीनच्या विमानाने मुंबईला जावयाचे असल्यामुळे वारंवार सभागृहाचे कामकाज थांबविणे योग्य नव्हते म्हणून मी कॅबिनेट मंत्र्यांच्या आगमनाची वाट पाहिली हे मी नाकारीत नाही. आणखी दोन मिनिटे कॅबिनेट मंत्री सभागृहात आले नसते तर मी सभागृहाचे कामकाज बरखास्त करणार होतो. त्यामुळे या सभागृहाची जाणीवपूर्वक अप्रतिष्ठा करण्याचा माझा हेतू नव्हता. त्याचप्रमाणे शासनाच्या वतीने प्रत्येक मंत्र्यांनी सभागृहामध्ये बसण्याची वेळ आणि कालावधी ठरवून दिलेला आहे. ज्या मंत्र्यांची आज सभागृहामध्ये बसण्याची पाळी होती त्यांना आपल्या भावना व्यवस्थितपणे समजावून सांगण्यात येतील.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मी आपल्या निदर्शनास एक गोष्ट आणतो की, हे अधिवेशन संपत असतांना अधिवेशन काळामध्ये या सदनाचे कामकाज किती वेळ चालले याची माहिती वाचून दाखविली जाते. त्याबाबतीत मी माननीय सभापतींकडे आग्रह धरला की, कॅबिनेट मंत्री सभागृहात उपस्थित न राहिल्यामुळे सभागृहाचे कामकाज किती वेळा तहकूब करावे लागले हे देखील वाचून दाखविण्यात आले पाहिजे. तेव्हापासून ते वाचले जाते. याचा अर्थ संसदीय कार्य मंत्र्यांची यामध्ये जबाबदारी वाढली आहे. तरीसुध्दा ते जबाबदारीने वागत नाहीत. विरोधी पक्षाला ठराव मांडण्यात अजिबात स्वारस्य नाही हे सांगण्यासाठी आपले संसदीय कार्य मंत्री सारखे सारखे टी.व्ही. च्या कॅमेऱ्यापुढे धावतात. त्यांची या सभागृहात उपस्थित रहाण्याची जबाबदारी नाही काय?

**(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)**

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, माझा पॉईंट ऑफ इन्फर्मेशन आहे. माननीय मंत्री श्री. विजयदादा मोहिते पाटील यांचे दालन सभागृहाच्या जवळ आहे. ते लांब न्यावे असे त्यांनी सांगितले आहे. याचे कारण सभागृहात कॅबिनेट मंत्री उपस्थित नसले तर त्यांना सभागृहामध्ये धरुन आणले जाते असे काही आहे काय?

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, माझा मुद्दा अजून संपलेला नाही. माझा प्रश्न असा होता की, आपण 10 महिने लागतात असे सांगितले. त्यांना 26 जानेवारी 2007 ला पदक मिळाले.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ KTG/

श्री. मधुकर चव्हाण....

त्यानंतर जानेवारी ते डिसेंबर 2008 पर्यंत 12 महिने झाले. आणि आता 25 जानेवारी 2009 ला पदक देणार आहात. म्हणजे यासाठी 24 महिन्यांचा कालावधी लागण्याचे कारण काय? त्यामध्ये काही लोक निवृत्त होणार आहेत. दुर्दैवाने त्यामध्ये कुणाचेही त्यांच्या आयुष्यामध्ये काही बरेवाईट होऊ नये.

(यानंतर श्री.बरवड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण......

जसे श्री. करकरेंच्या बाबतीत झाले तसे होऊ नये. 24 महिन्यांपासून त्यांना अपमानस्पद वागणूक देत आहात. श्री. एम. एन. रॉय यांनी ती फाईल हलवली नाही, हे खरे आह काय ? त्याबाबतीत शासन काय कारवाई करणार ?

श्री. नितीन राऊत : सभापती महोदय, श्री. करकरे यांचा प्रस्ताव ऑक्टोबर, 2007 मध्ये केंद्र शासनाकडे पाठविण्यात आला. 26.1.2008 रोजी केंद्र शासनाने त्यांना राष्ट्रपती पदक जाहीर केलेले आहे आणि 25 जानेवारी, 2009 रोजी त्यासंबंधीचा समारंभ आयोजित करण्यात आलेला आहे.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, 24 महिने का लागले ?

श्री. नितीन राऊत : सभापती महोदय, 26 जानेवारी, 2008 ला केंद्र शासनाने राष्ट्रपती पदक जाहीर केले.

श्री. मधुकर चव्हाण : आपण निवेदनामध्ये असे म्हटले आहे की, 26 जानेवारी, 2007, 15 ऑगस्ट, 2007 व 26 जानेवारी, 2008 या दिवशी उल्लेखनीय सेवेबद्दल पदके मिळालेल्या एकूण 109 पोलीस अधिकारी / कर्मचाऱ्यांना पदक प्रदान करण्याचा समारंभ 25 जानेवारी, 2009 रोजी आयोजित करण्यात आलेला आहे. श्री. करकरे यांचा एक वर्ष अपमान केला. ही पदके देण्यासाठी 24 महिने लागण्याचे कारण काय ?

श्री. नितीन राऊत : सभापती महोदय, मी यापूर्वीच सभागृहाला माहिती दिलेली आहे की, कलकत्त्याचे जे टांकसाळ आहे त्यांच्याकडून 6 ते 10 महिन्यात पदके तयार होऊन येतात. ती पदके तयार होऊन आलेली असून 25 जानेवारीला समारंभ घेत आहोत.

-----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभागृहाच्या कामकाजासंबंधी**

**उपसभापती** : यानंतर सन 2008 चे वि. स. वि. क्रमांक 57 चर्चेला घेण्यात येईल.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, माझी अल्पकालीन चर्चा होती पण माननीय मंत्रिमहोदय उपस्थित नाहीत असे सांगण्यात आले. आता पाच मिनिटांपूर्वी माननीय मंत्रिमहोदय या ठिकाणी उपस्थित झालेले आहेत. सोमवारी मी उपस्थित राहणार नाही. मघाशी माननीय सभापतींनी सांगितले की, माननीय मंत्रिमहोदय आले तर ती अल्पकालीन चर्चा घेऊ. ते आता सभागृहात आलेले आहेत. त्यामुळे आता मी दिलेली अल्पकालीन चर्चा घ्यावी. मी सोमवारी येणार नाही याबाबत मी माननीय सभापतींना आधीच पत्र दिलेले आहे. ही चर्चा शुक्रवारी घेतली जाईल असे आधी सभागृहात सांगण्यात आले होते.

**उपसभापती** : आजच्या दिवसाच्या कामकाज पत्रिकेतील बाब क्रमांक 4 वर अल्पकालीन चर्चा दर्शविण्यात आली आहे परंतु आज माननीय गृहमंत्री उपस्थित नाहीत.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, माननीय गृह राज्यमंत्री या ठिकाणी उपस्थित आहेत. माननीय राज्यमंत्र्यांनी उत्तर दिले तरी चालेल असे मी माननीय सभापतींना भेटून सांगितले आहे. सभापती महोदय, हे काय चालले आहे ? त्यांच्या सोयीप्रमाणे सभागृहाचे कामकाज चालणार आहे काय ? सोमवारी मी उपस्थित राहणार नाही असे आधीच सांगितले आहे.

**उपसभापती** : आपण मंगळवारी उपस्थित राहणार आहात काय ?

श्री. जयंत प्र. पाटील : मी मंगळवारी उपस्थित राहणार नाही. मी सोमवारी आणि मंगळवारी येणार नाही. मी त्यासंदर्भात अर्ज दिलेला आहे. मी आमदार झाल्यापासून या सभागृहामध्ये फक्त 6 ते 7 वेळाच गैरहजर राहिलेलो आहे. माझ्या अध्यक्षतेखाली नगरपालिकेचा कार्यक्रम असल्यामुळे मी सोमवार आणि मंगळवार असे दोन दिवस सभागृहामध्ये येणार नाही. माननीय मंत्रिमहोदयांनी विधानसभा सभागृहामध्ये उत्तर दिलेले आहे. त्यांची काय अडचण आहे ? विधानसभा सभागृहामध्ये मंत्रिमहोदयांनी उत्तर दिलेले आहे आणि त्या ठिकाणी सरकारची भूमिका कळलेली आहे. मी परवा सभागृहात उपस्थित राहणार नाही म्हणून आपण परवा ही चर्चा घेणार आहात काय ? ज्या दिवशी नियम 93 ची सूचना दिली होती त्याच्या दुसऱ्या दिवशी ही चर्चा

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ KTG/

श्री. जयंत प्र. पाटील.....

होणार होती. त्यानंतर शुक्रवार रोजी चर्चा घेण्यात येईल असे सांगण्यात आले. त्यानंतर आज चर्चा घेऊ असे सांगण्यात आले. मी याबाबतीत काल सचिवांना सुध्दा सांगितले की, राज्यमंत्र्यांकडून उत्तर आले तरी मला चालेल. ही चर्चा आजच झाली पाहिजे अशी माझी विनंती आहे.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, माननीय राज्यमंत्री सभागृहामध्ये उपस्थित असताना चर्चा नाकारण्याचे कारण काय ?

श्री. जयंत प्र. पाटील : आज चर्चा घेऊ असे सकाळी सांगितले होते.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, या सभागृहामध्ये माननीय तालिका सभापती आसनस्थ असताना आम्ही असा मुद्दा मांडला की, ज्या दिवशी नियम 93 ची सूचना दिली होती त्याच दिवशी संध्याकाळी त्याबाबत चर्चा घेऊ असे माननीय सभापतींनी सांगितले होते. त्यानंतर या गोष्टीला किती दिवस झाले ? विधानसभा सभागृहामध्ये स्थगन प्रस्ताव फेटाळला गेला तरी नंतर त्या ठिकाणी या विषयावर चर्चा झाली आणि माननीय मंत्रिमहोदयांनी उत्तर दिले. आमच्याकडे मान्य होऊनही चर्चा झालेली नाही. आम्ही दुय्यम सिटीझन आहोत काय ?

श्री. नितीन राऊत : सभापती महोदय, सन्माननीय गृहमंत्र्यांनी स्वत: सांगितले आहे की, मी सोमवारी या चर्चेला उत्तर देईन. विधानसभा सभागृहामध्ये सुध्दा अशीच चर्चा उपस्थित झाली होती आणि त्यावर त्यांनी उत्तर दिले होते. या विषयाच्या संदर्भात आता माझ्याकडे माहिती नाही.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, या अल्पकालीन चर्चेला आज सुरुवात होऊ द्यावी आणि उत्तर सोमवारी होऊ द्यावे.

( विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य उभे राहून बोलत असतात. )

**उपसभापती** : ही अल्पकालीन चर्चा सोमवारी घेण्यात येईल.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, आपण असे करु नये.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, ही चर्चा आज घेण्यात यावी.

**उपसभापती** : प्रत्येक वेळी मी सन्माननीय सदस्यांचे ऐकतो. सभागृहात माननीय गृहमंत्री उपस्थित नाहीत. माननीय राज्यमंत्री म्हणत आहेत की, या घटनेबाबत माझ्याजवळ माहिती नाही.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सभागृहात नेहमी सामूहिक जबाबदारीचे तुणतुणे वाजविले जाते. त्यानुसार माननीय गृह राज्यमंत्र्यांनी या चर्चेला उत्तर द्यावे.

श्री.दिवाकर रावते : ही चर्चा आज होऊ द्यावी आणि या चर्चेला शासनाने सोमवारी उत्तर द्यावे. माननीय राज्यमंत्री महोदय, आपण चर्चेमध्ये आलेले मुद्दे लिहून माननीय गृह मंत्र्यांना द्यावेत.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, या सभागृहात मुंबईतील अतिरेक्यांच्या हल्ल्याबाबतची चर्चा चालू होती त्यावेळी माननीय गृहमंत्री सभागृहात उपस्थित नव्हते. परंतु माननीय गृह राज्यमंत्र्यांनी त्या चर्चेचे मुद्दे लिहून घेतले होते आणि उत्तर मात्र माननीय गृहमंत्र्यांनी दिले होते. त्याच पध्दतीने आज ही अल्पकालीन चर्चा होऊ द्यावी. उत्तर सोमवारी होऊ द्यावे.

श्री.नितीन राऊत : सभापती महोदय, मुंबईमध्ये अतिरेक्यांनी केलेल्या हल्ल्याबाबत या सदनात दोन दिवस चर्चा झाली होती, त्या चर्चेच्या वेळी मी मुद्दे लिहून घेतले होते. त्या चर्चेला मी उत्तर देण्यास तयार होतो. परंतु समोरच्या बाजूने मला साथ मिळाली नाही. त्यांनी साथ दिली असती तर मी उत्तर दिले असते.

( विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य उभे राहून बोलत असतात. )

2....





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, मंत्रिमहोदयांना असे बोलण्याचा अधिकार नाही. चर्चेला कोणी उत्तर द्यावयाचे हे ठरविण्याचा अधिकार सभागृहाला आहे. त्यामुळे मंत्रिमहोदयांनी असे बोलू नये. मी सोमवार व मंगळवार या दोन दिवशी सभागृहात उपस्थित राहू शकणार नाही असे माननीय सभापतींना पत्र दिलेले आहे.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांच्या या विषयाबाबतच्या भावना अतिशय तीव्र झालेल्या आहेत तसेच सभागृहातील वातावरण सुध्दा बरेच तापलेले असल्यामुळे मी सभागृहाची बैठक 10 मिनिटांकरिता स्थगित करीत आहे.

( सभागृहाची बैठक दुपारी 1.57 ते 2.07 पर्यंत स्थगित झाली. )

-------

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

स्थगितीनंतर

**(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)**

**पृ.शी./मु.शी.**: विधेयकासंबंधी

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, आता विधानसभेमध्ये कोणत्याही चर्चेविना संमत झालेली विधेयक आमच्या पुढे ठेवण्यात आलेली आहेत. ही विधेयके आम्हाला चार दिवस अगोदर मिळाली पाहिजेत. या विधेयकांचा आम्ही अभ्यास केव्हा करणार, विधेयकाला सुधारणा केव्हा देणार ? भाजीपाल्यासारखी ही विधेयके येथे वाटण्यात आलेली आहेत.

**उपसभापती** : हा विषय आला की मला सांगावे. मी त्यासंबंधी निर्णय देईन.

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, बी-बियाण्याच्या संदर्भातील महत्वाचे विधेयक आज कामकाजपत्रिकेवर दाखविण्यात आलेले आहे. मागील अधिवेशनामध्ये विधानसभेमध्ये हे विधेयक मंजूर झाले होते. परंतु विधानपरिषदेमध्ये ते संमत होऊ शकले नाही. त्यामुळे ते विधेयक पुन्हा विधानसभेत आणावे लागले. विधानसभेमध्ये ते संमत झालेले आहे. ऑर्डिनन्स काढून महाराष्ट्रातील कापूस उत्पादक शेतक-यांना मदत केलेली आहे. शेतक-यांना पुढे फायदा व्हावा यासाठी या बियाण्याच्या संदर्भात कायदा करण्यासाठी सन्माननीय सदस्यांनी आग्रह धरला. पुढील काळात शेतक-यांच्या हितासाठी या विधेयकाचे कायद्यात रुपांतर करण्यासाठी या विधेयकावर चर्चा व्हावी अशी माझी सभागृहाला विनंती आहे.

....नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय कृषी मंत्र्यांनी जे निवेदन केलेले आहे ते सभागृहाची दिशाभूल करणार आहे. त्याचे कारण असे आहे की, विधानसभा सभागृहात हे विधेयक मांडण्यात आले होते, त्यावेळी आपल्या कौशल्याचे, आपल्या मंत्रालयातील अधिका-यांच्या कौशल्याचे विशाल असे दर्शन आम्हाला तेथे घडले. अध्यादेश काढताना शासनाने माननीय राज्यपालांची फसवणूक केलेली आहे आणि त्यासंबंधीची चर्चा रेकॉर्डवर आलेली आहे. विधिमंडळामध्ये सदर विधेयक मंजूरीसाठी आले असताना ज्या काही तांत्रिक अडचणी निदर्शनास आल्या त्या सर्व अडचणी रेकॉर्डवर आलेल्या आहेत. शासनाची कोणत्या ठिकाणी चूक होते आहे ही बाब आपल्या निदर्शनास आणून दिली. त्यावेळचे तालिका सभाध्यक्ष हे वकील असल्यामुळे या गोष्टीकडे जास्त लक्ष दिले. त्या विधानसभा सभागृहात या विधेयकातील एका शब्दासाठी 45 मिनिटे चर्चा झाली. त्यानंतर ते विधेयक थांबविले गेले. त्यानंतर ते विधेयक पुढील आठवडयात ठेवण्यात यावे असा निर्णय घेतला गेला. त्यात आमचा काही दोष नाही. सदर विधेयक पुढील आठवडयात गेल्यानंतर घटनेतील कलम 304 प्रमाणे माननीय राष्ट्रपतींची परवानगी घेतल्याशिवाय हे विधेयक सभागृहात मांडता येत नाही अशा प्रकारचा मुद्दा त्यावेळी उपस्थित झाला होता. या विधेयकावर विधानसभा सभागृहात चर्चा होऊन यासंदर्भात ॲडव्होकेट जनरल यांना बोलाविण्याचे ठरले. ते आले होते किंवा नाही याची मला माहिती नाही. विधानसभा सभागृहामध्ये श्री.अनॉमी रॉय यांच्या डोक्यावरील केस उपटता आहेत, त्यामुळे तेथे या विधेयकांवर चर्चा न होता ती विधेयके या सभागृहात चर्चेला आलेली आहेत. गोंधळात विधेयके मंजूर करुन घेणे ही प्रथा अत्यंत वाईट आहे. ब्रिटीश पार्लमेंटमध्ये सुध्दा अशी प्रथा नाही. विधिमंडळात चर्चेशिवाय कायदा मंजूर करणे म्हणजे It is a rape on democracy. There is no other word I can use for this. विधिमंडळात कायदा करताना संवेदना बाजूला ठेवून, गोंधळाचा फायदा घेऊन विधेयके मंजूर करुन घेणे ही प्रथा बरोबर नाही. गोंधळात विधेयक कसे उरकवावयाचे याची वाट शासनातील मंत्री पहात असतात.

**उपसभापती** : आता ही सगळी चर्चा मी थांबवितो आहे....

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी आपले मत व्यक्त करताना सांगितले की, अध्यादेश काढताना माननीय राज्यपालांची दिशाभूल केली गेली. या संदर्भात सगळया गोष्टींचे क्लेरिफिकेशन शासनाकडून करण्यात आले आहे. एवढेच नव्हे तर

2...

श्री. बाळासाहेब थोरात...

यासंदर्भात ॲडव्होकेट जनरल यांच्याशी शासनाने चर्चा केले आहे. त्यांचे मत देखील घेतले आहे.

**उपसभापती** : हा विषय ज्यावेळी चर्चेला येईल त्यावेळी माननीय मंत्री महोदयांनी आणि सन्माननीय सदस्यांनी आपापली मते व्यक्त करावीत. आता अल्पकालीन चर्चेस मी सुरुवात करतो.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील अल्पकालीन चर्चेस सुरुवात करतील. परंतु या चर्चेचे उत्तर माननीय गृहमंत्री यांनीच दिले पाहिजे अशी माझी मागणी आहे. ही चर्चा अत्यंत गंभीर आहे. या ठिकाणी माननीय गृह राज्यमंत्र्यांनी सांगितले की, मी या चर्चेचे उत्तर देणार नाही. त्यांचे म्हणणे मला पटलेले आहे. या चर्चेला माननीय गृहमंत्र्यांनीच उत्तर द्यावे अशीच आमची मागणी आहे. सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांना चर्चेस सुरुवात करु द्यावी. त्यांचे भाषण झाल्यानंतर या चर्चेवर दुस-या सदस्यांना ऑन लेग ठेवा व चर्चा थांबवावी, त्यास आमची हरकत नाही. परंतु या चर्चेला उत्तर माननीय गृहमंत्र्यांनीच द्यावे अशी आमची मागणी आहे.

श्री. नितीन राऊत : माननीय विरोधी पक्ष नेत्यांची मागणी मला मंजूर आहे.

-----------------

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभागृहातील कामकाजासंबंधी

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, आपण विधिमंडळाच्या दैनंदिन कामकाजास सुरुवात करतो. कार्यक्रमपत्रिकेत अल्पकालीन चर्चा असतात, विधेयके असतात,अर्धा-तास चर्चा असतात. आजच्या दिवसभरात सभागृहात कोणते कामकाज केले जाणार आहे याची माहिती दिली गेली तर सभागृहात उपस्थित राहणे शक्य होते. कारण मंत्र्यांना दोन्ही सभागृहातील कामकाज पहावे लागते. मंत्र्यांना माहिती मिळाली तर सभागृहाच्या कामकाजाचे नियोजन मंत्र्यांना करता येईल. यासंबंधीची माहिती अगोदर मिळाली तर माननीय मंत्री सभागृहात उपस्थित रहात नाही अशा प्रकारचा कधी कधी आरोप होतो, तो होऊ शकणार नाही.

**उपसभापती** : आपल्या बाबतीत असे कधी घडलेले नाही.

श्री. बाळासाहेब थोरात : माझ्या बाबतीत असे घडलेले नाही. परंतु सभागृहात कोणते कामकाज किती वाजता घेण्यात येईल यासंबंधीची पूर्व कल्पना दिली गेली तर आम्ही सर्व मंत्री सभागृहात उपस्थित राहण्यासंबंधी सतर्कता घेऊ शकतो.

**उपसभापती** : सन्माननीय मंत्र्यांचे म्हणणे योग्य आहे. मंत्री सभागृहात उपस्थित नाहीत असे प्रसंग कधी कधी येतात.

श्री. बाळासाहेब थोरात : विधानपरिषदेमध्ये एखादी लक्षवेधी सूचना असेल तर ती लक्षवेधी सूचना सुरु होण्यासाठी व त्या अनुषंगाने उत्तर देण्यासाठी आम्हाला दोन,दोन, तीन,तीन तास थांबावे लागते. आम्हाला कामकाजाची पूर्व कल्पना मिळाली तर निश्चितपणे मंत्र्यांना मदत होऊ शकेल.

**उपसभापती** : मी निश्चितपणे यासंबंधी खबरदारी घेतो.

---------

यानंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: विधानपरिषद आश्वासन समितीचा अहवाल सभागृहाला सादर करणे

श्री.संजय दत्त (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विधानपरिषद आश्वासन समितीचा एकशे-पंचेचाळीसावा, एकशे-सेहचाळीसावा, एकशे-सत्तेचाळीसावा, एकशे-अठ्ठेचाळीसावा, एकशे-एकोणपन्नासावा व एकशे-पन्नासावा अहवाल सभागृहाला सादर करतो.

**उपसभापती** : अहवाल सभागृहाला सादर झाले आहेत.

--------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ D/ MMP/ 14:20

**पृ.शी.**: मौजे देवकान्हे, ता.रोहा, जि.रायगड येथे विषारी दारु प्यायल्याने 6 जणांचा झालेला मृत्यू

**मु.शी.**: मौजे देवकान्हे, ता.रोहा, जि.रायगड येथे विषारी दारु प्यायल्याने 6 जणांचा झालेला मृत्यू या विषयावर श्री.जयंत प्र.पाटील, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अल्पकालीन चर्चा

**उपसभापती** : या अल्पकालीन चर्चेसंबंधी औपचारिक प्रस्ताव मांडता येणार नाही. या चर्चेसाठी एक तासाचा वेळ दिलेला आहे. सूचना देणारे सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील आपली सूचना वाचतील आणि भाषण करतील.

श्री.जयंत प्र.पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 97 अन्वये आपल्या अनुमतीने पुढील विषयावर अल्पकालीन चर्चा उपस्थित करतो :-

"रविवार, दिनांक २१ डिसेंबर, २००८ रोजी रोहे तालुक्यातील (जि.रायगड) मौजे देवकान्हे येथे विषारी दारु प्यायल्याने ६ जणांचा मृत्यू होणे व ४० हून अधिक जण अत्यवस्थेत असणे, जखमी व्यक्तींना मुंबई व अलिबाग येथे पुढील उपचारासाठी हलविण्यात येणे, मौजे देवकान्हे येथे दिनांक २१ डिसेंबर, २००८ रोजी ग्रामपंचायतीची निवडणूक पार पडणे, त्यानंतर सायंकाळी सुमारे ७० जण गावठी दारु प्यायल्याने अनेकांना उलट्यांचा त्रास होऊन काही वेळातच अनेक जण बेशुध्द पडणे व ६ जणांचा मृत्यू होणे, तसेच पनवेल तालुक्यात दिनांक २१ डिसेंबर, २००८ रोजी ग्रामपंचायतीच्या निवडणूकीच्या वेळी ओवे ग्रामपंचायतीमध्ये ओवे कॅम्प येथे राजकुमार म्हात्रे हा दरोडेखोर, गुंड व खंडणीबहादूर असून त्यांनी सुमारे ५० ते ६० गुंडाना घेऊन मतदारांना दमबाजी करणे, त्यांना पोलीस निरिक्षक श्री.गोलंदे यांनी अटक करणे, या प्रकारानंतर एका नेत्याने पोलीस निरिक्षकास दमबाजी देणे, म्हात्रे यास सोडविण्यासाठी तळोजे पोलीस स्टेशनच्या कर्मचाऱ्यांनाही शिवीगाळ करणे, सर्वांसमोर पोलीस निरिक्षकांना अपमानित करुन तुमची ताबडतोब बदली करतो असे धमकाविणे, याबाबत करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी"

सभापती महोदय, मी नियम २८९ अन्वये सूचना मांडली होती त्यावेळी सभागृहाचे कामकाज स्थगित करण्याचे काम केले. त्यावेळेला सत्ताधारी पक्षाकडून माझ्या भाषणामध्ये व्यत्यय आणण्यात आला होता. मी म्हणणे मांडत असताना राष्ट्रवादी काँग्रेस व काँग्रेस पक्षाचे नाव घेतले म्हणून सत्ताधारी पक्षाकडून माझ्या बोलण्यामध्ये व्यत्यय आणण्याची भूमिका घेतली गेली. आज याठिकाणी पूर्ण तयारीनिशी बोलण्यास मी उभा आहे. रायगड जिल्हयामध्ये विषारी दारु पिऊन ६ आदिवासी

..३..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील.............

लोकांचा मृत्यू झाला. दुसऱ्यांदा असा प्रकार रायगड जिल्हयामध्ये घडला आहे. सहा महिन्यापूर्वी रायगड जिल्हयाचे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष श्री.वसंत ओसवाल यांचे बंधू यांनी १०० लोकांना स्पिरिट पाजून यमसदनाला धाडले. त्यातील ३० लोकांना अंधत्व आले असून २० लोकांना अपंगत्व आले आहे. महाराष्ट्रामध्ये रायगड जिल्हयात सर्वात जास्त स्पिरिटची लायसन्स दिली गेली आहेत. १८०० लायसन्स रायगड जिल्हयात दिली गेली आहेत. यापैकी बहुतेक लायसन्स ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांकडे आहेत. सुधागडमध्ये जी घटना घडली होती त्यामध्ये १०० लोक मृत्युमुखी पडले होते. मी चिडलो असे मंत्रीमहोदय म्हणाले होते. ते नाराज झाले. परंतु १०० लोकांचे संसार उद्ध्वस्त झाले त्यामुळेच मी चिडलो होतो. हे आदिवासी लोक आहेत.

श्री.अरुण गुजराथी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नाव घेतले. ग्रामपंचायतीच्या निवडणुका चिन्हावर किंवा पक्षाच्या माध्यमातून लढल्या जात नाहीत. सन्माननीय सदस्य जी माहिती सभागृहाला देत आहेत ती वस्तुस्थिती मी नाकारत नाही. परंतु पक्षापेक्षा जी घटना घडली ती पुन्हा धडू नये याबद्दल आपले मत मांडावे अशी माझी त्यांना विनंती आहे.

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, कालच्या प्रकारावर मी अद्याप भाष्य केलेले नाही. सुधागडमध्ये सहा महिन्यापूर्वी जी घटना घडली तिचा उल्लेख केला आहे.

श्री.अरुण गुजराथी : सभापती महोदय, पक्षाचे नाव रेकॉर्डवरुन काढावे अशी माझी विनंती आहे.

**उपसभापती :** पक्षाचा उल्लेख झाला असेल तर रेकॉर्डवरुन काढून टाकण्यात येईल.

श्री.जयंत प्र.पाटील : सुधागड पाली येथे जे दारुकांड झाले त्यावेळेला तत्कालीन गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी कबूल केले होते, रायगड जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष यांचे भाऊ असले तरी आम्ही कारवाई करु असे रेकॉर्डवर आलेले आहे. सन्माननीय सदस्य श्री.अरुण गुजराथी यांचा मी शिष्य आहे. त्यांचा आदर्श घेऊनच मी सभागृहाच्या कामकाजात भाग घेत असतो, चर्चा करीत असतो. सभागृहात बेकायदेशीर बोलणार नाही. कोणी बेकायदेशीर काही करीत असेल तर ते करु देणार नाही. मी एकटा असलो तरी ताकदीने बोलू शकतो आणि नियमाच्या बाहेर काही बोलणार नाही.

(नंतर श्री.खर्चे...

अमुद्रित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील......

सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री. अरुणभाई गुजराथी हे आमचे आदर्श आहेत, गांधीवादी आहेत तसेच साने गुरुजींच्या विचारसरणीचे आहेत म्हणून आम्ही आपल्याला गुरुस्थानी मानतो आणि आपलाच आदर्श घेऊन सामाजिक जीवनात वावरतो. या निमित्ताने माझी आपल्याला विनंती आहे की, पालीचा मुद्दा वेगळा आहे. ज्या व्यक्तिने, ज्या इसमाने किंवा ज्या फर्मने हे 100 लोक मारले त्याला मात्र 15 दिवसात जिल्हा सत्र न्यायालयातून जामीन मिळाला होता. अशा प्रकारे गृह विभागाने मॅनेज करुन हा जामीन दिला होता परंतु त्याबाबत शासनाने उच्च न्यायालयात अपिल करण्याची तसदी घेतली नाही. आज ती व्यक्ती समाजात राजरोसपणे फिरत आहे. म्हणून माझा असा सवाल आहे की, रोहा येथे सध्याचे दारुकांड घडले त्यातील दारु ही पालीमधून आली होती काय, याची चौकशी झाली पाहिजे. ही दारु आणलेली आहे हे खरे आहे. कारण आपला सहकारी कॉंग्रेस (आय) या पक्षाचे मंत्री महोदय श्री. रविशेठ पाटील यांचे कार्यकर्ते यांनी घटनेच्या दुसऱ्याच दिवशी रोहा शहर बोर्ड लावून बंद ठेवले होते. रोहा येथील मुख्य बाजारपेठ बंद होती आणि हे मी शेतकरी कामगार पक्षाचा म्हणून बोलत नाही, शिवसेना पक्षाचे किंवा भारतीय जनता पक्षाचे कार्यकर्ते सांगत नाहीत तर कॉंग्रेस आय पक्षाच्या लोकांनीच सांगितले की हे कृत्य राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या लोकांनी केलेले आहे. मी घटना घडल्यानंतर सभागृहात स्थगन प्रस्तावाची सूचना दिली होती त्यावेळेसच मला समजले होते की, श्री. पासीनकर, जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष, जिल्हा कॉंग्रेस कमेटीचे अध्यक्ष यांच्या नेतृत्वाखाली रोहा शहर बंद ठेवण्यात आले आहे. म्हणून याप्रकरणाची सखोल चौकशी झाली पाहिजे. मी बऱ्याच वर्षांनी सभागृहात चिडलो कारण घटनाच इतकी गंभीर आहे. माझे वडील यापेक्षाही तापट स्वभावाचे होते. कारण आम्हाला अन्याय सहन होत नाही म्हणून मी चिडलो आहे. सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी साहेब बोलतात आणि नंतर शब्द मागे सुध्दा घेतात. तेच मला गडकरी साहेबांकडून मला शिकायचे आहे.

सभापती महोदय, श्रीमती संगीता थिटे या महिलेचा दारुचा व्यवसाय होता. वास्तविक आमचा रायगड जिल्हा हा तंटामुक्त जिल्हा म्हणून सर्वानाच माहीत आहे. तसेच आमचा जिल्हा दारुमुक्त देखील आहे आणि त्याचे कारण म्हणजे आमचे जिल्हा पोलीस अधीक्षक श्री. दिगावकर अत्यंत चांगले काम करीत आहेत. त्यांनाही मनापासून वाटते की, जिल्ह्यात शांतता रहावी म्हणून

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील.......

जिल्ह्यात तंटे झाले तर ते गावातच मिटवावे यादृष्टीने तेही प्रयत्नशील असतात. त्याचबरोबर गावठी दारु जर कोणी विकत असतील ती ठिकाणे सुध्दा त्यांनी बंद केलेली आहेत. लायसेन्सधारक जे आहेत त्यांच्यामुळे जिल्ह्यात मात्र देशी दारुची वाढ झालेली आहे, बियरची विक्री वाढलेली आहे परंतु गावठी दारुचे अड्डे मात्र त्यांनी बंद केले. अशा प्रकारे संपूर्ण जिल्ह्यातील गावठी दारुचे अड्डे गेल्या सहा महिन्यांपासून बंद होते. परंतु ग्रामपंचायतीच्या निवडणुकांच्या निमित्ताने म्हणजेच मतदान झाल्यानंतर संध्याकाळी ही दारु बनविण्यास सांगितले आणि दारु वाटण्याचे काम केले. यासंबंधीचे पंचनामे माझ्याकडे आहेत. तसेच या प्रकरणी श्रीमती संगीता थिटे ही महिला लॉक-अप मध्ये आहे आणि त्या महिलेचे पती श्री. सिताराम थिटे हे अत्यावस्थेत सायन हॉस्पिटलमध्ये उपचार घेत आहेत. त्यांच्यासोबत अजून 35 लोक देखील सिरियस आहेत. म्हणून माझी मागणी अशी आहे की, या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी होणे आवश्यक आहे. त्याचबरोबर जिल्ह्यातील सर्व स्पिरीटचे परवाने बंद केले पाहिजेत.....

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत पाटील ....

सभापती महोदय, स्पिरिटची सर्व लायसन्सेस त्वरी बंद करण्यात आली पाहिजे तसेच संबंधितांवर कडक कारवाई केली पाहिजे. सभापती महोदय, या ठिकाणी काम करणारा मी एक नेता आहे. कोणता माणूस कोणत्या पक्षाचा आहे याची मला सर्व माहिती आहे. सिताराम थिटे यांच्या घरी मी स्वत: गेलेलो आहे. सिताराम थिटे हे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे कार्यकर्ते आहेत. सिताराम थिटे यांच्या घरात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नेत्यांचे फोटो देखील आहेत. या दारु कांडामध्ये जे वाचलेले आहेत त्यांनी कोणाचे नाव सांगू नये असा दबाव पोलिसांकडून आणला जात आहे. त्यामुळे या प्रकरणाच्या संदर्भात जिल्हयाच्या बाहेरच्या अधिका-यांकडून चौकशी झाली पाहिजे अशी माझी मागणी आहे. पालीमध्ये दारु कांड झाले आणि आता रोहामध्ये जे दारु कांड झालेले आहे त्याची पुनरावृत्ती यापुढे होणार नाही यासाठी शासनाने काळजी घेतली पाहिजे. मला बोलण्यासाठी आपण केवळ 10 मिनिटांचा अवधी दिल्यामुळे मी माझे विचार सांगावयाचे असल्यामुळे मी कमी वेळेत या ठिकाणी विचार मांडणार आहे. माझ्या मतदारसंघात ग्रामपंचायतीच्या निवडणुका झाल्या. दुसरी घटना रायगड-पनवेल तालुक्यात घडलेली आहे. राजकुमार म्हात्रे या गुंडावर पोलिसांनी मोक्का लावला होता. या गुंड कार्यकर्त्यांना घेऊन मतदान केंद्रावर गेला होता. या गुंडाला आमच्या जिल्हयात बंदी आहे. या गुंडाने बँकावर, बिल्डरांवर आणि व्यापारी वर्गावर दरोडे घातलेले आहेत. नवी मुंबई आणि पनवेलच्या संदर्भात या ठिकाणी चर्चा करीत असतांना या गुंडाने टाकलेल्या दरोडयांचा अजून सुध्दा तपास लागलेला नाही. मी ज्या बँकेचा चेअरमन आहे त्या बँकेच्या तीन शाखांवर दरोडे टाकण्यात आलेले आहे. या दरोड्यांमध्ये राजकुमार म्हात्रे हा संशयीत आहे परंतु हा आरोपी गेल्या सहा महिन्यापासून फरार असल्यामुळे पोलिसांना तो अजूनपर्यंत सापडलेला नाही. या संशयीत आरोपींनी राजकीय दबाव आणून त्याच्यावरील मोक्का काढण्यात आलेला आहे. या गुंडाला राजकीय संरक्षण देण्याचे काम मोठया प्रमाणात सुरु आहे. राजकीय दबाव आणून या गुंडावरील मोक्का कायदा काढण्यात आला. राजकुमार म्हात्रेला पोलिसांनी 6 महिन्यांपासून फरार घोषित केलेले आहे. त्यामुळे पोलीस या गुन्हेगाराला पकडू शकले नाहीत. पनवेल तालुक्यात 21 डिसेंबर 2008 रोजी ग्रामपंचायतीच्या निवडणुका होत्या त्यावेळी हा गुंड एका मतदान केंद्रावर

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत पाटील ....

गेला असतांना पोलीस निरीक्षक श्री. गोलांदे यांनी त्याला पकडले. या आरोपीला पकडल्यानंतर काँग्रेसचे श्री राम ठाकूर यांनी पोलीस निरीक्षकास सांगितले की, तु कोणाला पकडतो आहेस? मी तुझी ताबडतोब बदली करुन टाकीन. मुख्यमंत्री माझे मित्र असल्यामुळे त्यांना फोन करुन मी तुझी ताबडतोब बदली करुन टाकेन. तेव्हा श्री. गोलांदे यांनी त्यांना सांगितले की, तुम्हाला काय करावयाचे असेल ते करा पण या गुंडाला मी सोडणार नाही. त्यांनतर श्री. गोलांदे या गुंडाला घेऊन पोलीस स्टेशनमध्ये गेले. पोलीस स्टेशनमध्ये गेल्यानंतर श्री. गोलांदे यांना शिवीगाळ करण्यात आली, पोलिसांना मारण्याची धमकी देण्यात आली. कमिशनर आणि असिस्टंट कमिशनरला फोन लावून सदर कारवाई थांबवण्याची त्यांनी मागणी कली. परंतु कर्तव्यदक्ष पोलीस अधिकारी श्री. गोलांदे यांनी राजकुमार म्हात्रेवर गुन्हा नोंद केलाच.

यानंतर श्री. अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील..........

त्यांनी सांगितले की, आम्हाला धमकी दिली, आम्हाला मारहाण करण्याचा प्रयत्न केलेला आहे. तेव्हा श्री.राजकुमार म्हात्रे यास लावण्यात आलेला मोक्का कोणी स्थगित केला. रायगड बाजारावर पाच लाख रुपयांचा दरोडा पडला त्यामध्ये श्री.राजकुमार म्हात्रे यांचा हात होता असे पोलिसांचे म्हणणे आहे. माझी या चर्चेच्या निमित्ताने मागणी आहे की, श्री.म्हात्रे यांना पुन्हा मोक्का लावण्यात यावा. तसेच ज्या पोलीस अधिकाऱ्याने त्यांच्यावरील मोक्का रद्द केला त्याची देखील चौकशी झाली पाहिजे. रोहे तालुक्यातील देवकान्हे येथे विषारी दारु प्यायल्याने सहा जणांचा मृत्यू झालेला आहे. तेथील जनतेला शासनाने न्याय देण्याचा प्रयत्न केला पाहिजे. तेथे जे गढूळ वातावरण निर्माण झालेले आहे ते निवळण्याचा प्रयत्न केला पाहिजे अशी शासनाकडे मागणी करुन माझे भाषण पूर्ण करतो.

श्री.नितीन राऊत ( गृह राज्यमंत्री ) : सभापती महोदय, या अल्पकालीन चर्चेस माननीय गृह मंत्री उत्तर देणार आहेत.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे (विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आणि सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी रोहे तालुक्यातील देवकान्हे येथे विषारी दारु पिऊन काही जणांचा झालेला मृत्यू अशा विषयाची नियम 93 अन्वये सूचना दिली होती. त्या सूचनेस अनुसरुन माननीय सभापतींनी अल्पकालीन चर्चा करण्यास मंजुरी दिली.

सभापती महोदय, मागील अधिवेशनात रोहा येथे विषारी दारु पिऊन 27 लोक दगावले होते. त्यावेळी माननीय मंत्री महोदय श्री.गणेश नाईक यांनी सांगितले होते की, उत्तर देताना सांगितले होते की, संबंधितांवर योग्य ती कारवाई करण्यात येईल. कोणी कितीही वाईट असला तरी रावणाचा भाऊ बिभीषण होता. त्याप्रमाणे आपण बिभीषण होऊ. ...

**उपसभापती** : ही चर्चा येथेच थांबविण्यात येत आहे.ही चर्चा नंतर घेण्यात येईल. सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे हे ऑन लेग आहेत.

आता मी पुढील कामकाज घेतो.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>**शासकीय विधेयकांबाबत**</u>

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आजच्या कामकाजपत्रिकेवर दाखविण्यात आलेले सन 2008 चे वि.स.स.क्रमांक 57- मुंबई पोलीस (सुधारणा) विधेयक या विधेयकास मी उपसूचना दिलेली आहे.

सभापती महोदय, आजच्या कामकाजपत्रिकेत "विधानसभेने संमत केल्यास" या शीर्षकाखाली जी विधेयके दाखविण्यात आलेली ती आजच मंजूर करुन देण्याची जबरदस्ती करु नये. आम्ही अडवणूक करणार नाही. परंतु मी "विधेयके पुर:स्थापित करण्यात आल्यानंतरचे प्रस्ताव" यासंबंधीचा म.वि.प.नियम 119 नियम वाचून दाखवितो. या नियमातील दुसऱ्या परिच्छेदात नमूद केलेले आहे की, "... परंतु ही तरतूद स्थगित करण्याच्या आपल्या अधिकाराचा वापर करुन सभापतींनी प्रस्ताव मांडण्यास परवानगी दिलेली नसेल तर, असा कोणताही प्रस्ताव, उद्देश व कारणे यांच्या निवेदनासह विधेयकाची प्रत आणि सदस्याने निवड केली असेल असा त्याचा हिंदी किंवा इंग्रजी भाषेतील अनुवाद, असा प्रस्ताव ज्या तारखेस मांडण्यात येईल त्या तारखेपूर्वी पूर्ण चार दिवस आधी प्रत्येक सदस्यास पाठविण्यात आल्याशिवाय, मांडता येणार नाही." याचा अर्थ अधिवेशन संपल्यानंतर ही विधेयके चर्चेसाठी येऊ शकतात.

यानंतर श्री.गायकवाड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते ...

हा नियम आहे. तेव्हा त्या नियमाप्रमाणे आम्हाला आपल्याकडून संरक्षण हवे आहे. या ठिकाणी 72 क्रमांकाचे विधेयक दाखविण्यात आलेले आहे. ते चुकीचे आहे. सिलेक्ट कमिटीसमोर हे विधेयक पाठविण्यात आले होते त्या कमिटीचा अहवाल आलेला नाही. हे विधेयक अत्यंत घाई घाईने आणले आहे . त्या विधेयकामध्ये उद्देशसुध्दा लिहिलेले नाहीत. तेव्हा अशा प्रकारचे विधेयक घाईने मंजूर करता कामा नये.असे मला सांगावयाचे आहे. मुबईतील लोकांच्या जीवन मरणाचा हा प्रश्न आहे. मुंबईतील माणूस तेथे राहील किंवा नाही अशा प्रकारे त्याच्या भवितव्यासबंधीचे हे महत्वाचे विधेयक आहे. .

**उपसभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, ज्या विधेयकावर आपल्याला सांगोपांग चर्चा करावयाची आहे. त्यावर चर्चा करण्यास माझी काहीही हरकत नाही परंतु काही विधेयके आपण प्राधान्याने मंजूर करु शकतो.

श्री.दिवाकर रावते : आता ती विधेयके घेण्यात येऊ नयेत. कारण ती विधेयके आताच आम्हाला देण्यात आली असून ती विधेयके आम्ही वाचलीसुध्दा नाहीत. तेव्हा ही विधेयके वाचण्यास आम्हाला वेळ देण्यात यावा आणि सोमवारी किंवा मंगळवारी ती घ्यावीत . माननीय संसदीय कार्य मंत्र्यांनी विधेयकासाठी दोन दिवस ठेवलेले आहेत. जकातीसबंधी जे विधेयक आहे ते विधेयके मंजूर करु परंतु बाकीच्या विधेयकावर आम्हाला सविस्तर करावयाची आहे.

**उपसभापती** : आता कोणते् विधेयक घ्यावयाचे ?

श्री.दिवाकर रावते : आता मुंबई पोलीस सुधारणा विधेयक धेण्यात यावे. बाकीची विधयके वाचण्यासाठी सुध्दा आम्हाला वेळ नाही. सुधारणा मांडण्यासाठी सुध्दा वेळ नाही. त्यामुळे ती विधेयके आता घेण्यात येऊ नये.

**उपसभापती** : ठीक आहे.

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## अशासकीय कामकाजासबंधी

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, अशासकीय कामकाज गेल्या दोन तीन अधिवेशनामध्ये होतच नाही अशासकीय कामकाज शेवटी ठेवण्यात येते परंतु शेवटी इतके कामकाज असते की ते कामकाजच होत नाही . तेव्हा या काकाजाला न्याय देण्यात यावा अशी माझी आपल्याला विनंती आहे.

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, अशासकीय कामकाज गुरुवारी ठेवले तर त्याला न्याय मिळेल. शुक्रवारी सन्माननीय सदस्यांना मतदारसंघात जावयाचे असते त्यामुळे शुक्रवारी हे कामकाज घेतले तर सदस्यांना आणि मंत्र्यांनासुध्दा उशिरा थांबावे लागेल. तेव्हा शुक्रवार ऐवजी गुरुवारी अशासकीय कामकाज घेण्यात यावे.

**उपसभापती** : याबाबतीत माननीय सभापतींशी चर्चा करुन अशासकीय कामकाजाचा दिवस ठरविण्यात येईल.

आता शासकीय विधेयक क्रमांक 57 घेण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : मुंबई पोलीस (सुधारणा) विधेयक

L.A. BILL NO. LVII OF 2008.

(A BILL FURTHER TO AMEND THE BOMBAY POLICE ACT, 1951 AND MOTION FOR REFERRING THE BILL TO JOINT SELECT COMMITTEE.)

श्री.नितीन राऊत (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विधान सभेने संमत केल्याप्रमाणे सन 2008 चे वि.स.वि. क्रमांक 57 मुंबई पोलीस अधिनियम, 1951 यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडतो.

**उपसभापती** :विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री.नितीन राऊत : सभापती महोदय,मी आपल्या अनुमतीने सन 2008 चे वि.स.वि. क्रमांक 57 मुंबई पोलीस अधिनियम, 1951 यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो..

प्रश्न प्रस्तुत झाला

**उपसभापती** :विधेयक सयुक्त चिकित्सा समितीकडे पाठविण्याबाबत सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते व डॉ.दीपक सावंत यांचा प्रस्ताव आहे. त्यांच्या पैकी कोणीही एकाने तो मांडावा.

श्री.दिवाकर रावते ( विधान सभेने निवडलेले ) सभापती महोदय, सन 2008 चे वि.स.वि. क्रमांक 57 मुंबई पोलीस अधिनियम, 1951 यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक विधान सभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहाच्या 23 सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त तीन महिन्याच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारर्थ पाठविण्यात यावे असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

प्रस्ताव प्रस्तुत झाला

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : आता विधेयक विचारात घेण्याबाबतचा प्रश्न आणि विधेयक संयुक्त चिकित्सा समितीकडे पाठविण्यासंबधीचा प्रस्ताव यावर एकत्रित चर्चा घेण्यात येईल. त्यानतर विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासबंधीचा प्रस्ताव प्रथम मतास टाकला जाईल व तो असंमत झाल्यास विधेयक विचारात घेण्यासबंधीचा प्रश्न मतास टाकला जाईल.

आता सदस्यांनी आपले भाषण सुरु करावे.

नतर श्री.सुंबरे

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/ MMP/ D/ श्री. गायकवाड नंतर --- 14:45

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, लोकशाहमध्ये सर्वसामान्य जनतेचा अन्यायाच्या विरोधात प्रतिक्रार करण्याचा अधिकार संपुष्टात आणणारे दुर्दैवी विधेयक प्रगल्भ विचारधारा असलेल्या या महाराष्ट्र राज्यात मांडले जात आहे याबद्दल मी प्रथमतः अत्यंत खेद व्यक्त करतो. या विधेयकाच्या माध्यमातून भवियात आपल्या सरकारकडून जनतेवर कितीही अन्याय आणि अत्याचार केला तरीही त्या विरोधात आवाज देखील निघता कामा नये अशा प्रकारची चीनी राज्यकर्त्यांची प्रवृत्ती या राज्यकर्त्यांनी या सदनात या विधेयकाच्या रूपाने आणली आहे त्याला काय म्हणावे हा प्रश्न आहे म्हणून मी त्या संदर्भात बोलण्यासाठी, माझे विचार मांडण्यासाठी उभा आहे. तसे पाहिले तर हा कायदा आपल्याकडे मुळात होताच. जगाच्या पाठीवर कोठल्याही देशामध्ये कोठल्याही आंदोलनामधून राष्ट्रीय संपत्तीचा नाश करणे हे कोणतेही सरकार सहन करणार नाही आणि करूही नये. या मताशी आपण सगळेच ठाम आहोत. ज्यांचा ज्यांचा लोकशाहीवर विश्वास आहे आणि देशावर प्रेम आहे त्या सर्वांनाच असे वाटत असते. परंतु हे विधेयक आणत असताना जी तरतूद होती त्यात ज्या पद्धतीने हा कायदा नव्याने करण्याचा प्रयत्न करीत आहात पण त्यात तुम्ही नवीन असे काय करीत आहात ? तर केवळ ज्याच्याकडे ते अधिकार दिलले आहेत ते बदलण्याचाच या विधेयकाचा उद्देश्य आहे. मुळात या विधेयकाप्रमाणे जो मूळ कायदा आज अस्तित्त्वात आहे त्याच्या खंड 51 मध्ये जर एखादा बेकायदेशीर जमावाचा.. आता यात बेकायदेशीर जमावाचा असा शब्द आपण घातला आहे. सांघिक हेतू शेवटास नेण्याच्या कामी केलेल्या कोणत्याही कृतीमुळे कोणत्याही मालमत्तेचे नुकसान वा हानी झाली असेल किंवा कोणत्याही व्यक्तीस किंवा व्यक्तींना मृत्यू आला असेल वा जबर दुखापत झाली असेल तेव्हा त्या संदर्भात राज्य सरकारला राजकीय राजपत्रात अधिसूचना करून.. म्हणजे यासाठी कायदा आहे. परंतु आता तुम्ही काय केले ? तर राजकीय राजपत्रा ऐवजी हा अधिकार जिल्हादंडाधिकाऱ्यांना देण्यात आला. त्यांना हा अधिकार देण्यासाठी ही नवीन तरतूद यात करण्यात येत आहे. मग या पोट कलमात म्हटल्याप्रमाणे, जेव्हा तुम्ही (2) मध्ये म्हटले आहे की, मुंबई पोलीस अधिनियम 1951 (यात यापुढे ज्याचा निदे "मुख्य अधिनियम" असा करण्यात आलेला आहे) याच्या कलम 51 मध्ये (क) पोट-कलम (1) ऐवजी, पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल. .. असे म्हणून हा बदल दाखविला आहे. (1) जेव्हा एखाद्या बेकायदेशीर जमावाने आपले समान उद्दिष्ट साधण्यासाठी केलेल्या

..... टीटी 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( सभापतीस्थानी - तालिका सभापती श्री.भास्कर जाधव )**

श्री. रावते .....

कोणत्याही कृतीमुळे कोणत्याही मालमत्तेची हानी किंवा नुकसान झाले असेल किंवा जेव्हा कोणत्याह व्यक्तीस वा व्यक्तींना मृत्यू आला असेल वा जबर दुखापत झाली असेल तेव्हा जिल्हा दंडाधिकाऱ्यास आदेशाद्वारे... म्हणजे यामध्ये 'जिल्हा दंडाधिकाऱ्यास' हा शब्द आपण टाकला आहे. यामुळे काय होईल ? ज्या क्षेत्रात त्याच्या मते असा बेकायदेशीर जमाव जमला होता ते क्षेत्र यापुढे अशांत क्षेत्र असे संबोधण्यात येईल. सभापती महोदय, मुळामध्ये या संपूर्ण विधेयकात मी जेव्हा हे विधेयक वाचत होतो तेव्हा प्रत्येक ठिकाण आलेला जो मूळ शब्द आहे .. 'बेकायदेशीर जमाव' आता या शब्दाची मुळी व्याख्याच केलेली नाही. बेकायदेशीर जमाव आपण कशाला म्हणणार ? एखाद्या पक्षाने परवानगी घेऊन काढलेला मोर्चा असेल तर तो कायदेशीर समजणार का ? एखाद्या ठिकाणी होत असलेली निदर्शने, ती परवानगी घेऊन केली असतील तर कायदेशीर आणि परवानगी घेऊन केली नसतील तर ती बेकायदेशीर ठरविणार का ? एखाद्या ठिकाणी अन्याय अत्याचार केला आणि लोकांनी उत्स्फूर्त न्याय मागण्यासाठी त्याला घेराओ घातला तर त्याला तुम्ही बेकायदेशीर समजणार का ? 'बेकायदेशीर' तुम्ही कशाला समजणार ? आता कालच मुंबईमध्ये लोकल रेल्वेच्या सगळ्या मोटरमननी एकाएकी रात्री 9 वाजता संप केला. लोक तेव्हा घरी जात होते, त्याच वेळेस नेमका हा संप मोटरमननी केला त्यामुळे सगळ्या गाड्या बंद झाल्या. तेथे जमाव कोणाचाच नव्हता. घरी जाण्यासाठी म्हणून आलेले हजारो लोक तेव्हा चर्चगेट स्टेशनमध्ये होते. अशा वेळी त्यातील कोणी तरी एक संतप्त माणूस निघतो आणि हे काय चालले आहे म्हणून विचारतो, का करता म्हणून विचारतो. लोकांना त्या संपाबद्दल काहीच माहिती नसते. ...

( यानंतर श्री. सरफरे .... यूयू 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

त्यांच्या मागण्या काय असतात? त्यांचे संप कशासाठी असतात? रेल्वे स्थानकावरील लोकांची गर्दी याला जमाव म्हणता येणार नाही. आपापल्या घरी जाण्यासाठी जमलेली ती मंडळी आहेत. रेल्वे गाडया वेळेवर येत नाहीत म्हणून त्यामधून संतापाचा उद्रेक निर्माण होऊन आंदोलन उभे रहाते. त्यामुळे त्याठिकाणी जमा झालेला हा जमाव नसतो. आपल्या कामधंद्यावर जाण्यासाठी पैसे देऊन तिकिट काढून आलेली ती मंडळी असतात. रेल्वे वहातूक विस्कळीत होणे आणि त्यामधून जमा झालेली गर्दी ही वेगवेगळया कामाच्या ठिकाणी जाणाऱ्या लोकांची असते. रेल्वे गाडया बंद पडल्यामुळे ती मंडळी संतप्त होतात. मुळामध्ये ही जनता कधीही संतप्त होत नाही. रेल्वे स्टेशनवर ते अर्धा तास, एक तास वाट पहातात. त्यानंतर आपल्याला यामधून आता हलता येणार नाही असे त्याठिकाणी वातावरण तयार होते. आणि मग त्यामधून उद्रेक निर्माण होतो. ती त्यांची संतप्त प्रतिक्रिया असते, त्यामधून तोडफोड सुरु होते. त्यामध्ये "बेकायदेशीर" काय? "बेकायदेशीर" शब्दाची व्याख्या या विधेयकामध्ये नाही. त्यांना तुम्ही बेकायदेशीर म्हणणार काय? तोडफोडीमधून वातावरण निर्माण झालेतर त्यामध्ये शासनाची चूक आहे, प्रशासनाची चूक आहे. त्याठिकाणी घडलेल्या घटनेचे पाप दुस-यावर ढकलण्याऐवजी पापी लोकांना सोडून त्या पापाचे प्रायश्चित्त सर्वसामान्य लोकांना भोगायला लावणारे हे विधेयक आहे. आणि मग आपण शासकीय राजपत्रामध्ये अधिसूचना प्रसिध्द करुन जिल्हाधिकाऱ्यांच्या माध्यमातून चौकशी करणार. या घडलेल्या घटनेच्या संदर्भात शासन कोणती चौकशी करणार आहे? चौकशीसाठी कुणाला नियुक्त करणार? याची सी.आय.डी.मार्फत चौकशी करणार काय? सी.बी.आय.मार्फत चौकशी करणार काय? एस.बी.मार्फत चौकशी करणार काय? न्यायालयीन चौकशी करणार काय? एक सदस्य चौकशी समिती नेमून चौकशी करणार काय? या चौकश्यांचे सरकारला दिलेले सर्व अहवाल आपण संपुष्टात आणता. अशाप्रकारे जमाव जमल्यानंतर त्याठिकाणी अशांत क्षेत्र म्हणून जिल्हाधिकारी घोषित करणार. काल झालेल्या अतिरेक्यांच्या हल्ल्याचे पडसाद जगभर उमटले. भारत-पाकिस्तान युध्द व्हावे म्हणून अमेरिका वाट पहात आहे. आम्ही युध्द करीत नाही म्हणून सर्वत्र प्रश्न निर्माण झाला आहे. सभापती महोदय, अतिरेक्यांनी ताजमहाल हॉटेलवर हल्ला केल्यानंतर हॉटेलच्या परिसरामध्ये कर्फ्यू होता. त्याच्या बाजूला इरॉस थिएटरजवळील लेन चालू होती. पलिकडे एक्सप्रेस टॉवरच्या परिसरात तेवढयापुरता कर्फ्यू होता, नरिमन हाऊसच्या भागामध्ये कर्फ्यू होता. हे भाग सोडून

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ MMP/ D/

श्री. दिवाकर रावते...

संपूर्ण मुंबई चालू होती. त्याला तुम्ही अशांत क्षेत्र म्हणणार काय? अशांत क्षेत्र म्हणजे नक्की काय? त्याची व्याख्या मी समजू शकलो नाही. कर्फ्यू, जमाव बंदी म्हणजे कायद्याच्या भाषेत नक्की व्याख्या काय? 4 पेक्षा जास्त लोक रस्त्यावर जमता कामा नये म्हणजे जमावबंदी असते. अशांत क्षेत्र जाहीर करीत असतांना त्याची व्याख्या या विधेयकामध्ये काय आहे? याचा नेमका अर्थ आम्ही काय समजावयाचा? हातामध्ये शस्त्रास्त्र घेऊन जातो म्हणजे अशांत क्षेत्र. मी जर काठीला लावलेला भगवा झेंडा घेऊन जात आहे, माझ्या हातामध्ये काठी आहे, काठीला झेंडा आहे किंवा माझ्या कमरेला पट्टा आहे म्हणून आपण ते अशांत क्षेत्र ठरविणार काय? आपण अशांत क्षेत्राच्या व्याख्येमध्ये, जे निर्बंध घातले आहेत त्यासंदर्भात जनतेने काय समजावयाचे? एकदा जमाव म्हटल्यानंतर त्या अशांत क्षेत्रामध्ये जायचे काय? आपण एकदा 144 कलम लावल्यानंतर लोक समजतात की, चार लोकांचा जमाव असेल आणि त्याठिकाणी पाचवा माणूस आला तर त्यांच्यावर आपण कारवाई करु शकता.

(यानंतर श्री.बरवड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

अशांत क्षेत्राची व्याख्या न देता आपण त्या वेळेला काही घडले असेल तर जिल्हाधिकारी अशांत क्षेत्र जाहीर करतील असे म्हटले आहे. असे क्षेत्र जाहीर केल्यानंतर ते पोलिसांच्या ताब्यात देणार काय ? ते कोणाच्या ताब्यात देणार ? ते कोणाच्या अधिकारात येणार ? अशांत क्षेत्र कोणत्या वेळी जाहीर करणार ? उद्या एखादा मोर्चा काढतो असे म्हटल्यानंतर आणि मोर्चा काढल्यानंतर ते अशांत क्षेत्र जाहीर केले आहे, त्या ठिकाणी जावयाचे नाही असे सांगणार काय ? याबाबत नक्की काय आहे याची व्याख्या केलेली नाही. या विधेयकामध्ये आपण जिल्हाधिकाऱ्याला बदलले. हा विचित्र बदल आहे. अशांत क्षेत्र घोषित करण्याबाबत एखादा अधिकार एका व्यक्तीकडे किंवा अधिकाऱ्याकडे देतो त्याबाबत या विधेयकामध्ये असे म्हटले आहे की, "ज्या क्षेत्रात त्यांच्या मते, असा बेकायदेशीर जमाव जमला होता ते क्षेत्र ( यात पुढे "अशांत क्षेत्र " असे संबोधण्यात आले)." सभापती महोदय, पुढे असे म्हटले आहे की, "असा बेकायदेशीर जमाव ज्या दिनांकास किंवा ज्या कालावधीत जमला असेल तो दिनांक किंवा तो कालावधी विनिर्दिष्ट करता येईल". ते कधी करणार आहात ? ते अगोदर करणार की नंतर करणार ? जमाव जमल्यावर, जमाव चालून आल्यावर, तोडफोड झाल्यावर, मोडतोड झाल्यावर करणार काय ? याबाबत नक्की काय आहे याचा खुलासा आपल्या कायद्याच्या तरतुदीमध्ये नाही. आपण नियम करणार असे सांगण्यात येईल.

सभापती महोदय, या विधेयकावर मी माझी पुढची सगळी मते मांडण्यापूर्वी मी एक बाब आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो. मी स्वत: यासाठी धावपळ करतो. आम्ही या ठिकाणी कशासाठी घाईघाईने विधेयके मांडावयाची याचे उत्तर आम्हाला मिळणे आवश्यक आहे. आजच्या 'लोकसत्ता' दैनिकामध्ये बातमी आलेली आहे परंतु त्यासंदर्भात गेले महिनाभर मी मंत्रालयामध्ये जात होतो. या सदनामध्ये एक विधेयक मंजूर झाले होते. मी एकटा त्या विधेयकाला उपसूचना देऊन बोलण्यासाठी उभा होतो. दुर्दैवाने म्हणा किंवा सुदैवाने म्हणा त्या दिवशी सगळ्यांच्या विरुध्द मी एकटा असे दृश्य होते. तत्कालीन मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमुख या ठिकाणी उपस्थित होते. त्या दिवशी कधी नव्हे ते सन्माननीय सदस्य श्री. उल्हास पवार यांनी स्वत:च्या नावाने उपसूचना मांडली. मला समजेना. मी त्या उपसूचनेच्या संदर्भात सुप्रीम कोर्टाच्या नोटिसेस कोट

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/ KGS/ D/ MMP/

श्री. दिवाकर रावते.....

केल्या. हे अत्यंत महत्वाचे विधेयक असून ते अशा पध्दतीने आणणे गैर ठरेल म्हणून ते विधेयक सन्माननीय सदस्यांच्या समितीपुढे जाऊ द्या आणि त्या समितीमध्ये त्यावर पूर्ण चर्चा होऊ द्या असे मी सांगितले होते. त्या विधेयकामध्ये ज्या त्रुटी राहिल्या त्या त्रुटीतून उद्या मुंबई शहराचा कोणताही फायदा होणार नाही, उलट नुकसानच होईल असे मी सांगितले होते. त्यावेळी अत्यंत पोटतिडिकीने प्रतिवाद करण्यासाठी सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण उभे होते. त्यावेळी सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांचा अविष्कार फार तीव्र होता. सामान्य जनता, मध्यमवर्गीय, जे हात आणि तोंडाची मिळवणी करतात ते विधिमंडळाच्या दारामध्ये न्याय मागण्यासाठी उभे असताना अनेक बिल्डर या विधिमंडळमध्ये हे विधेयक पास होऊ नये म्हणून 25-25 लाख रुपये घेऊन फिरत आहेत असे सन्माननीय सदस्यांनी सांगितले. त्या विधेयकाच्या विरोधात उपसूचना देऊन मी एकटा उभा होतो. त्यावेळी सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण हे माझ्यावर आरोप करीत आहेत की काय असे मला वाटले. परंतु नंतर त्यांनी सांगितले की, मी आपल्याबद्दल असे बोलणे शक्य नाही, परंतु ही वस्तुस्थिती आहे वगैरे त्यांनी सांगितले. मी त्या विधेयकावर बोलत असताना असे म्हणालो होतो की, विधेयक येणे आवश्यक होते असे माझे मत होते परंतु महसूल विभागाचा जो अधिकार आहे तो सहकार विभागाला देण्यास काढला होता. मी सांगितले की, सहकार खात्याला अधिकार देऊ नका. कारण एखाद्या मालमत्तेचे निर्धारित मूल्य किंवा शुल्क ठरविणे, स्टॅम्प ड्युटी ठरविणे हा महसूल विभागाचा अधिकार होता. त्यावेळी माननीय मुख्यमंत्र्यांनी स्वत: उभे राहून भाषण केले. माननीय मुख्यमंत्री स्वत: सर्वसामान्य जनतेकरिता सभागृहामध्ये आलेले आहेत असे वाटावे या पध्दतीने सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांच्या डोळ्यात आनंदाश्रू येण्याचे बाकी होते. ती सकाळी 11.00-12.00 वाजताची वेळ होती. विधेयकावर चर्चा चालू होती. त्यावेळचे ते दृश्य मला आठवते. त्यावेळी माननीय उपसभापती हे पीठासीन अधिकारी म्हणून बसलेले होते. सगळे बोलून झाल्यानंतर ती उपसूचना मला मांडावयास लावली.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

त्याबाबत दबाव नसेल, पण तत्कालीन माननीय मुख्यमंत्र्यांनी प्रतिष्ठा पणाला लावून ते विधेयक मंजूर करुन घेतले. आम्हाला वाटले होते की, हा कायदा लवकर अंमलात येईल. ते विधेयक मार्च महिन्यातील अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये मंजूर झाले होते. त्या विधेयकावर दिनांक 2.2.2008 रोजी माननीय राष्ट्रपतींची सही झालेली आहे. जुन्या इमारतींना कव्हेयंस मिळावा अशी अपेक्षा आहे. मी यासंदर्भात सहकार विभागाकडे चौकशी केली असता हे विधेयक आमच्या विभागाकडे का पाठविले ते आम्हाला माहीत नाही असे समजले. त्यानंतर मी मंत्रालयामध्ये गेलो. माझे मंत्रालयामध्ये कधीच काम नसते. परंतु या कामासाठी मी मंत्रालयात गेल्यावर गृह विभागाच्या सचिवांना भेटलो, सहकार विभागाच्या सचिवांना भेटलो, महसूल विभागाच्या सचिवांना भेटलो. त्यांनी मला असे सांगितले की, आमच्या विभागाचे हे विधेयक मंजूर होऊन आलेले आहे. राष्ट्रपतींची त्यावर सही झालेली आहे. त्यावेळी मे महिना सुरु होता. सभापती महोदय, एखादे विधेयक मंजूर झाल्यानंतर 1 महिन्याच्या आत त्याचे नियम तयार केले पाहिजेत असे सरकारवर वैधानिक बंधन आहे. मी त्या विधेयकावरील चर्चेत भाग घेतला होता. त्यावेळी तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी असे उत्तर दिले होते की, रावतेसाहेब आपण ज्या काही सूचना केल्या आहेत त्या सूचनांचा नियमात समाविष्ट केला जाईल. मंत्रिमहोदयांना मला सांगावयाचे आहे की, हे विधिमंडळ आहे. येथे घटनेतील तरतुदीनुसार कामकाज चालते, नियमाप्रमाणे कामकाज चालते. परंतु या विधेयकाबाबत अजून विधिमंडळाच्या सचिवांच्या कार्यालयाने विभागाला नोटीस का काढलेली नाही ते समजत नाही. चारही बाजूने कमकुवत परिस्थिती निर्माण होते तेव्हा कायदा खिळखिळा होतो. तशीच परिस्थिती निर्माण झालेली आहे. त्या संदर्भात एक महिन्यामध्ये नियम समितीपुढे नियम आले नाहीत हा हक्कभंग होतो. या विधेयकाला 2 वर्षे झालेली आहेत. त्या विधेयकावर राष्ट्रपतींची सही झाली आहे. हा कायदा थांबवून ठेवण्याची आवश्यकता नव्हती. आजही ते नियम तयार नाहीत. मी याबाबत चार वेळा चकरा मारल्या आहेत. त्या विधेयकावर बोलण्याचा उद्देश एवढाच होता की, मुंबईमधील सहकारी गृहनिर्माण संस्था आहेत त्या इमारतींच्या जागेची मालकी मूळ मालकांकडेच आहे. त्या जागांची मालकी गृहनिर्माण सहकारी संस्थांना

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

मिळावी. अनेक जमिनीचे मूळ मालक सहकारी संस्थांना कन्हेयन्स करुन देत नाहीत. त्यामुळे ती मालमत्ता सहकारी संस्थांच्या नावावर होत नाही. या गोष्टीकडे शासनाने लक्ष घातले पाहिजे. शासनाने आमच्या छाताडावर बसून ज्या पध्दतीने विधेयक पारित केले आणि आज 2 वर्षे झाल्यानंतरही तो कायदा अस्तित्वात आलेला नाही. ही जबाबदारी कोणाची आहे ? आमच्यासमोर घाईघाईने विधेयके आणली जातात त्यावेळी असे मुद्दे समोर येतात. आयत्या वेळी विधेयके आमच्यासमोर आणली जातात, तातडीने मंजूर करुन घेतली जातात. आम्हाला ज्या उपसूचना करावयाच्या असतात त्यासाठी वेळ दिला जात नाही, या विधेयकाला उपसूचना द्यावयाचे म्हटले तरी ती सोमवारी चर्चेला येईल. म्हणजे उपसूचना देण्यासाठी बराच खटाटोप करुनही उपयोग होणार नाही. म्हणून मी म्हणतो की, विधेयक मंजूर करण्यासाठी जेवढी घाई केली जाते तेवढी घाई कायदा अंमलात आणण्यासाठी का घाई केली जात नाही ? त्यामुळे त्या विधेयकाबाबत माझा हक्क भंगाचा प्रस्ताव दाखल करण्याचा माझा हक्क मी अबाधित ठेवत आहे. यानंतर मी विधेयकावर बोलणार आहे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, या विधेयकावर, उपसूचनेवर आणि विधेयकाच्या उद्देश व कारणांबाबत विरोधी पक्षातील जवळजवळ सर्वच सन्माननीय सदस्यांना बोलावयाचे आहे. परंतु विधानसभेने मंजूर केलेली 5-6 विधेयके या सभागृहासमोर आलेली आहेत. आज अनेक सन्माननीय सदस्यांना घरी जाण्याची घाई आहे. त्यामुळे सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांचे या विधेयकावरील भाषण अपूर्ण ठेवावे अशी माझी सूचना आहे.

**तालिका सभापती ( श्री.भास्कर जाधव )** : सध्या सुरु असलेल्या विधेयकावरील चर्चा तरी पूर्ण होऊ द्यावी.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, आमची उशिरा बसण्याची तयारी आहे.

**तालिका सभापती** : विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांचे नेहमीच शासनाला सहकार्य मिळत असते. आपल्या सर्वांच्या सहकार्यानेच पुढील विधेयके मंजूर करावयाची आहेत.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, मुंबई महानगरपालिकेतील उपकरासंबंधीचे विधेयक आहे, मुंबईचा चेहरामोहरा बदलण्याबाबतचे दुसरे विधेयक आहे.

यानंतर श्री.शिगम....

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KTG/ KGS/ पूर्वी श्री. खंदारे 15:05

डॉ. दीपक सावंत..

वैधानिक अधिकार काढून ते कार्यकारी अधिका-यांना देणारे, कलेक्टरला देणारे विधेयक आहे. महापौरांचे अधिकार काढून घेणारे विधेयक आहे. आज ही सर्व विधेयके संमत होऊ शकणार नाहीत एवढेच मला सांगावयाचे आहे.

**तालिका सभापती** : माझी सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, त्यांनी सर्वच विधेयकांवर बोलू नये.

डॉ. दीपक सावंत : तालिका सभापती महोदय, आपण घटनेने दिलेल्या अधिकारावर गदा आणत आहात. विधेयकावर बोलण्याचा सन्माननीय सदस्यांचा हक्क आहे. राजकीय आंदोलन करु नये अशा प्रकारचे विधेयक येथे आणलेले आहे. तालिका सभापती महोदय, आपण आपल्या काळात किती तरी राजकीय आंदोलने केलेली आहेत. विधेयकावर प्रत्येक सन्माननीय सदस्यांना बोलण्याचा अधिकार आहे.

**तालिका सभापती** : विधेयकावर बोलण्याच्या संदर्भात मी कोणत्याही सन्माननीय सदस्यांना रोखू शकणार नाही. माझी विनंती एवढीच आहे की, आपण सर्व जाणकार आणि अनुभवी सदस्य आहात. एकाच विधेयकावर सर्व सदस्यांनी बोलण्यापेक्षा वेगवेगळया विधेयकावर वेगवेगळया सदस्यांनी बोलावे.

डॉ.दीपक सावंत : आम्ही मुद्यांची पुनरावृत्ती करणार नाही.

श्री. मधुकर चव्हाण : विधानपरिषदेमध्ये कायद्याचा सर्वंकष विचार व्हावा या उद्देशाने दोन सभागृहे करण्यात आलेली आहेत. वेळ कमी मिळतो तसेच मुद्यांची पुनरावृत्ती होऊ नये हे मी समजू शकतो. चर्चेतून नवनीत निघते आणि त्यातून कायदा तयार होतो. परंतु आमचे कधी कोणी ऐकत नाही. निदान येथे रेकॉर्डवर तरी येते. काही विधेयके अशी आहेत की आयुक्तांना, जिल्हाधिका-यांना अधिकार दिलेले आहेत. नगरपारिषदेच्या, महापालिकेच्या महापौरांचे सर्व अधिकार काढून घेतलेले आहेत. आंदोलन करण्याचा मूलभूत अधिकाराच्या संदर्भात विधेयक आणलेले आहे. या विधेयकांच्या संदर्भात सन्माननीय मंत्री महोदयांबरोबर चर्चा झालेली आहे.

**तालिका सभापती** : आदरणीय सभापती आणि मंत्री यांच्या बरोबर आपली काही चर्चा झालेली असेल तर त्याबाबतीत विरोध असण्याचे कारण नाही.

..2..

श्री. अरुण गुजराथी : तालिका सभापती महोदय, मी माननीय मंत्री महोदयांच्या एक बाब निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, कलम 51 (2)मध्ये "... तीन टक्क्या पेक्षा अधिक नसेल इतकी जादा रक्कम (यात यापुढे ज्याचा निर्देश "नगरपालिका वसुली खर्च" असा करण्यात आला आहे)". ही मराठीमध्ये दिलेली सुधारणा इंग्रजीमध्ये सापडत नाही. म्हणजे मराठीमध्ये जो भाग दिलेला आहे तो इंग्रजीमध्ये नाही. याबाबतीत माननीय मंत्री महोदयांनी खुलासा करावा. दुसरी बाब अशी आहे की, अशांत क्षेत्र आणि बेकायदेशीर जमाव यासंबंधीची व्याख्या कलम 2मध्ये सापडत नाही. सीआरपीसीमध्ये या व्याख्या असतील असे मी गृहीत धरतो. पण या व्याख्या याठिकाणी सापडत नाहीत. Section 2 is always for definition and Section 5 is always for exemption. तेव्हा अशांत क्षेत्र आणि बेकायदेशीर जमाव या संबंधी माहिती मिळाली तर या विधेयकावर बोलता येईल.

....नंतर श्री. गिते....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ KGS/ KTG/ प्रथम श्री.शिगम 15:10

श्री. अरुण गुजराथी...

मराठीतील कलम 4 मध्ये म्हटले आहे की, "नगरपालिकेला 3 टक्के वसुली खर्च" याचा उल्लेख इंग्रजी विधेयकात मला आढळून येत नाही. यात कदाचित माझी देखील चूक असे शकेल. यासंबंधीचा खुलासा माननीय मंत्री महोदयांनी सभागृहाला करुन द्यावा अशी माझी विनंती आहे.

**तालिका सभापती** (श्री.भास्कर जाधव ) : माननीय मंत्री महोदय माहिती घेत आहेत. तोपर्यंत संसदीय कार्य मंत्र्यांचे काय म्हणणे आहे ते सभागृहाने ऐकून घ्यावे.

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, सभागृहात गृह विभागाचे विधेयकावर चर्चा सुरु झाली आहे. या विधेयकावर सन्माननीय सदस्य श्री. रावते बोलता आहेत. या विधेयकाच्या अनुषंगाने सन्माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी यांनी उपस्थित केला आहे. या संदर्भातील निर्णय आपण नंतर करावा. आजच्या कार्यक्रमपत्रिकेत विधेयक दाखविण्यात आलेली आहेत, त्यात दोन विधेयके महत्वाची आहेत ती अतिशय लहान विधेयके आहेत. सन 2008 चे वि.स.वि.क्रमांक 59- तुळजापूर विकास प्राधिकरण विधेयक हे एक विधेयक आहे आणि दुसरे सन 2008 चे वि.स.वि.क्रमांक 61-मुंबई ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) विधेयक. गृह विभागाचे विधेयकांवर जे सन्माननीय सदस्य बोलत आहेत,त्यांना तसेच ऑन लेग ठेवून ही दोन विधेयके प्रथम चर्चेस घ्यावीत अशी माझी विनंती आहे.

डॉ.दीपक सावंत : या दोन्ही विधेयकांची उद्दिष्टे व कारणे माननीय मंत्र्यांनी प्रथम सांगावीत. त्यानंतर आम्ही या दोन्ही विधेयकांना मंजुरी देऊ. सभापती महोदय, ही विधेयके अगोदर धेण्यात यावीत यासंबंधी आपण सभागृहाची मान्यता घ्यावी.

**तालिका सभापती** : माननीय मंत्री महोदय, सदर विधेयकांची उद्दिष्टे व कारणे सांगण्याची आपली तयारी आहे काय ?

श्री.सिध्दाराम म्हत्रे : उद्दिष्टे व कारणे सांगण्याची आमची तयारी आहे.

**तालिका सभापती** : सदरची दोन्ही विधेयके प्रथम चर्चेला घेण्यास सभागृहाची मान्यता आहे काय ?

( अनेक सन्माननीय सदस्य "होय" असे म्हणतात.)

**तालिका सभापती** : वि.स.वि.क्र.57 वरील चर्चा आपण येथेच थांबवू या.आता प्रथम विधेयक क्रमांक 61 चर्चेला घेण्यात येईल. सन्माननीय मंत्र्यांनी आपले विधेयक मांडावे.

----------

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: मुंबई ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) विधेयक.

L.A. BILL NO. LXI OF 2008.

(A BILL FURTHER TO AMEND THE BOMBAY VILLAGE PANCHAYATS ACT, 1958 AND THE MAHARASHTRA ZILLA PARISHADS AND PANCHAYAT SAMITIS ACT, 1961.)

श्री. सिध्दाराम म्हेत्रे ( ग्रामविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विधानसभेने संमत केल्याप्रमाणे सन 2008 चे वि.स.वि.क्रमांक 61 मुंबई ग्रामपंचायत अधिनियम,1958 आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम,1961यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडतो.

**तालिका सभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री.सिध्दाराम म्हत्रे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2008 चे वि.स.वि.क्रमांक 61 मुंबई ग्रामपंचायत अधिनियम,1958 आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम,1961यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

सभापती महोदय, ग्रामपंचायत,पंचायत समिती व जिल्हा परिषदांच्या निवडणुकीच्या संदर्भामध्ये ज्या प्रवर्गासाठी जागा राखीव असतील किंवा आरक्षित असतील, त्या प्रवर्गात जे उमेदवार इच्छूक असतात, त्यांनी नामनिर्देशनपत्रे भरताना जात पडताळणी समितीचे जात वैधता प्रमाणपत्र असल्याशिवाय त्यांना नामनिर्देशनपत्रे भरता येणार नाही अशा प्रकारची तरतूद मागच्या वेळी कायद्यात केली होती. परंतु त्यासंदर्भात लोकांनी तक्रारी केल्या की, आम्हाला जात पडताळणी वैधता प्रमाणपत्र तात्काळ मिळत नाही. त्यामुळे यासंदर्भातील मुदत तीन महिन्यांनी वाढवून द्यावी. ही मुदतवाढ 2006 मध्ये देण्यात आली होती. त्यानंतर 2007 मध्ये चार महिन्यांची मुदत वाढवून देण्यात आली होती. अशी परिस्थिती असताना सुध्दा जिल्हा परिषदेच्या 28 आणि ग्रामपंचायतीच्या 28 निवडणुका घ्याव्या लागल्या. या प्रकरणी हायकोर्टात केस दाखल करण्यात आली होती. त्या

3...



ABG/ KGS/ KTG/ प्रथम श्री.शिगम 15:10

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सिध्दाराम म्हत्रे...

केसच्या अनुषंगाने माननीय उच्च न्यायालयाने राज्य शासनाला असे सांगितले की, यासंदर्भात काही तरी निर्णय घ्यावा. आता नवीन विधेयकाप्रमाणे आरक्षित असलेल्या जागांवर निवडणकीसाठी इच्छूक असलेल्या उमेदवारांनी नामनिर्देशन पत्रे भरताना जात पडताळणी वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. जात पडताळणी वैधता प्रमाणपत्र असल्याशिवाय आरक्षित असलेल्या जागांवर इच्छूक उमेवारांचे नामनिर्देशन पत्रे स्वीकारले जाणार नाहीत. या तरतुदीमध्ये भविष्यात राखीव जागा रिक्त होणार नाहीत, पर्यायाने पोटनिवडणूक घेण्याची वेळ शासनावर येणार नाही. वारंवार पोट निवडणुकींसाठी खर्च होणार नाही. ही एक लहानशी तरतूद या विधेयकाच्या अनुषंगाने सभागृहासमोर आणलेली आहे. मी सभागृहाला विनंती करतो की, सन 2008 चे वि.स.वि.क्रमांक 61 मंजूर करावे.

प्रश्न प्रस्तुत झाला.

4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, या विधेयकाच्या अनुषंगाने मी एकच सूचना करणार आहे. महाराष्ट्रात जात पडताळणी समित्या कार्यरत आहेत. त्या समितींना पुरेसा कर्मचारीवर्ग नसल्यामुळे जात पडताळणीची कामे वेळेवर होत नाहीत. म्हणून जात पडताळणी समिती कार्यालयास मोठया प्रमाणात कर्मचारीवर्ग उपलब्ध करुन देण्यात यावा अशा प्रकारची सूचना करतो आणि माझे या विधेयकावरील मनोगत पूर्ण करतो.

----------

5...

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अनिल परब ( महाराष्ट्र विधानसभा सदस्यांव्दारा निर्वाचित ) : सभापती महोदय, या विधेयकाच्या अनुषंगाने मी देखील एकच सूचना करु इच्छितो. महापौरांच्या निवडणुकींच्या अनुषंगाने अशा प्रकारचे विधेयक सभागृहात आले होते, त्यावेळी ही तरतूद केली होती. निवडणुकीला इच्छूक असलेल्या उमेदवारांना आम्ही इच्छूक आहोत असा अर्ज दिल्यानंतर त्यांना जात पडताळणी समितीकडून जात वैधता प्रमाणपत्रे दिली जात नाहीत. इच्छूक असलेल्या उमेदवारांना देखील तातडीने जात पडताळणी समितीकडून वैधता प्रमाणपत्र उपलब्ध करुन देण्यात यावेत. निवडणुकीसांठी, शिक्षणासाठी आणि शासकीय नोकरी अशा तीनच कारणांसाठी जात पडताळणी समितीकडून वैधता प्रमाणपत्र तातडीने दिले जाते. परंतु कोणी इच्छूक असेल त्या व्यक्तींना जात पडतळणी वैधता प्रमाणपत्र दिले जात नाही. इच्छूक असेल अशा लोकांना देखील जात वैधता प्रमाणपत्र तातडीने उपलब्ध करुन देण्यासंबंधी आपण प्रत्येक जात पडताळणी समितीला सूचना द्याव्यात अशी माझी माननीय मंत्री महोदयांना विनंती आहे.

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** (श्री.भास्कर जाधव) : महत्वाचा मुद्दा आहे. अन्य वेळेला कोणाला जात पडताळणी प्रमाणपत्र हवे असेल तर दिले जात नाही. कारण नमूद करावे लागते.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सूचनेची नोंद घेतली आहे. सुधारणेसह विधेयक सभागृहाने मान्य करावे अशी मी विनंती करतो.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, हा कायदा या सभागृहाने यापूर्वी मंजूर केला होता. परंतु आयत्या वेळेला सत्ताधारी पक्षाला तो सोयीस्कर नसल्यामुळे निवडणुकांच्या आदल्या दिवशी तो बदलण्यात आला याची अनेकांना माहिती नाही. शासनाकडून असे आश्वासन हवे आहे की, निवडणुकांच्या काळात पुन्हा कायदा बदलणार नाही. अन्यथा आम्ही कायदा मंजूर करायचा आणि निवडणुका आल्या की वटहुकूम काढून तो रद्द करायचा, याची पुनरावृत्ती होऊ नये.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सन्माननीय सदस्यांनी सांगितले ते खरे आहे. नगरपालिकांच्या निवडणुका चालू होत्या त्या काळात काही लोकांनी उच्च न्यायालयात धाव घेतली होती. उच्च न्यायालयाने निर्देश दिले होते. त्यानुसार जात पडताळणी प्रमाणपत्रासाठी 3 महिने मुदत देण्यात आली होती. पुढे आणखी चार महिन्यांची मुदत दिली होती. आता जात पडताळणी प्रमाणपत्र सादर केल्याशिवाय नामनिर्देशन पत्र स्वीकारले जाणार नाही.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 8 (दोन्ही सम्मिलित) विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : मी आपल्या अनुमतीने सन 2008 चे वि.स.वि.क्रमांक-61 संमत करण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभापती** : सन 2008 चे वि.स.वि.क्रमांक-61 संमत झाले आहे.

-----





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>विधेयकांच्या कामकाजासंबंधी</u>**

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, नगरविकास विभागाशी संबंधित जवळजवळ 8 विधेयके आहेत. त्यापैकी 6 विधेयके विधानसभेत मंजूर झाली आहेत.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मी मंत्रीमहोदयांना नम्रपणे विचारु इच्छितो की, शासनाला आम्ही फेरीवाले वाटतो का? खालच्या सभागृहात विधेयके मंजूर झाली. परंतु आमचा थोडातरी सन्मान राखणार की नाही? आम्हाला पालापाचोळा समजता का?

श्री.मधुकर चव्हाण : संसदीय कार्यमंत्र्यांनी काही वेळापूर्वी सभागृहात भूमिका मांडली की, कामकाज पत्रिकेतील वि.स.वि.क्रमांक-61 व वि.स.वि.क्रमांक-59 ही दोन छोटी विधेयके मंजूर करण्यास सहकार्य करावे, त्याप्रमाणे आम्ही सहकार्य करीत आहोत. परंतु इतर विधेयके ही धोरणात्मक आहेत. महानगरपालिकेचे अधिकार संकुचित करणारी आहेत. आम्ही काही विधेयकांबाबत सुधारणा दिल्या आहेत.

श्री.हसन मुश्रीफ : एक विधेयक प्रॉपर्टी टॅक्ससंबंधीचे आहे.

डॉ.दीपक सावंत : आम्हाला त्या विधेयकावर आमची मते मांडावयाची आहेत.

श्री.दिवाकर रावते : हे विधेयक संयुक्त चिकित्सा समितीकडे होते. या विधेयकासंबंधी मी संयुक्त चिकित्सा समितीमध्ये माझी डिसेंट नोट दिलेली आहे. परंतु याठिकाणी विधेयकाची प्रत वितरित केली त्यामध्ये डिसेंट नोटचा कुठेही उल्लेख झालेला दिसत नाही. उद्देश नमूद केलेला नाही?

(नंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .......

एखादे विधेयक सभागृहात मांडता परंतु त्याच्या प्रती देखील आम्हाला देत नाहीत. कायदा तयार करतो परंतु कायदा करणाऱ्या सदस्यांना विधेयकाची कॉपी सुध्दा मिळत नाही, हे योग्य नाही. ही बाब मी सकाळी सचिवांच्या निदर्शनास आणून दिली होती. असे प्रकार आम्ही स्वीकारणार नाही. त्यात माझी डिसेंट नोट आहे ती देखील दिसत नाही, असे बिल आम्ही स्वीकारणार नाही.

**तालिका सभापती (श्री.भास्कर जाधव)** : सन्माननीय सदस्यांनी प्रथम माननीय मंत्री महोदयांचे म्हणणे तरी ऐकून घ्यावे.

श्री. हसन मुश्रीफ : महोदय,.......

श्री. दिवाकर रावते : अशाच प्रकारे मुंबईची वाट लावायला निघाला आहात परंतु रणकंदन झाले तरी आम्ही आपल्याला तसे करु देणार नाही. सरकार आमचे काही ऐकून घेणार की नाही ? अशा प्रकारे करुन कसे चालणार आहे ?

श्री. हसन मुश्रीफ : महोदय, हे विधेयक जवळपास दोन वर्षापर्यंत संयुक्त समितीसमोर होते आणि दोन वर्षानंतर त्या समितीचा अहवाल आलेला आहे. जोपर्यंत हे विधेयक सभागृहात पास होणार नाही तोपर्यंत जेएनयुआरएमचे पैसे मुंबईला मिळणार नाहीत......

श्री. मधुकर चव्हाण : माननीय मंत्री महोदय सभागृहाची दिशाभूल करीत आहेत. कारण पश्चिम बंगाल सरकारने काहीच केले नाही तरी देखील त्यांना जेएनयुआरएमचे लाखो रुपये मिळाले, दक्षिण भारतातील राज्यांनी काहीच न करता त्यांनाही त्या योजनेचे पैसे मिळाले आहेत. अशा प्रकारे घाईघाईने विधेयक पास करणे योग्य नाही. कारण मुंबईत राहणाऱ्या सामान्य माणसाच्या जीवन मरणाचा हा प्रश्न आहे. त्याच्या घराचे भाडे या विधेयकामुळे 6000 रुपयापर्यंत आपण वाढविणार आहात....

श्री. हसन मुश्रीफ : सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण, सन्माननीय श्री. दिवाकर रावते यांच्याबरोबर मी आजच बसून चर्चा करतो आणि नंतर हे विधेयक सभागृहात चर्चेला आणू.

श्री. मधुकर चव्हाण : या विधेयकावर सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांचे असहमती असलेले पत्र आहे, तसेच जो अहवाल अंतिमरित्या मान्य केला होता त्यातील काही शब्द आलेले नाहीत. तसेच या विधेयकावर सर्वंकष चर्चा होणेही आवश्यक आहे.

....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** : माननीय मंत्री महोदयांनी आपल्याला विनंती केली की चर्चा करुनच ते विधेयक मंजुरीसाठी आणणार आहेत.

श्री. हसन मुश्रीफ : माझी खात्री आहे की, मी सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते आणि सन्माननीय श्री. मधुकर चव्हाण यांच्याबरोबर चर्चा केल्यानंतर त्यांचे समाधान होईल, ते मी करु शकतो.

श्री. दिवाकर रावते : ठीक आहे, आमची हरकत नाही.

श्री. हसन मुश्रीफ : मी आता निदान तुळजापूर देवस्थानासंबंधीचे विधेयक सभागृहात मांडू शकतो काय ?

श्री. मधुकर चव्हाण : अजून त्या विधेयकाच्या प्रतीच आलेल्या नाहीत.

श्री. हसन मुश्रीफ : सर्व विधेयकाच्या प्रती सर्क्युलेट केलेल्या आहेत.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते आपण विधेयक क्र. 57 च्या संदर्भात विचार मांडत होता, ती चर्चा आपण सुरु करावी.

डॉ. दीपक सावंत : महोदय, अशा प्रकारे "ब्रेक के बाद" आपल्याला करता येणार नाही. अशी परवानगी देणे योग्य नाही.

**तालिका सभापती** : सभागृहाचा डेकोरम कुठेही डिस्टर्ब झालेला नाही, कारण आपण सभागृहात नंतर आलात.....

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, विधेयकाच्या संदर्भात संसदीय कामकाज मंत्र्यांबरोबर आमची चर्चा झाली असून दोन विधेयके संमत करण्याचे ठरले आहे.

**तालिका सभापती** : आता अशासकीय कामकाज घ्यावयाचे नाही असेही ठरले आहे काय ?

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, आज अशासकीय कामकाज घेतले जाणार आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, तुळजा भवानी मातेच्या संदर्भातील जे विधेयक आहे ते विधेयक येथे येईपर्यंत सभागृहाचे कामकाज आपण स्थगित करावे अशी विनंती आहे.

( सन 2008 चे विधानसभा विधेयक क्रमांक 59 हे विधेयक डिस्ट्रीब्यूट करण्यात आले.)

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, तुळजापूरच्या संदर्भात या ठिकाणी जे विधेयक आम्हाला देण्यात आलेले आहे त्या विधेयकाच्या सुरुवातीला इंग्रजीपासून सुरुवात करण्यात आली आहे व मधील सर्व भाग मराठीतून आहे. तसेच विधेयकातील काही पाने कोरी आहेत. तुळजापूरच्या भवानी मातेच्या विधेयकाच्या संदर्भात जर आपण अशा प्रकारे घाई करणार असाल तर आपल्याला भवानी माता कशी काय पावणार?

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मला तुळजापूरच्या संदर्भात जे विधेयक आम्हाला देण्यात आले त्याची सुरुवात मराठीतून आहे व नंतरचा उल्लेख इंग्रजीमधून आहे. आपण हे विधेयक मंजूर करण्यासाठी का घाई करीत आहात ते आम्हाला समजत नाही. या ठिकाणी आपण विधेयकाची गंमत करीत आहात असे आम्हाला वाटते.

**तालिका सभापती** : माझ्याकडे जे बिल आहे ते बरोबर आहे असे मला वाटते. ठीक आहे आता सन्माननीय मंत्री श्री. हसन मुश्रीफ साहेबांनी विधेयक क्रमांक 59 ला सुरुवात करावी असे मला वाटते.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGJ/ KTG/ D/ KGS/

**पृ. शी.** : तुळजापूर विकास प्राधिकरण विधेयक.

L.A. BILL NO. LIX OF 2008.

( A BILL TO PROVIDE FOR ESTABLISHMENT OF THE TULJAPUR DEVELOPMENT AUTHORITY; FOR PREPARING PLAN FOR THE TULJAPUR DEVELOPMENT AREA; FOR ENSURING TIMELY IMPLEMENTATION OF VARIOUS DEVELOPMENT WORKS IN THE SAID AREA AS PER THE SAID PLAN AND FOR THAT PURPOSE TO ENSURE CO-ORDINATION BETWEEN THE CONCERNED GOVERNMENT AND SEMI-GOVERNMENT AGENCIES, GIVING DIRECTIONS FOR PREPARING PLANS AND ESTIMATES OF THE WORK CONTAINED IN THE SAID PLAN, TO GRANT ADMINISTRATIVE APPROVAL TO THE PROPOSALS OF THE DEVELOPMENT WORKS AND PLANS AND ESTIMATES, TO GIVE APPROVAL TO THE TENDERS FOR WORKS INVITED BY THE CONCERNED GOVERNMENT AND SEMI-GOVERNMENT AGENCIES; TO RELEASE GOVERNMENT GRANTS TO THE CONCERNED AGENCIES AFTER APPROVAL OF TENDERS AND TO MONITOR IMPLEMENTATION OF DEVELOPMENT WORKS BY THE CONCERNED GOVERNMENT AND SEMI-GOVERNMENT AGENCIES; AND FOR THE MATTERS CONNECTED THEREWITH OR INCIDENTAL THERETO.)

श्री. हसन मुश्रीफ ( नगरविकास राज्य मंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विधानसभेने संमत केल्याप्रमाणे सन 2008 चे वि. स. वि. क्रमांक-59, तुळजापूर विकास क्षेत्रांसाठी योजना तयार करणे, उक्त योजने अनुसार उक्त क्षेत्रात करावयाच्या विविध विकासविषयक कामांची वेळेत अंमलबजावणी करणे आणि त्या प्रयोजनासाठी संबंधित शासकीय व निम-शासकीय अभिकरणांदरम्यान समन्वय राखणे, त्यासाठी उक्त योजनेमध्ये अंतर्भूत असलेल्या कामांचे नकाशे व अंदाज तयार करण्यासाठी निदेश देणे, विकासविषयक कामांचे प्रस्ताव आणि नकाशे व अंदाज यांना प्रशासकीय मान्याता देणे, संबंधित शासकीय व निम शासकीय अभिकरणांनी या कामासाठी मागवलेल्या निविदांना मान्यता देणे, निविदांच्या मान्यतेनंतर संबंधित अभिकरणांना शासकीय अनुदान देणे व संबंधित शासकीय व निम-शासकीय अभिकरणाद्वारे करण्यात येणा-या

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हसन मुश्रीफ ........

विकासविषयक कामांच्या अंमलबजावणीचे संनियंत्रण करणे इत्यादी कामांकरिता तुळजापूर विकास प्राधिकरणाची स्थापना करण्यासाठी आणि तत्संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता विधेयक मांडतो.

**तालिका सभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री.हसन मुश्रीफ : अध्यक्ष महोदय, सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2008 चे वि. स. वि. क्रमांक-59, तुळजापूर विकास क्षेत्रांसाठी योजना तयार करणे, उक्त योजने अनुसार उक्त क्षेत्रात करावयाच्या विविध विकासविषयक कामांची वेळेत अंमलबजावणी करणे आणि त्या प्रयोजनासाठी संबंधित शासकीय व निम-शासकीय अभिकरणांदरम्याने समन्वय राखणे, त्यासाठी उक्त योजनेमध्ये अंतर्भूत असलेल्या कामांचे नकाशे व अंदाज तयार करण्यासाठी निदेश देणे, विकासविषयक कामांचे प्रस्ताव आणि नकाशे व अंदाज यांना प्रशासकीय मान्याता देणे, संबंधित शासकीय व निम शासकीय अभिकरणांनी या कामासाठी मागवलेल्या निविदांना मान्यता देणे, निविदांच्या मान्यतेनंतर संबंधित अभिकरणांना शासकीय अनुदान देणे व संबंधित शासकीय व निम-शासकीय अभिकरणाद्वारे करण्यात येणा-या विकासविषयक कामांच्या अंमलबजावणीचे संनियंत्रण करणे इत्यादी कामांकरिता तुळजापूर विकास प्राधिकरणाची स्थापना करण्यासाठी आणि तत्संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

महोदय, हे विधेयक सभागृहात मांडत असताना थोडक्यात पार्श्वभूमी सांगण्याचा मी प्रयत्न करणार आहे. ती म्हणजे श्री क्षेत्र तुळजापूर मंदिर हे ऊस्मानाबाद जिल्हयात असून तुळजापूरची भवानी माता संपूर्ण महाराष्ट्राची कुलस्वामिनी आहे. माझ्या सारख्या अल्पसंख्याक माणसाला तुळजापूरच्या भवानी मातेचे विधेयक मांडण्याची संधी मिळाल्यामुळे मी स्वत:ला फार भाग्यवान समजतो. तुळजापूर मंदिर आणि त्याच्या परिसरातील 5 कि.मी. अंतराचा विकास करण्यासाठी शासन प्राधिकरण स्थापन करीत आहे.

यानंतर श्री. गायकवाड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ D/ KGS/ KTG/ प्रथम श्री.जुन्नरे 15.30

श्री.हसन मुश्रीफ ....

हे प्राधिकरण शासन स्थापन करणार असून या प्राधिकरणाने स्वत:चा आराखडा तयार करावयाचा आहे. त्याला प्रशासकीय मंजुरी देण्याचे अधिकार सुध्दा त्यांनाच देण्यात आलेले आहेत. ज्या खात्या अंतर्गत ही विकास कामे केली जाणार आहेत त्यांच्याकडूनच ही कामे करुन घ्यावयाची आहेत. निविदा काढणे, वर्क ऑर्डर देणे , देखरेख् करणे ही कामे करण्याची जबाबदारी प्राधिकरणाची आहे. जिल्हाधिकारी उस्मानाबाद हे या प्राधिकरणाचे अध्यक्ष राहणार आहेत. सबंधित क्षेत्रातील विधान सभा सदस्य , तुळजापूर नगरपालिकेचा अध्यक्ष, राज्य शासनाने नामनिर्देशित करावयाच्या दोन नामंकित व्यक्ती, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद, पोलीस अधीक्षक, उस्मानाबाद, अधीक्षक अभियता सार्वजनिक बांधकाम विभाग, उस्मानाबाद, अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्यादित, उस्मानाबाद, तसेच जिल्हा शल्यचिकित्सक उस्मानाबाद, कार्यकारही अभियंता, जीवन प्राधिकरण, उस्मासनाबाद , नगर रचनाकारक , उस्मानाबाद, जिल्हा प्रकल्प अधिकारी (नगर विकास) जिल्हाधिकारी कार्यालय, उस्मानाबाद, मुख्याधिकारी, तुळजापूर नगरपरिषद हे सदस्य राहणार असून जिल्हा नियोजन अधिकारी, उस्मानाबाद हे सदस्य सचिव राहणार आहेत.

सभापती महोदय, जवळजवळ 322 कोटी रुपये खर्च करुन तुळजापूर येथील मंदिराच्या परिसराचा विकास तीन टप्यात केला जाणार आहे त्यासाठी पाच कोटी रुपयांची पूरक मागणी मंजूर करण्यात आली असून राहिलेले 75 कोटी रुपये मार्च महिन्यात होणाऱ्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात दिले जाणार आहेत. अशा प्रकारे या परिसराचा तीन टप्यात विकास केला जाणार असून अशा प्रकारचे प्राधिकरण पहिल्यांदाच स्थापन करुन शासनाकडून 100 टक्के निधी तुळजापूरच्या विकासासाठी देणार येणार आहे. तेव्हा हे विधेयक मंजूर करावे अशी मी विनंती करतो आणि माझे भाषण संपवितो.

प्रश्न प्रस्तुत झाला

श्री.जयंत प्र.पाटील :या विधेयकाला माझा विरोध नाही मला फक्त एकच प्रश्न विचारावयाचा आहे की, त्या विधानसभा क्षेत्रातील विधान परिषद सदस्य असतील तर त्यांचा समावेश या प्राधिकरणात करण्यात येणार आहे काय ?

श्री.हसन मुश्रीफ : विधान परिषद सदस्य सुध्दा प्राधिकरणाचे सदस्य म्हणून राहतील.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ D/ KGS/

श्री.विनोद तावडे ( विधान सभेने निवडलेले ) : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी मांडलेले विधेयक चांगले आहे. या विधेयकावर बोलत असतांना माननीय मंत्रिमहोदयांनी प्राधिकरण स्थापन करण्याचा उल्लेख केलेला आहे.

सभापती महोदय, या विधेयकाच्या पान नंबर चारमध्ये असे म्हटलेले आहे की, "जिल्हाधिकारी, उस्मानाबाद हे प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष राहणार आहेत व विधानसभेतील आमदार या प्राधिकरणाचे सदस्य राहणार आहेत." या निमित्ताने मला माननीय मंत्रिमहोदयना दोन गोष्टी सुचवावयाच्या आहेत. जिल्हाधिका-यांना प्राधिकरणाचे अध्यक्ष करण्यात आलेले आहे. विधान सभेचे काम त्या क्षेत्रातील आमदार पहात असल्यामळे ते सदस्य राहणार आहेत `वास्तविक जिल्हाधिका-या ऐवजी स्थनिक आमदारांना वा पालक मंत्र्यांना अध्यक्ष करावयास पाहिजे होते .विकास करण्याचे काम करीत असताना हा कारभार लोक नियुक्त प्रतिनिधींच्या हातात देत आहोत की प्रशासनाच्या हातात देत आहोत याचा सरकारने विचार केला पाहिजे. लोक प्रतिनिधींच्या अध्यक्षतेखाली हे प्राधिकरण असले पाहिजे. या विकास प्राधिकरणाच्या माध्यमातून 300 कोटी रुपयांची विकास कामे केली जाणार आहेत. त्यामध्ये लोकांचे म्हणणे मांडणारा आमदार ही एकच व्यक्ती आहे. तेव्हा या विधेयकाच्या बाबतीत माझे असे म्हणणे आहे की , स्थानिक आमदारांच्या अध्यक्षतेखाली ही समिती ठेवण्यात आली तर ते अधिक संयुक्तिक झाले असते. या प्राधिकरणामध्ये अनेक शासकीय अधिकारी सदस्य राहणार आहेत व दोन सरकार नियुक्त सदस्य राहणार आहेत. त्यांच्या ऐवजी जिल्हा परिषदेचे सदस्य वा नगरपालिकेचे अध्यक्ष या सारखे जे लोकप्रतिनिधी आहेत त्यांचा समावेश या विकास प्राधिकरणामध्ये करावयास पाहिजे होता . विकास प्राधिकरण तयार करीत असतांना नकळत का होईना परंतु शासनाने लोक प्रतिनिधींना काहीही महत्व दिलेले नाही.

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. तावडे ...

शेवटी हे सगळे चालविणारे जे कोणी आहेत ते आयएएस, आयपीएस, एमपीएससी अधिकारी आहेत आणि या अधिकाऱ्यांच्या भरवशांवरच सारे चालवावयाचे असेल तर मग त्यात जनतेच्या भावना समजून घेऊन त्या जनतेतून जे निवडून येतात त्या सगळ्या लोकप्रतिनिधींकडे दुर्लक्ष झालेले आहे असे मला वाटते. म्हणून मला वाटते की, शासनाने अशा पद्धतीने लोकप्रतिनिधींना बाजूला सारून सगळ्या प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या ताब्यातच हे प्राधिकरण देणार असणारे विधेयक येथे आणणे हेच मुळात चुकीचे आहे. तरी शासनाने हे दुरूस्त करावे आणि नंतरच हे विधेयक येथे मंजुरीसाठी आणावे असे मला वाटते.

***

..... 3डी 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, या विधेयकाच्या बाबतीत बोलताना मला सांगितले पाहिजे की, तुळजापूरला आम्ही जेव्हा जेव्हा गेलो, महाराष्ट्राच्या तीर्थक्षेत्रांच्या संदर्भात सातत्याने पाहिले आहे की, तेथील स्थानिक नगरपालिका, तेथील तीर्थक्षेत्र संस्थान आणि आसपासचे जिल्हा प्रशासन यांच्यामध्ये फार मोठा विसंवाद असतो आणि हे चित्र अनेक यात्रांच्या वेळेस आपण पाहतो. म्हणून पंढरपूर देवस्थान आराखडा जसा सरकारने काही वर्षांपूर्वी मान्य केला त्याच पद्धतीने तुळजापूर असेल, शिर्डी इत्यादी ठिकाणच्या बाबतीत देखील विचार व्हावा अशी जनतेची अपेक्षा आहे. सभापती महोदय, हा जो आराखडा मांडलेला आहे त्या संदर्भात मला दोन तीन मुद्दे येथे उपस्थित करावेसे वाटतात. एक म्हणजे जी स्थानिक नगरपालिका असते तिचे अध्यक्ष त्यात असणार आहे असे आपण म्हटलेले आहे. परंतु बऱ्याचदा मुख्याधिकारी आणि अध्यक्ष असतात आणि तुळजापूर नगरपालिकेला त्यातून किती निधी मिळतो आहे व त्यांचे असणारे उत्पन्न तसेच तेथील संस्थानचे वेगवेगळे अधिकार यामध्येच फार मोठे विसंवाद झाल्याचे आपणास दिसून येतात. आता या विधेयकाच्या उद्दिष्टांमध्ये आपण म्हटलेले आहे की, विश्वस्थ आणि तेथील वेगवेगळे धार्मिक कार्यक्रम यामध्ये समन्वय राहणे आवश्यक आहे. उदा. आपण यातील 15 मध्ये दुसऱ्या मुद्यात (ज) मध्ये म्हटलेले आहे की, विश्वस्थ व्यवस्था - तुळजापूर भवानी मंदिर विश्वस्थ व्यवस्था आणि इतर अभिकरणे, तुळजा भवानी मंदिराच्या मुख्य वार्षिक यात्रेच्या प्रसंगी करण्याच्या व्यवस्था योग्य रीतीने करीत असल्याबद्दल खातरजमा करणे व त्यांचे संनियंत्रण करणे. सभापती महोदय, येथे मला मुद्दाम आपले लक्ष वेधावयाचे आहे की, वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळ्या मंदिरांमध्ये वेगवेगळ्या परंपरा आहेत. तशाच प्रकारे तुळजापूर मंदिरामध्ये असणाऱ्या परंपरांनुसार हा सगळा कार्यक्रम होत चालला आहे. आपण याचे व्यवस्थापन करीत असताना, समन्वय करीत असताना त्यात सरकारीकरण किंवा सरकारी हस्तक्षेप होत नाही ना हे पाहणे अत्यावश्यक आहे. येथे मी या सभागृहाचे आणि सरकारचेही आपल्यामार्फत लक्ष वेधू इच्छिते की, माझ्या माहितीप्रमाणे गुजराथ सरकारने वेरावळ येथे 'मंदिर व्यवस्थापन' असा एक अभ्यासक्रम सुरू केलेला आहे. या अभ्यासक्रमाचा हेतूच हा आहे की, धर्मशास्त्रानुसार त्या त्या मंदिरातील ज्या ज्या प्रथा, परंपरा असतील, मग तेथे आलेल्या गर्दीचे व्यवस्थापन करण्यापासून ते भाविकांना कशा पद्धतीने दर्शन होईल, नैवेद्याच्या पद्धती काय आहेत याचे संहितीकरण व्हावे, डॉक्युमेंटेशन व्हावे आणि त्यातून लोकांना आणि पुजाऱ्यांनाही चांगल्या प्रकारे मदत व्हावी. सभापती महोदय, मला हे

..... 3डी 3 ...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. गोऱ्हे ....

उदाहरण देण्याचा आणि मघापासून माझी या विधेयकाच्या संदर्भात बोलण्याची जी अस्वस्थता चालली होती त्यामागील एक कारण असे आहे की, अनेकदा सरकारी अधिकाऱ्यांच्या याकडे पाहण्याचा दृष्टिकोन आणि तेथील गुरव, भाविक तसेच तेथील पुजारी यांचे अधिकार यावरून वादविवाद होतात व त्या गोष्टी अगदी कोर्टापर्यंत देखील गेलेल्या आहेत. माननीय राज्यमंत्री हे स्वत: कोल्हापूरचे असल्याने त्यांना याची कल्पना असेल. कोल्हापूर महालक्ष्मी मंदिराचा वाद कोर्टापर्यंत गेलेला आहे. पंढरपूर मंदिराच्या बाबतीत देखील तेथील बडवे आणि उत्पातांचा वाद यावरून तेथे फार मोठा सामाजिक संघर्ष झाला. तसेच तुळजापूरला देखील वेगवेगळ्या गुरवांचे जे त्यांचे म्हणून अधिकार असतात ते लक्षात घेता धर्माच्या कामामध्ये हस्तक्षेप न करता आपण भूमिका घ्यायची म्हटले तरी मी आपल्याला येथे उदाहरण देईन की, मध्यंतरी तेथे श्री.पवार नावाचे एक अधिकारी आले होते आणि त्यांनी एक नियम दाखविला. तो नियम त्यांनी कोठून काढला होता कोण जाणे. पण एका मंदिरावर असलेल्या भगवा ध्वज त्यांनी उतरविला व अजूनही माझ्या माहिती प्रमाणे त्या मंदिरावर भगवा ध्वज लावला जात नाही. म्हणजे तो भगवा ध्वज जो उतरविला गेला तो उतरविलाच. म्हणजे आपण कोणत्या वेळी कोणाच्या भावनांचा कशा पद्धतीने विचार करतो याची भूमिका स्पष्ट नसेल तर केवळ सरकारीकरण केल्यामुळे ... म्हणून मला येथे मुद्दा हाच मांडावयाचा आहे की, रस्ते व्यवस्थित असावेत, पाण्याच्या व्यवस्था व्यवस्थित असाव्यात, मंदिरामध्ये चेंगराचेंगरी होऊ नये, आलेल्या भाविकांची राहण्याची चांगली व्यवस्था असावी, पण मंदिराच्या धर्मशास्त्रामध्ये स्वत:ला पाहिजे ती भूमिका चालविण्याचा 'व्हेटो' या सरकारी अधिकाऱ्यांना मिळालेला नाही हे त्यांना स्पष्ट व्हायला पाहिजे याकडे मी आपले लक्ष वेधू इच्छिते. आपण हा जो मंदिर व्यवस्थापन आराखडा तयार करीत आहात, पण गेल्या वर्षी स्थानिक आमदारांनी आमच्याशी बोलून आमचा आमदार-निधी देखील घेतला होता. जसा पंढरपूरसाठी अनेक आमदारांनी आपला आमदार-निधी तेथील देवस्थानच्या विकासासाठी देऊ केला आहे. ...

( यानंतर श्री. सरफरे .... 3इ 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे...

ज्यावेळी गुरु ता गद्दी साठी मोठया प्रमाणात निधी आला आणि त्यामधून संपूर्ण नांदेडमध्ये फार मोठया प्रमाणात चांगली बांधकामे झाली म्हणून संबंधितांचे कौतुक झाले. परंतु आता जर आपण नांदेडमध्ये स्वत: जाऊन पाहिलेतर ठिकठिकाणी किती कामे रेंगाळलेली आहेत. तेथील भाविकांना मोठया प्रमाणात त्रास होत आहे त्याची आपल्याला कल्पना आहे. ज्यावेळी 200 ते 300 कोटींचा निधी मिळतो त्यावेळी मोठया प्रमाणावर कॉट्रॅक्टरची चांदी होते असते. आणि लोकांच्या वाटयाला वाईट प्रतिची कामे येतात. म्हणून हा महत्वाचा भाग याठिकाणी लक्षात घेणे आवश्यक आहे. हा जो आराखडा आहे त्याची दर सहा महिन्यांनी काय प्रगती झाली? याचा अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात यावा. जेणेकरुन त्यामध्ये किती खर्च झाला, त्याचा उपयोग कसा केला जातो? याची आपल्याला माहिती मिळेल. विकास प्राधिकारणाच्या कामकाजाचा देखील कालबध्द कृती कार्यक्रम असला पाहिजे. हा कार्यक्रम करीत असतांना आपण तुळजापूरचा विकास वेगाने करणार आहोत काय? तुळजापूरहून गाणगापूरला लोक जातात त्यांना एकत्रितपणे यात्रा करण्याचा हेतू असतो. अशी सलगपणे तीर्थक्षेत्रे जोडली जात असतील तर त्याकरिता पंढरपूर, तुळजापूर आणि गाणगापूर अशी बससेवा आपण सुरु केली पाहिजे. आज तुळजापूरला जातांना सोलापूर-तुळजापूर हा अरुंद रस्ता असल्यामुळे अपघात वारंवार होतात. तुळजापूरला अनेक भाविक चालत जातात या गोष्टींचा विचार करुन रस्त्यांच्या कनेक्टिव्हिटीचा विचार करुन त्यांचा योग्य रितीने विकास होईल अशी अपेक्षा व्यक्त करते आणि माझे भाषण संपविते.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, या विधेयकाच्या निमित्ताने मला दोन सूचना करावयाच्या आहेत. या विधेयकात करण्यात आलेली तरतूद प्रोटोकॉलच्या दृष्टीने विचित्र वाटते. लोकप्रतिनिधी म्हणून त्या परिसरातील निवडून आलेले विधानसभा सदस्य यांना या प्राधिकरणावर सदस्य म्हणून न नेमता प्रोटोकॉलप्रमाणे प्रथम स्थान दिले पाहिजे. मंत्रिमहोदयांनी आता याठिकाणी सांगितले की, आम्ही यामध्ये विधानसभा आणि विधानपरिषद सदस्य घेऊ. परंतु निवडून आलेला लोकप्रतिनिधी हा प्रोटोकॉलप्रमाणे जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली काम करणार हे बरोबर वाटत नाही. त्याठिकाणी जिल्हयाचे पालक मंत्री किंवा स्थानिक आमदारांना अध्यक्ष केले पाहिजे. त्यामुळे ही विसंगती दूर व्हावी अशी माझी विनंती आहे. आपल्या सभागृहामध्ये माननीय पिठासीन अधिकारी वरच्या स्थानावर बसतात आणि विधीमंडळ सचिव खालच्या स्थानावर बसतात. मुंबई महानगरपालिकेमध्ये महापौर हे वरच्या स्थानावर बसतात आणि आय.ए.एस. झालेले आयुक्त खालच्या स्थानावर बसलेले असतात. लोकशाही व्यवस्थेमध्ये निवडून आलेले लोकप्रतिनिधी यांना प्रोटोकॉलप्रमाणे एक स्थान असल्यामुळे याठिकाणी विसंगती वाटते. आपण असे म्हणावे की, आता हे विधेयक आपण मंजूर करावे. आपल्या सूचनेची नोंद घेतली असून पुढील सहा महिन्यात पुन्हा अध्यादेश काढून त्याचे कायद्यामध्ये रुपांतर करु. त्याला आमची आडकाठी नाही. दुसरे असे की, तुळजापूर प्राधिकरण स्थापन केले आहे. त्याप्रमाणे कोल्हापूरचे अंबाबाईचे देवस्थान आहे. त्या मंदिरामध्ये दक्षिणेकडून, उत्तरेकडून लोक येतात, परदेशामधून लोक येतात. अशाप्रकारे कोल्हापूरच्या देवस्थानाप्रमाणे महाराष्ट्रामधील आणखी देवस्थाने असतील त्या सर्व देवस्थानांसाठी सर्वंकष असे प्राधिकरण केले पाहिजे. याठिकाणी आपण साडे तीनशे कोटी रुपये खर्च केले आहेत.

सभापती महोदय, मी जातीचा विषय मांडीत नाही. परंतु 90 टक्क्याच्या वर हिंदू लोक रहातात. मंत्रिमहोदयांनी भाषण करतांना सांगितले त्याचा मला याठिकाणी अभिमान वाटतो. आपल्या या वाक्याचा अर्थ मला कळला आणि मी ते मान्य केले. आपण जन्माने अल्पसंख्यांक असलो तरी याठिकाणी मंदिराचा जीर्णोध्दार करण्याचा आपल्याला अभिमान वाटतो. आपल्या या वाक्याचा मला अभिमान वाटतो. म्हणून माझी आपणास विनंती आहे की, आपण याच भावनेने पुढील अधिवेशनामध्ये महालक्ष्मी देवस्थान असो, ज्योर्तिलिंगापैकी भीमाशंकर असेल, तुळजापूर, रेणापूरचे



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ D/ KTG/

श्री. मधुकर चव्हाण....

देवस्थान असेल अशाठिकाणी लाखो लोक येतात. ही हिंदूची देवस्थाने असतात. त्याठिकाणी त्यांचे पावित्र्य आपण फक्त आपल्या मनात ठेवतो.परंतु आजूबाजूचा परिसर बरोबर नसतो. मला वाटते की, या विधेयकाला पाठिंबा देतांना या दोन गोष्टींचा विचार केला पाहिजे. विधीमंडळामधील विधानसभेचे दोन सदस्य आणि विधानपरिषदेचे दोन सदस्य घ्यावेत आणि लोकप्रतिनिधी म्हणून तेथील खासदार किंवा पालकमंत्री किंवा आमदार हे त्या प्राधिकरणाचे अध्यक्ष असले पाहिजे. एवढे सांगून माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

----

(यानंतर श्री.बरवड)

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत ( मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, माननीय राज्यमंत्री श्री. हसन मुश्रीफ यांनी एक चांगले विधेयक आणल्याबद्दल मी त्यांचे स्वागत करतो.

एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते ती म्हणजे या देशामध्ये हिंदूंची देवस्थाने स्वच्छ नाहीत. दक्षिणेतील तिरुपती म्हणजे तिरुमलाई हे एकमेव देवस्थान असे आहे की ज्याचा संपूर्ण परिसर स्वच्छ आहे. येथील रचना आणि आकार हा महत्वाचा विषय आहे. हे सगळे करण्यासाठी आपण जी रचना करणार त्यामध्ये त्या ठिकाणी असणारे बांगडीवाले, फेरीवाले यांचाही विचार करावा लागेल. त्या ठिकाणी उंची कमी आहे. त्या ठिकाणी प्रचंड गर्दी असते. त्या ठिकाणी गाभारा छोटा आहे. त्या ठिकाणी अक्षरश: गुदमरल्यासारखे वाटते. आपण सांगितले की, पुजाऱ्यांच्या बाबतीत वाद आहे. त्यापासून अलिप्त राहून सुविधा कशी करता येईल याबाबतीत आपल्याला वेगळ्या पध्दतीची रचना करावी लागेल. आपण जे वित्तीय ज्ञापन दिले आहे त्यामध्ये असे म्हटले आहे की, "या विधेयकाच्या खंड 8 (2) मध्ये तुळजापूर विकास बृहत योजनेखाली मंजूर केलेल्या कामांसाठी राज्य शासन, यथोचित विनियोजनाव्दारे, आवश्यक ती अनुदाने देईल, अशी तरतूद आहे. उक्त योजनेखाली मंजूर होणाऱ्या कामांवर जो खर्च होईल त्यावर ही रक्कम अवलंबून असल्याने या प्रयोजनासाठी आवश्यक असलेली रक्कम सध्या विनिर्दिष्ट करणे शक्य होणार नाही. तथापि, याबाबतीतील आवश्यक तो खर्च यथोचित विनियोजन करुन, राज्याच्या एकत्रित निधीतून करावा लागेल." हे वित्तीय ज्ञापन समाधानकारक नाही. किंबहुना ते चेष्टा करणारे आहे. एका बाजूला आपण रोमँटीक चित्र रंगवता की, आम्ही ते फार चांगले करावयास निघालो आहोत परंतु तरतूद मात्र दीड दमडीची सुध्दा करीत नाही. याबाबतचा आराखडा आपल्या समोर नाही. निश्चित किती खर्च येईल हे आपल्याला माहीत नाही. एकत्रित निधीतून निधी देऊ असे सांगत आहात. हे ज्ञापन सुध्दा सुधारण्याची आवश्यकता आहे. हे सगळे आपण कधीपर्यंत करणार, कसे करणार ? आज केवळ सवंग लोकप्रियतेसाठी आम्ही तुळजापूरच्या मंदिरासाठी हे करणार आहोत एवढेच चित्र निर्माण करीत आहात. तरतूद मात्र शून्य आहे. या गोष्टीचा मी निषेध करतो.

**तालिका सभापती ( श्री. भास्कर जाधव )** : उद्देश व कारणे सांगताना त्यांनी असे सांगितले आहे की, बजेटमध्ये तरतूद करण्यात येईल.

...2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/ D/

श्री. अरविंद सावंत : या ठिकाणी असे म्हटले आहे की, तो खर्च यथोचित विनियोजन करुन राज्याच्या एकत्रित निधीतून करावा लागेल. माझे असे म्हणणे आहे की, हे वित्तीय ज्ञापन त्याचे स्वागत करतो. या बिलामध्ये पाच किलोमीटरच्या परिसराचा उल्लेख आहे. म्हणजे ती त्रिज्या धरणार. त्या ठिकाणी एका बाजूला काहीच नाही. उलट दुसऱ्या बाजूने अधिक काम करावे लागेल. त्या ठिकाणी रस्ता रुंदीकरणाचे काम करावे लागेल. सोलापूरकडून येणारा रस्ता अरुंद आहे. केवळ पाच किलोमीटर त्रिज्या असे सिमित करु नका. एका बाजूला टेकडी आहे. त्या ठिकाणी काही करण्याची गरज नाही. शहरातील पाच किलोमीटरचा भाग तसेच सोलापूर रस्त्याकडील भाग यामध्ये येईल. त्याचे नियोजन करुन पाच किलोमीटरच्या परिसराऐवजी दहा किलोमीटरचा परिसर घेतला तरी चालेल. त्यादृष्टीने विचार करावा. मी या विधेयकाचे पुन्हा स्वागत करतो. हे काम लवकरात लवकर करावे अशी अपेक्षा व्यक्त करुन मी माझे भाषण संपवितो.

----

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत ( मुंबई विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी तुळजापूरचा विकास करण्यासाठी जे विधानसभा विधेयक क्रमांक 59 या ठिकाणी मांडलेले आहे त्यावर अगोदरच्या अनेक सन्माननीय सदस्यांनी आपले विचार व्यक्त केलेले आहेत. या बिलाची एकंदर मांडणी पाहिली, तसेच विकास प्राधिकारणाची रचना पाहिली तर त्यावर नोकरशाहीचा पगडा दिसतो. आपण सर्व अधिकारी, पदसिध्द अध्यक्ष, सदस्य सचिव पाहिले तर सर्व अधिकारीच आहेत. या प्राधिकारणावर संपूर्णपणे नोकरशाहीचा पगडा दिसतो. शिर्डी संस्थान किंवा मुंबईच्या प्रभादेवी येथील सिध्दीविनायक संस्थान पाहिले तर त्या ठिकाणी जे लोकनियुक्त प्रतिनिधी आहेत किंवा राज्य शासनामार्फत नियुक्त झालेले जे प्रतिनिधी आहेत त्यांचा मोठ्या प्रमाणवर समावेश असतो. हे जसे तीर्थक्षेत्र आहे तसेच ते काही वर्षानंतर पर्यटन क्षेत्र सुध्दा होऊ शकते. त्याचा देखील आपल्याला विचार करणे आवश्यक आहे.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत....

त्यानुसार आपण यामध्ये बदल घडवून आणू शकतो काय ?

सभापती महोदय, दुसरा महत्वाचा मुद्दा असा आहे की, या माध्यमातून शासनाच्या तिजोरीत लाखो रुपये येणार आहेत. त्याचा विनियोग कसा करण्यात येणार आहे त्याचा या विधेयकात उल्लेख करण्यात आलेला नाही. पृष्ठ क्रमांक 6 वर "अर्थसंकल्प, लेखे आणि लेखापरीक्षा" हा जो भाग आहे त्यातील मुद्दा क्र.3 मी वाचून दाखवितो. त्यात असे म्हटले आहे की, "विकास प्राधिकरण, उस्मानाबाद येथील शासकीय कोषागारामध्ये स्वीय खाते उघडेल, विकास प्राधिकरणाचा अध्यक्ष व सदस्य सचिव यांच्या नावाने संयुक्तपणे ते खाते चालविण्यात येईल" सभापती महोदय, जे निवडून आलेले लोकप्रतिनिधी आहेत किंवा त्या भागातील नगरपालिकेचे लोकप्रतिनिधी असतील त्यांच्यावर शासनाचा विश्वास नाही. त्यामुळे हे सर्व अधिकारी जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिका-यांना दिले आहेत. आर्थिक व्यवस्थापन करण्याचे अधिकार देखील त्यांनाच दिलेले आहेत, याबाबत शासनाने विचार करणे आवश्यक आहे. तसेच नजिकच्या भविष्य काळामध्ये येणा-या निधीचा विनियोग करण्यासाठी ट्रस्ट तयार करुन त्याबाबत पुढे काय सुधारणा करणार आहे किंवा नाही हे देखील या विधेयकाच्या चर्चेला उत्तर देताना माननीय मंत्रिमहोदयांनी स्पष्ट करावे अशी विनंती करतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

----

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भगवान साळुंखे ( पुणे विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, सन 2008 चे वि.स.वि.क्रमांक 59 - तुळजापूर विकास प्राधिकरण या विधेयकावर मी माझे विचार व्यक्त करण्यासाठी उभा आहे.

सभापती महोदय, या विधेयकावर मी भाषण न करता मी काही उपसूचना सुचवू इच्छितो. पृष्ठ क्र.3 वर खंड 6 मध्ये "तुळजापूर नगरपरिषदेच्या नगर हद्दीपासून पाच किलोमीटर पर्यंतच्या आसपासच्या क्षेत्रासाठी" म्हटले आहे त्याऐवजी "तुळजापूर नगरपरिषदेच्या नगर हद्दीपासून 5 कि.मी.त्रिज्येपर्यंतचे क्षेत्र" असे म्हटले पाहिजे. 5 कि.मी.म्हटले तर ते सरळ रेषेत होईल. म्हणून 5 कि.मी.पर्यंतच्या त्रिज्येपर्यंतचे क्षेत्र असे म्हणावे.

तसेच खंड 2 मधील उपखंड (1) मध्ये "सोयीसुविधा" यामध्ये मार्ग, रस्ता, पूल, पूल दळणवळणाची इतर कोणतीही साधने, खुली जागा," असे नमूद केले आहे. यामध्ये आणखी 2-3 गोष्टींचा अंतर्भाव करावा अशी माझी सूचना आहे. यामध्ये "धर्मशाळा/भक्त निवास" याचा समावेश करावा. ज्या क्षेत्रात भाविक जातात त्या क्षेत्राची "ऐतिहासिक पार्श्वभूमि, धार्मिक ग्रंथालये," असा उल्लेख असावा. यामध्ये "कोणतीही कल्याणकारी योजना" असा शब्द वापरलेला आहे. या शब्दाचा स्पष्ट उल्लेख करण्यात यावा.

पृष्ठ क्रमांक 4 वर विकास प्राधिकरणामध्ये कोण कोण सदस्य असतील त्याचा उल्लेख केलेला आहे. यामध्ये करण्यात आलेली तरतूद पाहता हे प्राधिकरण नोकरशहांच्या हातामध्ये देत आहात असे म्हणावे लागते. यातून लोकप्रतिनिधींना बाजूला सारले जात आहे दिसून येते. त्याऐवजी पालक मंत्र्यांना पदसिध्द अध्यक्ष नेमावे, ते शक्य नसेल तर त्या तालुक्याच्या आमदारांना पदसिध्द अध्यक्ष नेमावे. ते इच्छुक नसतील तर अन्य आमदारांना पदसिध्द अध्यक्ष नेमावे. त्याचबरोबर क्र.14 वर जिल्हा नियोजन अधिका-यांना सदस्य-सचिव म्हणून नेमले जाणार आहे. जिल्हा नियोजन अधिका-यांना या प्राधिकरणात प्रत्यक्षात काम करणे शक्य होणार नाही. कारण त्यांच्याकडे असलेल्या कामाचा ताण व त्यांना मिळणारा वेळ पाहता नगरपालिकेच्या मुख्याधिका-यांना सदस्य-सचिव म्हणून नेमले तर ते व्यवहारिक होईल आणि ते सक्षमपणे काम पाहू शकतील.

यानंतर श्री.शिगम....

MSS/ KGS/ MMP/ KTG/ D/ पूर्वी श्री. खंदारे 15:55

(श्री. भगवान साळुंखे....

सभापती महोदय, तुळजापूर भवानी ट्रस्टचे जे कोणी सेक्रेटरी किंवा अध्यक्ष असतील त्यांना सुध्दा या समितीमध्ये सदस्य म्हणून घेतले पाहिजे. त्यांना बाजूला ठेवून समिती चांगली होईल असे वाटत नाही. या समितीमध्ये जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिका-यांचा समावेश केलेला आहे. परंतु जिल्हा परिषदेच्या अध्यक्षांना या समितीमध्ये घेतलेले नाही. तेव्हा या समितीमध्ये त्यांचा देखील रोल असला पाहिजे. इतर सर्व अधिका-यांचा उल्लेख या ठिकाणी करण्यात आलेला आहे. आणखी तीन अधिका-यांचा समावेश या समितीमध्ये असला पाहिजे असे मला वाटते. हा सांस्कृतिक स्वरुपाचा विषय आहे. त्यामुळे याच्याशी निगडित असलेले शिक्षण अधिकारी- प्राथमिक, शिक्षण अधिकारी- माध्यमिक, आणि शिक्षण अधिकारी- प्रौढ शिक्षण यांचा देखील समावेश केला तर अधिक चांगले होईल.

विधेयकाच्या पान क्रमांक 5 वरील खंड 7 मधील पोट कलम 1 (छ)मध्ये असे म्हटलेले आहे की, " विकसित झालेली कामे, बांधकामे, उपयुक्त सेवा, इत्यादी पूर्ण झाल्यानंतर, तुळजापूर नगरपरिषद, पोलीस विभाग, तुळजाभवानी मंदिर विश्वस्तव्यवस्था, सार्वजनकि बांधकाम विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी यांसारख्या आणि त्यांच्यासारख्या इतर संबंधित अभिकरणांकडे हस्तांतरित करणे." या हस्तांतरणाच्या संदर्भात स्पष्ट निर्देश दिलेले नाहीत. "Responsibility of all means responsibility of none" असे काही वेळा म्हणावे लागते. सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी सांगितल्याप्रमाणे हिंदूंची मंदिरे म्हणून कोणीही निगा राखत नाही. तेव्हा "fixation of responsibility", जबाबदारी निर्धारित करण्यासंबंधी स्पष्ट उल्लेख असला पाहिजे.

पृ.क्र. 4वर प्राधिकारणासाठी समिती नेमण्याचा उल्लेख केलेला आहे. या समितीमध्ये समाजाचा सुध्दा सहभाग असला पाहिजे असे वाटते म्हणून तुळजापूर शहरामध्ये ज्या कोणी एनजीओ काम करु इच्छित असतील त्यांचा देखील अंतर्भाव या समितीमध्ये करण्यात यावा. पान क्रमांक 6 वरील प्रकरण चार मध्ये अर्थसंकल्प, लेखे आणि लेखापरीक्षा यामध्ये 10 मुद्यांचा समावेश केलेला आहे. आणखी एका 11व्या मुद्याचा यामध्ये समावेश असावा असे मला वाटते. तो मुद्दा असा की, भाविक दोन प्रकारे दान करतात. एक तर ते दान दान-पेटीत टाकतात किंवा तेथे बसलेल्या सेवेक-यांना दान देतात. अशा वेळी सेवेक-यांमध्ये त्या दानावरुन भांडणे होतात. तेव्हा पावतीद्वारे

(श्री. भगवान साळुंखे...

किंवा दानपेटीद्वारे जे दान मिळते त्यातील काही हिस्सा प्राधिकरणाकडे देण्याची तरतूद असली पाहिजे.त्यामधील काही रक्कम विकासासाठी आणि काही रक्कम देखभालीसाठी खर्च करण्याची तरतूद असली पाहिजे. त्यासाठी रुल्स आणि रेग्युलेशन्स निश्चित करावे लागतील. जे सेवेकरी महिनाभरासाठी, वर्षभरासाठी असतात, वार लावून आपला उदरनिर्वाह करतात त्यांना सुध्दा मानधन देण्याची तरतूद असली पाहिजे. मी सुचविलेल्या मुद्यांचा शासनाने विचार करावा एवढे बोलून मी माझे दोन शब्द संपवितो.

---

...नंतर श्री. गिते....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ MMP/ D/ KTG/ KGS/ प्रथम श्री.शिगम 16:00

श्री. रामनाथ मोते ( कोकण विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, या ठिकाणी शासनाने जे विधेयक आणलेले आहे,त्या विधेयकाचे मी मनापासून स्वागत करतो. मी सन्माननीय सदस्यांनी मांडलेल्या मुद्यांची पुनरावृत्ती करणार नाही. परंतु सन्माननीय सदस्य श्री. साळुंखे यांनी जे मुद्दे मांडले, त्या मुद्याशी मी सहमत आहे. भक्तांसाठी निवासव्यवस्था या विषयी या विधेयकात तरतूद असणे आवश्यक होती. या विधेयकात त्यादृष्टीने तरतूद करण्यात यावी. पान क्रमांक 3 वर विकासाच्या वाख्येत असे म्हटले आहे की, सध्याच्या बांधकामामध्ये किंवा जमिनीमध्ये कोणताही बदल करण्याचा अधिकार प्राधिकरणाला मिळणार असेल तर त्या परिसराचा नव्याने आराखडा तयार करण्यात येणार आहे काय आणि या प्राधिकरणाला आताचे जे काही स्टक्चर्स आहेत, जे या विकासात आडवे येणार आहेत. त्यासंदर्भात काही कार्यवाही होणार आहे काय ? या संदर्भात शासन काही निर्णय घेणार आहे काय ? या गोष्टींचा खुलासा होणे अत्यंत आवश्यक आहे.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 4 वर या संदर्भातील कमिटीवर व्यक्तीची नेमणूक करण्यासंबंधी तरतूद केलेली आहे. त्या कमिटीवर कमिटीवर कोण असावे, कोण नसावे, यासंबंधीचा अन्य सन्माननीय सदस्यांनी उल्लेख केलेला आहे. या विधेयकांतील त्या कलमात दोन नामांकित व्यक्ती एवढाच उल्लेख केलेला आहे.सदर व्यक्तीची नियुक्ती करताना कोणते निकष शासनाकडून लावले जाणार आहेत ? या कमिटीवर सी.ए. अथवा ॲडव्होकटची नेमणूक केली जाणार आहे काय ? नामांकित व्यक्ती म्हणजे कोण ? त्यासंबंधी निकष काय असणार आहे? त्यासंदर्भात खुलासा होणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी एका गोष्टीचा उल्लेख केला या सर्वोच्च सभागृहामध्ये एखादे विधेयक मंजूर करतो.विधेयक मंजूर झाल्यानंतर त्याची नियमावली वर्षानुवर्षे केली जात नाही. हे विधेयक मंजूर झाल्यानंतर त्याची नियमावली किती दिवसात करण्यात येईल यासंबंधीचे शासनाने काही नियोजन केलेले आहे काय ? यासंबंधी शासनाने खुलासा करावा अशी विनंती करतो आणि या विधेयकावरील माझे भाषण पूर्ण करतो.

--------

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले ( महाराष्ट्र विधानसभा सदस्यांव्दारा निर्वाचित ) : सभापती महोदय, विकास प्राधिकरण स्थापन करण्याची संकल्पना राज्यात अनेक ठिकाणी या अगोदर राबविण्यात आलेली आहे. त्यास अनुसरुन पान क्रमांक 4 वरील यादी आपल्यासमोर आलेली आहे. त्याच्यामध्ये आधीच्या प्राधिकरणांचा काही अनुभव शासनाजवळ आहे काय? आपण जी नावे दर्शविलेली आहेत. बहुतेक अनुभव असा येतो की, या एकूण प्रकल्पाचे गांभीर्य, गरज या दोन्हीची माहिती घेऊन येण्याच्या ऐवजी बहुतेक वेळेला अशा सभांना ते आपला कोणी तरी प्रतिनिधी पाठवितात. जिल्हा पोलीस अधीक्षक आपण घेतले आहे. परंतु पोलीस अधीक्षकांना दुसरेच काही तरी काम निघते आणि मग त्या खात्याच्या कोणाला तरी सांगितले जाते की, तू त्या सभेस उपस्थित रहा. अशा त-हेचे लोक येतात, त्यांचा विकासाशी काहीही संबंध येत नाही. प्राधिकरणाशी संबंध नाही. त्यामुळे यातील जो बॅलन्स आहे तो म्हणजे लोकप्रतिनिधी आणि शासकीय अधिकारी या सगळया नावांपेक्षा बाकीची काही नावे घेण्याची आवश्यकता वाटते. शिवाय यांच्या बाबतीत असे होते की, साधारणपणे त्यांच्या कार्यकाळ किती आहे याची निश्चिती नसल्यामुळे, तसेच या विषयामध्ये किती रस आहे हेही लक्षात येत नाही. त्यामुळे अशा नवीन प्राधिकरणामध्ये जेव्हा अशा लोकांची नियुक्ती होते, ते किती वेळ देणार आहेत ? प्राधिकरणाच्या प्रोसेसमध्ये सहभागी होणार आहेत किंवा नाही ? याची शासन खातरजमा करुन घेईल काय ? या गोष्टीचा शासनाने खुलासा करावा अशी विनंती करतो आणि माझे मनोगत पूर्ण करतो.

--------

यानंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

SGB/ MMP/ KGS/ 16:05

श्री.केशवराव मानकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2008 चे वि.स.वि. क्रमांक-59 चे मी स्वागत करतो. मी दोन सूचना करणार आहे. माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी विकास प्राधिकरणासंबंधी जी सूचना केली त्यानुसार सी.ए. आणि वकील यांचा समितीमध्ये जरुर समावेश करावा. परंतु विकासाची कामे नीटपणे होण्यासाठी वास्तुशास्त्रज्ञांचा देखील समावेश असणे आवश्यक आहे. विकास करीत असताना 5 कि.मी.परिघाची अट घालण्यात आली आहे. फक्त विकासाची कामे करण्यासाठी प्राधिकरण नेमले जाणार असल्यामुळे मुख्य रस्त्याला जोडणारे हायवेपर्यंतचे जे रस्ते असतील त्यांचा देखील विकासाच्या कामामध्ये समावेश करावा अशी सूचना करुन माझे भाषण पूर्ण करतो.

-----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हसन मुश्रीफ (विधी व न्याय राज्यमंत्री) : सभापती महोदय, यापूर्वी मी या बिलाचा उद्देश सांगत असताना हे नमूद केले होते की, या देवालयाला दररोज 50 हजार ते 1 लाख भाविक भेट देत असतात. या भाविकांची, यात्रेकरुंची व्यवस्था व्हावी, त्यांना सोयी सुविधा मिळाव्यात, त्या विभागाचा सुध्दा विकास व्हावा व तो परिसर स्वच्छ असावा या स्तुत्य हेतूने हे विधेयक आणलेले आहे. याठिकाणी सन्माननीय सदस्य सर्वश्री विनोद तावडे, मधुकर चव्हाण, भगवान साळुंखे, रामनाथ मोते, हेमंत टकले, केशवराव मानकर, डॉ.दीपक सावंत, डॉ.नीलम गोऱ्हे यांनी आपले विचार मांडले आहेत. अनेकांनी एका मुद्याचा उल्लेख केला तो म्हणजे समितीचे अध्यक्ष हे जिल्हाधिकारी ऐवजी पालकमंत्री किंवा त्या विभागाचे आमदार असावेत. आजही अनेक समित्यांचे अध्यक्ष हे आयएएस अधिकारी आहेत आणि त्या समितीचे सदस्य म्हणून आमदार आहेत. हे दैनंदिन काम आहे. 315 कोटी रुपयांचा विकास आराखडा निश्चित करणार आहोत. पालकमंत्र्यांना ताबडतोबीने बैठका घेणे, कामांचा दर्जा तपासणे, गुणवत्ता तपासणे अशी अनेक दैनंदिन कामे पुढे येणार आहेत त्याकडे लक्ष देण्यास पुरेसा वेळ मिळणे शक्य होईल असे मला वाटत नाही. जिल्हाधिकारी यांना अध्यक्ष करण्याचा हेतू असा की, कोणत्या तरी व्यक्तीवर जबाबदारी निश्चित करता आली पाहिजे. जिल्हाधिकारी यांच्यासह संबंधित विभागाचे अधिकारी सदस्य म्हणून घेण्यात आले आहेत. अनेकांनी सूचना केली की, त्या भागातील खासदार आणि त्या भागातील भविष्यातील विधानपरिषद सदस्य तसेच जिल्हा परिषद अध्यक्ष यांचा समितीमध्ये समावेश करावा. त्याप्रमाणे निश्चितपणे समावेश करु. सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांनी सांगितले की, 5 पैशाची तरतूद केलेली नाही असे सांगितले. या कामासाठी 5 कोटी रुपयांची तरतूद केलेली असून 75 कोटी रुपये मार्चच्या अधिवेशनामध्ये तरतूद केली जाणार आहे. 315 कोटी रुपये विकासाचा कालबध्द कार्यक्रम तयार करुन त्या परिसराचा विकास केला जाईल. किती कि.मी.चा परिघ असावा असाही मुद्दा उपस्थित झाला. त्या विभागामध्ये 5 कि.मी.च्या परिघामध्ये जेवढा म्हणून विकास करता येईल तो निश्चितपणे केला जाईल. याठिकाणी अशीही सूचना करण्यात आली की, कोल्हापूरच्या अंबाबाई देवालयाचे महत्व लक्षात घेऊन त्या परिसराच्या विकासासाठी सुध्दा प्राधिकरण नेमण्यात यावे. मी जरुर या सूचनेचे स्वागत करतो. लवकरात लवकर मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये त्याठिकाणी प्राधिकरण स्थापन करण्यासाठी प्रयत्न केला जाईल. मी स्वत: कोल्हापूरचा असल्यामुळे माझी ती जबाबदारी आहे.

(नंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ KGS/ MMP/ पूर्वी श्री. भोगले... 16:10

श्री. हसन मुश्रीफ ....

कोल्हापूर येथे महालक्ष्मी मंदिराच प्राधिकरण स्थापन करण्यासंबधीचा निर्णय घेण्यासाठी मंत्रिमंडळासमोर जाणार आहोत. मंत्रिमंडळाने त्या प्रस्तावाला मान्यता दिल्यानंतर पुढील अधिवेशनात तसे विधेयक सभागृहाच्या मान्यतेसाठी आणण्यात येईल.

श्री. प्रकाश शेंडगे : सन्माननीय सदस्यांनी देवालयाचे प्राधिकरणात रुपांतर करावे अशी सूचना केली नाही तर तुळजापूरच्या धर्तीवर प्राधिकरण नेमण्यासंबंधीची सूचना केली आहे.

श्री. हसन मुश्रीफ : महोदय, तुळजापूर विकास प्राधिकरणाच्या धर्तीवरच कोल्हापूरचाही विकास करण्यासंबंधीचा प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर नेण्यात येईल.

श्री. दिवाकर रावते : महोदय, तुळजापूरसंबंधीचे विधेयक मांडण्याचे भाग्य माननीय मंत्री महोदयांना लाभले हे मान्य आहे. परंतु आमदारांना कमीपणा येईल असे काही तरी या कायद्याच्या माध्यमातून आपण करीत आहात, हे योग्य नाही. कारण आमदार जिल्हाधिकारी अध्यक्ष असलेल्या समितीचा सदस्य म्हणून राहिल्यानंतर त्याला कमीपणा वाटणार नाही काय ? वास्तविक आमदार गेल्यानंतर ज्या जिल्हाधिकाऱ्याने उठून उभे रहावे व त्याला सलाम करावा असे पाहिजे तर उलट त्यांच्याच अध्यक्षतेखाली आमदारांना समितीचे सदस्य म्हणून आपण करीत आहात, अशी विचित्र परिस्थिती यामुळे निर्माण होणार आहे. आपण आता या विधेयकाला उत्तर देत आहात, थोड्या वेळाने हे विधेयक पास देखील होणार आहे म्हणून आता आणि याच क्षणाला ते करण्याचा अधिकार आपल्याला आहे. वास्तविक या विधेयकाच्या प्रती आम्हाला अगोदर मिळाल्या असत्या तर त्यात काही उपसूचना देता आल्या असत्या परंतु आयत्या वेळेस विधेयकाची कॉपी दिल्यामुळे आम्हाला त्याचा अभ्यास करता आला नाही. आणि आता अशा प्रकारची सूचना मांडली तर कदाचित आपण म्हणाल की, शासनाची अडवणूक करतात परंतु कायदा करताना अनेक अडचणी असतात आणि त्या जर शासनाच्या लक्षात आणून दिल्या नाही तर आम्हाला बाहेर विचारणारे आहेत. लोक आम्हाला म्हणतील की आपण सभागृहात काय करीत होता, शासन काय करीत आहे हे आपल्याला समजले नाही का ? म्हणून उत्तर देतांना आम्हाला वाटले होते की, या सूचनेचा मंत्री महोदय विचार करतील, परंतु त्यांच्या स्पष्टीकरणातून तसे दिसून येत नाही.

श्री. हसन मुश्रीफ : महोदय, अनेक समित्या अशा आहेत की, त्यात आमदार सदस्य आहेत आणि जिल्हाधिकारी अध्यक्ष आहेत. नागपूर सुधार प्रन्यासचे अध्यक्ष सुध्दा आयएएस अधिकारीच आहेत....

(........2



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : महोदय आयएएस अधिकारी काय आपले बाप आहेत काय ? मंत्री महोदय त्यांचे एवढे कशाला सांगत आहेत हेच मला समजत नाही. सरकार सुध्दा तेच चालवितात म्हणून आपली कमजोरी दिसून येते, हे दुर्देव आहे, आपण त्यांना सलाम करतो. याचा अर्थ आम्ही मुर्ख आहोत, आम्ही अडाणी आहोत, आम्हाला अक्कल नाही आणि फक्त आयएएस अधिकारीच काम करीत आहेत, हे काय चालले आहे ? रेल्वेच्या डब्यात सुध्दा आयएएस अधिकारी ओ.सी.फर्स्ट क्लासमध्ये आणि आमदार मात्र ओ.सी. सेकंड क्लासच्या डब्यात, काय तर ते आयएएस आहेत.

श्री. हसन मुश्रीफ : महोदय, हे काम जोखमीचे आणि डे टू डे काम असल्यामुळे दररोज बैठका घ्याव्या लागतील, आराखडा तयार करावा लागेल, आवश्यक प्रस्ताव शासनाकडे पाठवावे लागणार आहेत.

श्री. दिवाकर रावते : कुठलाही अधिकारी असो तो अशा समित्यांचा सदस्य सचिव असतो. तसेच मंत्री महोदय म्हणतात त्याप्रमाणे दररोज काम, जोखमीचे काम असते परंतु काम करणारे हे सचिव दर्जाचेच अधिकारी असतात. अंमलबजावणी करण्याचे काम तेच करतात. जिल्हा नियोजन व विकास मंडळाचे सदस्य सचिव सुध्दा जिल्हाधिकारी असतात आणि पालकमंत्री अध्यक्ष असतात.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सिध्दीविनायक मंदिराला आयएएस अधिकारी नाही, शिर्डी मंदिराला आयएएस अधिकारी नाही तसेच पंढरपूरच्या मंदिराला आयएएस अधिकारी नाही. त्यामुळे तुळजापूर मंदिरालाच आयएएस अधिका-याची आपल्याला गरज का वाटली ? या ठिकाणी माननीय मंत्रीमहोदयांनी विधेयकाच्या संदर्भात जे समर्थन केलेले आहे ते अजून भयानक आहे. त्यांनी सांगितले की, डे टू डे काम असल्यामुळे प्राधिकरणावर आमदार नको हे काही बरोबर नाही. डे टू डे काम आमदार करु शकत नाही का ? लोकप्रतिनिधींची किंमत कमी करण्याचे काम आपण करीत आहात. कलेक्टरला तुळजाभवनी मंदिराचे आपण काम देत आहात, जसे काही कलेक्टर रिकामेच असतात. उलट कलेक्टर जास्त बिझी असतात त्यामुळे हे प्राधिकरण अजून खाली येईल. या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी ज्या भावना व्यक्त केलेल्या आहेत त्या भावंनाचा आपण फेर विचार करावा. या प्राधिकरणाचे अध्यक्ष हे ख-या अर्थाने आमदार असावयास पाहिजे.

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, शिर्डी आणि सिध्दीविनायक मंदिर हे न्यास आहे. शिडी आणि सिध्दीविनायक मंदिर हे प्राधिकरण नाही. देवालयाचे जे काही उत्पन्न येते त्याचे नियोजन करण्यासाठी न्यास आहे. त्यामुळे न्यायासाचा आणि आपल्या विधेयकाचा काही संबंध नाही. आपले प्राधिकरण हे त्या भागाच्या विकासासाठी स्थापन करीत आहोत. या प्राधिकरणाला शासन 100 टक्के अनुदान देणार आहे.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, एमएमआरडीएचे अध्यक्ष माननीय मुख्यमंत्री आहेत. प्राधिकरणामध्ये आर्थिक विषय आहे असे माननीय मंत्री महोदय म्हणाले आहेत. मुंबई महानगरपालिकेत स्थायी समितीचा अध्य हा प्रमुख आहे. केरळपेक्षा मुंबई महानगरपालिकेचा अर्थसंकल्प 100 कोटी रुपयांपेक्षा जास्त आहे. स्थायी समितीचा अध्यक्ष हा नगरसेवक असून माननीय आयुक्त अर्थसंकल्प सादर करीत असतात. बीएमआरडीचे अध्यक्ष माननीय मंत्री महोदय आहेत. सिडकोचे अध्यक्ष माननीय मंत्री महोदय आहेत. येथे मानमरातबाचा मुद्दा नाही परंतु प्रोटोकॉलचा मुद्दा आहे. मला वाटते की, आपण तेथील पालकमंत्र्यांना तुळजाभवानी प्राधिकरणाचे अध्यक्ष करा आणि कलेक्टरांना कार्यकारी संचालक करा, डायरेक्टर करा, एम.डी. करा असे आमचे म्हणणे आहे. हे बील पास करा आणि त्यानंतर ऑर्डीनन्सच्या माध्यमातून सुधारणा आणा एवढेच मला या निमित्ताने सांगावयाचे आहे.

...2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, आपण या विधेयकाच्या संदर्भात दोन गोष्टी करु या. या प्राधिकरणामध्ये खासदार, जिल्हापरिषदेचे अध्यक्ष आणि विधान परिषदेचा सदस्य असे तीन सदस्य असणार आहेत. विधान परिषदेचे जे कोणी सदस्य होतील त्यांना नेमण्याचे काम आपण करु. या प्राधिकरणाच्या कामाची चर्चा डीपीडीसीमध्ये ठेवण्याची प्रोव्हीजन करु. प्राधिकरणाचे काम सुरु झाल्यानंतर अडचणी आल्या तर आपण दुरुस्ती करुन पालक मंत्र्यांना सुध्दा अध्यक्ष करण्याचा निश्चितपणे विचार करु. कोल्हापूरच्या मंदिराच्या परिसराचा विकास करण्यासाठी सुध्दा आपण प्राधिकरण करण्यासाठी मंत्रिमंडळाच्या बैठकीत विषय मांडू. आपण आता हे विधेयक संमत करावे अशी मी आपल्या सर्वांना विनंती करतो.

डॉ. नीलम गो-हे : सभापती महोदय, देवस्थान मधील धार्मिक उपचार आणि परंपरा ज्या आहेत त्याच्यात अधिकारी हस्तक्षेप करणार नाहीत याबाबत माननीय मंत्रीमहोदयानी आम्हाला मार्गदर्शन करावे अशी विनंती आहे.

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, देवस्थानामध्ये आम्ही काहीही हस्तक्षेप करणार नाही. प्राधिकरण हे फक्त त्या परिसराच्या विकासाचे काम करणार आहे. विकास आराखडा जेवढा ठरविण्यात आलेला आहे तेवढाच डेव्हलेप करण्यासाठी प्राधिकरणाची निर्मिती करण्यात आलेली आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, आपण घाई घाईने विधेयक आणता, विधेयक संमत करण्याची विनंती आम्हास करता, आम्हीही त्याला काही वेळा मान देतो हे आम्हाला मान्य आहे. हे विधेयक छोटे होते परंतु आम्ही विधेयक वाचत गेल्यानंतर आम्हाला यातील सर्व त्रुटी दिसून आल्या. विधिमंडळाने आपले अधिकार प्रशासकीय माध्यमातून करण्यास सुरुवात केली तर ते चांगले नाही. माझी आपल्याला विनंती आहे की, एक्झीक्यूटीव्ह ॲथोरीटी ही आयएएस अधिका-यांकडेच असते. हे मोठे प्राधिकरण असल्यामुळे त्यावर आयएएस अधिका-याची नियुक्ती करणे आवश्यक आहे. आयएएस अधिकारी आपल्या ताकदीप्रमाणे काम करीत असतात. परंतु शिडी संस्थानचे काम सन्माननीय सदस्य श्री. ससाणे साहेब चांगल्या पध्दतीने बघतच आहेत ना? त्यामुळे या विधेयकाच्या संदर्भात आपण विचार करावा, आज बील पास करुन नंतर हे बील पुन्हा अमेंड करावे.



SGJ/ KGS/ MMP/ प्रथम श्री. खर्चे.... 16:15

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** : सन्माननीय मंत्री महोदय, असे म्हणाले की, हे बील आपण प्रथम मंजूर करु व कामाला वेळ लागला तर पालक मंत्र्यांना प्राधिकरणाचा अध्यक्ष करण्याचा सुध्दा विचार करु असे त्यांनी सांगितले आहे.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, महालक्ष्मी मंदिराच्या विकासासाठी आपण या ठिकाणी प्राधिकरण करण्याचे वचन दिल्यामुळे मी आपले अभिनंदन करतो.

यानंतर श्री. अजित.....

अस्ुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण.......

तुळजापूर विकास प्राधिकरणाच्या धर्तीवर कोल्हापूर महालक्ष्मी मंदिर परिसराचा विकास करण्यासाठी कोल्हापूर विकास प्राधिकरणाचे विधेयक पुढील अधिवेशनात आणावे अशी माझी मंत्रिमहोदयांना विनंती आहे.

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, तुळजापूर विकास प्राधिकरणाच्या धर्तीवर कोल्हापूर विकास प्राधिकरणासंबंधीचा विषय मंत्रिमंडळात घेऊन पुढील अधिवेशनात त्याप्रमाणे विधेयक आणण्याचा प्रयत्न करण्यात येईल.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभापती ( श्री.भास्कर जाधव ):** विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडशः विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 15 (दोन्ही सम्मिलित) विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2008 चे. वि.स.स.क्र. 59 संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभापती** : सन 2008 चे वि.स.वि.क्रमांक 59 एकमताने संमत झाले आहे.

--------------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: मुंबई प्रांतिक महानगरपालिका (सुधारणा )विधेयक

L.A.BILL NO LXII OF 2008.

(A BILL FUTHER TO AMEND THE BOMBAY PROVINCIAL MUNICIPAL CORPORATIONS ACT,1949 )

श्री.हसन मुश्रीफ (नगर विकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, विधानसभेने संमत केल्याप्रमाणे, मी आपल्या अनुमतीने सन 2008 चे वि.स.वि.क्र.62, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, 1949 यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडतो.

**तालिका सभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय,मी आपल्या अनुमतीने सन 2008 चे वि.स.वि.क्र.62-मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, 1949 यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

सभापती महोदय, दिनांक 21.4.2008 रोजी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत राज्यातील 15 "ड"वर्ग महानगरपालिकांसाठी जकात कराऐवजी उपकर सुरु करण्याचा निर्णय घेण्यात आला. या निर्णयाच्या अनुषंगाने अध्यादेश काढण्यात आला. या विधेयकात प्रामुख्याने दोन गोष्टी आहेत. वस्तुंची किंमत वेगवेगळी ठरविली जात होती. त्या वस्तुंची व्याख्या करणे आणि महानगरपालिकेला शासनाला निर्देश देता यावेत असे स्पष्ट केलेले आहे. कोणकोणत्या वस्तुंचा समावेश उपकरामध्ये केला जाईल त्याचे शेड्युल जोडलेले आहे. ही पध्दत नवी मुंबई महानगरपालिकेमध्ये सुरु आहे. या विघेयकाद्वारे इतर महानगरपालिकांना आपण पर्याय देत आहोत. म्हणजे महानगरपालिकेने जकात किंवा उपकर यापैकी एक पर्याय निवडावा. आतापर्यंत वस्तुंची किंमत वेगवेगळी धरली जात होती. त्या वस्तुची व्याख्या करण्यासाठी हे विधेयक आणलले आहे.

प्रश्न प्रस्तुत झाला.

यानंतर श्री.गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते ( विधान सभेने निवडलले ) :सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी मांडलेल्या विधेयकावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.सभापती महोदय, शासनाचा निषेध करण्यासबंधीचा शब्द तरी किती वेळा वापरावयाचा. आता मी कोणत्या शब्दात खेद व्यक्त करु. विधेयक मांडत असतांना शासनाने विचार करुनच मांडले पाहिजे.

सभापती महोदय, ज्यावेळी अर्थसंकल्प सभागृहात सादर करण्यात आला होता तेव्हा या सभागृहामध्ये अर्थ राज्यमंत्री डॉ..सुनील देशमुख हे कोटावर गुलाबाचे फूल लावून आले होते. त्यावेळी त्यांचा सूट आणि सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांचे डायलाग सर्वांनी ऐकले होते. त्यावेळी जकात रद्द करण्यात आल्याची घोषणा केल्या नंतर सभासदांनी बाके वाजवली होती.
जकात रद्द करण्यात यावी अशी अनेक वर्षापासून व्यापा-यांची मागणी होती. यापुढे जकात रदद करण्यात येऊन उपकर लावण्यात येईल अशा प्रकारची घोषणा करण्यात आल्यानंतर सन्माननीय सदस्यांनी बाके वाजवली होती. संध्याकाळी प्रत्येक शहरातील व्यापा-यांनी फटाके वाजवले आणि एकमेकांना पेढे भरवून आनंद व्यक्त केला होता. त्यासबंधीची छायाचित्रे वर्तमानपत्रात दुस-या दिवशी छापून आली होती. जकात रद्द केल्याबद्दल व्यापा-यांना आनंद झाला होता. सांगली, कोल्हापूर, अमरावती या श्‌हरात मोठया प्रमाणावर फटाके वाजवून जल्लोष करण्यात आला होता शासनाला असे वाटले की आपण एक पाऊल पुढे टाकले आहे . संभाजी नगर येथे माननीय मत्रिमहोदयांचा सत्कारसुध्दा करण्यात आला होता. जकात रद्द करुन उपकर आणल्याबदददल लोकांनी त्यांचा सत्कार केला होता. उपकर लावण्यात आल्याबद्दल नाही तर जकात गेल्याबद्दल व्यापा-यांनी जल्लोष केला होता. परंतु शासन कोणाच्या खिशात हात घालणार आहे हे त्याना सांगितलेच नाही. कोणत्या पध्दतीने जनतेला लुटण्यात येणार आहे हे त्यांनी सांगितलचे नाही. जकात रद्द करण्यात आल्याबद्दल मंत्रिमहोदयांनी सत्कार घेतला आणि त्यानंतर हळूच अध्यादेश काढून उपकर लावण्यात आला . या अध्यादेशाला नियमित करण्यासाठी आता विधेयक मांडण्यात आलेले आहे. म्हणून मी मघाशी असे म्हणालो होतो की मी आता कोणत्या शब्दात खे्द व्यक्त करु. उपकर आणल्यानंतर व्यापा-यांच्या एक गोष्ट लक्षात आली होती आणि त्यांनी मोठया प्रमाणावर आंदोलन सुरु केले होते. सन्माननीय सदस्य श्री.बाजोरिया आता येथे उपस्थित नाहीत परंतु मी येथे संगू इच्छितो की अकोल्यामधील व्यापा-यांनी प्रचंड प्रमाणात आदोलन सुरु केले होते काल पर्यन्त आपण नाक्यावर जकात भरत होतो परंतु आता शासन आपल्या दुकासनात येऊन चोपडयामध्ये हातघालणार आहे. हे व्यापा-यांच्या लक्षात आले आहे. ऑडिटच्या संदर्भात एक



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

विधेयक मंजूरीसाठी आलेले आहे. आता सेल्स टॅक्सच्या वकिलांनासुध्दा ऑडिट करण्यास परवानगी देण्यात येणार आहे. तो एक वेगळाच विषय आहे.जकात असावी की उपकर असावा असा हा विषय असून सगळया नगरपालिकेमध्ये नेहमीच भांडणारे सर्व नगरसेवक एकमताने जकातच राहिली पाहिजे असे सांगत आहेत. त्यांना उपकर नको आहे. तेव्हा आता ज्या ठिकाणी शासनाने उपकर लावला आहे त्याठिकाणी पुन्हा जकात लावण्याची नामुष्की शासनावर आली आहे. अमरावती मध्ये तर इतिहासच घडला होता. त्या ठिकाणी जकात वसुली बंद झाली त्यामुळे दोन महिने जकात वसूल करण्यात आला नाही व उपकरही लावण्यात आला नाही. संभाजीनगर मध्ये सुध्दा तेच झाले होते. तेथे जकात वसुली बंद करण्यात आली होती त्यामुळे रोजचे उत्पन्न बंद झ्ाले. त्यामुळे कोटयावधी रुपयांचे नुकसान त्या त्या नगरपालिकांचे झाले होते. त्याचबरोबर उपकर काही जमा होत नव्हता त्यामुळे ठराव करण्यात आला होता व दोनतीन महिन्याच्या कालावधीत आंदोलने झाली होती या आंदोलनामध्ये तीन महिन्याची गॅप पडली होती नगरपलिकेला त्या काळात जकातीचे उत्पन्न मिळाले नाही आणि उपकर रद्द करुन जकात लावली होती परंतु तीही वसूल

झाली नाही. त्याचबरोबर ठेकेदार अगोदरचा ठेवावयाचा की नवीन ठेवावयाचा यासंबंधी नवीन वादळ निर्माण झाले होते. पूर्वी श्री.राजेश टोपे यांच्याकडे हा विभाग होता आता श्री.हसन मुश्रीफ यांच्याकडे हा विभाग देण्यात आला आहे. अशा प्रकारचे गोंधळाचे वातावरण संपूर्ण राज्यात निर्माण झाले होते. नवीन मुंबई सोडली तर इतर ठिकणी अशी स्थिती होती . नवीन महा नगरपालिकेच्या धर्तीवर आपण जकात रद्द करुन उपकर लावण्याची पध्दत सुरु करु असे सांगण्यात आले होते. त्याचबरोबर सर्व आयुक्तांना , नगरसेवकांना, महापौरांना डेमो दाखिण्याचा प्रयत्न केला व त्यांना असे सागितले की नवीन मुबईमध्ये अशा प्रकारची पध्दत आहे ती आपण देखील स्वीकारावी त्यानंतर लोकांनी ही पध्दत स्वीकारली होती. आता हे विधेयक आमच्याकडून मंजूर करुन घेण्यात येत आहे आणि जर आम्ही हे विधेयेक मंजूर केले तर शासन अमलात आणणार आहे काय ? आम्ही या विध्ेयकाच्या विरोधात आहोत. कारण ही पध्दत जनतेला नामंजूर आहे. तेव्हा असे विधेयक आम्ही ी का मजूर करावयाचे असा प्रश्न आहे. जनतेला जे नामंजूर आहे ते विधेयक आम्ही का पास करावे या पेक्षाही जनतेच्या दबावाखाली कायदा मंजूर



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ D/ KGS/ MMP/

श्री.दिवाकर रावते...

करीत असताना जकात बंद केलेली होती ती पुन्हा चालू ठेवली आहे.तेव्हा या विधे्यकावर अधिक चर्चा करण्या ऐवजी हे विधेयक मागे घेण्यात यावे अन्यथा जकात रद्द केलेली पुन्हा सुरु केलेली आहे. यामध्ये गडबड होऊन जाईल पूर्वी जकात लागू केलेली ती मागे घेऊन पुन्हा जकात सुरु केलेली आहे. तेव्हा शासनाचे नक्की धोरण काय आहे हे आम्हाला समजत नाही.

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/ KGS/ D/ MMP/ श्री. गायकवाड नंतर --- 16:30

श्री. रावते ....

एका ठिकाणी आम्हाला कायदा मंजूर करायला लावायचा आणि दुसरीकडे तो अमलात असलेला कायदा रद्द करून जकात आणायला सांगायचे. तेव्हा सरकारचे नेमके यामध्ये नक्की धोरण काय आहे ? तुम्ही बहुमताने येथे कायदा मान्य करून घ्याल परंतु आम्हाला तरी याला विरोध हा करावा लागणार आहे. कारण हे विधेयक मंजूर करण्याचे पाप आम्ही करू इच्छित नाही. हे वेगळेच विधेयक आहे. तेव्हा कृपा करून आपण हे विधेयक तहकूब करावे, मागे घ्यावे. जेथे जकात आहे तेथे अध्यादेश आणावा. मी आपल्याला सांगू इच्छितो की, जो कायदा वापरला जातो, ज्या कायद्याचा उपयोग होतो, जो जनहिताचा कायदा असतो व जो लोकांना मान्य असतो तो कायदा तुम्ही अमलात आणू शकता अन्यथा त्याला विरोध हा होणारच. आपण पुन्हा जकात कर सुरू केला आहे म्हणजे तेथे हा कायदा तुम्ही अमलात आणत नाही तर मग आता आमच्याकडून कशासाठी हा मंजूर करून घेत आहात ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, नवी मुंबईमध्ये याची अमलबजावणी सुरू आहे. बाकीच्या महानगरपालिकांमध्ये देखील आपल्याला तो लागू करावयाचा आहे मात्र तसे करताना आपण त्यांना पर्याय देत आहोत. कारण अनेक वस्तू जकातीमध्ये येत नाहीत. त्यामुळे ज्या महापालिकांमध्ये हे नाही त्यांनी तेथे आर्थिक सेसमध्ये काय करावे यासाठी हे विधेयक आहे. थोडक्यात आपण महापालिकांना यातून पर्याय देत आहोत. एक तर सेस स्वीकारा किंवा जकात कर स्वीकारा असे या द्वारा सांगत आहोत.

श्री. दिवाकर रावते : असे असेल तर मग आपण मला या विधेयकामध्ये पर्याय असल्याचे कलम वाचून दाखवावे.

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, आपण ते जेथे चालू केले आहे तेथे कायदा करण्याची आवश्यकता आहे, ते बंद आपण केलेले नाही. म्हणून मुंबई महापालिकेत हे सुरू आहे, त्यांना याची आवश्यकता आहे. म्हणूनच आपण हे मंजूर करावे अशी माझी आपणास विनंती आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, कायदा असा होत नाही. तुमची मर्जी असेल त्याप्रमाणे कायदा स्वीकारा असे कधीही होत नाही. खालच्या सभागृहामध्ये गोंधळात आपण हे विधेयक मंजूर करून येथे आणले आहे.

**तालिका सभापती** : आता यानंतर सन्माननीय सदस्य श्री.अरूण गुजराथी हे बोलतील.

..... 3ओ 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरूण गुजराथी (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, विधानसभेने पारित केलले वि.स.वि.क्रमांक 62 या विधेयकाला समर्थन देत असताना मी त्यावर माझे विचार मांडण्यासाठी उभा आहे. सभापती महोदय, हे विधेयक येथे येण्यापूर्वी आपण जकात कर रद् करणारे विधेयक मंजूर केले आणि महाराष्ट्रातील महापालिकांमधील, ड वर्ग महापालिकांतील जकातकर बंद करण्यासंबंधीचा निर्णय घेतला. सरकारच्या या निर्णयाचे स्वागत देखील फार मोठ्या प्रमाणात झाले. जकात नको ही सर्वांचीच भावना होती. Collection of octroi is worst form of collection of taxes. कारण जकात कर नाक्यावर शेकडो वाहने उभी राहतात त्यातून इंधनाचा कसा तेथे वापर होतो याची माहिती आपणा सर्वांनाच आहे. प्रत्येक वाहनाचे तेथे दोन ते 10 तास वाया जात असतात. म्हणूनच जकात नकोच ही भावना प्रबळ होत गेली आणि शासनानेही ती उचलून धरली. मग शासनाने उपकर आणला. पण आता तो उपकर महापालिकांनी का नाकारला याचा आपण शोध घेणे आवश्यक आहे असे मला वाटते. या कायद्यात व्यापाऱ्यांच्या दृष्टिकोनातून जी काही पुस्तके सीझ करण्याची तरतूद आहे आणि दंड करण्याची तरतूद आहे त्यामुळे व्यापारी बिथरले आणि म्हणू लागले की, ही तरतूद असलेला कायदा आम्हाला नको. शेवटी तरतूद ही असली पाहिजे कारण तरतुदीशिवाय आपण कोठेही पुढे जाऊ शकत नाही. परंतु महापालिकांनी, व्यापाऱ्यांनी ते का नाकारले याचा अभ्यास करणे गरजेचे आहे. नवी मुंबईमध्ये हा उपकर आहे मग इतर महापालिका तो का स्वीकारत नाहीत याचाही आपण विचार केला पाहिजे. ...

( यानंतर श्री. सरफरे .... 3पी 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी...

सभापती महोदय, उपकर वाईट आहे अशातला भाग नाही, परंतु ते का आपण स्वीकारीत नाही. दरवर्षी जकात कराच्या माध्यमातून जितके उत्पन्न मिळते त्यापेक्षा 8 ते 10 टक्के जास्त उत्पन्न मिळेल अशापध्दतीने तो कर आपण ठेवला पाहिजे. हे कर लावतांना कोणते दर असले पाहिजे याचा विचार झालेला नाही. बऱ्याच मानगरपालिकांना ज्यावेळी आपणप सूट दिली की,ज्यांना सेस नको असेल त्यांनी ऑक्ट्रॉय घेतला पाहिजे. त्यामुळे ऑक्ट्रॉय घ्यायला भराभर सुरुवात झाली. म्हणजे आपण काय करावयास गेलो, आणि काय झाले आणि त्याचा फायदा कुणाला झाला याचा विचार केला तर फायदा कुणालाही झाला नाही. शासनाला एक पाऊल मागे यायला लागले त्यासाठी हरकत नाही. परंतु आपण यामध्य`सुधारले पाहिजे. आपण वॅटवर सरचार्ज लावावा तर हे सर्व बंद होईल. आपल्याला उपकर लावण्याची आवश्यकता नाही. महाराष्ट्रातील ड वर्ग महानगरपालिकांतून गेल्या वर्षी जितका कर आला तितका सरचार्ज लावल्यातर दुसरी एजन्सी निर्माण होणार नाही. वॅटच्या माध्यमातून तो कर आपल्याकडे येईल तो आपण स्वीकारला नाही याचे कारण मंत्रिमहोदयांनी सांगावे. परंतु हा कायदा कायम स्वरुपी होऊ शकत नाही, हे घ्या किंवा ते घ्या अशाप्रकारचे ऑप्शन कोणत्याही कायद्यात असू शकत नाही. This is a temporary arrangement or makeshift arrangement. त्वरेने उत्पन्न सुरु व्हावे म्हणून तातपुरती केलेली सोय आहे. या कायद्याचा स्वीकार करतांना त्यातून अल्टिमेटली नाका बंद झाला पाहिजे, ऑक्ट्राय बंद झाला पाहिजे. आणि सेसच्या जागी वॅटवर सरचार्ज जसा इतर राज्यात लावला जातो त्याप्रमाणे केले तर नगरपालिका, महानगरपालिकांचा व्यापाऱ्यांचा त्याला पाठिंबा मिळेल. म्हणून माझी विनंती आहे की, आपण कायदा संमत करु या तो केला नाहीतर अडचण निर्माण होईल आणि म्हणून तुम्ही त्वरेने पावले उचलून सांगा की, ज्याला ऑक्ट्रॉय हवा असेल त्यांनी तो घ्यावा आणि ज्यांना उपकर हवा असेल तर त्यांनी तो घ्यावा ही आपण तातपुरती व्यवस्था केली आहे. कायमस्वरुपी विचार करतांना आपल्याला नाके हटवावे लागतील. उपकर हवा असेलतर कायद्यातील कडक तरतूदी आपल्याला काढून टाकाव्या लागतील. किंवा त्यामध्ये सुधारणा करावी लागेल. अल्टिमेटली वॅटवर सरचार्ज लावून इतर राज्यात जी पध्दत चालू आहे त्याच पध्दतीने आपल्या राज्याला पुढ जावे लागेल. याचा आपल्याला विचार करावा लागेल असे मी यानिमित्ताने सुचवितो.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मी आपल्या निदर्शनास आणू इच्छितो की, माझ् याजवळ विधेयक क्रमांक 72 ची प्रत आहे. या विधेयकामध्ये स्पष्ट आणि सुंदर भूमिका मांडण्यात आली आहे. हा कायदा जर तुम्हाला स्वीकारावयाचा असेल तर स्वीकारा, स्वीकारावयाचा नसेल तर नका स्वीकारु. अशाप्रकारचे ऑप्शन या विधेयकामध्ये आहे. यामध्ये आपण म्हटले आहे की, "इमारती व जमीन यावर भांडवली मूल्य आधारीत किंवा सर्व मालमत्ता कर बसविण्याच्या पध्दतीत" म्हणजे आपण हे स्वीकारावे किंवा ते स्वीकारावे. अशाप्रकारे कायद्यामध्ये ऑप्शन दिले आहे. म्हणून मी म्हणालो की, आपण उभे राहून अशाप्रकारची सुधारणा या कायद्यामध्ये करावी. त्याला आम्ही संमती देऊ.

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मी सभागृहामध्ये स्पष्ट केले आहे की, उपकर लावण्याबाबत मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये निर्णय घेण्यात आला आणि त्यानंतर अध्यादेश काढण्यात आला. त्याप्रमाणे नगरपालिकांनी जकात बंद करुन त्याठिकाणी सेस चालू केला. ज्यावेळी तो सेस सुरु केला त्यावेळी त्यामध्ये अनेक त्रुटी त्या त्या महानगरपालिकेच्या त्या विभागामध्ये आढळून आल्या. उदा. नवी मुंबईमध्ये हा प्रयोग यशस्वी कां झाला? मीरा-भाईंदरमध्ये सुध्दा हा प्रयोग यशस्वी कां झाला? याचे कारण त्याच्या जवळपास सर्व महानगरपालिकांचा एरिया होता. त्याठिकाणी अडकून पडलेला माल दुसऱ्या वस्तीमध्ये आणता येत नव्हता. परंतु ग्रामीण भागातील ज्या महानगरपालिका आहेत. उदा कोल्हापूर महानगरपालिकेच्या क्षेत्राला लागून दोन-तीन कि.मी.वर शिरवली म्हणून ग्रामपंचायतीचा भाग आहे. त्याठिकाणी लोक आपल्या वस्तू आणून ठेवायला लागले. आणि त्या ठिकाणाहून गावामध्ये वस्तू आणायला लागले. त्यामुळे कोल्हापूर महानगरपालिकेचे नुकसान झाले. हा कायदा आपण करतांना बऱ्याच गोष्टी आपल्या लक्षात आल्या नाहीत. वॅटवर सरचार्ज लावण्याची सूचना माननीय सदस्य श्री. गुजराथी साहेबांनी केली. जकात बंद झाली पाहिजे, व्यापाऱ्यांना त्रास होत होता, वाहने थांबत होती.

(यानंतर श्री.बरवड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हसन मुश्रीफ ....

त्यामुळे बराच परिणाम होत होता. या गोष्टीशी शासन सहमत होते म्हणून तर आपण कायदा आणला. यामध्ये त्रुटी दिसल्या त्यामुळे ताबडतोबीने आपण मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये पुन्हा सांगितले की, आपण दोन्ही पैकी एक पर्याय स्वीकारावा. जे उपकर स्वीकारणार आहेत त्यांच्यासाठी हे विधेयक आहे. आम्ही आज कायदा केला म्हणजे सगळ्यांनी उपकर घ्यावा असे नाही. त्यांना आपण पर्याय ठेवलेला आहे. या विधेयकामध्ये जर नसेल तर या पर्यायाचा आवश्यक तो बदल आपण यामध्ये करु. परंतु आपण हे विधेयक मान्य करावे. कारण मिरा-भाईंदर महानगरपालिकेमध्ये ही पध्दत सुरु आहे. त्यामुळे त्यांचे फार नुकसान होत आहे.

श्री. दिवाकर रावते : या विधेयकामध्ये 'जकातकराऐवजी' अशी शब्दरचना नाही.

---

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MMP/ D/

डॉ. नीलम गोऱ्हे ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदय मघापासून जे मुद्दे मांडत आहेत त्यामध्ये एक गोष्ट स्पष्ट होत नाही आणि ती गोष्ट म्हणजे संपूर्ण स्थानिक स्वराज्य संस्थांकडून सरकारकडे जो पैसा जातो तो परत त्यांच्याकडे वेळेवर येत नाही ही अनेक महानगरपालिकांची व्यथा आहे. आपण नवीन मुंबई महानगरपालिकेचे मघापासून दहा वेळा उदाहरण दिले. मला या ठिकाणी सांगितले पाहिजे की, अनेक महानगरपालिकांचा या उपकराला का विरोध आहे याची कारणे आपण सभागृहासमोर मांडली काय ? आता आपण कायदा मंजूर करुन घेऊन तो बदलणार आहात हे स्पष्ट करणार काय ? विरोधी पक्षांना एक तर अती चांगुलपणामुळे महामूर्ख ठरण्याची परिस्थिती येते किंवा आपण आम्हाला बावळट समजत आहात. मुद्दा असा आहे की, एकदा विधेयक मंजूर झाल्यावर मंत्रिमहोदय बदलले जाणार. अनेक वेळेला वेगवेगळ्या पध्दतीने जबाबदाऱ्यांचे फेरवाटप होते आणि कायदे आहे तसेच राहतात. असे जर आपण प्रत्येक वेळी कायदे बदलण्यासाठी करणार असलो तर खरोखर ते अस्तित्वात येतात काय ? औरंगाबाद तसेच अनेक महानगरपालिकांनी या उपकराला का विरोध केला याची स्पष्ट कारणे आपण आम्हाला सांगत नाही. सभापती महोदय, मला माननीय मंत्रिमहोदयांबद्दल वैयक्तिक अतिशय आदर आहे. तरी मला सांगावयास पाहिजे की, आपण जे आश्वासन देता त्यानंतर आपण असे म्हणता की वेळ आली तर बदलू. ऊसतोड कामगारांच्या प्रश्नाचा या ठिकाणी प्रत्यक्ष संबंध नसला तरी जी जी आश्वासने दिली जातात त्यांची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी कायदेशीर दृष्ट्या त्या मंत्रिमहोदयांवर राहतेच असे नाही आणि या सभागृहातील जी आश्वासने असतात ती कागदोपत्री निघून जातात. अनेक महानगरपालिकांची ही व्यथा होती की, उपकर घेतला जाईल पण आम्हाला ते पैसे मिळेवर मिळणार नाहीत. म्हणून महानगरपालिकांनी विरोध केला. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी यांनी सांगितले की, जकातीचा त्रास होतो. ही वस्तुस्थिती आहे की, व्यापाऱ्यांना जकातीचा त्रास होतो. परंतु महानगरपालिकेला स्वत:चे उत्पन्न कमीतकमी त्रास होऊन जमा करावयाचे असेल तर जकातीच्या संदर्भात देखील वेगवेगळे प्रयोग अनेक महानगरपालिका करीत आहेत. मग आपण जेव्हा अशी विधेयके आणता त्यावेळी मला या ठिकाणी एक प्रश्न उपस्थित करावयाचा आहे. शासन आणि आपण सर्वजण असे म्हणतो की, आम्ही कै. यशवंतराव चव्हाण याचे पाईक आहोत. मग उपकराला तुमचा का विरोध आहे याबाबत आपण

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MMP/ D/

डॉ. नीलम गोऱ्हे ......

10 महानगरपालिकांचे तरी मत विचारले का ? आपण स्थानिक स्वराज्य संस्थेच्या बाबतीत कोणतेही विधेयक आणत असताना जिल्हा परिषदा असोत किंवा महानगरपालिका असोत त्यांची मते विचारात न घेताच आपण अशी विधेयके लादता, ही गोष्ट अयोग्य आहे. एका बाजूला स्थानिक स्वराज्य संस्था हा या लोकशाहीचा पाया आहे असे आपण म्हणतो आणि स्थानिक स्वराज्य संस्थांमधील प्रतिनिधींचे आणि त्या ठिकाणी जे जे लोक बहुमताने असतील किंवा अल्पमताने असतील त्यातील तज्ज्ञांची मते, सामान्य माणसांची मते, तेथील अधिकाऱ्यांची मते, नगरसेवकांची मते विचारात घेतली का ? निदान महानगरपालिकांना आपण अधिकृतरीत्या कळविले का की, आम्ही उपकराचा चॉईस देणार आहोत. मग जर का सगळ्या महानगरपालिका म्हणाल्या, 22 पैकी 21 जण जर असे म्हणाले आम्हाला जकात नको, उपकर सुध्दा नको आणि काही तरी वेगळा मार्ग आणा तर गोष्ट वेगळी आहे. आपण एकट्या नवीन मुंबईचे उदाहरण देऊन परत परत जो आपल्याला निर्णय बदलावा लागला तो आपण विधिमंडळावर कसा काय लादता हा प्रश्न माझ्यापुढे निर्माण होतो. हे महानगरपालिकांना पर्याय म्हणून असेल असे वाक्य त्यामध्ये नाही. आपण महानगरपालिकांचे मत विचारात घेत नाही. आपण अशी विधेयके आणून फक्त स्वत:चे काम साधून घेता आणि विरोधकांना प्रत्येक ठिकाणी टीका सहन करावी लागते. म्हणून मला असे वाटते की, ही फसवणूक तरी बंद करा. एवढे बोलून मी माझे भाषण संपविते.

---

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. रावते साहेबांनी एक मुद्दा सांगितला होता. मी आता उत्तराचे भाषण करीत नाही पण एकच सांगतो की, 15 नोव्हेंबर, 2008 रोजी आपण एक अध्यादेश काढलेला आहे आणि या अध्यादेशाव्दारे आपण जकात ऐवजी उपकर बसविण्याचा अध्यादेश काढलेला आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी जे सांगितले ते पुन्हा सांगावे.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मी असे म्हणालो की, ज्या ज्या महानगरपालिकेमध्ये सध्या उपकर सुरु आहे त्यासाठी हे विधेयक आणलेले आहे. याबाबत अध्यादेश काढलेला आहे. मी हा अध्यादेश वाचून दाखवितो.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, पान 2 वरील "70-क" मध्ये असे म्हटले आहे की, "ज्या शहरामध्ये आयात मालावर यथामूल्य "जकात" किंवा "उपकर" बसविला जातो," म्हणजे आपला पॅटर्न बदलला आहे. काही ठिकाणी जकात आहे तर काही ठिकाणी उपकर आहे. आयएएस अधिका-यांनी ही वाक्यरचना त्यांच्या सोयीप्रमाणे केली आहे. त्यात पुढे असे म्हटले आहे की, "अशा शहरामध्ये आयात करण्यात येणाऱ्या मालाच्या संबंधात "वस्तूचे मूल्य" म्हणजे, मूळ बीजकामध्ये नमूद केलेले मूल्य, आणि त्यामध्ये अशा वस्तूंवरील जहाज वाहतूक मालप्रेषणविषयक देय रक्कम, विमा, सीमाशुल्क, उत्पाद शुल्क, प्रतिशुल्क, कोणताही विक्रीकर (असल्यास), मूल्यवर्धित कर, परिवहन खर्च, विक्रेत्याचा वाहतूक खर्च, वाहन खर्च आणि इतर खर्च अनुषंगिक खर्च यांचा समावेश होईल." पुढे खंड 3 मध्ये असे नमूद केले आहे की, "मुख्य अधिनियमाच्या कलम 127 मधील, पोट-कलम (2) मध्ये, खंड (अअ) मध्ये, पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल, परंतु, राज्य शासनास, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे महानगरपालिकेला, उपभोग, उपयोग किंवा विक्री यासाठी शहरामध्ये होणा-या मालाच्या प्रवेशावर जकातीऐवजी उपकर बसविण्याकरिता, निदेश देता येतील." सध्या सुरु असलेली जकात सुरु ठेवण्याचा त्या महानगरपालिकेला अधिकार देता येईल असे वाक्य त्यामध्ये घातले तर सध्याची व्यवस्था टिकेल, अन्यथा, शासनाला या कायद्याप्रमाणे पूर्ण उपकर बसविणे क्रमप्राप्त होईल. अशीच या कायद्याची तरतूद आहे.

श्री.हसन मुश्रीफ : या अध्यादेशाद्वारे महानगरपालिकांना उपकर लावण्यासंबंधी निर्देश देण्याचे अधिकार शासनाने प्राप्त करुन घेतलेले आहेत. सदरहू अधिकारानुसार दि.21.10.2008 रोजी अधिसूचना काढून उपकर लागू करण्याचे निर्देश 14 "ड" वर्ग महानगरपालिकांना देण्यात आल्यानंतर परिस्थितीचा विचार करुन त्याच अध्यादेशाद्वारे दि.15.11.2008 रोजी अधिसूचना काढून महानगरपालिकांमध्ये सेस केव्हा लागू करावयाचा यासंबंधी निर्णय घेण्याची मुभा दिलेली आहे आणि त्यांना ती मुभा मिळालेली आहे. त्या महानगरपालिकांमध्ये जकात कर सुरु करावयाचा

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हसन मुश्रीफ.....

की उपकर सुरु करावयाचा याबाबत अध्यादेश काढून शासनाने त्यांना पर्याय दिलेला आहे. ज्या महानगरपालिकांमध्ये सध्या उपकर सुरु आहे त्या वस्तूंची व्याख्या काय असावी, कारण जकात करात त्या वस्तूंची व्याख्या वेगळी होती, उपकरामध्ये व्याख्या वेगळी आहे. याबाबतची सूचि निश्चित करण्यासाठी हे विधेयक आणलेले आहे.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, मंत्रिमहोदयांचे म्हणणे आहे की, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी जे म्हटले त्याप्रमाणे त्याचा अर्थ होत नाही. त्यामुळे सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी पुन्हा विधेयकातील तरतुदी वाचून दाखविल्या आहेत. आपल्या म्हणण्यानुसार यासाठी शासनाने अध्यादेश काढलेला आहे. मग त्या अध्यादेशाचे रुपांतर करणारे विधेयक सभागृहासमोर आणले असते तर ते समजू शकलो असतो. शासनाने याबाबत नियमावली तयार केलेली आहे. मंत्रिमहोदय, आम्हाला जे पाहिजे ते आपण आता स्पष्टपणे म्हटले आहे. परंतु कायद्यात तशी तरतूद नाही. यामध्ये अशी तरतूद केली आहे की, "परंतु, राज्य शासनास, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे महानगरपालिकेला, उपभोग, उपयोग किंवा विक्री यासाठी शहरामध्ये होणा-या मालाच्या प्रवेशावर जकातीऐवजी उपकर बसविण्याकरिता, निदेश देता येतील." शासनाने किंमतीची व्याख्या केली असती तर ठीक होते. या विधेयकातील तरतुदींचे सविस्तरपणे वाचन केल्यावर या विधेयकातील बारीकसारीक गोष्टी आमच्या लक्षात आल्या आहेत. यामुळे महागाई आणखी वाढणार आहे. जो माणूस विम्याचा हप्ता भरतो, त्या माणसाचे नुकसान झाल्यावर त्याला नुकसान भरपाई मिळते. आता मंत्रिमहोदयांनी जे म्हटले आहे ते शासनाच्यावतीने सुधारणाच्या स्वरुपात सभागृहात आणले पाहिजे. त्यानंतर शासनाची भूमिका स्पष्ट होईल आणि शासन हे करु शकते. अन्यथा, विभागाचे अधिकारी आपल्याला असे म्हणतील की, सभागृहात जे भाषण करण्यात आले होते तो भाग वेगळा आहे, पण सभागृहाने असा कायदा पास केलेला आहे.

यानंतर श्री.शिगम....

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. मधुकर चव्हाण...)

माननीय मंत्री महोदय बरोबर बोलले. परंतु "either ... or" असे झालेले नाही. तेव्हा त्याबाबतीत त्यांनी खुलासा करावा.

श्री. हसन मुश्रीफ : मी मघाच पासून हे सांगण्याचा प्रयत्न केलेला आहे. 15 नोव्हेंबरला अध्यादेश काढून ते अधिकार आणि पर्याय आपण दिलेले आहेत. जेथे आपण उपकर लावणार आहोत त्याबाबतीत वस्तुंची व्याख्या केलेली नव्हती त्यामुळे नुकसान होत होते. तेवढया पुरतीच या विधेयकाची व्याप्ती आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्या प्रमाणे आम्ही त्यामध्ये निश्चितपणे क्लॅरिटी आणत आहोत. त्याबाबतीत कोणताही संदेह राहाणार नाही अशा प्रकारची व्यवस्था शासन निश्चितपणे करील.

--

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चंद्रकांत पाटील (पुणे विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मुंबई प्रांतिक महानगरपालिका (सुधारणा) विधेयकावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

जकात नको म्हणून व्यापा-यांनी वर्षानुवर्षे आंदोलने केली. जकात ऐवजी दुसरा कर द्या असे या विधेयकामध्ये म्हटलेले आहे. जकात हा जाचक कर आहे. व्यापा-यांना व्यापर करणे हा गुन्हा वाटू लागला आहे. व्यापारी व्यापार करतो म्हणून त्याला ऑक्ट्राय भरावा लागतो, शॉप गुडस् ॲक्ट खाली तो व्यापार करतो म्हणून त्याला सर्व्हिस टॅक्स, इन्कम टॅक्स, आता नवीन आलेला फ्रिन्ज बेनिफिट टॅक्स असे टॅक्स लावण्यात आलेले आहेत. त्यामुळे व्यापार करणे त्याला गुन्हा वाटू लागला आहे. ऑक्ट्राय ही कन्सेप्ट मुळात चुकीची आहे. एखादा माणूस शहरामध्ये 10 कोटीचा व्यापार करीत असेल आणि त्याला 4 टक्के टॅक्स भरावा लागत असेल तर त्यामुळे त्याला काही विशेष सवलती देण्यात येत नाहीत. सर्वसामान्य माणसाप्रमाणेच त्याला सर्व सुविधा मिळतात. सर्वसामान्यांना जेवढे पाणी मिळते तेवढेच पाणी त्याला मिळते. कोणत्याही सुविधा त्याला अधिक प्रमाणात मिळत नाहीत. युती सरकारच्या काळामध्ये जेव्हा नगरपालिकांचा ऑक्ट्राय काढला त्यावेळी कोणताही पर्यायी टॅक्स आला नाही. व्हॅट येताना हे गृहीत होते की, व्हॅटमधून जो फायदा मिळेल त्यामधून जाचक टॅक्स कमी होतील. व्हॅटमुळे महाराष्ट्र शासनाचा महसूल 11 हजार कोटीने वाढला. सभापती महोदय, व्यापा-यांनी 15 दिवस व्यापार बंद ठेवला होता. मोठया प्रमाणावर व्यापारी रस्त्यावर आले होते. त्यांच्या भावना आपण लक्षात घ्याव्यात. हा ऑक्ट्राय नको आणि उपकरही नको असे व्यापा-यांचे म्हणणे आहे. व्यापा-यांना वेगळे पुस्तक ठेवावे लागू नये म्हणून गुजरात सरकारने व्हॅटमध्ये 1 टक्का वाढ केली. व्हॅटचे बर्डन 1 टक्का जास्त आले. त्यामधून महानगरपालिकांना पैसे मिळाले. माझे म्हणणे असे आहे की, यामुळे व्यापार करणे हा गुन्हा केल्यासारखे होईल आणि व्यापार हा हळूहळू शहरातून बाहेर जाईल. उदा. शिरोळा हे गाव शहरापासून दोन कि.मी.अंतरावर आहे आणि तेथे ग्रामपंचायत आहे. तर मग सर्व व्यापार तेथून चालेल. तेव्हा ऑक्ट्राय नको आणि उपकरही नको असे माझे मत आहे. म्हणून हे विधेयक शासनाने मागे घ्यावे, एवढे बोलून मी माझे दोन शब्द संपवितो.

---

....3...



MSS/ D/ MMP/ पूर्वी श्री. खंदारे 16:50

श्री. विनोद तावडे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2008चे वि.स.वि.क्रमांक 62 - मुंबई प्रांतिक महानगरपालिका (सुधारणा) विधेयकावर बोलण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, मी जास्त भाषण करणार नाही. फक्त एकाच मुद्याबाबत माननीय मंत्री महोदयांनी स्पष्टीकरण करणे आवश्यक आहे. ज्या महापालिका उपकर लावतील तो त्यांनी कसा लावायचा, काय लावायचा यासंबंधीचे हे विधेयक आहे. जकात किंवा उपकर लावण्यासंबंधीचा जो अध्यादेश काढण्यात आलेला आहे त्याचे विधेयक अजून यावयाचे आहे. मग त्यामधील उपकर लागला तर काय ? त्या विधेयकाची शासनाला गरज नाही काय ? आपण एक पायरी सोडून एकदम पुढे जात आहात, त्यामुळे आपले हंसे होईल. तेव्हा आधी काढलेल्या अध्यादेशाचे विधेयकात रुपांतर करावे एवढेच मला माननीय मंत्री महोदयांच्या निदर्शनास आणून द्यायचे आहे.

--

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ KGS/ MMP/ KTG/प्रथम श्री. शिगम 16:55

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, दिनांक 15.11.2008 रोजी अधिसूचना काढली होती. त्यामध्ये आपण स्पष्टपणे म्हटले होते. आज जे विधेयक आणतो आणले आहे, त्या अनुषंगाने निर्देश देण्याचे अधिकार आपण घेत आहोत. या निर्देशाव्दारे आपण त्यांना जे लागेल ते देण्याचा आपला प्रस्ताव आहे. मी दोन गोष्टी मघापासून सांगण्याचा प्रयत्न करीत आहे. ज्या महानगरपालिकेला आता ऑक्ट्राय चालू आहे, ज्या महानगरपालिका हा पर्याय निवडणार आहेत. तेवढया मर्यादेपूरते हे विधेयक आहे. ज्यांना ऑक्ट्रॉय चालू करावयाचा आहे, त्याच्याबद्दलचा अध्यादेश आहे आणि त्यासंबंधीचे निर्देशही देणार आहोत. या दोघांमध्ये संदिग्धता आम्ही ठेवणार नाही. जे आवश्यक असेल तेवढेच आम्ही करणार आहोत.

**तालिका सभापती (श्री.भास्कर जाधव )** : सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांनी एक नवीन प्रश्न या ठिकाणी निर्माण केला आहे. आपण म्हणता आम्ही अध्यादेश काढला होता. प्रोसीजर अशी आहे की, अध्यादेश सभागृहासमोर आणून त्याचे कायद्यात रुपांतर आपण करतो. आपण विधेयक क्रमांक 62 सभागृहासमोर आणलेले आहे. आपण पूर्वी काढलेल्या अध्यादेशाचे कायद्यात रुपांतर करीत आहात काय एवढीच माहिती सन्माननीय सदस्यांना सांगावी.

श्री. हसन मुश्रीफ : हे वेगळे आहे.

( गोंधळ )

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्यांनी सांगितले हे वेगळे आहे.

श्री. हसन मुश्रीफ : सन्माननीय सदस्यांच्या मनामध्ये गोंधळ निर्माण झालेला आहे.

**तालिका सभापती** : आता आपण स्टेप बाय स्टेप जाऊ.सन्माननीय सदस्यांच्या मनातील पहिला संदेह दूर झाला आहे. त्यामुळे मंत्री महोदयांचे म्हणणे सन्माननीय सदस्यांनी पूर्णपणे ऐकून घ्यावे.

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मी मघापासून सांगण्याचा प्रयत्न करीत आहे की, पहिल्यांदा शासनाने उपकराचा अध्यादेश काढला होता. तो नवी मुंबई वगैरे ठिकाणी लागू झाला. त्यानंतर 15 नगरपालिकेंच्या संबंधी अध्यादेश काढला. त्यास विरोध झाला. त्यासाठी आपण पुन्हा वेगळा अध्यादेश काढला. तो काढल्यानंतर तेथे परत जकात सुरु झाली. ज्या ठिकाणी उपकर सुरु आहे यासंदर्भातील हे विधेयक आहे. त्या विषयी दिनांक 3.10.08 च्या अध्यादेशाप्रमाणे त्यांना निर्देश देण्याचे अधिकार आपण प्राप्त करुन घेत आहोत. यासंदर्भातील संदिग्धता अजिबात ठेवणार

2..

श्री. हसन मुश्रीफ...

नाही हे मी वारंवार सांगतो आहे. ज्यांना उपकर घ्यावयाचा आहे, त्यांनी उपकर घ्यावा, ज्यांना जकात कर घ्यावयाचा असेल त्यांनी जकात कर घ्यावा. याची सर्व संदिग्धता आपण संुपुष्टात आणणार आहोत.

**तालिका सभापती** : सन्माननीय मंत्री महोदयांनी असे सांगितले आहे की, ज्या महानगरपालिकांमध्ये सध्या उपकर सुरु आहे. परंतु ज्या वेगवेगळया वस्तू आहेत, त्या वेगवेगळया वस्तूंवर महानगरपालिका वेगवेगळया कराची आकारणी करते. यात सुसूत्रता यावी असे मंत्री महोदयांचे म्हणणे आहे असे मला वाटते.

( गोंधळ )

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, आदरणीय मंत्री महोदयांनी प्रारुपातील पहिल्याच परिच्छेदात काय लिहीले ते वाचावे. " ज्याअर्थी यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम,1949 यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती आणि म्हणून, त्यांनी दिनांक 3 ऑक्टोबर, 2008 रोजी मुंबई प्रांतिक महानगरपालिका (सुधारणा) अध्यादेशृ 2008 प्रख्यापित केला होता.

ज्याअर्थी, उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करणे इष्ट आहे, त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या एकोणसाठाव्या वर्षी, या व्दारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे. एवढाच परिच्छेद वाचला तर सर्व गोष्टी लक्षात येतील. तुमचा जो अध्यादेश होता, त्याला रेग्युरलायझेशन करण्याचे विधेयक होते...

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत.......

तुमचे पहिले प्रिॲम्बल वेगळे आहे. म्हणून माझी विनंती आहे की, हे विधेयक शासनाने मागे घ्यावे.

श्री.हसन मुश्रीफ : हा अध्यादेश वेगळा आहे. 3.10.2008 रोजी काढलेल्या अध्यादेशाचे विधेयकात रुपांतर करीत आहोत. या विधेयकाद्वारे आपण निर्देश देण्याचे अधिकार घेत आहोत.

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, आपण कायदा करण्यासाठी निघालो आहोत. भावनिक पध्दतीने जरी विचार करीत असलो तरी कायद्याच्या भाषेत याठिकाणी कुठेही उद्धृत केलेले नाही. मुळात अध्यादेशामध्ये हे किंवा ते असा ऑप्शन आहे. विधेयकात तो नाही. शासन सरळ सरळ डिक्टेट करीत आहे. मंत्रीमहोदय म्हणत आहेत की, आम्ही निर्देश देणार आहोत. मूळचा अध्यादेश काय म्हणतो? हे करा किंवा ते करा असा तुम्हाला ऑप्शन आहे. म्हणून माझी विनंती आहे की, वादविवाद न करता विधेयक मागे घेण्यात यावे आणि नव्याने विधेयक इंट्रोडयूस करावे. त्याचा रेफरन्स देऊन बिल मंजूर करणे चुकीचे होईल.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, मंत्रीमहोदयांनी भाषणात सांगितले की, त्याची तारीख देखील एकच आहे. तो दिनांक 3.10.2008 रोजी अंमलात आला असे मानण्यात येईल. मग चर्चा करण्याचा प्रश्न येतो कुठे? तो अध्यादेश वेगळा आहे आणि हे विधेयक वेगळे आहे.

श्री.हसन मुश्रीफ : ती अधिसूचना होती आणि हा अध्यादेश आहे. 3.10.2008 च्या अध्यादेशासाठी विधेयकात दुरुस्ती करीत आहोत. हेतू स्पष्ट आहे, नवी मुंबई आणि इतर महानगरपालिकांमध्ये जी उपकराची पध्दत चालू आहे त्या उपकराची व्याख्या स्पष्ट व्हावी, वस्तू स्पष्ट व्हाव्यात, जेथे नवीन पध्दत सुरु केली तेथे संरक्षण द्यावे हा हेतू आहे. सन्माननीय सदस्यांनी व्यक्त केलेल्या भावनांशी मी सहमत आहे. या राज्यातील जकात कर दूर व्हावा आणि व्यापारी व वाहनांना होणारा त्रास थांबविण्यासाठी काय करता येईल हा मुद्दा आहे. यातील संदिग्धता आम्ही दूर करु. कोणताही गोंधळ ठेवणार नाही हेच मी यापूर्वी सांगितले आहे.

डॉ.दीपक सावंत : मंत्रीमहोदय सभागृहाची दिशाभूल करीत आहेत.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : बी-बियाण्यांच्या कायद्यासंदर्भात हीच विसंगती निर्माण झाली होती. ही चूक मंत्रीमहोदयांची किंवा विभागाच्या सचिवांची नाही. कायद्याचे फ्रेमिंग करणाऱ्या विधी विभागाचा हा घोळ आहे. श्री.शिंदेकर हे विधीमंडळ सचिवालयात रुजू झाल्यापासून या भानगडी सुरु झाल्या आहेत. अध्यादेशाचे विधेयकात रुपांतर करीत असताना एकाच शब्दासाठी खालच्या सभागृहात दीड तास चर्चा झाली. अध्यादेश एक आणि विधेयक दुसरेच होते. म्हणून आम्ही विनंती करीत आहोत की, ज्यांना ऑक्ट्रॉय पाहिजे त्यांना ऑक्ट्रॉय द्या. परंतु रितसर कायदा आणून द्या. जो अध्यादेश काढला आहे त्याप्रमाणे हे विधेयक आलेले नाही.

श्री.अरविंद सावंत : मंत्रीमहोदय अध्यादेशाचा संदर्भ देत आहेत म्हणून गैर आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, हे विधेयक मताला टाकावे अशी माझी सूचना आहे.

**तालिका सभापती** (श्री.भास्कर जाधव) : आपण गुडफेथमध्ये हे विधेयक चर्चेला घेतले आहे.

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य पोलची मागणी करीत असतात)

श्री.हसन मुश्रीफ : याला काय अर्थ आहे?

(नंतर 3 व्ही.1.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ KGS/ KTG/ श्री. भोगले नंतर.... 17:05

श्री. हसन मुश्रीफ : महोदय, विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्यांनी असा आग्रह धरणे योग्य नाही, याला काय अर्थ आहे ? .....अडथळा.......

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य विधेयक मतास टाकावे असा आग्रह धरतात.)

श्री. हसन मुश्रीफ : महोदय, हे विधेयक सन्माननीय सदस्यांच्या सहकार्याने व सामंजस्यानेच आपल्याला पास करावयाचे आहे. मी या विधेयकाच्या चर्चेला उत्तर देताना सुरुवातीलाच सांगितले की शासनाकडे महानगरपालिका उपकर लागू करण्यासंबंधी निदेश देण्याचे अधिकार राहतील. दुसरे म्हणजे .....अडथळा......विरोधी पक्षाच्या सदस्यांची संख्या जास्त आहे म्हणून आपण आता मतदानाची मागणी करणे योग्य नाही. आजपर्यंत आपण सामंजस्यानेच सर्व कामकाज करीत आलो आहोत. राज्याच्या हिताचा विषय आहे आणि अशा प्रकारे झाले तर गोंधळाची स्थिती निर्माण होणार आहे. आज जर सभागृहाने हे विधेयक पास केले नाही तर अध्यादेशाची मुदत संपेल म्हणून माझी सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, त्यांनी अशा प्रकारे आग्रह धरु नये......

श्री. मधुकर चव्हाण : महोदय, अशा प्रकारे चुकीचा कायदा आपल्याला करता येणार नाही. या अध्यादेशात "आईदर ऑर" असे त्यात म्हटले आहे. तसेच आपण अशाच प्रकारे पास करण्याचा प्रयत्न केला तर आम्ही "पोल" मागू.

श्री. हसन मुश्रीफ : याला अर्थ नाही. सोमवार दिनांक 29 डिसेंबर, 2008 रोजी पुन्हा या बिलावर उत्तर देताना सन्माननीय सदस्यांच्या शंकांचे निरसन करण्याचा प्रयत्न करण्यात येईल.

**तालिका सभापती** : विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य हे ज्येष्ठ सदस्य आहेत. त्यांना माहीत आहे की, अजून पोल मागण्याची वेळ आलेली नाही, हे सदस्यांनी लक्षात घ्यावे. तसेच सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले यांनाही बोलावयाचे आहे, ते केव्हापासून परवानगी मागत आहेत, परंतु मी त्यांचे नाव पुकारले नाही.

श्री. हसन मुश्रीफ : महोदय, या कायद्यामुळे कुठलीही संदिग्धता निर्माण होणार नाही, गोंधळाची परिस्थिती निर्माण होणार नाही हे सन्माननीय सदस्यांनी समजून घ्यावे.

श्री. अरविंद सावंत : महोदय, विधेयक पास करण्याची जबरदस्ती करुन चालणार नाही. तसाच आग्रह धरला तर आम्ही पोल मागणार आहोत, हे लक्षात घ्यावे.

.......2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ KGS/ KTG/

**तालिका सभापती** : सभागृहाच्या संमतीनेच हे विधेयक चर्चेसाठी आलेले आहे. माननीय सभापतींसमोर देखील आपण मान्य केलेले आहे. म्हणून अशा प्रकारचा आग्रह न धरता यातून मार्ग सुचवावा, अशी माझी विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांना विनंती आहे.

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य हे विधेयक शासनाने परत घेण्याची सूचना करतात.)

श्री. हसन मुश्रीफ : महोदय, या विधेयकावरील उत्तर आपण सोमवारला ठेवू. जेणेकरुन सन्माननीय सदस्यांच्या शंकांचे आणखी निरसन करता येईल.

श्री. अरविंद सावंत : महोदय, शासनाला पराभव डोळ्यासमोर दिसत आहे. परंतु येथे पराभव आणि विजयाचा प्रश्न नाही तर मुलभूत नियम पायदळी तुडवून कायदा पास करुन घेण्याचा प्रयत्न करणे योग्य नाही. अशा प्रकारे दादागिरी करुन कायदा पास करता येत नाही. शासनाला सोमवारला हे विधेयक आणायचेच असेल तर त्यात तशी सुधारणा करुन सभागृहात चर्चेसाठी आणावे, आमची अडचण नाही. परंतु शासनाला तशी सुधारणा करुन आणायचेच नाही.

श्री. हसन मुश्रीफ : महोदय, सन्माननीय सदस्यांच्या शंकांचे निरसन करुन पुन्हा सोमवारला हे विधेयक आणण्यात येईल. सन्माननीय सदस्यांचे समाधान हेच शासनाचे समाधान असेल. विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांच्या विरुध्द जाऊन हे विधेयक पास करायचे नाही. सभागृहाच्या शंकांचे निरसन करुन हे विधेयक आपण पास करु.

**तालिका सभापती** : या विषयावर आता चर्चा करावी की नाही याबाबत विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनीच सांगावे. त्याशिवाय मी पुढील प्रोसेस सुरु करणार नाही. मला एवढेच विचारावयाचे आहे की, विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य, हे विधेयक मंजूर करण्यासाठी सहकार्य करणार काय ? कारण आपल्या मदतीशिवाय विधेयक पास होणार नाही याची मला पूर्ण कल्पना आहे. त्यानंतरच आपण पुढचा निर्णय घेऊ. आता माननीय मंत्री महोदय "ऑन लेग" आहेत.....

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती ....**

या विधेयकाच्या संदर्भात आता काय करावयाचे हे सन्माननीय सदस्य श्री. रावते साहेबांनीच सांगावे. मी अजूनपर्यंत बिलाच्या प्रोसिजरला सुरुवात केलेली नाही. हे विधेयक मंजूर करण्यास सन्माननीय सदस्यांनी मला सहकार्य करावे. आपली मदत मिळाल्याशिवाय हे विधेयक मंजूर होणार नाही.

ठीक आहे, सन्माननीय मंत्रीमहोदय श्री. हसन मुश्रीफ साहेब ऑन लेग राहतील. सन्माननीय मंत्रीमहोदयांनंतर सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले यांना विधेयकाच्या संदर्भात विचार मांडता येतील.

सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन सोमवार दिनांक 29 डिसेंबर 2008 रोजी सकाळी 10.00 ते 11.45 वाजेपर्यंत विशेष बैठक घेण्यात येईल त्यानंतर सभागृहाची नियमित बैठक दुपारी 12.00 वाजता पुन: भरेल.

(सभागृहची बैठक सायंकाळी 5 वाजून 12 मिनिटांनी सोमवार, दिनांक 29 डिसेंबर, 2008 रोजीच्या सकाळी 10.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

---------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही